# पुणे जिल्हा

## राजगड

किल्ल्याची उंची : १३९४ मीटर.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पुणे
जिल्हा : पुणे
श्रेणी : मध्यम
किल्ले राजगड, हिंदवी स्वराज्याची राजधानी
गडांचा राजा, राजियांचा गड

राजगड हे शिवाजी महाराजांचे पहिले प्रमुख राजकीय केंद्र. बुलंद, बेलाग आणि बळकट राजगड आजही आपल्याला हिंदुस्वराज्याची ग्वाही देत उभा आहे. पुण्याच्या नैऋत्येला ४८ कि.मी. अंतरावर अन् भोरच्या बायव्येला २४ कि.मी. अंतरावर नीरा-वेळवंडी-कानंदी आणि गुंजवणी नद्यांच्या खो-यांच्या बेचक्यात मुरुंबदेवाचा डोंगर उभा आहे. मावळभागामध्ये राज्यविस्तार साध्य करण्यासाठी राजगड आणि तोरणा हे दोन्ही किल्ले मोक्याच्या ठिकाणी होते. तोरणा जरी अभेद्य असला तरी बालेकिल्ला आकाराने लहान असल्यामुळे राजकीय केंद्र म्हणून हा किल्ला सोयीचा नव्हता. त्यामानाने राजगड दुर्गम असून त्याचा बालेकिल्ला तोरणा किल्ल्यापेक्षा मोठा आहे. शिवाय राजगडाकडे कोणत्याही बाजूने येताना एखादी टेकडी किंवा नदी ओलांडावीच लागते एवढी सुरक्षितता होती,म्हणून आपले राजकीय केंद्र म्हणून शिवाजी महाराजांनी राजगडाची निवड केली.राजगडाला तीन माच्या व बालेकिल्ला आहे. बालेकिल्ला सर्वात उंच असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १३९४ मीटर आहे.
शिवतीर्थ रायगड श्री शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचा विस्तार दाखवतो तर दुर्गराज राजगड त्यांच्या महत्वाकांक्षेची उंची दाखवतो.

### इतिहास : राजगडा संबधीचे उल्लेख

१)‘राजगड आणि तोरणा हे दोन्ही किल्ले अभेद्य स्वरूपाचे असून अशा ठिकाणी वसले आहेत की मावळयांचा नेता शिवाजी याला राज्यविस्तारासाठी किल्ल्यांचा भरपूर उपयोग झाला.’
-जेम्स ड्ग्लस(बुक ऑफ बॉम्बे)
२) साकी मुस्तैदखान त्याच्या मासिरे आलिमगिरे नावाच्या ग्रंथात म्हणतो- ‘राजगड हा अतिशय उंच. त्याची उंची पाहता सर्व किल्ल्यात तो श्रेष्ठ होय असे म्हणता येईल. त्याचा घेर १२ कोसांचा आहे. त्याच्या मजबूतीची तर कल्पनाही करवत नव्हती. डोंगराच्या द-याखो-यातून आणि घनघोर अरण्यातून वा-याशिवाय दुसरे काही फिरकू शकत नाही. येथे पावसालाच फक्त वाट मिळू शकते. इतर कोणीही त्यातून जाऊ शकत नाही.’
३) महेमद हाशिम खालीखान याने ‘मुन्तखबुललुबाब-ए-महेमदॉशाही ’ नामक ग्रंथामध्ये म्हणतो,‘राजगड किल्ल्याचे मी कसे वर्णन करु? काय त्या किल्ल्याची उंची, काय त्यांचा विस्तार !जणू काही आकाशच पसरले होते त्याचे टोक पाहून छाती दडपे. त्याच्या भाराने पृथ्वी धारण करणारा पाताळातील वृषभ ओरडत असावा. त्या भागात सापांचा सुळसुळाट होता. जिकडे तिकडे निरनिराळया प्रकारचे हिंस पशु दिसत. त्यामुळे सगळे त्रस्त होऊन गेले. राजगड किल्ला म्हणजे डोंगराची रांग त्याचा घेर बारा कोसांचा त्याला सगळीकडून वेढा घालणे कठिण होते.’

इतिहास :-

इतिहासातून अस्पष्ट येणा-या उल्लेखांवरुन सातवाहनपूर्व म्हणजे साधारण २००० वर्षा पूर्वी पासूनचा हा डोंगर आहे. ब्रम्हर्षी ऋषींचे येथे असणारे वास्तव्य व याच ब्रम्हर्षी ऋषींच्या नावावरुन येथे स्थापन झालेले श्री ब्रम्हर्षी देवस्थान यावरुन डोंगर फार पुरातन असावा.
राजगडाचे पूर्वीचे नाव होते मुरंबदेव हा किल्ला बह्मनी राजवटी मध्ये याच नावाने ओळखला जात असे अर्थात त्यावेळी गडाचे स्वरूप फार काही भव्य दिव्य असे नव्हते. इसवी सन १४९० च्या सुमारास अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहमद बहिरी याने वालेघाट आणि तळकोकणातील अनेक किल्ले जिंकून पश्चिम महाराष्टात प्रभाव निर्माण केला आणि याच वेळी त्याने मुरूंबदेव हा किल्ला हस्तगत केला. मुरुमदेवाचे गडकरी बिनाशर्त शरण आल्यामुळे अहमद बहिरीला किल्ला जिंकण्यास विशेष प्रयास करावे लागले नाही. पुढे किल्ल्यावर निजामशाहीची सत्ता प्रस्थापित झाल्यावर १२५ वर्षे किल्ल्यावर कोणाचाही हल्ला झाला नाही. इसवी सन १६२५ च्या सुमारास मुरूमदेव किल्ला निजामशाही कडून आदिलशही कडे आला. निजामशहाच्या वतीने बाजी हैबतराव शिलीमकर व त्याचे वडील रुद्राजी नाईक या किल्ल्याची व्यवस्था पाहत होते. मलिक अंबरच्या आदेशानुसार बाजी हैबरावाने मुरुमदेवाचा ताबा आदिलशाही सरदार हैबतखामाकडे दिला.

१६३० च्या सुमारास हा किल्ला आदिलशहाकडून परत निजामशाहीत दाखल झाला. शहाजीराजांचा अधिकारी सोनाजी या किल्ल्याचा कारभार पाहू लागला. विजापूर आदिलशाही सैन्याच्या एका तुकडीने किल्ल्यावर हल्ला केला. त्यात सोनाजी जखमी झाला. म्हणून बालाजी नाईक शिळीमकर आपल्या तुकडीसह मुरुमदेवाच्या रक्षणार्थ धावून गेला. तेव्हा बालाजी नाईक जखमी झाला. या कामगिरी बद्दल शहाजीराजांनी बाळाजी नाईक शिलीमकरांचा नंतर सन्मानही केला.

शिवरायांनी मुरुमदेवाचा किल्ला कधी घेतला याचा लिखीत पुरावा आज मात्र उपलब्ध नाही त्यामुळे किल्ला ताब्यात कधी आला हे सांगणे अनिश्चितच आहे.

शिवचरित्र साहित्य खंडाच्या दहाव्या खंडात प्रसिद्ध झालले एक वृत्त सांगते की, ‘शिवाजीने शहामृग नावाचा पर्वत ताब्यात घेऊन त्यावर इमारत बांधली.’

सभासद बखर म्हणतो की,

‘मुराबाद म्हणोन डोंगर होता त्यास वसविले त्याचे नाव राजगड म्हणोन ठेविले. त्या गडाच्या चार माच्या वसविल्या सभासदाने बालेकिल्ल्याला सुद्धा एक माची म्हणून गणली आहे.’

मात्र सन १६४६ ते १६४७ च्या सुमारास शिवरायांनी तोरणा किल्ल्यासोबत हा किल्ला जिंकून घेतला. हा किल्ला बांधण्याचे काम महाराजांनी मोठ्या झपाट्याने सुरु केले. त्या डोंगरास तीन सोंडा किंवा माच्या होत्या त्यासही तटबंदी केली. मुख्य किल्ल्यास राजगड नाव ठेवून एक इमारत उभी केली. तीन माच्यांना सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती ही नावे दिली. शिरवळ नजीक खेडबारे नावाचा गाव होता तेथे रान फार होते त्या ठिकाणी फर्माशी आंब्याची झाडे लावून पेठ वसविली व तिचे नाव शिवापूर असे ठेवले.इसवीसन १६६० मध्ये औरंगजेबाच्या आज्ञेनुसार शाहिस्तेखानाने शिवाजी महाराजांच्या प्रदेशावर स्वारी केली. फारसी साधनांमधून अशी माहिती मिळते की शाहिस्तेखानाने राजगडाकडे फौज पाठविलेली होती ह्या फौजेने राजगडाच्या जवळपासची काही खेडी जाळून उध्वस्त केली परंतु प्रत्यक्ष राजगड किल्ला जिकंण्याचा प्रयत्न मात्र केला नाही ६ एप्रिल १६६३ रोजी शाहीस्तेखानावर छापा घालून शिवाजी महाराज राजगडावर परतले.

सन १६६५ मध्ये मिर्झाराजा जयसिंग याने शिवरायांच्या प्रदेशावर स्वारी केली. दाऊदखान आणि रायसिंग या दोन सरदारांना त्याने या परिसरातील किल्ले जिंकण्यासाठी पाठविले. ३० एप्रिल १६६५ रोजी मुगल सैन्याने राजगडावर चाल केली. परंतु मराठ्यांनी किल्ल्यावरुन विलक्षण मारा केल्या मुळे मुगलांना माघार घ्यावी लागली.

शिवाजी महाराजांनी जयसिंग बरोबर तह करताना २३ किल्ले देण्याचे मान्य केले व स्वत:कडे १२ किल्ले ठेवले. या १२ किल्ल्यांमध्ये राजगड, तोरणा, लिंगाणा, रायगड यांचा समावेश होतो. सभासद बखरीतील उल्लेख खालील प्रमाणे आहे-

‘सत्तावीस किल्ले तांब्रास दिले. निशाणे चढविली वरकड राजगड व कोट मोरोपंत पेशवे व निलोपंत मुजुमदार व नेताजी पालकर सरनोबत असे मातुश्रींच्या हवाली केले व आपणही दिल्लीस जावे, बादशाहाची भेट घ्यावी असा करार केला.’

शिवाजी महाराज आग्र्याहून निसटून निवडक लोकांनिशी १२ सप्टेंबर १६६६ ला राजगडाला सुखरुप पोचले. २४ फेब्रुवारी १६७० रोजी राजगडावर राजारामचा जन्म झाला. सिंहगड किल्ला घेण्यासाठी शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसुरे यास राजगडावरुनच १६७० मध्ये पाठविले. सन १६७१-१६७२ मध्ये शिवाजी महाराजांनी रायगड स्थान राजधानी साठी निश्चित केले आणि राजधानी रायगडावरुन राजगडाकडे हलविली.

३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांचे निधन झाल्यावर स्वराज्यावर औरंगजेबाच्या स्वारीचे संकट कोसळले. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांना पकडून ठार मारले यानंतर मुगलानी मराठ्यांचे अनेक गड जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. किशोरसिंह हाडा या मुगल सरदाराने जून १६८९ मध्ये राजगड जिंकून घेतला. औरंगजेबाने अबुलखैरखान याला राजगडाचा अधिकारी म्हणून नेमले. मात्र अद्याप संभाजी महाराजांना पकडल्याची वार्ता पसरली नव्हती त्यामुळे मराठ्यांची फौज राजगडाभोवती गोळा झाली आणि आपल्या बळावर राजगड पुन्हा जिंकून घेतला.

जानेवारी १६९४ मधील एका पत्रात शंकराजी नारायण सचिव याने 'कानद खो-यातील देशमुखांनी राजगडाच्या परिसरातील प्रदेशाचे मुगलांच्या हल्ल्यापासून संरक्षण केल्या बद्दल त्यांची इनामे त्यांचकडे चालवावीत ' असा आदेश दिला होता.

पुढे ११नोहेंबर १७०३ मध्ये स्वत: औरंगजेब जातीनिशी हा किल्ला जिंकण्यासाठी पुण्याहून निघाला. औरंगजेबाचा हा प्रवास मात्र सुखकर झाला नाही. राजगडाच्या अलीकडे चार कोस घाटातला रस्ता आहे. रस्ता केवळ दुर्गम होता औरंगजेबाने एक महिना आधी काही हजार गवंडी, बेलदार आणि कामदार यांना रस्ता नीट करण्याच्या कामावर पाठविले. पण रस्ता काही नीट झाला नव्हता त्यामुळे बरेचशे सामान आहे तिथे टाकून द्यावे लागले. २ डिसेंबर १७०३ रोजी औरंगजेब राजगडा जवळ पोहचला. किल्ल्यास मोर्चे लावले. किल्ल्याचा बुरुज तीस गज उंच त्याच उंचीचे दमदमे तयार करुन त्यावर तोफा चढविल्या व बुरुजावर तोफांचा भडीमार करु लागले. तरबियतखान आणि हमीबुद्दीनखान याने पद्मावतीच्या बाजूने मोर्चे लावले. पुढे दोन महिने झाले तरी किल्ला काही हातात येत नव्हता. शेवटी ४ फेब्रुवारी १७०३ रोजी राजगड औरंगजेबाच्या हातात पडला. इरादतखान याला औरंगजेबाने किल्लेदार नेमले आणि किल्ल्याचे नाव ‘नाबिशहागड’असे ठेवले.

२९ मे १७०७ रोजी गुणाजी सावंत याने पंताजी शिवदेवा बरोबर राजगडावर स्वारी करुन तो किल्ला जिंकून घेतला आणि पुन्हा किल्ला मराठयांच्या स्वाधीन झाला. पुढे शाहुच्या ताब्यात किल्ला आल्यावर १७०९ मध्ये शाहुने सुवेळा माचीस ३०० रुपये व संजीवनी

माचीस १०० रुपये अशी व्यवस्था लावून दिली.

पेशवेकाळात राजगड हा सचिवांच्या ताब्यात होता. पेशवाई मध्ये आर्थिक परिस्थिती वांरवार बिघडत असल्याने किल्ल्यावर शिबंदीचे पगारही वेळेवर होत नसत. अशाच परिस्थिती मध्ये राजगडावरील सेवकांचे पगार एक वर्षभर थकले होते - राजवाडे खंड १२.

यानंतर राजगड भोर संस्थानाच्या ताब्यात गेला. त्याची व्यवस्था पाहण्यासाठी सहा अधिकारी नेमले. सुवेळा माचीसाठी सरनोबत शिलीमकर, पद्मावती माचीसाठी सरनोबत-पवार घराण्यातील, संजीवनी माचीसाठी सरनोबत- खोपडे घराण्यातील या शिवाय नाईक व सरनाईक हे अधिकारी सुद्धा असत.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

पद्मावती तलाव :-

गुप्तदरवाजा कडून पद्मावती माचीवर आल्यावर समोरच सुबक बांधणीचा विस्तीर्ण असा तलाव आढळतो. तलावाच्या भिंती आजही शाबूत आहेत. तलावात जाण्यासाठी त्याच्या भिंतीतच एक कमान तयार केलेली आहे. तलावात सध्या गाळ मोठ्या प्रमाणात साचला आहे.

रामेश्वराचे मंदिर:-

पद्मावती देवीच्या मंदिरा समोरच पूर्वभिमुख असे रामेश्वर मंदिर आहे. मंदिरातील शिवलिंग शिवकालीन आहे. मंदिरात असणारी मारूतिरायांची मूर्ती दक्षिणाभिमुख आहे.

राजवाडा:

रामेश्वर मंदिरापासून पाय-यांनी वर जातांना उजवीकडे राजवाड्याचे काही अवशेष दिसतात.या राजवाड्यामध्ये एक तलाव आहे.या शिवाय राजवाड्यापासून थोडे पुढे गेल्यावर अंबारखाना लागतो.याच्या थोडे पुढे सदर आहे. सदरेच्या समोर दारुकोठार आहे.

सदर:-

ही गडावरची सर्वात महत्वाची अशी वास्तू. रामेश्वर मंदिरापासून पाय-यांनी वर गेल्यावर उजव्या हातास राजवाड्याचे अवशेष आहेत. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे सदर आहे. पूर्वी या सदरेत ओटीच्या कडेस मधल्या खणात एक जुना गालिचा व त्यावर लोड ठेवलेला असे.अनेक इतिहास तज्ज्ञांचे असे मत आहे की ही सदर नसून तटसरनौबताचे घर आहे.

पाली दरवाजा:-

पाली दरवाजाचा मार्ग पाली गावातून येतो. हा मार्ग फार प्रशस्त असून चढण्यासाठी पाय-या खोदल्या आहेत.

पाली दरवाजाचे पहिले प्रवेशद्वार भरपूर उंचीचे आणि रुंदीचे आहे, यातून हत्ती सुद्धा अंबारीसह आत येऊ शकतो. हे प्रवेशद्वार ओलांडून २०० मी. पुढे गेल्यावर भरभक्कम बांधणीचे दुसरे प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराचे संरक्षण चांगल्या बुलंद अशा बुरुजांनी केलेले आहे. या दरवाजाचे वैशिष्ट्य म्हणजे दरवाजाच्या वर आणि बुरुजावर परकोट बांधलेले आहेत. या परकोंटाना गोल आकाराचे झरोके ठेवलेले आढळतात. अशा झरोक्यांना 'फलिका' असे म्हणतात. या फलिकांचा उपयोग तोफा डागण्यासाठी होत असे. दरवाजातून आत शिरल्यावर दोन्ही बाजूस पहारेक-यांच्या देवड्या आहेत. या दरवाजाने गडावर आल्यावर आपण पद्मावती माचीवर पोह्चतो.

गुंजवणे दरवाजा:-

गुंजवण दरवाजा म्हणजे एकामागे एक असलेल्या तीन प्रवेशद्वारांची एक मालिक आहे. पहिला दरवाजा अत्यंत साध्या बांधणीचा आहे. मात्र दरवाजाला दोन्ही बाजूस भरभक्कम बुरुज आहे. गुंजवणे दरवाजाच्या दुस-या प्रवेशद्वाराला वैशिष्टपूर्ण कमान आहे.या दरवाजाच्या शेवटी व गणेश पट्टीच्या खाली दोन्हीकडे दोन उपडे घट घेतलेल्या व एका कमलकलिके समोर असलेल्या सोंडा आहेत. सांप्रत या शिल्पावरुन श्री किंवा गजशिल्प तयार झाले असावे असे अनुमान निघते. या सर्व गोष्टींवरुन असे अनुमान निघते की,हे प्रवेशद्वार शिवपूर्वकालात बांधलेले असावे. या प्रवेशद्वारातून आत आल्यावर दोन्ही बाजूस

पद्मावती माची:-

राजगडाला एकूण ३ माच्या आहेत. या पैंकी सर्वात प्रशस्त अशी माची म्हणजे पद्मावती माची. पद्मावती माची केवळ एक लष्करी केंद्र नसून निवासाचे ठिकाणही होते. माचीवर बांधकामाचे अनेक अवशेष सापडतात. पद्मावती देवीचे मंदिर,सईबाईंची समाधी ,हवालदारांचा वाडा, रत्नशाला, सदर, पद्मावती तलाव, गुप्त दरवाजा, पाली दरवाजा, गुंजवणे

दरवाजा, दारुगोळ्याची कोठारे या वास्तू आजही शिल्लक आहेत.याशिवाय पद्मावती माचीवर ब्राम्हणवर्गाची आणि अष्टप्रधान मंडळाची काही घरे आहेत.

पद्मावती मंदिर :-

सध्या २००२ मध्ये या मंदिराचा जीर्णोध्दार केला आहे. शिवरायांनी किल्ले मुरुंबदेवाचे राजगड म्हणून नामकरण केल्यावर येथे असलेल्या जागेवर पद्मावती देवीचे मंदिर बांधले याचा उल्लेख आढळतो. सध्या मंदिरात आपल्याला तीन मूर्त्या दिसतात. मुख्य पुजेचे मूर्ती भोरच्या पंत सचिवांनी स्थापन्न केली आहे. त्याच्या उजव्या बाजुला लहान असलेली मूर्ती शिवरायांनी स्थापित केलेली आहे तर दोन मूर्तीच्या मध्ये शेंदूर

पहारेक-यांच्या देवड्या आहेत.फासलेला तांदळा म्हणजे पद्मावती देवीची मर्ती आहे. या मंदि्रात सध्या २० ते ३० जणांना राहता येते. मंदिराच्या बाजूसच पाण्याचे टाके आहे. यातील पाणी पिण्यासाठी योग्य आहे. मंदिराच्या समोरच सईबांईची समाधी आहे.

संजीवनी माची:-

सुवेळा माचीच्या बांधणीनंतर शिवाजीमहाराजांनी या माचीचे बांधकाम करण्यास सुरवात केली. माचीची एकूण लांबी अडीच कि.मी. आहे. ही माची सुद्धा ३ टप्प्यांमध्ये बांधलेली आहे. संजीवनी माचीवरील घरांचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत. माचीच्या प्रत्येक टप्प्यास चिलखती बुरुज आहेत. पहिला टप्पा खाली उतरुन उत्तरेकडे वळून तटालागत थोडे मागे चालत गेल्यावर तीन तिहेरी बांधणीचे बुरुंज लागतात. या तिन्ही बुरुजावर शिवकालात प्रचंड मोठ्या तोफा असाव्यात या माचीवर अनेक पाण्याची टाकी आहेत. या माचीला एकूण १९ बुरुज आहेत. माचीला भुयारी परकोटाची योजना केलेली आहे. या भुयारातून बाहेरील तटबंदी कडे येण्यासाठी दिंड्यांची व्यवस्था केलेली आहे. संजीवनी माचीवर आळु दरवाजाने सुद्धा येते. आळु दरवाजा पासून राजगडाची वैशिष्ट्य असलेली चिलखती तटबंदी दुतर्फा चालू होते. दोन्ही तटांमधील अंतर अर्धा-पाऊण मीटर असून खोली सुमारे ६ ते ७ मीटर आहे. या भागात बुरुजांच्या चिलखतात उतरण्यासाठी पाय-यांच्या दिंड्या आहेत. तसेच नाळेतून वर येण्यासाठी दगडी सोपान आहेत. माचीवर तटबंदी मध्ये काही जागी प्रातर्विधीची ठिकाणे आढळतात. दुहेरी तटबंदीच्या शेवटी बलाढ्य बुरुज आहेच यांचा उपयोग दूरवर नजर ठेवण्यासाठी होत असे.

आळु दरवाजा:-

संजीवनी माचीवर येण्यासाठी या दरवाजाचा उपयोग होत असे. तोरणा वरुन राजगडावर येण्याचा एकमेव मार्ग या दरवाजातून जात असे. आळु दरवाजा सद्यस्थितीला ब-यापैकी ढासाळलेल्या अवस्थतेत आहे. या दरवाजावर एक शिल्प आहे. वाघाने एक सांबार उताणे पाडले आहे असे चित्र या शिल्पात दाखवले आहे.

सुवेळा माची:-

मुरुंबदेवाचा किल्ला ताब्यात आल्यानंतर शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या पूर्वेकडील डोंगररांगेला भरभक्कम तटबंदी बांधली, आणि माचीला सुवेळा माची असे नाव ठेवले. पूर्वेकडे ही माची असल्यामुळे या माचीचे नाव सुवेळा असे ठेवले. सुवेळा माची ही संजीवनी एवढी लांब नाही मात्र या माचीचे सुद्धा ३ टप्पे आहेत. पूर्वेकडे ही माची चिंचोळी होत गेलेली आहे.

माचीच्या प्रारंभी टेकडी सारखा भाग आहे याला डुबा असे म्हणतात. या डुब्याच्या डावीकडून रानातून जाणा-या वाटेने गेल्यावर शिबंदी घरटे दिसतात. तेथे डाव्या हातास एक दक्षिणमुखी वीर मारुती व त्याच्या जवळ पाण्याचे टाक आहे. येथे असणारे चौथरे येसाजी केक, तानाजी मालसुरे व शिलींबकर या सरदारांची होती. येथून सरळ जाणारी वाट सुवेळा माचीच्या दुस-या टप्प्यावर जाते तर डावीकडे जाणारी वाट काळेश्वरी बुरुजाच्या परिसरात घेऊन जाते. आपण माचीच्या दिशेने थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे एक सदर लागते. येथून पुढे तटबंदीच्या खरा भाग सुरु होतो. येथील तटबंदी दोन टप्प्यांत विभागली असून प्रत्येक टप्प्याच्या शेवटी चिलखती बुरुज आहे. दुस-या टप्प्यात गेल्यावर तटबंदीच्या दोन्ही बाजूस आतील अंगास भुयारी चिलखती परकोटाची रचना केली आहे. दुस-या टप्पयाकडे जातांना एक उंच खडक लागतो आणि या खडकात ३ मीटर व्यासाचे एक छिद्र आढळते या खडकालाच नेट किंवा 'हत्तीप्रस्तर' असे म्हणतात. या हत्तीप्रस्तराच्या अलीकडे तटातील गणपती आढळतो व तेथूनच पुढे तटातून खाली जाण्यासाठी गुप्त दरवाजा आहे. या दरवाजाला मढे दरवाजा असे म्हणतात.हत्ती प्रस्तराच्या पुढील भागात सुद्धा एक असाच गुप्त दरवाजा

सुवेळामाचीच्या सर्वात शेवटच्या टप्प्यात खालच्या भागात वाघजाईचे शिल्प आहे.

काळेश्वरी बुरुज आणि परिसर:-

सुवेळा माचीच्या दुस-या टप्प्याकडे जाणा-या वाटेच्या उजवीकडे वळल्यावर आपल्याला पाण्याची काही टाकी दिसतात. पुढे रामेश्वर मंदिराचे काही अवशेष आहेत.या रामेश्वर मंदिरात शिवलिंग, भग्न नंदी, एक यक्षमूर्ती अशी शिल्पे आढळतात.

या रामेश्वर मंदिराच्या वरील बाजूस शिलाखंडावर गणेशाची प्रतिमा, पार्वती, शिवलिंग अशी शिल्पे आहेत. येथून थोडेसे पुढे गेल्यावर काळेश्वरी बुरुज आहे. येथेच तटात एक गुप्त दरवाजा देखील आढळतो.

बालेकिल्ला:-

राजगडाच्या सर्वात उंच भाग म्हणजे बालेकिल्ला होय. या बालेकिल्ल्याकडे जाणारा रस्ता कठीण आणि अरुंद आहे. चढण संपल्यानंतर बालेकिल्ल्याचा दरवाजा लागतो. यालाच महादरवाजा असे ही म्हणतात. आजही दरवाजा चांगल्या स्थितीत आहे. प्रवेशद्वाराची उंची ६ मीटर असून प्रवेशद्वारावर कमळ, स्वस्तिक ही शुभचिन्ह कोरलेली आहेत. बालेकिल्ल्याला साधारण १.५ मीटर उंचीची तटबंदी बांधलेली असून विशिष्ट अंतरावर बुरुजही ठेवलेले आहेत. दरवाजातून आत गेल्यावर समोरच जननीमंदिर आहे. येथून पुढे गेल्यावर चंद्रतळे लागते. तळ्याच्या समोरच उत्तरबुरुज आहे. येथून पद्मावती माची आणि इतर सर्व परिसर दिसतो. बुरुजाच्या खालून एक पायवाट बालेकिल्ल्यावर येते आता मात्र ही वाट एक मोठा शिलाखंड टाकून बंद केलेली आहे.ही वाट ज्या बुरुजावरून वर येते त्या बुरुजाला उत्तर बुरुज असे म्हणतात.येथून संपूर्ण राजगडाचा घेरा आपल्या लक्षात येतो.या उत्तर बुरुजाच्या बाजुला ब्रम्हर्षी ऋषींचे मंदिर आहे.या शिवाय बालेकिल्ल्यावर काही भग्न अवस्थेतील इमारती चौथरे, वाड्यांचे अवशेष आढळतात.

राजगड किल्ला संपूर्ण पाहण्यासाठी साधारण २ दिवस लागतात. गडावरुन तोरणा, प्रतापगड, रायगड, लिगांणा, सिंहगड, पुरंदर, वज्रगड, मल्हारगड, रोहीडा, रायरेश्वर आणि लोहगड, विसापूर हे किल्ले दिसतात.

**गडावर जाण्याच्या वाटा** : गडावर जाण्यासाठी अनेक मार्ग आहेत.

१.गुप्तदरवाज्याने राजगड : पुणे- राजगड अशी एस.टी पकडून आपल्याला वाजेघर या गावी उतरता येते.बाबुदा झापा पासून एक तासाच्या अंतरावर रेलिंग आहेत.यांच्या साह्याने अत्यंत कमी वेळात राजगडावर जाता येते.यावाटेने गडावर जाण्यास ३ तास लागतात.

२.पाली दरवाज्याने राजगड:- पुणे-वेल्हे एस.टी.ने वेल्हे मार्गे पाबे या गावी उतरुन कानद नदी पार करून पाली दरवाजा गाठावा.ही वाट पाय-याची असून सर्वात सोपी आहे.यावाटेने गडावर जाण्यास ३ तास लागतात

३.गुंजवणे दरवाज्याने राजगड... पुणे वेल्हे या हमरस्त्यावरील मार्गासनी या गावी उतरावे आणि तिथून साखरमार्गे गुंजवणे या गावात जाता येते.ही वाट अवघड आहे.या वाटेवरून गड गाठण्यास अडीच तास लागतात.माहितगारा शिवाय या वाटेचा उपयोग करू नये.

४.अळु दरवाज्याने राजगड:- :भुतोंडे मार्गे आळु दरवाज्याने राजगड गाठता येतो.शिवथर घळीतून ही अळू दरवाज्याने राजगड गाठता येतो.

५.गुप्तदरवाजामार्गे सुवेळामाची :- :गुंजवणे गावातून एक वाट जंगलातून गुप्तदरवाजेमार्गे सुवेळा माचीवर येते.

**राहण्याची सोय** : १.गडावरील पद्मावती मंदिरात २० ते २५ जणांची रहाण्याची सोय होते.

२.पद्मावती माचीवर रहाण्यासाठी पर्यटक निवासाच्या खोल्या आहेत.

**जेवणाची सोय** : आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय** : पद्मावती मंदिराच्या समोरच बारामही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : ३ तास.

# सिंहगड

किल्ल्याची उंची : ४४०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: पुणे
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

पुण्याच्या नैऋत्येला साधारण २५ कि.मी अंतरावर असणारा हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ४४०० फूट उंच आहे. सह्याद्रीच्या पूर्व शाखेवर पसरलेल्या भुलेश्वराच्या रांगेवर हा गड आहे. दोन पाय-यांसारखा दिसणारा खांदकड्याचा भाग आणि दूरदर्शनचा उभारलेला मनोरा ह्यामुळे पुण्यातून कुठूनही तो पटकन ध्यानी येतो. पुरंदर, राजगड, तोरणा, लोहगड, विसापूर, तुंग असा प्रचंड मुलूख गडावरून दिसतो.

इतिहास : हा किल्ला पूर्वी आदिलशाहीत होता. दादोजी कोंडदेव हे विजापूरकरांकडून म्हणजेच आदिलशाहिकडून सुभेदार म्हणून नेमले होते. पुढे इ.स.१६४७ मध्ये दादोजी कोंडदेवांचे निधन झाल्यावर कोंडाण्यावरील किल्लेदार सिद्दी अंबर याला लाच देऊन शिवाजी महाराजांनी हा किल्ला स्वराज्यात आणला व या गडावर आपले लष्करी केंद्र बनवले. पुढे इ.स.१६४९ मध्ये शहाजी राजांच्या सुटकेसाठी शिवाजी महाराजांनी तो परत आदिशहाला दिला. पुरंदरच्या तहात जे किल्ले मोगलांना दिले त्यामध्ये सिंहगड पण होता. मोगलांतर्फे उदेभान राठोड हा कोंडाण्याचा अधिकारी होता. हा मूळचा राजपूत होता पण तो बाटून मुसलमान झाला.
सिंहगड हा मुख्यत: प्रसिद्ध आहे तो तानाजी मालुसरे यांच्या बलिदानामुळे. शिवाजी महाराज जेव्हा आग्र्याहून सुटून परत आले तेव्हा त्यांनी दिलेले गड परत घ्यायला सुरुवात केली. तेव्हा तानाजीने कोंडाणा आपण घेतो म्हणून कबूल केले.
या युद्धाबाबत सभासद बखरीत पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो:
तानाजी मालूसरा म्हणून हजारी मावळियांचा होता त्याने कबूल केले की,‘कोंडाणा आपण घेतो ’, असे कबूल करून वस्त्रे,विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखाली गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून रात्री गडाच्या कड्यावरून चढवले. गडावर उदेभान रजपूत होता त्यांस कळ्ले की, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हाती तोहा बार घेऊन, हिलाल (मशाल), चंद्रज्योती लावून बाराशे माणूस तोफाची व तिरंदाज, बरचीवाले, चालोन आले. तेव्हा मावळे लोकांनी फौजेवर रजपुतांचे चालून घेतले. मोठे युद्ध एक प्रहर झाले. पाचशे रजपूत ठार जाले. उदेभान किल्लेदार खाशा त्यांशी व तानाजी मालुसरा सुभेदार यांशी गाठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एक एकावर पडले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाही. मग तानाजीने आपले डावे हाताची ढाल करून त्याजवरि वोढ घेऊन, दोधे महारागास पेटले. दोधे ठार झाले. मग सूर्याजी मालुसरा (तानाजीचा भाऊ),याने हिंमत धरून, कुल लोक सावरून, उरले राजपुत मारिले. किल्ला काबीज केला. शिवाजी महाराजाना गड जिंकल्याची पण तानाजी पडल्याची बातमी मिळाली तेव्हा ते म्हणाले ,‘एक गड घेतला, परंतु एक गड गेला.’ माघ वद्य नवमी दि. ४ फेब्रुवारी १६७२ च्या रात्री हे युद्ध झाले.

दारूचे कोठार : दरवाजातून आत आल्यावर उजवीकडे जी दगडी इमारत दिसते तेच दारू कोठार. दि. ११ सप्टेंबर १७५१ मध्ये या कोठारावर वीज पडली. ह्या अपघातात गडावरील त्यावेळच्या फडणीसांचे घर उध्वस्त होऊन घरातील सर्व माणसे मरण पावली.

टिळक बंगला : रामलाल नंदराम नाईक यांच्याकडून खरेदी केलेल्या जागेवरच्या ह्या बंगल्यात बाळ गंगाधर टिळक येत असत. १९१५ साली महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांची भेट याच बंगल्यात झाली.

कोंढाणेश्वर : हे मंदिर शंकराचे असून ते यादवांचे कुलदैवत होते. आत एक पिंडी व सांब असणारे हे मंदिर यादवकालीन आहे.

श्री अमृतेश्वर भैरव मंदिर : कोंढाणेश्वराच्या मंदिरावरून थोडे पुढे गेले की डावीकडे हे अमृतेश्वराचे प्राचीन मंदिर लागते. भैरव हे कोळ्यांचे दैवत आहे. यादवांच्या आधी ह्या गडावर कोळ्यांची वस्ती होती. मंदिरात भैरव व भैरवी अशा दोन मुर्त्या दिसतात. भैरवाच्या हातात राक्षसाचे मुंडके आहे.

देवटाके : तानाजी स्मारकाच्या मागून डाव्या हाताच्या छोट्या तलावाच्या बाजूने डावीकडे गेल्यावर हे प्रसिद्ध असे देवटाके लागते. या टाक्याचा उपयोग पिण्याचे पाणी म्हणून होत असे व आजही होतो. महात्मा गांधी जेव्हा पुण्यास येत तेव्हा मुद्दाम ह्या टाक्याचे पाणी मागवत असत.

कल्याण दरवाजा : गडाच्या पश्चिमेस हा दरवाजा आहे. कोंढणपूरवरून पायथ्याच्या कल्याण गावातून वर आल्यास ह्या दरवाजातून आपला प्रवेश होतो. हे एकामागोमाग असे दोन दरवाजे आहेत. यापैकी वरच्या दरवाज्याच्या दोन्हीकडील बुरुजांच्या भिंतीत अर्धवट बाहेर आलेला हत्ती व माहूत अशी दगडी शिल्पे होती.

श्रीशालीवाहन शके १६७२ कारकीर्द

श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडित प्रधान

असा शिलालेख आढळतो.

उदेभानाचे स्मारक : दरवाजाच्या मागच्या बाजूस वर असलेल्या टेकडीवर यावे. येथे जो चौकोनी दगड आहे तेच उदेभान राठोडचे स्मारकचिन्ह म्हणून ओळखले जाते. मोगलांतर्फे उदेभान हा सिंहगडचा अधिकारी होता.

झुंजारबुरूज : झुंजारबुरूज हे सिंहगडचे दक्षिण टोक होय. उदयभानूच्या स्मारकापुढून समोरची टेकडी उतरून या बुरुजावर येता येते. येथून समोरच टोपीसारखा राजगड, त्याच्याच उजवीकडे तोरणा हे गड दिसतात तर खाली पानशेतचे खोरे दिसते. पूर्वेकडे लांबवर पुरंदर दिसतो.

डोणगिरीचा उर्फ तानाजी कडा : झुंजारबुरूजावरून मागे येऊन तटाच्या भिंतीच्या बाजूने पायवाटेने तानाजीच्या कड्याकडे जाता येते. हा कडा गडाच्या पश्चिमेस आहे.येथूनच तानाजी मावळ्यांसह वर चढला.

राजाराम स्मारक : राजस्थानी पद्धतीची रंगीत देवळासारखी जी घुमटी दिसते तीच छत्रपती राजाराम महाराज यांची समाधी. मोगली फौजेला सतत ११ वर्षे टक्कर देणा-या राजाराम महाराजांचे वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी शनिवार दि.२ मार्च इ.स.१७०० या दिवशी सिंहगडावर निधन झाले. पेशव्यांतर्फे या स्मारकाची उत्तम व्यवस्था ठेवली जायची.

तानाजीचे स्मारक : अमृतेश्वराच्या मागच्या बाजूने वर गेल्यावर डाव्या बाजूस सुप्रसिध्द तानाजीचे स्मारक दिसते. 'तानाजी स्मारक समितीच्या' वतीने हे बांधण्यात आले आहे. माघ वद्य नवमी दि. ४ फेब्रुवारी १६७२ या दिवशी झालेल्या लढाईत तानाजी मारला गेला. दरवर्षी माघ वद्य नवमीस येथे मंडळातर्फे तानाजीचा स्मृतिदिन साजरा केला जातो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

पुणे-कोंढणपूर : पुणे-कोंढणपूर बसने कोंढणपूरला उतरून कल्याण गावातून कल्याण दरवाजातून आपण गडावर जातो. या मार्गाने दोन दरवाजे पार केल्यावर आपला गडावर प्रवेश होतो.

पुणे दरवाजा : पुणे-सिंहगड या बसने जाताना वाटेत खडकवासला धरण लागते. या मार्गाने तीन दरवाजे पार केल्यावर आपला गडावर प्रवेश होतो.

**राहण्याची सोय :** नाही

**जेवणाची सोय :** गडावर छोटे हॉटेल्स यामध्ये जेवणाची सोय होते.

**पाण्याची सोय :** देवटाक्यांमधील पाणी बारामहिने पुरते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २ तास

# तोरणा

किल्ल्याची उंची : १४००मीटर

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: पुणे

जिल्हा : पुणे

श्रेणी : मध्यम

शिवाजी महाराजांनी सुरुवातीच्या काळात जे काही किल्ले घेतले त्यापैकी एक किल्ला तोरणा. गडावर तोरण जातीची पुष्कळ झाडी असल्यामुळे गडाचे नाव पडले तोरणा. महाराजांनी गडाची पहाणी करतांना याच्या प्रचंड विस्तारामुळे याचे 'प्रचंडगड' असे नाव ठेवले.

पुणे जिल्ह्याच्या वेल्हा तालुक्यातून गेलेल्या सह्याद्रीच्या रांगेतून दोन पदर निघून पूर्वेला पसरत गेलेले आहेत. यापैकी पहिल्या पदरावर तोरणा व राजगड वसलेले आहेत तर दुस-या पदराला भुलेश्वर रांग म्हणतात. पुण्याच्या नैऋत्येस असलेल्या पर्वतराजीमध्ये उत्तर अक्षांश व पूर्व रेखांशावर हा किल्ला आहे. याच्या दक्षिणेला वेळवंडी नदी व उत्तरेला कानद नदीचे खोरे आहे. गडाच्या पश्चिमेला कानद खिंड, पूर्वेला बामण व खरीव खिंडी आहेत.

**इतिहास :** हा किल्ला कधी आणि कोणी बांधला याचा पुरावा आज उपलब्ध नाही. येथील लेण्यांच्या आणि मंदिरांच्या अवशेषांवरुनहा शैवपंथाचा आश्रम असावा. इ.स.१४७० ते १४८६ च्या दरम्यान बहमनी राजवटीसाठी मालिक अहमद याने हा किल्ला जिंकला. पुढे हा किल्ला निजामशाहीत गेला. नंतर तो महाराजांनी घेतला व याचे नाव प्रचंडगड ठेवले. गडावर काही इमारती बांधल्या. राजांनी आग्र्याहून आल्यावर अनेक गडांचा जीर्णोद्धार केला. त्यात ५ हजार होन इतका खर्च त्यांनी तोरण्यावर केला. संभाजी महाराजांचा वध झाल्यावर हा किल्ला मोगलांकडे गेला. शंकराजी नारायण सचिवांनी तो परत मराठ्यांच्या ताब्यात आणला. पुढे इ.स.१७०४ मध्ये औरंगजेबाने याला वेढा घातला व लढाई करून आपल्या ताब्यात आणला व याचे नाव फुतुउल्गैब म्हणजे दैवी विजय ठेवले. पण परत चार वर्षांनी सरनोबत नागोजी कोकाटे यांनी गडावर लोक चढवून गड पुन्हा मराठ्यांच्या ताब्यात आणला व यानंतर तोरणा कायम स्वराज्यातच राहिला. पुरंदरच्या तहात जे किल्ले मोगलांना दिले त्यामध्ये तोरणा महारजांकडेच राहिला. विशेष म्हणजे औरंगजेब बादशहाने लढाई करून जिंकलेला असा हा मराठ्यांचा एकमेव किल्ला होय.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :**

**गडावर जाण्याच्या वाटा :**

**राहण्याची सोय :** गडावरील मेंगाई देवीच्या मंदिरात १० ते १५ जणांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** मेंगाई देवीच्या मंदिराच्या समोरच बारामही पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** अडीच तास वेल्हेमार्गे, ६ तास राजगड-तोरणा मार्गे

**सूचना :** गडावर जाणारी वाट :- कठीण- राजगड- तोरणा मार्गे

# पुरंदर

किल्ल्याची उंची : १५०० मीटर

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: पुणे

जिल्हा : पुणे

श्रेणी : सोपी

सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या मूळ रांगेतून काही फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा तसाच पूर्वेकडे अदमासे २४ कि. मी. धावून भुलेश्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर, वज्रगड वसलेला आहे. कात्रज घाट, बापदेव घाट, दिवे घाट हे तीन घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याला चौफेर माच्या आहेत. किल्ल्याचे स्थान १८.२८ अंश अक्षांश व ७४.३३ अंश रेखांश वर स्थित आहे. किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला अंदाजे २० मैलांवर तर सासवडच्या नैऋत्येला ६ मैलांवर आहे. गडाच्या पूर्वेला बहुतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमेला डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला १३-१४ मैलांवर सिंहगड आहे तर पश्चिमेला १९-२० मैलांवर राजगड आहे. पुरंदर किल्ला तसा विस्ताराने मोठा आहे. किल्ला मजबूत असून बचावाला जागा उत्तम आहे. गडावर मोठी शिबंदी राहू शकते. दारूगोळा व धान्याचा मोठा साठा करून गड दीर्घकाळ लढवता येऊ शकत असे. एक बाजू सोडली तर गडाच्या इतर सर्व बाजू दुर्गम आहेत. गडावरून सभोवारच्या प्रदेशावर बारीक नजर ठेवता येते.

**इतिहास :** अल्याड जेजुरी  पल्याड सोनोरी  मध्ये वाहते कऱ्हा  पुरंदर शोभती शिवशाहीचा तुरा ।  असे पुरंदर किल्ल्याचे वर्णन केलेले आढळते. पुरंदरच्या पायथ्याशी नारायणपूर नावाचे गाव आहे. या गावात यादवकालीन धाटणीचे महादेवाचे मंदिर आहे. यावरून हा किल्ला साधारण १००० ते १२०० वर्षांपूर्वीचा आहे असे अनुमान निघते.  पुरंदर म्हणजे इंद्र. ज्याप्रमाणे इंद्राचे स्थान बलाढ्य तसाच हा पुरंदर. पुराणात या डोंगराचे नाव आहे 'इंद्रनील पर्वत'. हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग खाली पडला, तोच हा इंद्रनील पर्वत.  बहामनीकाळी बेदरचे चंद्रसंपत देशपांडे यांनी बहामनी शासनाच्या वतीने पुरंदर ताब्यात घेतला. त्यांनी पुरंदरच्या पुनर्निर्माणास प्रारंभ केला. त्याच घराण्यातील महादजी निळकण्ठ याने कसोशीने हे काम पूर्ण केले. येथील शेंदऱ्या बुरूज बांधताना तो सारखा ढासळत असे. तेव्हा बहिरनाक सोननाक याने आपला पुत्र नाथनाक आणि सून देवकाई अशी दोन मुले त्यात गाडण्यासाठी दिली. त्यांचा बळी घेतल्यावरच हा बुरूज उभा राहिला. हा किल्ला सन १४८९ च्या सुमारास निजामशाही सरदार मलिक अहंमद याने जिंकून घेतला. पुढे शके १५५० मध्ये तो आदिलशाहीत आला. इ. स. १६४९ मध्ये आदिलशहाने शहाजीराजांना कैदेत टाकले. याच वेळी शिवाजी महाराजांनी अनेक आदिलशाही किल्ले आपल्या ताब्यात घेतले. म्हणून शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने फत्तेखानास रवाना केले. परिस्थिती फारच बिकट होती. एकीकडे आपले वडील कैदेत होते तर दुसरीकडे फत्तेखानाच्या स्वारीमुळे स्वराज्य धोक्यात येणार होते. महाराजांनी यावेळी लढाईसाठी पुरंदर किल्ल्याची जागा निवडली. मात्र यावेळी गड मराठ्यांच्या ताब्यात नव्हता. महादजी निळकंठराव यांच्या ताब्यात किल्ला होता. त्यांच्या भावाभावांमधील भांडणाचा फायदा उठवून महाराजांनी किल्ल्यात प्रवेश करण्यात यश मिळवले. या पुरंदर किल्ल्याच्या सहाय्याने मराठ्यांनी फत्तेखानाशी झुंज दिली आणि लढाई जिंकली. शिवाजी महाराजांना या पहिल्या लढाईतच मोठे यश प्राप्त झाले. सन १६५५ मध्ये शिवाजी राजांनी नेताजी पालकर यास गडाचा सरनौबत नेमले. वैशाख शु. १२ शके १५७९ म्हणजेच १६ मे १६५७ गुरुवार या दिवशी संभाजी राजांचा जन्म पुरंदरावर झाला. शके १५८७ म्हणजेच १६६५ मध्ये मोगल सरदार जयसिंगाने पुरंदरला वेढा घातला. या युद्धाचे वर्णन सभासद बखरी मध्ये असे आढळते. 'तेव्हा पुरंधरावरी नामजाद लोकांचा सरदार राजियाचा मुरारबाजी परभु म्हणून होता. त्याजबराबर हजार माणूस होते. याखेरीज किल्ल्याचे एक हजारे असे दोन हजारे लोक होते. त्यात निवड करून मुरारबाजी याने सातशे माणूस घेऊन ते गडाखाली दिलेरखानावरी आले. दिलेरखान तालेदार जोरावर पठाण पाच हजार याखेरीज बैल वैगरे लोक ऐशी फौज गडास चौतर्फा चढत होती. त्यात होऊन सरमिसळ जाहले. मोठे धोरंदर युद्ध जाहले. मावळे लोकांनी व खांसा मुरारबाजी यांनी निदान करून भांडण केले. पाचशे पठाण लष्कर ठार जाहले. तसेच बहिले मारले.' मुरारबाजी देशपांडे चे हे शौर्य पाहून दिलेरखान बोलिला, 'अरे तू कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नावजितो.' ऐसे बोलिता मुरारबाजी बोलिला 'तुजा कौल म्हणजे काय? मी शिवाजी महाराजांचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?' म्हणोन नीट खानावरी चालिला. खानावरी तलवरीचा वार करावा तो खानाने आपले तीन तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानाने तोंडात आंगोळी घातली, 'असा शिपाई खुदाने पैदा केला.' खानाने वज्रगड ताब्यात घेतला आणि पुरंदरावर हल्ला केला व पुरंदर माचीचा ताबा घेतला. माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध झाले. मुरारबाजी पडला आणि त्याच बरोबर पुरंदरही पडला. हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा त्यांनी जयसिंगाशी तहाचे बोलणे सुरू केले आणि ११ जून १६६५ साली इतिहास प्रसिद्ध 'पुरंदरचा तह' झाला. यात २३ किल्ले राजांना मोगलांना द्यावे लागले. त्यांची नावे अशी, १. पुरंदर २. रुद्रमाळ किंवा वज्रगड  ३. कोंढाणा ४. रोहीडा  ५. लोहगड ६. विसापूर  ७. तुंग ८. तिकोना  ९. प्रबळगड १०. माहुली ११. मनरंजन १२. कोहोज  १३. कर्नाळा १४. सोनगड  १५. पळसगड १६.भंडारगड  १७. नरदुर्ग १८. मार्गगड  १९. वसंतगड २०. नंगगड  २१. अंकोला २२. खिरदुर्ग (सागरगड)  २३. मानगड  ८ मार्च १६७० मध्ये निळोपंत मुजुमदाराने किल्ला स्वराज्यात आणला. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर किल्ला औरंगजेबाने जिंकला व त्याचे नाव 'आजमगड' ठेवले. पुढे मराठ्यांच्या वतीने शंकराजी नारायण

सचिवांनी मोगलांशी भांडून पुरंदर घेतला. शके १६९५ मध्ये छत्रपती शाहू यांनी किल्ला पेशवे यांस दिला. अनेक दिवस किल्ल्यावर पेशव्यांची राजधानी होती. शके १६९७ मध्ये गंगाबाई पेशवे यांना गडावर मुलगा झाला, त्याचे नाव सवाई माधवराव ठेवण्यात आले. इ. स. १८१८ मध्ये इंग्रजांनी गड आपल्या ताब्यात घेतला.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : पुरंदर आणि वज्रगड जरी एकाच डोंगरसोंडेवर वसलेले असले तरी ते दोन स्वतंत्र किल्ले आहेत.

{बनी दरवाजा : पुरंदर माचीवरील हा एकमेव दरवाजा. आपण नारायणपूर गावातून किल्ल्यावर जातांना हा दरवाजा लागतो. दरवाजा आजही चांगल्या स्थितीत आहे. दरवाज्यातून आत शिरल्यावर पहारेक-यांच्या देवड्या आहेत. दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच पुरंदरचा खंदकडा आपले लक्ष वेधून घेतो. दरवाज्यातून आत शिरल्यावर दोन रस्ते लागतात, एक सरळ पुढे जातो तर दुसरा डावीकडे मागच्या बाजूस वळतो. आपण सरळ रस्त्याने पुढे गेल्यावर उतारावर लष्कराच्या बराकी आणि काही बंगले दिसतात. माचीची एकंदर लांबी एक मैल आहे, तर रुंदी १०० ते १५० फूट आहे. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी एक मंदिर दिसते त्याचे नाव 'पुरंदरेश्वर'.

रामेश्वर मंदिर : पुरंदरेश्वर मंदिराच्या मागील कोप-यात पेशवे घराण्याचे रामेश्वर मंदिर आहे. हे पेशव्यांचे खाजगी मंदिर होते. या मंदिराच्या थोडे वरती गेल्यावर पेशव्यांच्या दुमजली वाड्यांचे अवशेष दिसतात. पेशवाईच्या आरंभी बाळाजी विश्वनाथाने तो बांधला. या वाड्यातच सवाई माधवरावांचा जन्म झाला. वाड्याच्या मागे विहीर आहे. आजही ती चांगल्या अवस्थेत आहे. येथून थोडे पुढे गेल्यावर दोन वाटा लागतात. एक वाट बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाते तर दुसरी खाली भैरवखिंडीच्या दिशेने जाते. आपण प्रथम बालेकिल्ल्याच्या दिशेने वर जाऊया. यावाटेने वर गेल्यावर १५ मिनिटातच आपण दिल्ली दरवाजापाशी पोहचतो.

खंदकडा : या तीस-या दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे एक कडा थेट पूर्वेकडे गेलेला दिसतो हाच तो खंदकडा. या कड्याच्या शेवटी एक बुरूज आहे. बुरूज पाहून आल्यावर परत तीस-या दरवाज्यापाशी यावे. येथून एक वाट पुढे जाते. वाटेतच आजुबाजूला पाण्याची काही टाकी लागतात. थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे एक उंचवटा लागतो. त्याच्या मागे पडक्या जोत्यांचे अवशेष आहेत. येथेच अंबरखाना असल्याचे अवशेष दिसतात. थोडे वर चढून पाहिल्यास वाड्याचे अवशेष दिसतात. हे सर्व पाहून पुन्हा आपल्या वाटेला लागावे. वाटेवरून पुढे गेल्यावर काही पाण्याचे हौद लागतात. या वाटेवरून पुढे जातांना एक वाट डावीकडे खाली गेली आहे. या वाटेवरून खाली गेल्यावर केदार दरवाजा लागतो. पडझडी मुळे आज हा दरवाजा वापरात नसला तरी पूर्वी या दरवाजाला फार महत्त्व होते. पद्मावती तळे : मुरारबाजींच्या पुतळ्या पासून थोडे पुढे गेल्यावर पद्मावती तळे लागते.

शेंद-या बुरूज : पद्मावती तळ्याच्या मागे बालेकिल्ल्याच्या वायव्येस, तटबंदीच्या बरोबरीने एक बुरूज बांधला आहे त्याचे नाव शेंद-या बुरूज.

पुरंदरेश्वर मंदिर : हे मंदिर महादेवाचे आहे. मंदिरात इंद्राची सव्वा ते दीड फूटापर्यंतची मूर्ती आहे. हे मंदिर साधारणपणे हेमाडपंथी धाटणीचे असावे. थोरल्या बाजीरावाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला.

दिल्ली दरवाजा : हा उत्तराभिमुख दरवाजा आहे. दरवाज्याच्या वळणावर श्री लक्ष्मी मातेचे देवालय आहे. दरवाजा ब-यापैकी सुस्थितीत आहे. या दरवाज्यातून आत गेल्यावर उजवी कडे आणखी एक दरवाजा दिसतो. डावीकडची वाट बालेकिल्ल्याच्या दुस-या टोकापर्यंत जाते. या वाटेने पुढे गेल्यावर काही पाण्याची टाकी लागतात. याशिवाय या भागात बघण्यासारखे काही नाही. आल्या मार्गाने दिल्ली दरवाज्यापाशी यावे. समोरच उजवी कडे असणा-या दरवाज्याने पुढे जावे. येथून पुढे गेल्यावर आणखी एक दरवाजा लागतो. या दरवाज्यावर दोन्ही बाजूस सिंहाच्या प्रतिकृती आढळतात.

केदारेश्वर : २० मिनिटात केदार दरवाजा पाहून आपण आपल्या मूळ वाटेला लागू शकतो. यावाटेने १५ मिनिटे चालून गेल्यावर काही पाय-या लागतात. त्या आपल्याला थेट केदारेश्वराच्या मंदिरा पर्यंत घेऊन जातात. पुरंदरचे मूळ दैवत म्हणजे केदारेश्वर. मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे. महाशिवरात्रीला हजारो भाविक याच्या दर्शनाला येतात. मंदिराच्या समोरच एक दगडी दीपमाळ आहे. सभोवती दगडी फरसबंदी आहे. केदारेश्वराचे मंदिर म्हणजे किल्ल्यावरील अत्युच्च भाग. येथून राजगड, तोरणा, सिंहगड, रायरेश्वर, रोहीडा, मल्हारगड, क-हेपठार हा सर्व परिसर दिसतो. या केदार टेकडीच्या मागे एक बुरूज आहे त्याला कोकण्या बुरूज असे नाव आहे.

पुरंदर माची : आल्या वाटेने माघारी फिरून दिल्ली दरवाज्यातून जाणा-या वाटेने थेट पुढे यावे. म्हणजे आपण माचीवरील भैरवखिंडीत जाऊन पोहचतो. वाटेत वाड्यांचे अनेक अवशेष दिसतात.

भैरवखिंड : याच खिंडीतून वज्रगडावर जाण्यासाठी वाट आहे. खिंडीत शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. या खिंडीपर्यंत गाडी रस्ता आलेला असल्याने त्या रस्त्यावरून चालत गेल्यावर वाटेतच उजवीकडे राजाळे तलाव लागतो. सध्या पुरंदरमाचीवर याच तलावाचे पाणी वापरले जाते.

वीर मुरारबाजी : बिनीदरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे गेल्यावर समोरच वीर मुरारबाजीचा पुतळा दिसतो. इ.स. १९७० मध्ये हा पुतळा उभा केला आहे.

संपूर्ण गड फिरण्यास एक दिवस लागतो. पुरंदर सोबत वज्रगड देखील पहायचा असल्यास दीड दिवस लागतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** पुरंदर किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत.

१) पुण्याहून : पुण्याहून ३० कि.मी अंतरावर असणा-या सासवड या गावी यावे. सासवड ते नारायणपूर ही अशी एस.टी सेवा देखील उपलब्ध आहे. नारायणपूर हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे. गावातूनच गाडी रस्ता थेट किल्ल्या पर्यंत गेलेला आहे. पुणे ते नारायणपूर अशी बस सेवा देखील उपलब्ध आहे. नारायणपूर गावातून गडावर जाण्यास दोन मार्ग आहे. एक म्हणजे गाडी रस्ता. या रस्त्याने गड गाठण्यास २ तास पुरतात तर दुसरी म्हणजे जंगलातून जाणारी पायवाट. या पायवाटेने एक तासात आपण पुरंदर माचीवरच्या बिनीदरवाज्यापाशी पोहचतो

२) सासवडहून : किल्ल्यावर जाणारी दुसरी वाट जरा आडमार्गाची आहे. सासवडहून सासवड - भोर गाडी पकडावी. या गाडीने नारायणपूर गावाच्या पुढे असणा-या 'पुरंदर घाटमाथा' या थांब्यावर उतरावे. हा घाटमाथा म्हणजे पुरंदर किल्ला आणि समोर असणा-या सूर्यपर्वत यामधील खिंड होय. या थांब्यावर उतरल्यावर समोरच डोंगरावर एक दोन घरे दिसतात. या घरामागूनच एक पायवाट डावीकडे वर जाते. ही वाट पुढे गाडी रस्त्याला जाऊन मिळते. या वाटेने पाऊण तासात पुरंदर माचीवरील बिनीदरवाजा गाठता येतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर मिलिटरीचे बंगले आहेत. यामध्ये राहण्याची सोय होऊ शकते. मात्र त्यासाठी तेथे असणाऱ्या त्यांच्या ऑफिसरची परवानगी घेणे आवश्यक आहे

**जेवणाची सोय :** आपण स्वतः करावी.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पायथ्यापासून १ तास.

# शिवनेरी

किल्ल्याची उंची : ३५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: नाणेघाट
जिल्हा : पुणे
श्रेणी : मध्यम

शिवनेरी किल्ला पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरात आहे. जुन्नर मध्ये शिरतानांच शिवनेरीचे दर्शन होते. महाराष्ट्राचे दैवत श्री शिवछत्रपती यांचे हे जन्मस्थान. किल्ला तसा फार मोठा नाही.१६७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीतील डॉ. जॉन फ्रायर याने या किल्ल्याला भेट दिली. त्याने आपल्या साधनग्रंथात, या किल्ल्यावर हजार कुटुंबांना सात वर्षेपुरेल एवढी शिधासामुग्री आहे असा उल्लेख केला आहे.

**इतिहास :** 'जीर्णनगर', 'जुन्नेर' म्हणजेच जुन्नर हे शहर इसवीसनापूर्व काळापासून प्रसिद्ध आहे. जुन्नर ही शकराजा नहपानाची राजधानी होती. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा नाश केला आणि जुन्नर व येथील सर्व परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नाणेघाट हा पुरातन व्यापारी मार्ग. या मार्गावरून फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक चालत असे. यावर नजर ठेवण्यासाठी या मार्गावरील दुर्गांची निर्मीती करण्यात आली. सातवाहनांची सत्ता स्थिरावल्यानंतर येथे अनेक ठिकाणी त्यांनी लेणी खोदवून घेतली. सातवाहनांनंतर शिवनेरी चालुक्य, राष्ट्रकूट या राजवटींच्या सत्तेखाली होता. ११७० ते १३०८ च्या सुमारास यादवांनी येथे आपले राज्य स्थापन केले. आणि याच काळात शिवनेरीला गडाचे स्वरूप प्राप्त झाले. नंतर इ. स. १४४३ मध्ये मलिक - उल - तुजार याने यादवांचा पराभव करून किल्ला सर केला. अशा प्रकारे किल्ला बहमनी राजवटीखाली आला. इ. स. १४७० मध्ये मलिक - उल - तुजारचा प्रतिनिधी मलिक महंमद याने किल्ला नाकेबंदी करून पुन्हा सर केला. १४४६ मध्ये मलिक महंमदच्या वडिलांच्या मृत्युनंतर निजामशाहीची स्थापना झाली. पुढे १४९३ मध्ये राजधानी गडावरून अहमदनगरला हलवण्यात आली. इ. स. १५६५ मध्ये सुलतान मूर्तिजा निजामाने आपला भाऊ कासीम याला या गडावर कैदेत ठेवले होते. यानंतर १५९५ मध्ये किल्ला व जुन्नर प्रांत मालोजी राजे भोसले यांच्याकडे आला. जिजामाता गरोदर असताना जाधारावांनी ५०० स्वार त्यांच्या सोबत देऊन त्यांना रातोरात शिवनेरीवर घेऊन गेले. 'शिवनेरी गडावर श्रीभवानी सिवाई, तीस नवस जिजाऊने केला जे आपल्याला पुत्र झाला तर तुझें नांव ठेवीन. त्याऊपर शिवाजीराजे यांचा जन्म जाला शके १५५६ क्षये नाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी चंद्रवार.' इ. स. १६३२ मध्ये शिवरायांनी गड सोडला आणि १६३७ मध्ये मोगलांच्या ताब्यात गेला. १६५० मध्ये मोगलांविरूद्ध येथील कोळ्यांनी बंड केले. यात मोगलांचा विजय झाला. इ. स. १६७३ मध्ये शिवरायांनी शिवनेरीचा किल्लेदार अजीजखान याला फितवून किल्ल्याला माळ लावून सर करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. इ. स. १६७८ मध्ये जुन्नर प्रांत लुटला गेला आणि मराठ्यांनी किल्ला घेण्याचा प्रयत्न केला मात्र अपयश पदरात पडले. पुढे ४० वर्षांनंतर १७१६ मध्ये शाहुमहाराजांनी किल्ला मराठेशाहीत आणला व नंतर तो पेशव्यांकडे हस्तांतरीत करण्यात आला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** सात दरवाज्यांच्या वाटेने गडावर येतांना पाचवा म्हणजे शिपाई दरवाजा पार केल्यावर मुख्य वाटसोडून उजव्या बाजूने पूढे गेल्यावर 'शिवाई देवीचे ' मंदिर लागते.मंदीराच्या मागे असणा-या कड्यात ६ ते ७ गुहा आहेत.या

गुहा मुक्कामासाठी अयोग्य आहेत. मंदिरात शिवाई देवीची मूर्ती आहे . शेवटच्या दरवाज्यातून गडावर प्रवेश केल्यावर समोरच अंबरखाना आहे.आजमितिस या अंबरखान्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. मात्र पूर्वी या अंबरखान्याचा उपयोग धान्य साठविण्यासाठी केला जात असे. अंबरखान्यापासून दोन वाटा निघतात.एक वाट समोरच असणा-या टेकाडावर जाते. या टेकाडावर एक कोळी चौथरा आणि एक इदगा आहे. दुसरी वाट शिवकुंजापाशी घेऊन जाते. वाटेत गंगा, जमुना व याशिवाय पाण्याची अनेक टाकी लागतात. जिजाउंच्या पुढ्यात असलेला बालशिवाजी , हातातील छोटी तलवार फिरवीत आईला आपली भव्य स्वप्ने सांगत आहे, अशा आवीर्भावातील मायलेकरांचा पुतळा ‘शिवकुंजा’ मध्ये बसविला आहे.शिवकुंजासमोरच कमानी मशिद आहे आणि समोरच खाली पाण्याचे एक टाके आहे. येथून समोर चालत गेल्यास हमामखाना लागतो. येथूनच पुढे शिवजन्मस्थानाची इमारत आहे. ही इमारत दुमजली असून खालच्या खोलीत जिथे शिवरायांचा जन्म झाला तेथे शिवरायांचा पुतळा बसविण्यात आला आहे. इमारतीच्या समोरच ‘बदामी पाण्याचे टाकं’ आहे.येथून पुढे जाणारा रस्ता कडेलोट टोकावर घेऊन जातो. सुमारे दिड हजार फुट उंचीचा ह्या सरळसोट कड्याचा उपयोग हा गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी होत असे.गड फिरण्यास २ तास पुरतात. वर किल्ल्यावरून चावंड, नाणेघाट आणि जीवधन तसेच समोर असणारा वडूज धरणाचा जलाशय लक्ष्य वेधून घेतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :**गडावर जाण्याचे दोन प्रमुख मार्ग जुन्नर गावातूनच जातात. पुणेकरांना तसेच मुंबईकरांना एका दिवसात शिवनेरी पाहून घरी परतता येते.

साखळीची वाट : या वाटेने गडावर यायचे झाल्यास जुन्नर शहरात शिरल्यानंतर नव्या बसस्टँड समोरील रस्त्याने शिवपुतळ्यापाशी यावे. येथे चार रस्ते एकत्र मिळतात . डाव्या बाजूस जाणा-या रस्त्याने साधारणत: एक किलोमीटर गेल्यावर रस्त्याच्या उजव्या कडेला एक मंदिर लागते. मंदिरासमोरून जाणारी मळलेली पायवाट थेट शिवनेरी किल्ल्याच्या एका कातळभिंतीपाशी घेऊन जाते.भिंतीला लावलेल्या साखळीच्या साह्याने आणि कातळात खोदलेल्या पाय-यांच्या साह्याने वर पोहचता येते. ही वाट थोडी अवघड असून गडावर पोहचण्यास पाऊण तास लागतो.

सात दरवाज्यांची वाट : शिवपुतळ्यापासून डाव्या बाजूच्या रस्त्याने चालत सुटल्यास डांबरी रस्ता आपणास गडाच्या पाय-यांपाशी घेऊन जातो. या वाटेने गडावर येतांना सात दरवाजे लागतात. पहिला महादरवाजा, दुसरा पीर दरवाजा, तिसरा परवानगीचा दरवाजा, चौथा हत्ती दरवाजा, पाचवा शिपाई दरवाजा, सहावा फाटक दरवाजा आणि सातवा कुलाबकर दरवाजा .या मार्गेकिल्ल्यावर पोहचण्यासाठी दीड तास लागतो.

मुंबईहून माळशेज मार्गे: जुन्नरला येतांना माळशेज घाट पार केल्यावर ८ ते९ किलोमीटरवर ‘शिवनेरी १९ कि.मी.’ अशी एक पाटी रस्त्याच्या कडेला लावलेली दिसते. हा मार्ग गणेश खिंडीतून शिवनेरी किल्ल्यापर्यंत जातो. या मार्गाने गडावर पोहचण्यास एक दिवस लागतो.

**राहण्याची सोय :** या किल्ल्यावर शिवकुंजाच्या मागील बाजूस असणा-या व-हांड्यामध्ये १० ते १२ जाणांची रहाण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** किल्ल्यावर जेवणाची सोय नसल्याने ती व्यवस्था आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** गंगा व जमुना या टाक्यांमध्ये बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** साखळीच्या मार्गेपाउण तास, सात दरवाजा मार्गेदीड तास.

# चावंड

किल्ल्याची उंची : ३४०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: नाणेघाट

जिल्हा : पुणे

श्रेणी : मध्यम

चामुंडा अपभ्रंशे चावंड। जयावरी सप्तकुंड॥ गिरी ते खोदूनी अश्मखंड। प्रसन्नगडा मार्ग निर्मिला॥ जुन्नर तालुक्यामध्ये नाणेघाटाचे पहारेकरी म्हणून नावलौकिक मिळवलेले किल्ले म्हणजे जीवधन, चावंड, हडसर आणि शिवनेरी. यांपैकी चावंड जुन्नर शहरापासून तासाभराच्या प्रवासावर असलेल्या आपटाळे गावानजीक आहे. गडाच्या पायथ्याशी चावंड गाव वसलेले आहे. नाणेघाटापासून जुन्नरच्या दिशेने १५ कि.मी. च्या आसपास चावंड वसलेला आहे. चावंड गावात आणि आजुबाजूच्या गावांमध्ये महादेवकोळ्यांची वस्ती आहे.

**इतिहास** : १) सन १४८५ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना करणाऱ्या मलिक अहमदला पुणे प्रांतातले जे किल्ले मिळाले त्यामधे चावंडचे नाव आहे. बहमनी साम्राज्याचे जे तुकडे झाले त्यात त्याला उत्तर कोकण व पुणे प्रांत मिळाले. २) दुसरा बुऱ्हाण निजामशाह (इ.स. १५९०-१५९४) हा सातवा निजाम. याचा नातू बहादुरशाह १५९४ साली चावंडला कैदेत होता. ३) १६३६ मध्ये निजामशाहीचा आदिलशाह आणि मोगलांपासून बचाव करण्यासाठी शहाजीराजांनी जो तह केला, त्यानुसार चावंड मोगलांना मिळाला. ४) मे १६७२ पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानात कवी जयराम पिंडे म्हणतो की त्याचप्रमाणे चामुंडगड, हरिश्चंद्रगड, महिषगड आणि अडसरगड हे किल्ले महाराजांच्या मावळ्यांनी जिकिरीने लढून घेतले. महाराजांनी याचे नाव प्रसन्नगड असे ठेवले. ५) या गडाची अनेक नावे अशाप्रकारे आहेत- चामुंड, चाऊंड, चावंड- ही नावे चामुंडा या शब्दाचा अपभ्रंश आहेत. चुंड- हे निजामशाही आमदानीतील नाव आहे. प्रसन्नगड- हे शिवाजी महाराजांनी ठेवलेले नाव. मलिक अहमदने शिवनेरी जिंकल्यावर आपल्या एका सरदाराच्या हाती हा किल्ला दिला. या किल्ल्यातही भरपूर लूट त्याच्या हाती आली. जोंड किल्ल्याचीही व्यवस्था आपल्या एका सरदाराच्या हाती सोपवून त्याने लोहगडाकडे आपला मोर्चा वळवला.
संदर्भ - अहमदनगरची निजामशाही मलिक अहमदच्या अधिकारापुढे नमूद केलेल्या किल्ल्यांच्या अधिकाऱ्यांनी मान झुकवली नव्हती. त्यांचा पाडाव करण्यासाठी त्याने कूच केले. ते किल्ले म्हणजे- चावंड, लोहगड, तुंग, कोआरी, तिकोणा, कोंढाणा, पुरंदर, भोरप, जीवधन, मुरंजन, महोली आणि पाली. हे सर्व किल्ले त्याने बळाचा वापर करून आपल्या ताब्यात घेतले. संदर्भ - गुलशने इब्राहिमी आदिलशाहच्या सैन्याशी लढताना इब्राहीम निजामशाहच्या मस्तकात गोळी लागून तो ठार झाला. निजामशाही वकील मिया मंजू याने अहमद नावाच्या मुलाला दौलताबादच्या कैदेतून सोडवून गादीवर बसवले. त्याचवेळी त्यांने इब्राहीमच्या अल्पवयीन मुलाची म्हणजे बहादूरशाहची चावंडला बंदिवासासाठी रवानगी केली. चांदबीबी ही बहादूरशाहची आत्या. मिया मंजूने बहादूरशाहवर असलेले चांदबीबीचे पालकत्व हिरावून घेतले. पुढे निजामशाही गादीवर तोतया आहे हे सिद्ध झाले. निजामशाही सरदार इख्लासखान याने चावंड किल्ल्याच्या सुभेदाराला राजपुत्र बहादूर याला आपल्या हवाली करण्यास हुकूम पाठवला. या हुकुमाचे पालन मिया मंजू याच्या लेखी आज्ञेशिवाय होणार नाही असे सुभेदाराने कळवले. इख्लासखानाने तोतया बहादूरशहा निर्माण केला. मिया मंजूने अकबराचा राजपुत्र मुराद यास मदतीस बोलावले. मुराद अहमदनगरच्या किल्ल्यावर चालून आला. आता मिया मंजूला पश्चात्ताप झाला. त्याने अहमदनगरच्या संरक्षणासाठी सरदार अन्सारखान व राज्यप्रतिनिधी म्हणून चांदबीबीला नेमले. मिया मंजू आदिलशाह व कुतुबशहा यांना मदतीस बोलावण्यास अहमदनगरच्या बाहेर पडला. चांदबीबीने याचा फायदा उठवीत त्याचा हस्तक अन्सारखान याचा खून करवला. आणि चावंडच्या अटकेतून बहादूरशाहची मुक्तता करत त्याची सुलतान म्हणून ग्वाही दिली. १) जे किल्ले ऋषी नावांशी संबंधित आहेत ते अतिप्राचीन. २) जे किल्ले बौद्ध, जैन लेण्यांनी अलंकृत आहेत ते प्राचीन. ३) जे किल्ले शैव, शाक्त, नाथ सांप्रदायाशी निगडित आहेत ते म्हणजे मध्यमयुगीन. ४) चावंड हा चामुंडा नावाचा अपभ्रंश असल्याने व त्यावर पाणयाची सात टाकी एकाच ठिकाणी असल्याने तो सप्त मातृकांशी संबंधित आहे. म्हणून तो शाक्त पंथाशी निगडित आहे. चावंड निजामशाहीत जाण्याअगोदर तेथील किल्लेदार महादेवकोळी जमातीतला असावा असे तेथील स्थानिक महादेवकोळी वस्तीवरून प्रतीत होते. येथील अवशेषांना पाहता आणि राजमार्ग अभ्यासता चावंड सातवाहनकालीन असल्याची चिन्हे दिसतात. निजामशाही वारसदाराला येथे ठेवण्यासाठी या किल्ल्याचा वापर केला गेला. यावरून त्याची दुर्गमता दिसून येते. त्याचा इतिहास बखरींच्या पानांत नसला तरी मौलिक लोकसाहित्यात नक्की सापडेल. ५) चामुंडा हे देवीचे क्रूर रूप. या रुपात सर्व काही भयानक, अमंगल. ही देवी बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान येथील आहे. हाडकुळी, जीभ बाहेर, उभे केस, मुंडांच्या माळा, हाडांचे दागिने, व्याघ्रचर्म नेसलेली. स्मशानात पिंपळाखाली हिचे वास्तव्य. हिचे वाहन गाढव, प्रेत, घुबड, गिधाड. ध्वजावर अग्नीपुराणाप्रमाणे चार हात. शक्ती, मुंड, शूळ ही हिची आयुधे. ६) सप्त मातृका म्हणजे- ब्राम्ही, महेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इन्द्राणि आणि चामुंडा. या सर्वांमध्ये चामुंडा श्रेष्ठ. संदर्भ - देवी भागवत

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : दरवाजातून आत जाताच दहा पायऱ्या चढून गेल्यावर दोन वाटा लागतात. वरची उजवीकडची वाट उद्ध्वस्त अवशेषांकडे घेऊन जाते, तर डावीकडे तटबंदीच्या बाजूने जाणारी वाट आहे. उजव्या बाजूस कातळात कोरलेल्या १५-२० पायऱ्या चढून गेल्यावर काही वास्तू नजरेत येतात. एका वास्तूचा चौथरा अजून व्यवस्थित आहे. इथे आपल्याला अशा बऱ्याच वास्तू दिसतात म्हणून असा निष्कर्ष काढता येईल की इथेच सारा कारभार चालत असावा. जवळ जवळ १५ ते २० वास्तू इथे आहेत. जेथे चौथरा शिल्लक आहे तेथेच मोठे गोल उखळ आहे. मात्र त्यास खालच्या बाजूला एक छिद्र आहे. बाजूलाच २ संलग्न अशी टाकी आहेत येथून उत्तरेस थोडे पुढे गेलो की एक खचत चाललेली वास्तू नजरेस पडते. हिच्या बांधकामावरून असे प्रतीत होते की हे एक मंदिर असावे. पण बरीच खचल्यामुळे जास्त काही अंदाज बांधता येत नाही. येथून आजूलाबाजूला साधारण ३०० मी. च्या परिसरात १०-१५ उद्ध्वस्त बांधकामे तशीच ७-८ टाकी आढळून येतात. गडाच्या वायव्य भागात आपल्याला एकमेकांना लागून अशी सात टाकी आहेत. ही टाकी सप्त मातृकांशी निगडित आहेत. गडाच्या याच भागात बऱ्यापैकी तटबंदी असून आग्नेय भाग कड्यांनी व्यापला आहे. यावरून कळून येतं की गड किती दुर्गम आहे. म्हणूनच बहादूरशाह निजामाला येथे ठेवण्यात आले होते. ज्या भागात तटबंदी आहे त्या भागात या

तटबंदीच्या बाजूने फिरण्यास जागा आहे. ही बहुदा गस्त घालण्यासाठी असावी. या ठिकाणी बराच उतार असून काही ठिकाणी हौद आहेत. थोडे पुढे उजवीकडे गेल्यावर एका मंदिराचे अवशेष आढळतात. येथेही बरेच शिल्पकाम आढळते. ज्या ठिकाणी तटबंदी ढासळलेली आहे, तिथे चिऱ्याचे दगड गाडग्यासारखे रचून ठेवले आहेत. हे कोणाचे काम असावे हे कळत नाही. ईशान्य भागात ज्या ठिकाणी तटबंदी संपते त्या ठिकाणी कातळकोरीव गुहा आहेत. या पहारेकऱ्यांच्या चौक्या असाव्यात. एक गुहा अगदी सुस्थितीत आहे. गुहेत प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूला हौदसदृश साधारण ५ फूट खोलीचे बांधकाम आढळते. या गुहेलगत असलेल्या तटबंदीच्या खाली भुयारी मार्गाचे प्रवेशद्वार आहे असे ग्रामस्त सांगतात. येथे रॅपलिंग करून जाता येते.यापुढे आपण गडाच्या पूर्वेस येतो. या भागात कोणतेही अवशेष नाहीत. बेलाग कड्यांनी हा भाग व्यापला असल्यामुळे इथे तटबंदी नाही. हा भाग बराच विस्तीर्ण असूनही निर्जन आणि ओसाड आहे. जवळ जवळ अर्ध्या कि.मी.च्या परिसरात एकही बांधकाम आढळत नाही. गडाच्या दक्षिण बाजूला आणि नैऋत्येस आपल्याला तुरळक अशी तटबंदी आढळते. इथेच पाण्याची दोन टाकी आहेत. इथून पुन्हा पश्चिमेकडे निघाल्यावर आपल्याला मजबूत अशा तटबंदीचे दर्शन घडते. दोन बुरूजही आढळतात. इथून आपण टेकडी कडे निघतो, मंदिर पाहायला.गडाच्या सर्वात उंच भागात चामुंडा देवीचे मंदिर आहे. मंदिरातील मूर्ती प्राचीन असून बांधकाम मात्र नवीन आहे. आजुबाजूला जुन्या मंदिराचे अवशेष विखुरलेले दिसतात. एक तुटलेली मूर्ती आढळते जी एखाद्या ऋषीचे प्रतीक असावी. तसेच एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या चामुंडा देवीच्या मंदिरासमोर आढळणारा नंदी. जुन्या अवशेषांमध्येही नंदीची मूर्ती आढळते. याचा अर्थ हा होतो की जवळच कुठेतरी शिवलिंग असावे आणि काळाच्या ओघात हरवले असावे. ग्रामस्थांनी श्रमदानाने जसे नवीन देऊळ बांधले तशी शेजारी असलेली दीपमाळही बांधण्याचा प्रयत्न केला आहे. ही दीपमाळ असे सुचवते की इथे एक शिवमंदिर असावे.एकंदरीत पाहता, गडाचा घेरा विस्तीर्ण आहे. साधारण ५-६ कि.मी.चा व्यास असावा. गडाच्या ईशान्येस असणाऱ्या गुहांचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. या वास्तूंविषयी बऱ्याच दंतकथा ऐकण्यात आहेत. गडावर सातवाहन संस्कृतीचा प्रभाव आहे. सातवाहनांचा इतिहास फार भव्य आहे, पण त्यांच्या किल्ल्यांचे अजून संशोधन झाले तरच या भव्य इतिहासावर जास्त प्रकाश पडेल. या किल्ल्यांचा इंग्रजांनी पूर्ण नायनाट करण्याचा प्रयत्न केला, पण ते सफल झाले नाहीत. आज हेच किल्ले आपल्याला आवाहन करीत आहेत, त्यांना भेट द्यायला, तर का आपण जाऊ नये? इथल्या स्थानिक महादेवकोळ्यांकडून जसे आपण दंतकथा ऐकतो, तसे इतिहासही जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडमाथा गाठण्यासाठी गडाच्या पश्चिमेकडूनच वाट आहे. चावंड वाडीतील आश्रमशाळेपासून गड चढण्यास चांगली मळलेली पायवाट आहे. या वाटेने साधारण अर्धातास चढल्यानंतर आपण खडकात खोदलेल्या पायऱ्यांच्या समांतर रेषेत चालतो. ( प्रचलित दंतकथेनुसार ते गडावर पोहोचवणारे गुप्त भुयार असावे.) साधारण १५ पायऱ्या चढून गेल्यावर आपणास एक मन खिन्न करणारी गोष्ट जाणवते. पूर्वी कोणा अनामिकाने या पायऱ्या चढण्यासाठी आधार म्हणून एका छोट्या तोफेची नळी जमिनीत पुरली आहे. साधारण २ इंच अंतर्गत व्यास असलेली ही तोफ २ ते २ १/२ फूट लांबीची आहे.जमिनीच्या वर असलेला हा भाग साधारण दोन तृतियांश आहे. या तोफेची लांबी साधारण ३ ते ३ १/४ फूट असावी. या तोफेला जंबुरका म्हणतात.या पायऱ्या अगदीच छोट्या आहेत. इंग्रजांनी १ मे १८१८ रोजी चावंडवर हल्ला करून येथील पायऱ्या उद्ध्वस्त करून टाकण्याचा प्रयत्न केला. तशा सुरुंग लावल्याच्या खुणाही आपल्याला पायऱ्या चढताना दिसतात. यानंतर २०-२५ पायऱ्या चढून गेल्यावर आपल्याला प्रवेशद्वाराची तटबंदी पूर्णपणे सामोरी येते. येथे ३ मी. लांबीच्या प्रशस्त पायऱ्या आहेत, ज्यावर आज रानगवत माजलेले आहे. वर चढून गेल्यावर प्रथमदर्शनी नजरेस पडते ती कातळकोरीव गणेशप्रतिमा, आणि नैऋत्यमुखी प्रवेशद्वार. या प्रवेशद्वारावरही एक गणपती कोरलेला आहे. यावरून असे कळते की पेशवे काळातही या गडावर बराच राबता असावा. दरवाजाची उजवी बाजू एक अखंड कातळ आहे. उजवा स्तंभही याच कातळातून कोरलेला आहे. गडावरची हीच वास्तू अबाधित राहिली आहे. दरवाजाजवळच एक उखळ पडले आहे.

**राहण्याची सोय :** गडावरील कोठारांमध्ये १५ ते २० जण राहू शकतात, तर चामुंडा मातेच्या मंदिरात २ जण. इथे उंदीर त्रास देऊ शकतात. चावंडवाडीत रहाण्याची उत्तम सोय होते.

**जेवणाची सोय :** गडावर जेवणाची सोय नाही. मात्र चावंड गावात जेवणाची सोय होऊ शकते.

**पाण्याची सोय :** गडावर अनेक टाकी आहेत ज्यामध्ये बारामही पिण्याचे पाणी आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** १ तास चावंड गावापासून

# हडसर

किल्ल्याची उंची : ३२०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: नाणेघाट
जिल्हा : पुणे
श्रेणी : मध्यम

सह्याद्री म्हणजे दुर्गांची खाणच. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका असाच गडकिल्ल्यांनी नटलेला आहे. ‘हडसर’ हा असाच या भागातील सुंदर किल्ला आहे. नाणेघाटा पासून सुरुवात करून जीवधन ,चावंड , शिवनेरी , लेण्याद्रि, हडसर आणि हरिश्चंद्रगड अशी सहा दिवसांची भटकंती आपल्याला करता येते.

**इतिहास :** हडसर किल्ल्याचे दुसरे नाव म्हणजे पर्वतगड. सातवाहनकालात या गडाची निर्मिती झाली असून या काळात गड मोठ्या प्रमाणावर राबता होता. नाणेघाटाच्या संरक्षणासाठी नगरच्या सरहद्दीवर हा किल्ला बांधला गेला. १६३७ मध्ये शहाजी राजांनी मोगलांशी केलेल्या तहामध्ये हडसर किल्ल्याचा समावेश होता, असा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतो. यानंतर १८१८ च्या सुमारास ब्रिटिशांनी जुन्नर व आसपासचे किल्ले जिंकले. हडसर किल्ल्याच्या वाटाही ब्रिटिशांनी सुरुंग लावून फोडल्या.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** हडसर किल्ल्याची प्रवेशद्वारे म्हणजे स्थापत्यशास्त्राचा एक नमुनाच आहे. बोगदेवजा प्रवेशमार्गावरची दरवाज्यांची दुक्कलं , नळीत खोदलेल्या पाय-या आणि गोमुखी रचना असलेली प्रवेशद्वारे पाहणे म्हणजे दुर्गशास्त्रातील एक वेगळेच दुर्गवैशिष्ट्यच ठरते. गडावरील मुख्य दरवाज्यातून वरती आल्यावर दोन वाटा फुटतात. यातील एक वाट समोरच्या टेकाडावर जाते. तर दुसरी वाट डावीकडे असणा-या दुस-या प्रवेशद्वारापाशी जाते. दुस-या दरवाज्यातून वरती आल्यावर समोरच पाण्याचे एक टाके आहे. यातील पाणी पिण्यास योग्य आहे. येथेच समोर एक उंचवटा दिसतो. या उंचवट्याच्या दिशेने चालत जाऊन डावीकडेवळल्यावर कड्यालगतच शेवटच्या खडकात कोरलेली तीन प्रशस्त कोठारे दिसतात. यांच्या कातळावर गणेशप्रतिमा कोरल्या आहेत. ही कोठारे राहण्यासाठी अयोग्य आहेत.येथूनच उजवीकडे गेल्यावर मोठा तलाव लागतो. येथे महादेवाचे मंदिरही लागते. मंदिराच्या समोरच मोठा नंदी असून मंदिराच्या सभामंडपात सहा कोनाडे आहेत. त्यापैकी एका कोनाड्यात गणेशमूर्ती , गरूडमूर्ती तर एकात हनुमानाची मूर्ती स्थानापन्न आहे. मंदिराच्या समोरच एक भक्कम बुरूज आहे. मंदिराच्या समोरच एक तलाव आहे. पावसाळ्यात तलावात भरपूर पाणी साठते. तळ्याच्या मधोमध एक पुष्करणी सारखे दगडातील घडीव बांधकाम आहे. बुरुजाच्या भिंतीच्या उजवीकडे खाली उतरल्यावर एक बुजलेले टाके दिसते. येथून थोडे पुढे गेल्यावर कातळात खोदलेली प्रशस्त गुहा लागते. मात्र ही गुहा म्हणजे पहारेक-यांची देवडीच होय. मंदिराच्या समोरील टेकडीवरून माणिकडोह जलाशयाचा परिसर अत्यंत सुरेख दिसतो. समोरच चावंड , नाणेघाट , शिवनेरी , भैरवगड, जीवधन असा निसर्गरम्य परिसर न्याहाळता येतो. येथून परत फिरून प्रवेशद्वारापाशी यावे आणि परतीच्या वाटेला लागावे.

**गडावर जाण्याच्या वाटा :** या किल्ल्यावर जाण्यासाठी प्रामुख्याने दोन मार्ग आहेत. यापैकी एक वाट राजदरवाज्याची असून दुसरी वाट गावक-यांनी त्यांच्या सोयीसाठी दगडात पाय-या कोरून बांधून काढलेली आहे.कोणत्याही वाटेने गडावर पोहचण्यासाठी हडसर या गावी यावे लागते. जुन्नरहून निमगिरी, राजूर किंवा केवाडा यापैकी कोणतीही बस पकडून पाऊण तासात हडसर या गावी पोहचता येते. हडसर या गावातून वर डोंगरावर जाताना एक विहीर लागते. येथून थोडे वर गेल्यावर डावीकडे पठारावर चालत जावे. पठारावरील शेतामधून चालत गेल्यावर १५ मिनिटांच्या अंतरावर दोन डोंगरामधील खिंड व त्यामधील तटबंदी दृष्टिक्षेपात येते. खिंड समोर ठेवून चालत गेल्यावर अर्ध्या तासात आपण बुरूजापाशी येऊन पोहचतो. येथून सोपे कातळरोहण करून आपण किल्ल्याच्या दरवाज्यापाशी येऊन पोहचतो. वाटेतच डोंगरकपारीत पाण्याची दोन टाकी आढळतात. दुसऱ्या वाटेने म्हणजे या खिंडीकडे न वळता सरळ पुढे चालत जाऊन डाव्या बाजूस असणा-या डोंगराला वळसा घालून डोंगराच्या मागील बाजूस पोहचावे. येथून शंभर ते दीडशे पाय-या चढून गेल्यावर आपण खिंडीतील मुख्य दरवाज्यापाशी पोहचतो. ही राजदरवाज्याची वाट असून अत्यंत सोपी आहे. येथून किल्ल्यावर जाण्यास एक तास पुरतो.

**राहण्याची सोय :** महादेवाच्या मंदिरात ४ ते ५ जणांना राहता येते. मात्र पावसाळ्यात मंदिरात पाणी साठत असल्याने राहण्याची थोडी गैरसोयच होते.

**जेवणाची सोय :** वर किल्ल्यावर जेवणाची सोय नसल्याने ती आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर प्रवेशद्वारातून वरती आल्यावर समोरच बारमाही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** १ तास

# जीवधन

किल्ल्याची उंची : ३७५४
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: नाणेघाट
जिल्हा : पुणे
श्रेणी : कठीण

घाटघरच्या परिसरात पूर्वमुखी असलेला 'जीवधन' किल्ला प्राचीन नाणेघाटाच्या व्यापारी मार्गावर संरक्षणासाठी उभा केला होता. जीवधन किल्ला नाणेघाटापासून अगदी सादेच्या अंतरावर आहे.

इतिहास : शिवजन्माच्या वेळी निजामशाही अस्ताला जात होती. पण याची साक्ष देणारा एकमेव किल्ला म्हणजे जीवधन होय. १७ जून १६६३ रोजी निजामशाही बुडाली. शहाजीराजांनी निजामशाहीचा शेवटचा वंशज 'मूर्तिजा निजाम' याला जीवधन या गडावर कैदेत असताना त्याला सोडवून संगमनेरजवळ असणा-या पेमगिरी किल्ल्यावर घेऊन गेले. त्याला निजामशहा म्हणून घोषित केले आणि स्वतः वजीर बनले. घाटघर हे जीवधनच्या पायथ्याचे गाव. येथील जमिनीचे वैशिष्ट्य म्हणजे बांबूची बने. सारे जंगल हे बांबूच्या बनांचे आहे.गोरक्षगडाप्रमाणे या गडांचा दरवाजादेखील कातळकड्यामध्ये कोरलेला आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : पश्चिम दरवाज्याने वर गडावर पोहोचल्यावर समोरच गजलक्ष्मीचं शिल्प आहे. गावकरी याला 'कोठी' असे संबोधितात. जवळच पाण्याची टाके आहेत. दक्षिणेस जीवाईदेवीचे पडझड झालेले मंदिर आहे. तसेच गडावर अंतर्भागात एकात एक अशी पाच धान्यकोठारं आहेत. आत कमलपुष्पे कोरलेली आहेत. शेवटच्या इंग्रज-मराठे युद्धात १८१८ मध्ये या कोठारांना आग लागली होती. ती राख आजही या कोठड्यांमध्ये आढळते. गडाच्या एका टोकाला गेल्यावर समोरच दोन हजार फूटांचा वांदरलिंगी सुळका लक्ष वेधून घेतो. गडाचा आकार आयताकृती आहे. वांदरलिंगीच्या कड्यापासून कोकणचे निसर्गरम्य दर्शन होते. समोरच नानाचा अंगठा, हरिश्चंद्रगड, हडसर, चावंड, कुकडेश्वराचे मंदिर, धसईचे छोटेसे धरण, माळशेज घाटातील काळे तुकतुकीत रस्ते न्याहाळता येतात. अशाप्रकारे हा जीवधन किल्ला चार ते पाच तासांत पाहून होतो.

गडावर जाण्याच्या वाटा :

१) कल्याण-नगर मार्गात नाणेघाट चढून गेल्यावर पठार लागते. या पठारावरून उजवीकडे जंगलात एक वाट जाते. या वाटेने दोन ओढे लागतात. हे ओढे पार केल्यावर एक कातळभिंत लागते. या भिंतीला चिकटून उजवीकडे जाणारी वाट वांदरलिंगी सुळक्यापाशी घेऊन जाते. तर डावीकडे जाणारी वाट एका खिंडीपाशी पोहोचते. जीव मुठीत धरून त्या उभ्या कातळभिंती पार केल्यावर पुन्हा कातळात खोदलेल्या पाय-या लागतात. सन १८१८ नंतर सुरुंग लावून इंग्रजांनी हा मार्ग चिणून काढला व पश्चिम दरवाज्याची वाट बुजवून टाकली. या दरवाज्याने वर जाण्यास अनेक वानरयुक्त्या योजाव्या लागतात. वाट जरा अवघडच असल्याने जपूनच जावे.
२) गडावरजाणारी दुसरी वाट जुन्नर-घाटघर मार्गेराजदरवाज्याची आहे. ही वाट घाटघरहून सरळ गडावर जाते. वाट अत्यंत सोपी आहे.

राहण्याची सोय : गडावर रहाण्याची सोय नाही

जेवणाची सोय : जेवणाची सोय आपण स्वतःच करावी.

पाण्याची सोय : गडावर बारमाही पाण्याची टाकी आहेत.

जाण्यासाठी लागणारा वेळ : २ तास

# नाणेघाट

किल्ल्याची उंची : २५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: नाणेघाट
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

इतिहास : नाणेघाट या नावावरूनच आपल्याला कल्पना येईल की हा घाट फारच पुरातन आहे. नाणेघाट सुमारे सव्वादोन हजार वर्षापूर्वी खोदला गेला. प्रतिष्ठान ही सातवाहनांची राजधानी. सातवाहन काळात कल्याण ते प्रतिष्ठान (जुन्नर) या राजमार्गावर नाणेघाटात डोंगर फोडून ह्या मार्गाची निर्मिती केली गेली. सातवाहन कुल हे महाराष्ट्रातील प्राचीन असे कुल आहे आणि त्यांचे राज्य इ.स पूर्व अडीचशे वर्ष तर ते इ.स नंतर अडीचशे वर्षेअसे जवळजवळ पाचशे वर्ष होते. प्राचीन काळी कल्याण बंदरामध्ये परकीय लोक

विशेषत: रोमन व्यापारी आपला माल घोडे अथवा बैलावर वाहून नेत असत. हा माल प्रामुख्याने सातवाहन काळातील राजधानी असलेल्या प्रतिष्ठान नगरीत व्यापारासाठी नेला जाई. या व्यापाऱ्यांकडून जकात जमा केली जाई. त्या जकातीचा दगडी रांजण आजही येथे पहावयास मिळतो

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : नाणेघाटाची संरक्षक फळी ही शिवनेरी, हडसर, चावंड आणि जीवधन या चार किल्ल्यांनी बनलेली आहे. साठ मीटर लांब आणि जागोजागी दोन ते पाच मीटर रूंद अशी ही नाणेघाटाची नळी आहे. या नळीच्या मुखाशी एक दगडी रांजण आहे. अदमासे चार फूट व्यासाचा आणि पाच फूट उंचीचा हा रांजण पूर्वी जकातीसाठी वापरला जात असे. जकातकर रुपाने यात तत्कालीन ‘कर्षापण’ नावाची नाणी टाकली जात असत. नाणेघाट चढून गेल्यावर प्रथम दर्शनी दृष्टिक्षेपात पडणारी कातळात कोरलेली ऐसपैस आणि सुंदर गुहा हेच येथील महत्वपूर्ण वैशिष्ट्य होय. या गुहेत साधारणत: ४०-४५ जण राहू शकतात. सध्या वापरण्यात येणा-या गुहेत तिन्ही भिंतीवर लेख आहेत. हा लेख एकूण २० ओळींचा असून मध्य भागातील भिंतीवर १० तर उजवीकडील भागावर दहा ओळी आहेत. हा लेख ब्राम्ही लिपीतला असून या लेखामध्ये अनेक अंकनिर्दिष्ठ संख्या आहेत. पुराणकालातील इतकी संख्या असलेल्या भारतातील हा प्राचीन असा लेख आहे. या लेखात सातवाहन सम्राज्ञी ‘नागतिका’ हिने केलेल्या यज्ञांची नावे आहेत. येथे वाजपेय, राजसूय, अश्वमेध अशा प्रकारचे यज्ञ केले असल्याचे उल्लेख सापडतात. या यज्ञात ब्राह्मणांना केलेल्या दानांचा देखील उल्लेख या लेखांमध्ये आढळतो. या गुहेत सातवाहनांची शिल्पे देखील कोरलेली आहेत. यापैकी पहिले शिल्प सातवाहन संस्थापक शालिवाहनाचे, दुसरे शिल्प राजा सातकर्णी याची पत्नी देवी नायनिकीचे तर तिसरे शिल्प राजा सातकर्णीचे. गुहेवर पाण्याची तीन ते चार टाकी आढळतात. गुहेच्या वर पाहिल्यावर एक प्रचंड कातळ भिंत दिसते, यालाच नानाचा अंगठा असे म्हणतात. घाटमाथ्यावर पोहचल्यावर ,उजवीकडे वळल्यावर आपण नानाच्या अंगठ्यावर येऊन पोहोचतो.येथेच बाजूला एक गणेशाची मूर्तीही दृष्टिक्षेपात येते. समोर दिसणारे गोरखगड, मच्छिंद्रगड , सिध्दगड, हरिश्चंद्रगड, भैरवकडा, कोकणकडा आणि डावीकडे असणारा जीवधन आपले मन मोहून टाकतात. घाटावरील विस्तीर्ण असे पठार हे नाणेघाटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. अशाप्रकारे मुंबईकरांना एका दिवसात जाऊन येता येईल असा नाणेघाटाचा ट्रेक हा एक सुरेख अनुभव ठरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा** : नाणेघाटाला यायचे झाल्यास मुंबई किंवा पुणे गाठावे १: मुंबईकरांना नाणेघाटाला यायचे असल्यास कल्याण मुरबाड मार्गेवैशाखरे गावी यावे. वैशाखरे हे जरी पायथ्याचे गाव असले तरी तेथे न उतरता वैशाखरे पासून पुढे दोन कि.मी अंतरावर असलेल्या नाणेघाट या नामनिर्देशित फलकाच्या मार्गाने थेट दोन तासात आपल्याला नाणेघाटावर पोहचता येते. या वाटेवर पावसाळ्यात दोन ओढ्यांचे दर्शन होते. २:पुण्याहून नाणेघाटाला यायचे झाल्यास पुणे-जुन्नर एसटी पकडून जुन्नरला यावे. जुन्नर ते घाटघर एसटी पकडून घाटघरला यावे. येथ पर्यंत पोहचण्यास दीड तास लागतो.घाटघर वरून ५ कि.मी चालत नाणेघाट गाठता येतो.

**राहण्याची सोय** : गुहेत ४०-४५ जणांच्या रहाण्याची सोय होते.

**जेवणाची सोय** : किल्ल्यावर कोणत्याही प्रकारच्या जेवणाची सोय नसल्याने ही सोय आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय** : गुहेशेजारील तीस-या व चौथ्या टाक्यातील पाणी पिण्यासाठी योग्य आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : दोन तास पायथ्यापासून.

# रोहीडा

{कल्ल्याची उंची : ३६६० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

सह्याद्रीच्या डोंगररांगेत भोर ते महाबळेश्वर असा एक सुरेख डोंगरमार्ग आहे. या डोंगररांगेत ३ ते ४ किल्ले आहेत. यापैकी एक रोहीड खो-यात वसलेला किल्ला म्हणजेच ‘किल्ले रोहीडा’. रोहीडखोरे हे नीरा नदीच्या खो-याच्या काही भागात वसलेले आहे. या खो-यात ४२ गावे होती. त्यापैकी ४१ गावे सध्याच्या पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात मोडतात. रोहीडा किल्ला हे रोहीड खो-याचे प्रमुख ठिकाण होते. पुणे सातारा जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, सहकारी दूधयोजना यामुळे येथील परिसरातील बहुतेक सर्व गावापर्यंत बस, वीज आदी सुविधा पोहचल्या आहेत. त्यामुळे येथील जीवन सुखी झालेले आहे. रोहीडा किल्ला भोरच्या दक्षिणेस सुमारे ६ मैलांवर आहे. रोहीडा किल्ल्याला विचित्रगड किंवा बिनीचा किल्ला असे देखील संबोधले जाते.

**इतिहास** : या किल्ल्याची निर्मिती ही यादवकालीन आहे. या किल्ल्यावरील तीस-या दरवाजावर असणा-या शिलालेखावरून मुहम्मद आदिलशहाने ह्या गडाची दुरुस्ती केली असे अनुमान निघते. या शिलालेखावरून मे १६५६ नंतर हा किल्ला शिवाजी

महाराजांनी बांदल देशमुखांकडून घेतला असे समजते. किल्ला घेण्यासाठी राजांना बांदल देशमुखांशी हातघाईची लढाई करावी लागली. यात कृष्णाजी बांदल मारला गेला. बाजीप्रभू देशपांडे बांदलाचे मुख्य कारभारी होते. लढाईंतर बाजीप्रभू देशपांडे व इतर सहका-यांना स्वराज्यात सामील करून घेतले गेले. इ.स. १६६६ च्या पुरंदरच्या तहानुसार हा किल्ला मोघलांच्या स्वाधीन केला गेला. २४ जून १६७० रोजी शिवरायांनी किल्ला परत घेतला.कान्होजी यांच्याकडे भोरची पूर्ण तर रोहीडा किल्ल्याची निम्मी देशमुखी व जमिनीचे काही तुकडे इनाम होते. रोहीड्याचे गडकरी त्यांचेकडून ३० होन घेत होते. शिवाजी महाराजांच्या अधिका-यांनी शिवाजी महाराजांकडे विचारणा केली की ३० च होन का, शिवाजी महाराजांनी निर्णय दिला की, जेथे आपले चाकर असल्यामुळे पूर्वापार चालत आलेले द्रव्यच घ्यावे. पुढे किल्ला मोघलांनी जिंकला, मात्र भोरच्या पंत सचिवांनी औरंगजेबाशी झुंजून किल्ला स्वराज्यात पुन्हा दाखल केला. संस्थाने विलीन होईपर्यंत राजगड, तोरणा, तुंग आणि तिकोना किल्ल्याप्रमाणे हा ही किल्ला भोरकरांकडे होता.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : पहिल्या दरवाज्याच्या चौकटीवर गणेशपट्टी आणि वर मिहराब आहे. पुढे १५ ते २० पाय-या पार केल्यावर दुसरा दरवाजा लागतो. येथून आत गेल्यावर समोरच पाण्याचे भुयारी टाके आहे. याचे पाणी बाराही महिने पुरते. येथून ५-७ पाय-या चढून गेल्यावर तिसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा अतिशय भक्कम आहे. यावर ब-याच प्रमाणात कोरीव काम आढळते. दोनही बाजूंस हत्तीचे शिर कोरण्यात आले आहे. तसेच डाव्या बाजूला मराठी व उजव्या बाजूला फारसी शिलालेख आहे. आजुबाजूच्या तटबंदीची पडझड झाली आहे. ह्या सर्व दरवाजांची रचना एकमेकांना काटकोनात आहे. येथून आत शिरल्यावर समोरच २ वास्तू दिसतात. एक गडावरील सदर असावी तर दुसरे किल्लेदाराचे घर असावे. डाव्या बाजूला थोडे अंतर चालून गेल्यावर रोहिडमल्ल उर्फ भैराबाचे मंदिर लागते. मंदिरासमोर लहानसे टाके, दीपमाळ व चौकोनी थडगी आहेत. देवळात गणपती, भैरव व भैरवी यांच्या मूर्ती आहेत. रोहीड्याचा घेर तसा लहानच आहे. किल्ल्याच्या आग्नेयेस शिरवले बुरूज, पश्चिमेस पाटणे बुरूज व दामगुडे बुरूज, उत्तरेस वाघजाईचा बुरूज व पूर्वेस फत्ते बुरूज व सदरेचा बुरूज असे एकूण ६ बुरूज आहेत. गडाची तटबंदी व बुरुजांचे बांधकाम अजूनही मजबूत आहेत. गडाच्या उत्तरेकडील भागात टाक्यांची सलग रांग आहे. येथेच एक भूमिगत पाण्याचे टाके आहे. तेथेच मानवी मूर्ती व शिवपिंडी आहे. संपूर्ण गड फिरण्यास दीड तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

बाजारवाडी मार्गे: दक्षिणेस ८-१० किमी अंतरावर बाजारवाडी नावाचे गाव आहे. बाजारवाडीपर्यंत जाण्यासाठी एसटी सेवा उपलब्ध आहे. बाजारवाडीपासून मळलेली वाट गडाच्या पहिल्या दरवाजापाशी घेऊन जाते. वाट अत्यंत सोपी असून दरवाजापर्यंत पोहचण्यास एक तास लागतो.अंबवडे मार्गेभोर ते अंबवडे अशी एसटी सेवा उपलब्धआहे.पूणे-भोर-पानवळ-अंबवडे अशी बससेवा देखील उपलब्ध आहे. या गाडीने अंबवडे गावी उतरून गावाच्या पूर्वेकडील दांडावरून गड चढण्यास सुरुवात करावी. ही वाट लांबची आणि निसरडी आहे. या वाटेने गड गाठण्यास सुमारे अडीच तास पुरतात.शक्यतो गडावर जाताना बाजारवाडी मार्गेजावे आणि उतरताना नाझरे किंवा अंबवडे मार्गेउतरावे म्हणजे रायरेश्वराकडे जाण्यास सोपे जाते.

रोहीडा ते रायरेश्वर वाटा : १. भोर - कारी बसने कारी गावात उतरावे. तिथून लोहदरा मार्गे२ तासांत रायरेश्वर पठाराकडे पोहचतो व पठारावरील वस्ती पर्यंत जाण्यास दीड तास लागतो. २. वडतुंबी मार्गे- दुपारची (२.४५) भोर-टिटेघर गाडी आंबवण्यास येते. तिने वडतुंबी फाट्यावर उतरावे. तिथून १५ मिनिटांत वडतुंबी गाव गाठणे. येथून साधारणतः २ तासात गणेशदरा मार्गेरायरेश्वर पठारावर पोहचता येते. ३. भोर-कोर्लेगाडीने कोर्लेगावात उतरावे. रात्री उशीर झाल्यास गावात मुक्काम करून पहाटे गायदरा मार्गाने ३ तासात रायरेश्वर पठारावरील देवळात जाता येते. ४. भोर-दाबेकेघर बसने दाबेकेघरला उतरायचं व तिथून धानवली पर्यंत चालत जायचं. पुढे वाघदरामार्गे३ तासात रायरेश्वर गाठायचं.

**राहण्याची सोय** : रोहीडमल्लच्या मंदिरात ५ ते ७ जणांची रहाण्याची सोय होते. पावसाळ्यात मात्र मंदिरात रहाता येत नाही.

**जेवणाची सोय** : जेवणाची सोय आपण स्वतःच करावी.

**पाण्याची सोय** : गडावर पिण्याचे पाणी बारमाही उपलब्ध आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : बाजारवाडी मार्गे- १ तास

# कोरीगड - कोराईगड

किल्ल्याची उंची : फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

मुळशी धरणाच्या पश्चिमेकडे एक मावळ आहे त्याचे नावं आहे कोरबारस मावळ.याच मावळ प्रांतात कोरीगड आणि घनगड हे किल्ले येतात.लोणावळा आणि पाली यांच्यामध्ये असणा-या सव्वाष्णी घाटाच्या माथ्यावर कोरीगड आहे.हा किल्ला प्रसिद्ध आहे त्याच्या सद्यःस्थितीला असलेल्या अखंड तटबंदीमुळे. या भागातील किल्ले पहावयाचे असल्यास तीन ते चार दिवसांची सवड हवी. कोरीगड, घनगड, सुधागड आणि सरसगड या सारखा सुंदर ट्रेकही या भागात आपल्याला करता येतो.

**इतिहास :** या गडाचा इतिहासात फारसा कुठे उल्लेख नाही. १६५७ मध्ये महाराजांनी लोहगड, विसापूर, तुंग-तिकोना या किल्ल्यांबरोबर कोरीगड आपल्या स्वराज्यात दाखल करून घेतला. मार्च १८१८ मध्ये एक तोफेचा गोळा दारुकोठारावर पाडून त्याने हा गड जिंकला .गडावर मोठ्या प्रमाणावर प्राणहानी आणि वित्तहानी झाली . या किल्ल्याबरोबर दक्षिणेकडील घनगडही ही इंग्रजांना मिळाला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** पेठ-शहापूर गावातून कोराईगड एका भिंतीसारखा भासतो. गडमाथा म्हणजे एक भलेमोठे पठारच आहे.गडाची तटबंदी साधारणतः दीड किलोमीटर लांबीची आहे. तटबंदीवरून संपूर्ण गडाला फेरा घालता येतो. पेठ-शहापूरच्या वाटेने वर येतांना मार्गात अनेक गुहा व पाण्याची टाके आणि श्री गणेशाची मूर्ती लागते. गणेशदरवाज्याने अर्थात पेठ शहापूरच्या वाटेने वर आल्यावर समोरच वाड्यांचे अवशेष आढळतात. समोरच पठारावर दूरवर कोराईदेवीचे मंदिर आहे .मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. मंदिरासमोरच एक दीपमाळ आहे. कोराईदेवीच्या मूर्तीची उंची साधारणतः चार फूट आहे. गडावर दक्षिणेकडच्या बाजूस अनेक बुरूज आहेत. गडावर आजही सहा तोफा आहेत. त्यापैकी सर्वात मोठी 'लक्ष्मी ' तोफ कोराईदेवीच्या मंदिराजवळ आहे.याचप्रमाणे गडावर आणखी दोन मंदिरे आहेत. गडावर दोन विस्तीर्ण तळी आहेत. तळ्यांच्या पुढे आणखी दोन गुहा आहेत. येथेच शंख-चक्र -गदा-पद्मधारी श्री विष्णूची मूर्ती आहे. गडावरून समोरच नागफणीचे टोक, तुंग, तिकोना, माथेरान, प्रबळगड, कर्नाळा आणि माणिकगड असा सर्व परिसर दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** सद्यःस्थितीला गडावर जाण्यासाठी दोन वाटा अस्तित्वात आहेत.

१. पेठ-शहापूर : कोरीगडला जाण्यासाठी लोणावळ्याला यावे. येथून आय.एन.एस. शिवाजीमार्गेआंबवणे किंवा भांबुर्डेला जाणारी बस पकडावी, किंवा सहारा प्रकल्पाकडे जाणारी बस पकडावी आणि भुशी धरणाच्या पुढे, आय.एन.एस. शिवाजीच्या पुढे २२ कि.मी. वरील पेठ-शहापूर गावात उतरावे. या गावातून सरळ जाणारी पायवाट आपल्याला पाय-यांपाशी घेऊन जाते. पाय-यांच्या सहाय्याने वीस मिनिटांत गडावर पोहचता येते.

२. आंबवणे गाव : कोरीगडला जाण्यासाठी आंबवणे गावातूनही जाता येते. ही वाट मात्र जरा अवघड आहे. या वाटेने जाण्यासाठी लोणावळ्याहून भांबुर्डेकडे अथवा थेट आंबवणेकडे जाणारी बस पकडावी. गावातून अर्ध्या तासात गडावर जाता येते.

**राहण्याची सोय :** गडावरील मंदिरात राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** किल्ल्यावर जेवणाची सोय नसल्याने ती आपण स्वतःच करावी.

**पाण्याची सोय :** गडावर नाही, गडावर दोन तळी असली तरी त्यातील पाणी पिण्यायोग्य नाही. पेठशहापूर मार्गेगडावर येणाऱ्या वाटेवर दरवाजाच्या अलीकडे एक टाके आहे. पिण्याच्या पाण्यासाठी हे वापरावे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पेठशहापूर मार्गेअर्धा तास.

# घनगड

किल्ल्याची उंची : ३०००
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुग
ंडोंगररांग: - लोणावळा
जिल्हा : रायगड
श्रेणी : कठीण

मुळशीच्या पश्चिमेला एक मावळ भाग आहे यालाच 'कोरसबारस' मावळ म्हणतात.याच मावळात येणारा हा घनगड.आड बाजूला असलेला हा किल्ला मात्र आपल्यासारख्या ट्रेकर्सला नेहमीच खुणावत राहतो.येथील जनजीवन शहरी सुखसोयींपासून दुरावलेले.

**इतिहास :**

किल्ल्याच्या बद्दल इतिहासात फारसा उल्लेख आढळत नाही.मात्र किल्ला कोळी सामंताकडून निजामशहाकडे आणि पुढे आदिलशहाकडे आणि नतर मराठ्यांकडे आला.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

किल्ल्यावर प्रवेश केल्यावर डाव्या हाताला असणारी टेकडीवर जाणारी वाट पकडावी.या वाटेने वर जातांना एका पडक्या दरवाजातून आपण गडमाथ्यावर प्रवेश करतो.गडावर पडक्या घरांचे अवशेष आहेत.पाण्याची एक ते दोन टाकी आहेत आजमितिस मात्र ती फुटलेली आहेत.बाकी किल्ल्यावर फारसे अवशेष नाहीत.किल्ल्यावरून सुधागड,सरसगड अणि तैलबैला ची भिंत हा परिसर दिसतो.तसेच नाणदांड घाट ,सव्वष्णीचा घाट ,भोरप्याची नाळ या कोकणातील घाटवाटा सुध्दा दिसतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

कठीण. प्रस्तरारोहण आवश्यक.

१. ऐकोलेमार्गे

किल्ल्यावर जाण्यासाठी एकच वाट आहे अणि ती ऐकोले गावातूनच वर जाते.मुंबईकरानी अणि पुणेकरांनी लोणावळा गाठावे.लोणावळ्याहून भाबुर्डेकडे जाणारी एस टी पकडावी.लोणावळा ते भांबुर्डेहे अंतर ४० कि.मी चे आहे.भांबुर्डेगावातून थेट ऐकोले गावात यावे .भांबुर्डेते ऐकोले हे साधारणत: अंतर २० मिनिटाचे आहे.ऐकोले गावातूनच किल्ल्यावर जाण्याचा रस्ता आहे.गावातून बाहेर पडल्यावर डावीकडची वाट पकडावी.ही वाट थेट किल्ल्यावर जाते.यावाटेने पुढे जातांना गारजाई देवीचे मंदिर लागते.या मंदिरात ''श्री गारआई महाराजाची व किले घनगडाची '' असा शिलालेख कोरलेला आहे.मंदिराच्या समोरच एक तोफगोळा पडलेला आहे. या मंदिराच्या डाव्या बाजूनेच किल्ल्यावर जाणारी वाट आहे.येथून थोड्याच वेळात आपण एका कातळकड्यापाशी येऊन पोहचतो.गडावर जाणारी वाट इग्रजांनी सुरुंग लावून चिणून काढली आहे.१५ फुटाच्या ह्या कड्यावर थोडे प्रस्तरारोहण करून चढून जावे लागते.आवश्यक असल्यास १५ फुटाचा दोर लावावा.हा कडा पार केला की आपण थेट किल्ल्यातच प्रवेश करतो.

## राहण्याची सोय :

वर राहण्याची सोय नाही मात्र गारजाई च्या मंदिरात २० लोकांची राहण्याची सोय होते.

## जेवणाची सोय :

आपण स्वत: करावी.

## पाण्याची सोय :

किल्ल्यावर पिण्याचे पाणी नाही

## जाण्यासाठी लागणारा वेळ :

ऐकोले गावातून अर्धातास

## जाण्यासाठी उत्तम कालावधी सर्व ऋतुत

# लोहगड

किल्ल्याची उंची :
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

पवनामावळात असणारा आणि लोणावळा (बोर) घाटाचाक संरक्षक असणारा हा लोहगड पुणे – मुंबई हमरस्त्यावरून सहजच नजरेस पडतो. पुण्या आणि मुंबईपासून जवळ असल्या कारणाने येथे ट्रेकर्स मंडळींची नेहमीच ये जा चालू असते. किल्ल्याच्या पोटात भाजे आणि बेडसे या प्रसिध्द लेण्या आहेत.. मुंबई – पुणे रेल्वेमार्गावरील मळवली स्टेशनवर उतरून आपण किल्ल्याकडे जाऊ शकतो. महामार्गापासून जवळच असल्याने पायथ्याच्या गावात सर्व सुखसुविधा आहेत.

**इतिहास** : लोहगड किल्ला हा अति मजबूत, बुलंद आणि दुर्जेय आहे. किल्ल्याची निर्मिती जवळ असणारी भाजे आणि बेडसे ही बौद्धकालीन लेणी ज्या काळी निर्माण झाली, त्याही पूर्वी म्हणजेच सत्तावीशसे वर्षांपूर्वी झालेली असावी असे अनुमान निघते. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव या सर्व राजवटी या किल्ल्याने पाहिल्या.इ. स. १४८९ मध्ये मलिक अहमंदने

निजामशाहीची स्थापना केली आणि अनेक किल्ले जिंकून घेतले. त्यापैकीच लोहगड हा एक. इ. स. १५६४ मध्ये अहमदनगरचा सातवा राजा दुसरा बुऱ्हाण निजाम या किल्ल्यावर कैदेत होता. इ. स. १६३० मध्ये किल्ला आदिलशाहीत आला. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण आणि भिवंडी परिसर जिंकून घेतला आणि लोहगड - विसापूर हा सर्व परिसर सुद्धा स्वराज्यात सामील करून घेतला. इ. स. १६६५ मध्ये झालेल्या पुरंदरच्या तहात हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला गेला. पुढे १३ मे १६७० मध्ये मराठ्यांनी किल्ला परत जिंकला. पहिल्या सुरत लूटेच्या वेळेस आणलेली संपत्ती नेताजी पालकरने लोहगडावर आणून ठेवली होती. इ. स. १७१३ मध्ये शाहूमहाराजांनी कृपावंत होऊन लोहगड कान्होजी आंग्रे यांस दिला. १७२० मध्ये आंगऱ्यांकडून तो पेशव्यांकडे आला. १७७० मध्ये नाना फडणवीसांचा सरदार जावजी बोंबले याने तो आपल्या ताब्यात घेतला. नानांनी पुढे धोंडोपंत नित्सुरे यांच्याकडे किल्ल्याचा कारभार सोपवला.इ. स. १७८९ मध्ये नानांनी किल्ल्याचे बांधकाम आणखीन मजबूत करून घेतले. किल्ल्यात नानांनी सोळा कान असलेली एक बाव बांधली व तिच्या बाजूस एक शिलालेख कोरला, त्याचा अर्थ असा- शके १७११ मध्ये बाळाजी जनार्दन भानू - नाना फडणवीस यांनी ही बाव धोंडो बल्लाळ नित्सुरे यांच्या देखरेखीखाली बाजीचट याचेकडून बांधिवली. नानांनी आपले सर्व द्रव्य नित्सुऱ्यांचे निगराणीत लोहगडावर आणले. १८०० मध्ये नित्सुऱ्यांचा कैलासवास झाला. १८०२ मध्ये त्यांच्या पत्नी किल्ल्यावर येऊन राहिल्या. १८०३ मध्ये किल्ला इंग्रजांनी घेतला. पण नंतर दुसऱ्या बाजीरावाने तो पुन्हा जिंकला. ४ मार्च १८१८ ला जनरल प्रॉथर लोहगड जिंकण्यासाठी आला. त्याने सर्व प्रथम विसापूर जिंकला. ज्या दिवशी विसापूर इंग्रजांनी घेतला त्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठे लोहगड सोडून गेले. **गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : गडावर चढतांना आपल्याला सलग चार प्रवेशद्वारांमधून आणि सर्पाकार मार्गावरून जावे लागते. सर्वप्रथम १. गणेश दरवाजा:- ह्याच्याच डाव्या - उजव्या बुरुजाखाली सावळे कुटुंबाचा नरबळी देण्यात आला होता आणि त्याच्या बदल्यात त्यांच्या वंशजांना लोहगडवाडीचीपाटिलकी देण्यात आली होती.येथे आतील बाजूस शिलालेख आहेत. २. नारायण दरवाजा:- हा दरवाजा नाना फडणीसांनी बांधला. येथे एक भुयार आहे, जिथे भात व नाचणी साठवून ठेवण्यात येई. ३. हनुमान दरवाजा:- हा सर्वात प्राचीन दरवाजा आहे. ४. महादरवाजा:- हा गडाचा मुख्य दरवाजा आहे. यावर हनुमानाची मूर्ती कोरली आहे. ह्या दरवाज्यांचे काम नाना फडणीसांनी १ नोव्हेंबर १७९० ते ११ जून १७९४ या कालावधीत केले.महादरवाज्यातून आत शिरताच एक दर्गा लागतो. दर्ग्याच्या शेजारी सदर व लोहारखानाचे भग्न अवशेष आढळतात. याच दर्ग्याच्या बाहेर बांधकामाचा चुना बनविण्याचा घाणा आहे.उजवीकडे ध्वजस्तंभ आहे.याच्या जवळच एक तोफ काही हौश दुर्गप्रेमींनी सिंमेटच्या चौथ-यात बसवलेली आहे.अशीच एक तोफ तुटलेल्या अवस्थेत लक्ष्मीकोठीच्या समोर पडलेली आहे. ध्वजस्तंभाच्या उजवीकडे चालत गेल्यास लक्ष्मी कोठी आढळते. या कोठीत राहाण्याची सोय होते.या कोठीत अनेक खोल्या आढळतात.दर्ग्याच्या पुढे थोडे उजवीकडे गेल्यास थोडा उंचवटयाचा भाग आहे , जिथे एक सुंदर शिवमंदिर आढळते.पुढे सरळ चालत गेल्यावर एक छोटेसे तळे आहे.हे तळ अष्टकोनी आहे. त्याच्याच बाजूला पिण्याच्या पाण्याचे टाके देखील आहे.ही गडावरील पिण्याच्या पाण्याची एकमेव सोय आहे. तिथून पुढे पंधरा ते वीस मिनिटे चालत गेल्यास एक मोठे तळे आढळते.नाना फडणवीसांनी या तळ्याची बांधणी केली आहे.हे तळं सोळाकोनी आहे.मोठ्या तळ्याच्या पुढे विंचुकाट्याकडे जातांना वाड्यांचे काही अवशेष दिसतात. लक्ष्मी कोठीच्या पश्चिमेस विंचूकाटा आहे. या विंचूकाट्यास बघून आपल्याला आठवण येते ती म्हणजे राजगडाच्या संजीवनी माचीची. पंधराशे मीटर लांब आणि तीस मीटर रुंद अशी ही डोंगराची सोंड आहे. विंचुकाटयावर जाण्यासाठी एक टप्पा उतरून पलीकडे जावे लागते . गडावरून पाहिले असता हा भाग विंचवाच्या नांगीसारखा दिसतो,म्हणून यांस विंचूकाटा म्हणतात.या भागात पाण्याची उत्तम सोय आढळते. गडाच्या आजुबाजूचा परिसर न्याहाळण्यासाठी या विंचूकाट्या चा उपयोग होत असावा. या गडावरून येतांना भाजे गावातील भाजे लेण्या आवर्जून पाहव्यात.पावसाळ्यातील लोहगडाचे रुप पाहिले की मनोन्मनी गुणगुणतं...। ओल्या पानातल्या रेषा वाचतात ओले पक्षी। आणि पोपटी रंगाची रान दाखविते नक्षी ।।

**गडावर जाण्याच्या वाटा** : लोहगडावर जाण्यासाठी तीन वाटा आहेत.

**1**) पूण्यावरून अथवा मुंबईवरून येतांना लोणावळ्याच्या पुढे असणा-या मळवली स्थानकावर उतरावे.तेथून एक्स्प्रेस हायवे पार करून भाजे गावातून थेट लोहगडला जाणरी वाट पकडावी.वाट मोठी आणि प्रशस्त आहे.तिथून दीड तासांच्या चालीनंतर ‘गायमुख’ खिंडीत येऊन पोहचतो. खिंडीच्या अलिकडेच एक गाव आहे त्याचे नाव लोहगडवाडी.खिंडीतून उजवीकडे वळले म्हणजे लोहगडास प ास पोहचतो आणि डावीकडे वळले म्हणजे विसापूर किल्ल्यावर पोहचतो.या मार्गेलोहगडावर प्रवेश करतांना चार दरवाजे लागतात.

२) लोणावळ्याहून दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने थेट लोहगडावाडी पर्यंत जाता येते.पवना धरणाकडे जाणा-या रस्त्याने थोडे पुढे गेल्यावर डावीकडे एक रस्ता लागतो तेथून ३ ते ४ किं मी अंतरावर लोहगडावाडी आहे.उभा चढ आणि अतिशय धोकादायक वळणे आहेत.साधारण अर्धा तासाचा प्रवास आहे.मात्र येथे एसटी महामंडळाची सोय नाही.स्वत:चे वाहन असल्यास उत्तम अथवा लोणवळ्यातून ट्रॅक्सने जाता येते मात्र ट्रॅक्सभाडे १००० रु आहेत.

३) काळे कॉलनी ही पवना धरणाजवळ वसलेली आहे.तेथून लोहगड आणि विसापूर मधील गायमुख खिंड परिसर व्यवस्थित दिसतो.पवना धरणाच्या खालून एक रस्ता गायमुख खिंडीच्या डावीकडील टेकटेकडीवर जातो तेथून एक मळलेलीपायवाटआपणासलोहगडावाडीत घेऊन जाते.या टकडीवर अग्रवाल नावाच्या इसमाचा बंगला आहे.या वाटेने किल्ल्यावर जाण्यास २ तास लागतात.

**राहण्याची सोय :** लक्ष्मी कोठी रहाण्याची एकमेव सोय आहे.३० ते ४० जण आरामात राहू शकतात.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: जेवणाची सोय करावी अथवा लोहगडवाडी मध्यक जेवणाची सोय होते.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्यासाठी पाणी उपलब्ध आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २ तास.

# विसापूर

किल्ल्याची उंची : ३०३८फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : पुणे
श्रेणी : मध्यम

पुण्याकडे जातांना लोणावळा सोडले की लोहगड-विसापूर ही जोडगोळी गिर्यारोहकांचे लक्ष वेधून घेत असते. मळवली रेल्वेस्थानकावर उतरल्यावर समोरच दिसतो तो म्हणजे लोहगड. मात्र डोंगरामागे लपलेला विसापूर किल्ला भाजे गावात गेल्यावरच नजरेस पडतो. पवनामावळात मोडणारा आणि लोणावळा (बोर) घाटाचे संरक्षण हा विसापूर किल्ला करतो. पूर्वीपासूनच दुर्लक्षित असलेला हा विसापूर किल्ला इतिहासात फार मोठे असे स्थान मिळवू शकला नाही.

**इतिहास :** मराठे १६८२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात पुण्याच्या उत्तर बाजूला स्वारीसाठी गेले. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शहाबुद्दीन चाकणमध्ये होता. मराठे लोहगडाच्या बाजूला आल्याचे समजल्यावर तो तेथे पोहचला. तेथे त्याने केलेल्या चकमकीत ६० माणसांची कत्तल झाली. तेथून मराठे विसापूर किल्ल्यावर गेल्याचे समजले म्हणून तो तेथे पोहचेपर्यंत मराठे कुसापुर गावाजवळ पोहचले. १६८२ मध्ये मराठ्यांचा आणि मोगलांचा शिवाशिवीचा खेळ चालूच होता. ४ मार्च १८१८ ला जनरल प्रॉथर लोहगड जिंकण्यासाठी आला. त्याने सर्व प्रथम विसापूर जिंकला. ज्या दिवशी विसापूर इंग्रजांनी घेतला त्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठे लोहगड सोडून गेले

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** पाय-यांच्या सहाय्याने किल्ल्यावर जाताना एक मारुतीचे देऊळ आहे. बाजूलाच दोन गुहा आहेत. यात ३० ते ४० जणांची रहाण्याची सोय होते. मात्र पावसाळ्यात गुहेत पाणी साठते. गडावर पाण्याची तळी आहेत. गडावरील पठारावर लांबवर पसरलेली तटबंदी आपले लक्ष्य वेधून घेते. गडावर एक मोठे जातंही आहे

**गडावर जाण्याच्या वाटा :** मुंबई-पुणे लोहमार्गावर मळवली या रेल्वे स्थानकावर उतरावे. येथून भाजे गावात यावे. भाजे गावातून विसापूर किल्ल्यावर जाण्यास दोन वाटा आहेत.

१) पहिल्या वाटेने गडावर जायचे झाल्यास वाटाड्या घेणे आवश्यक ठरते. भाजे लेण्यांना जाण्यासाठी पाय-या आहेत. या पाय-या सोडून एक पायवाट जंगलात गेलेली दिसते. उजवीकडची पायवाट धरल्यावर २० मिनिटे चालून गेल्यावर काही घरे लागतात. या वाटेने आपण मोडकळीस आलेल्या पाय-यांपाशी पोहचतो. येथे बाजूलाच एक मंदिर आहे.

२) दुस-या वाटेने भाजे गावातून गायमुख खिंडीपर्यंत यावे. गायमुख खिंडीतून डावीकडे जंगलात जाणारी वाट थेट विसापूर किल्ल्यावर घेऊन जाते.

३) मळवली स्थानकातून बाहेर आल्यावर वाटेत एक्स्प्रेस हायवे लागतो. हायवे पार करण्यासाठी बांधलेल्या पादचारी पुलावरून डावीकडे उतरणारा जिना उतरल्यावर पाटण गाव लागते. याच पाटण गावातून विसापूरवर जाण्याचा रस्ता आहे.

**राहण्याची सोय :** गडावर रहाण्यासाठी दोन गुहा आहेत.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपण स्वतःच करावी.

**पाण्याची सोय :** गडावर पिण्याच्या पाण्यासाठी तळी आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** अडीच तास.

# राजमाची

किल्ल्याची उंची :
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : पुणे
श्रेणी : मध्यम

सह्याद्रीच्या लोणावळा खंडाळा पासून निघणा-या डोंगररांगेमुळे निर्माण झालेला परिसर 'उल्हास नदीचे खोरे' म्हणून ओळखला जातो.याच परिसरातून उल्हास नदी उगम पावते.याच 'उल्हास नदीच्या खो-यांच्या प्रदेशात मुंबईपुणे लोहमार्गावर लोणावळ्याच्या वायव्येस १५ कि.मी अंतरावर राजमाची किल्ला वसलेला आहे.कल्याणा नालासोपारा ही प्राचीन काळातील मोठी व्यापारी बंदरे.या बंदरापासून बोरघाटमार्गेपुण्याकडे जाणारा मार्ग हा पुरातन व्यापारी मार्ग.जसा नाणेघाट तसा बोरघाट,त्यामुळे या मार्गावरूनही मोठ्या प्रमाणात वाहतूक चालत असे.या व्यापारी मार्गाचे नियंत्रण करण्यासाठी शिवाय जकात वसूलीसाठी कोकण आणि घाटाच्या वेशीवर असणा-या किल्ल्यांचा उपयोग केला जात असे.यापैकी सर्वात प्रमुख' किल्ले राजमाची.किल्ल्याचा भौगोलिक दृष्ट्या विचार केल्यास आपल्या असे लक्षात येईल की राजमाचीच्या एका बाजूस पवन मावळ प्रांतातील तुंग, तिकोना, लोहगड, विसापूर तर एका बाजूस पेठ, भीमाशंकर, ढाक चा किल्ला, गोरखगड, सिध्दगड, चंदेरी असा सर्व परिसर नजरेत पडतो. त्यामळे हा किल्ला म्हणजे लष्करी दृष्टया एक प्रमुख ठाणं असले पाहिजे. किल्ल्याला दोन बालेकिल्ले आहेत. हे दोन बालेकिल्ले म्हणजे दोन स्वतंत्र अस`किल्लेच होय.

## इतिहास :
राजमाची किल्ल्याच्या पोटात एक लेणं आहे यालाच 'कोंडाणे लेणी' असे म्हणतात.ही लेणी कोंडाणा गावापासून आग्नेयेस २ कि.मी अंतरावर आहेत.ही लेणी ख्रिस्तपूर्व दुस-या शतकात म्हणजे सातवाहनकालाच्या सुरवातीला खोदलेली आहेत.अखंड दगडात कोरलेल्या वास्तुशिल्पाचा हा उत्कृष्ठ नमुना आहे.या लेणी समुहात एक चैत्यगृह आणि सात विहारांचा समावेश आहे. या लेण्यांची निर्मीती राजमाचीवर असणा-या सत्तेखाली झाली.यावरुनच असे अनुमान निघते की हा किल्ला साधारण २५०० वर्षापूर्वीचा असावा.राजमाची किल्ल्यास पूर्वी 'कोंकणचा दरवाजा'संबोधण्यात येत असे. कल्याणच्या १६५७ च्या स्वारी नंतर त्याचवर्षी शिवाजी महाराजांनी पुणे आणि कल्याण विभागात असलेल्या बोरघाटावरील राजमाची ,लोहगड, तुंग, तिकोना, विसापूर किल्ले स्वराज्यात दाखल करून घेतले. यामुळे पुण्यापासून ते ठाण्यापर्यंतचा सर्व प्रदेशावर शिवशाहीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. पुढे संभाजी महाराज जिवंत असे पर्यंत म्हणजेच सन १६८९ पर्यंत हे सर्व किल्ले मराठयांच्या ताब्यात होते. यानंतर १७१३ मध्ये शाहुमहाराजांनी कान्होजी आंग्रे यांना हा किल्ला दिला . सन १७३० मध्ये हा किल्ला पहिले बाजीराव पेशवे यांच्याकडे आला.१७७६मध्ये सदाशिवरराव तोतयाने संपूर्ण कोकण प्रांत काबीज करीत बोरघाटा पर्यंत पोहचला.त्याने राजमाची किल्ला घेतला.यानंतर या तोतयाचे वर्चस्व वाढले मात्र पेशव्यांनी त्याच्यावर हल्ला करून राजमाची किल्ला आणि आजुबाजुचा परिसर आपल्या ताब्यात घेतला.पुढे १८१८ मध्ये किल्ला इंग्रजांकडे गेला. उल्हास नदीच्या या पात्रात कोंदीवडे आणि कोंढाणा जवळ एका मोठ्या दगडात २१ हंडे पाणी मावेल एवढा पाळणा कोरला असून त्यामध्ये एका बालकाची मूर्ती कोरली आहे.पूर्वी स्थनिक लोक मुलं होण्यासाठी येथे नवस करत असा संदर्भ महाराष्ट्र गॅझेटिअर रायगड जिल्हा सन १९९३ पृष्ठ क्रं ७२१ वर दिला आहे.या परिसरात याला 'जिजाऊ कुंड 'म्हणतात या कुंडात लोक मोठ्या श्रध्देने सूर्यस्नान करतात.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :
लोणवळ्याहून तुंगार्लीमार्गेराजमाचीला येतांना वाटेतच गावाच्या वेशीजवळ एक योध्द्याचे स्मारक ,अर्धवट तुटलेली तटबंदी,दरवाजाचे अवशेष,गणपति आणि मारुतिरायाची मूर्ती आहे.किल्ल्यावरून आजुबाजुचा दिसणारा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. किल्ल्याच्या माचीवर वस्ती आहे तिला 'उधेवाडी' असे म्हणतात.

उदयसागर तलाव : पावसाळ्यात हा तलाव मात्र ओसंडून वाहतो. तलावाच्या समोरील टेकाडं खाली उतरून गेल्यावर समोरच एक मोठे पठार लागते.पावसाळ्यात दरीतून पडणा-या धबधब्यांचे सुंदर दृष्य दिसते.हिरवीगार वनश्री अगणित धबधबे आणि सतत कोळणारा पाऊस या अल्हाददायक वातावरणामुळे मनोन्मनी कुसुमाग्रजांच्या ओळी गुणगुणायला लागतात , पलिकडे खळाळे निर्मळ निळसर पाणी उत्तुंग तरुंची उभी सभोती श्रेणी एकाकी धूसर पाऊलवाट मधे ही तिजवरून विहारे मनामध्ये वनराणी

मनरंजन : उंचीने श्रीवर्धनपेक्षा लहान असणा-या या बालेकिल्ल्यावर जाणरी वाट सोपी आहे. साधारण अर्ध्या तासात आपण बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारात पोहचतो. मनरंजनवर जाणारी वाट सोपी आहे. या किल्ल्याचा दरवाजा हा गोमुखी आहे.किल्ल्यावर गेल्यावर उजवीकडच्या वाटेवर जुन्या काळातील किल्लेदारांच्या वाड्यांचे अवशेष दिसतात. त्यासमोरच छप्पर उडालेले उत्तम दगडीबांधकामाचे मंदिर आहे. या मंदिराच्या दरवाज्यावर गणेशाचे शिल्प कोरलेले आहे. दोन चार पाण्याची टाकी आहेत. किल्ल्याची तटबंदी आजही काही प्रमाणात शाबूत आहे. येथून कर्नाळा, प्रबळगड, ईर्शाळगड, ढाकबहिरी, नागफणीचे टोक हा सर्व परिसर दिसतो.

श्रीवर्धन : राजमाचीच्या असणा-या दोन बालेकिल्ल्यांपैकी सर्वात उंच असा हा बालेकिल्ला.श्रीवर्धनची तटबंदी आणि बुरुज आजही ब-यापैकी सुस्थितीत आहे.किल्ल्याला अनेक ठिकाणी दुहेरी तटबंदी असावी असे अवशेषांवरून दिसते.दरवाजाची कमान ब-यापैंकी शाबूत आहे. दरवाजाच्याच बाजुला पहारेक-यांच्या देवड्या आहेत.किल्ल्यावर जाण्याच्या वाटेवरच एक गुहा आणि पाण्याची दोन टाकी आहेत .या गुहा म्हणजे दारुगोळ्याचे कोठार आहे.बालेकिल्ल्याच्या माथ्यावर एक ध्वजस्तंभ आहे.समोरच ढाकबहिरीचा चित्तथरारक सुळका तर त्याच्या

उजव्या हातास असणारा शिरोट्याचा नयनरम्य तलाव हा सर्व परिसर दिसतो.

शंकराचे मंदिर : तलावाच्या पश्चिमेला एक सुंदर कळशीदार शंकराचे मंदिर आहे.या मंदिरासमोरच गोमुख असून त्यातले पाणी समोरच्या टाक्यामध्ये पडते. सध्या या मंदिराच्या उत्खननाचे काम गावक-यांनी हाती घेतलेले आहे.राजमाचीला पूर्व आणि दक्षिण दिशांना जी खोल दरी आहे ती 'कातळदरा' या नावाने ओळखली जाते.या दरीतूनच उल्हास नदी उगम पावते.या नदीच्या पश्चिमेकडील डोंगराला 'भैरव डोंगर' म्हणतात.अशा निसर्गसौंदर्याने नटलेल्या राजमाची किल्ल्याचे खरे वैशिष्ट्य म्हणजे या किल्ल्याचे दोन बालेकिल्ले श्रीवर्धन आणि मनरंजन .बालेकिल्ल्याकडे जातांना वाटेत खडकात खोदलेल्या गुहा लागतात.श्रीवर्धन आणि मनरंजन बालेकिल्ल्यांच्या मध्ये एक सखलपट्टी आहे,यावरच भैरवनाथाचे एक मंदिर आहे. मंदिरासमोरच ३ दिपमाळा आणि लक्ष्मीची मूर्ती आहे.येथून डावीकडे जाणारी वाट मनरंजन आणि उजवीकडची वाट श्रीवर्धन किल्ल्यावर जाणारी आहे.

## गडावर जाण्याच्या वाटा :

लोणावळ्याहून तुगांर्ली मार्गे: लोणावळ्याहून तुगांर्ली मार्गेराजमाची गावात यावे. ही वाट एकदंर १९ कि.मी ची आहे.वाटेने किल्ल्यावर जाण्यास ५ तास लागतात.

कर्जतहून कोंदीवडे मार्गे: कर्जतहून कोंदीवडे या गावात बसने यावे.इथून गडावर जाण्यास सुमारे ३ ते ४ तास लागतात.

**राहण्याची सोय** : १. उधेवाडी गावात राहण्याची उत्तम सोय होते. भैरवनाथाच्याच्या मंदीरातही आणि बालेकिल्ल्यावर जातांना लागणा-या गुहेतही राहाता येते. २. राजमाची रुलर एड एन्ड डेव्हलपमेंट प्रोग्राम या संस्थेने बांधलेल्या खोल्यांमध्येही रहाण्याची व्यवस्था होते.

**जेवणाची सोय** : राजमाची गावात जेवणाची उत्तम सोय होते.

**पाण्याची सोय** : राजमाची गावात पाण्याची सोय होते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : तुंगार्ली मार्गे५ तास, कर्जत - कोंदिवडे मार्गे२ तास

# तिकोना

किल्ल्याची उंची : ३५८०फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: लोणावळा

जिल्हा : पुणे

श्रेणी : सोपी

मुंबई-पुणे हमरस्त्यावरुन दिसणारे लोहगड आणि विसापूर किल्ले आपल्याला सर्वांना माहीत आहेत. याच किल्ल्यांच्या मागील बाजूस पवनमावळ प्रांतात असणा-या तिकोना ऊर्फ वितंडगड याची आपणं ओळख करून घेऊया. लोहगड आणि विसापूरया किल्ल्यांच्या मागे हा किल्ला असल्याने थेट नजरेस पडत नाही.सध्याच्या द्रुतगति महामार्गावरून मात्र हा किल्ला सहज दृष्टीक्षेपात येतो.बोरघाट चढून गेल्यावर माथ्यावर कार्ले, भाजे, बेडसे, भंडारा आणि शेलारवाडी ही लेणी आहेत. या लेण्यांच्या सुरक्षिततेसाठी उभारलेले किल्ले म्हणजे लोहगड, विसापूर, तुंग आणि तिकोना. प्राचीन बंदराना घाटमाथ्याशी जोडणा-या अनेक घाटवाटा या परिसरात आहेत त्यामुळे यावर वचक ठेवण्यासाठी या दुर्गांची निर्मीती केली होती. साधारणत: या परिसरातील लेणी ही बौध्द आणि हिनयान पध्दतीची असल्यामुळे हे सर्व किल्ले ८०० ते १००० या काळात बांधलेले असावेत.

**इतिहास** : इ.स १५८५ च्या सुमारास निजामशाहीचा सरदार मलिक अहमद निजामशहा याने हा किल्ला जिंकला आणि किल्ला निजामशाहीत सामील झाला.या गडा बद्दलचा इतिहास फारसा कुठेही उपलब्ध नाही.शिवरायांनी १६५७ मध्ये जुन्या निजामशी कोकणातील माहुली ,लोहगड, विसापूर,सोनगड,तळा व कर्नाळा या किल्ल्यांसोबत हा किल्ला देखील आपल्या स्वराज्यात सामील करुन घेतला व सर्व निजामशाही कोकण शिवरायांच्या हाताखाली आले.या किल्ल्याचा उपयोग संपूर्ण पवनमावळावर देखरेखा ठेवण्यासाठी होत असे.सन १६६० मध्ये या भागाच्या सुरक्षिततेसाठी नेताजी पालकर यांची नियुक्ती झाली.१२ जून १६६५ पुरंदर तहानुसार १८ जूनला कुबादखानाने हलालखान व इतर सरदारांसोबत ह्या परिसराचा ताबा घेतला. .इ.स १६८२ च्या ऑगष्ट महिन्यात संभाजी व अकबर याची भेट झाली या भेटीनंतर अकबर तिकोना किल्ल्यावर राहण्यास आला.मात्र येथील हवा न मानवल्याने त्याला जैतापूर येथे धाडण्यात आले. इ.स.१८१८ मध्ये किल्ल्यावर छोट्याफार प्रमाणात लढाई झाली यात किल्ल्याचे ब-याच प्रमाणवर नुकसान झाले.आजमितिस किल्ल्याची मोठया प्रमाणावर पडझड झाली आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : गडाचा घेरा फार मोठा नसल्यामुळे एक तासातं सर्व गड पाहून होतो.गडाच्या दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे वळावे.थोडे अंतर चालून गेल्यावर एक पाण्याचे टाके आणि गुहा लागते.गुहेत १० ते १५ जणांची राहण्याची होते.मात्र पावसाळ्यात गुहा राहण्यास अयोग्य आहे.गुहेच्या बाजुने वर जाणारी वाटेने थेट बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी पोहचतो.प्रवेशद्वाराच्या पाय-या ह्या दमछाक करणा-या आहेत. दरवाज्यातून आतं शिरल्यावर उजवीकडे पाण्याची टाकं आहेत तर डावीकडे तटबंदीचा बुरुज दिसतो.सरळ

थोडेवर गेल्यावर एक वाट उजवीकडे उतरते.येथे पाण्याची काही टाकी आढळतात.येथून माघारी फिरून सरळ वाटेला लागावे.ही वाट आपल्याला काही तुटलेल्या पाय-यांपाशी घेऊन जाते.येथून वर गेल्यावर समोरच महादेवाचे मंदिर आहे.मंदिरामागे पाण्याचा मोठा खंदक आहे.याला वळसा घालून गेल्यावर आपणा ध्वजस्तंभाच्या जागी पोहचतो. बालेकिल्ल्यावरुन समोरच उभा असणारा तुंग,लोहगड,विसापूर,भातराशीचा डोंगर,मोर्सेचा डोंगर,जांभुळीचा डोंगर,पवनेचा परिसर आणि फागणे धरण हा सर्व परिसर न्याहळता येतो.गडावरून संपूर्ण मावळप्रांत आपल्या नजरेत येतो.अशा प्रकारे ४ तासात संपूर्ण गड पाहून परतीच्या प्रवासाला लागु शकतो.सर्व गड फिरण्यास १ तास पुरतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

बेडसे लेण्या मार्गे: अनेक ट्रेकर्स लोहगड,विसापूर ,बेडसे लेणे आणि तिकेना असा ट्रेकही करतात.यासाठी बेडसे लेण्या करुन तिकोनापेठेत जाता येते.

ब्राम्हणोली मार्गे: अनेक ट्रेकर्स तुंग आणि तिकोना असा ट्रेकही करतात.यासाठी तुंग किल्ला पाहून तुंगवाडीत उतरावे आणि केवरे या गावी यावे येथून लाँचने पलिकडच्या तीरावरील ब्राम्हणोली या गावी यावे.ब्राहणोली ते तिकोनापेठ हे अंतर ३० मिनिटांचे आहे.

तिकोनापेठ मार्गे: गडावर जाणारी मुख्य वाट ही तिकोनापेठ या गावातून जाते.यासाठी लोणावळ्याच्या दोन स्टेशन पुढच्या कामशेत स्टेशनावर उतरावे.कामशेत ते काळे कॉलनी बस पकडून काळे कॉलनी मध्ये उतरावे. कामशेत ते काळे कॉलनी अशी बस सेवा अथवा जीपसेवा उपलब्ध आहे.काळे कॉलनी ते तिकोनापेठ अशी देखील जीपसेवा उपलब्ध आहे.या बसने किंवा जीपने तिकोनापेठ गावं गाठावे. कामशेत पासून सकाळी ८.३० ला सुटणारी पौंड बस पकडून तिकोनापेठ या गावी उतरावे.तसेच कामशेत ते मोर्सेबस पकडून ही तिकोनापेठला उतरता येते. तिकोनापेठेतून ४५ मिनिटात आपण किल्ल्यावर पोहचतो.वाट फार दमछाक करणारी नसून अत्यंत सोपी व सरळ आहे.किल्ल्यावरील दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे एक वाट जाते,या वाटेने २० मिनीटांतच बालेकिल्ला गाठता येतो.

**राहण्याची सोय** : पावसाळा सोडून इतर सर्व ऋतुत १० ते १५ जणांना गुहे मध्ये राहता येते.

**जेवणाची सोय** : आपणं स्वत: करावी.

**पाण्याची सोय** : गडावर बारामही पिण्याच्या पाण्याची टाकं आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : १ तास

# तुंग

किल्ल्याची उंची : ३००० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

किल्ल्याच्या नावावरून आपल्या सर्वांना असेच वाटेल की, किल्ला चढायला खरोखरच कठीण आहे मात्र किल्ला चढण्यास फारच सोपा आहे. पवन मावळ प्रांतातील तुंग किल्ला हा एक घाटरक्षक दुर्ग म्हणून ओळखला जातो. पूर्वी बोरघाटामार्गेचालणा-या वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग होत असे. या किल्ल्यावरून लोहगड ,विसापूर ,पवन मावळ हा सर्व परिसर नजरेत येतो.

**इतिहास** : या किल्ल्याला तशी वैभवशाली इतिहासाची परंपरा लाभलेली नाही. मात्र १६५७ मध्ये मावळ प्रांतातील इतर किल्ल्यांसमवेत हा किल्ला देखील स्वराज्यात सामील झाला. सन १६६० मध्ये या भागाच्या सुरक्षिततेसाठी नेताजी पालकर यांची नियुक्ती झाली. जयसिंगाने आणि दिलेरखानाने आपल्या स्वारीच्या वेळी ६ मे १६६५ रोजी तुंग आणि तिकोना या भागातील अनेक गावे जाळली पण, हे किल्ले मात्र जिंकू शकले नाही. १२ जून १६६५ पुरंदर तहानुसार १८ जूनला कुबादखानाने हलालखान व इतर सरदारांसोबत ह्या परिसराचा ताबा घेतला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** :गडमाथा फारच आटोपता असल्यामुळे एक तासात सर्व गड पाहून होतो. तुंगवाडीतून गडावर जाणारी वाट मारुतीच्या मंदिरा जवळून जाते. या मंदिरात ५ ते ६ जणांची राहण्याची सोय होते. या मंदिरापासून थोड्याच अंतरावर गडावर जाण्यासाठी पाय-या लागतात. पाय-यांच्या वाटेत थोड्याच अंतरावर हनुमान मंदिर लागते.पुढे गोमुखी रचनेचा दरवाजा आहे. येथून आत शिरल्यावर आपण गड माथ्यावर पोहोचतो. उजवीकडे गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या मागील बाजूस पाण्याचा खंदक आढळतो. येथूनच बालेकिल्ल्यावर जाणारी वाट आहे.बालेकिल्ल्यावर तुंगीदेवीचे मंदिर आहे. मंदिरा समोरच जमिनीत खोदलेली गुहा आहे. यात पावसाळ्या शिवाय इतर ऋतूत २ ते ३ जणांची राहण्याची सोय होऊ शकते. अशा प्रकारे एक दिवसात किल्ला पाहून लोणावळ्याला परतता येते.

**गडावर जाण्याच्या वाटा** : या गडावर जाणा-या सर्व वाटा पायथ्याच्या तुंगवाडीतूनच जातात. या वाडीतून गडावर जाण्यास साधारणत: ४५ मिनिटे लागतात. गडमाथा तसा लहान असल्यामुळे एक तासात सर्व गड पाहून होतो.

घुसळखांब फाट्यामार्गे: गडावर जाण्यासाठी लोणावळा स्टेशनवर पोहचावे. येथून भांबूर्डेअथवा आंबवणे कडे जाणारी एस.टी पकडून

कि.मी अंतरावरील घुसळखांब फाट्यापाशी उतरावे. या फाट्यापासून दीड तासांची पायपीट केल्यावर आपण ८ कि.मी अंतरावरील तुंगवाडीत पोहोचतो. येथून गडावर पोहचण्यास ४५ मिनिटे लागतात.
ब्राम्हणोली-केवरे : अनेकजण तिकोना ते तुंग असा ट्रेक देखील करतात. यासाठी तिकोना किल्ला पाहून तिकोनापेठेत उतरावे आणि काळे कॉलनी चा रस्ता धरावा. वाटेतच ब्राम्हणोली गावं लागते. या गावातून लाँच पकडून पवनेच्या जलाशयात जलविहाराची मौज लुटत पलीकडच्या तीरावरील केवरे या गावी यावे. केवरे गावा पासून २० मिनिटातच आपण तुंगवाडीत पोहोचतो.
तुंगवाडीच्या फाट्या मार्गे: जर लाँच ची सोय उपलब्ध नसेल तर तिकोनापेठेतून दुपारी ११.०० वाजताची एस.टी महामंडाळाची कामशेत-मोरवे गाडी पकडून मोरवे गावाच्या अलीकडच्या तुंगवाडीच्या फाट्यावर उतरावे. येथून पाऊण तासांची पायपीट केल्यावर आपणं तुंगवाडीत पोहचतो.

राहण्याची सोय : तुंगवाडीतील मारुतीच्या मंदिरात ६ ते ७ जणांची राहण्याची सोय होते. तुंगवाडीत भैरोबाचे देखील मंदिर आहे यात २० जणांना राहता येते.

जेवणाची सोय : आपण स्वत: करावी.

पाण्याची सोय : मंदिरा जवळच गावात पाणी उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : पायथ्यापसून ४५ मिनिटे

# मल्हारगड

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: भुलेश्वर रांग
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

महाराष्टातील सर्व किल्ल्यांमध्ये सर्वात शेवटी बांधला गेलेला किल्ला म्हणून 'मल्हारगड' प्रसिद्ध आहे. पुणे जिल्ह्याच्या दक्षिणेकडे वेल्हे तालुक्यातून सह्याद्रीच्या मूळ रांगेचे दोन फाटे फुटतात. एका डोंगररांगेवर राजगड आणि तोरणा तर दुसरी डोंगररांग ही पूर्व-पश्चिम पसरलेली आहे. याच रांगेला भुलेश्वर रांग म्हणतात. पुरंदर, वज्रगड, मल्हारगड, सिंहगड याच रांगेवर वसलेले किल्ले आहेत. पुण्याहून सासवडला जातांना लागणाऱ्या दिवेघाटावर लक्ष ठेवण्यासाठी मल्हारगडाची निर्मिती केली गेली. या किल्ल्याची निर्मिती अगदी अलीकडची म्हणजे इ. स. १७५७ ते १७६० या काळातील आहे. पायथ्याला असणाऱ्या सोनोरी गावामुळे या गडाला 'सोनोरी' म्हणूनही ओळखले जाते.

इतिहास : या किल्ल्याची बांधणी पेशव्यांचे सरदार पानसे यांनी केली. पानसे हे पेशव्यांच्या तोफखान्याचे प्रमुख होते. सन १७५७ ते १७६० च्या कालावधीमध्ये किल्ल्याचे बांधकाम झाले. सन १७७१ - ७२ मध्ये थोरले माधवराव पेशवे किल्ल्यावर येऊन गेल्याचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतात. या पानसेंचा किल्ल्याखालच्या सोनोरी गावात एक चिरेबंदी वाडा सुद्धा आहे. याच सोनोरी गावात श्रीकृष्णाची अत्यंत सुंदर मूर्ती असलेले मंदिर आहे. या किल्ल्याचा उपयोग दिवेघाटावर आणि आजुबाजूच्या प्रदेशावर नजर ठेवण्यासाठी होत असे.
गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : मल्हारगड हा साधारण त्रिकोणी आकाराचा असून आतील बालेकिल्ल्याला चौकोनी आकाराचा तट आहे. मल्हारगड आकाराने लहान असून संपूर्ण किल्ला पाहण्यास अर्धा-पाऊण तास पुरतो. किल्ल्याची तटबंदी, बुरूज यांची काही ठिकाणी पडझड झाली असली तरी बऱ्याच ठिकाणी ती शाबूत आहे. पूर्वेकडच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर डाव्या बाजूने पुढे गेले असता बालेकिल्ल्याच्या तटाआधी आपल्याला एका वाड्याचे अवशेष दिसतात. बाजूलाच एक विहीरही आहे. मात्र ती वापरात नसल्याने गडावरील इतर विहिरीं प्रमाणेच यात पाणी अजिबात नाही. बालेकिल्ल्यात प्रवेश न करता असेच तटाच्या बाजूने पुढे गेल्यावर समोरच एक तळे लागते. किल्ल्याच्या दक्षिणेला असणारे हे तळे तटाला लागूनच असून पावसाळ्यात व हिवाळ्यात पाण्याने भरलेले असते. यातील पाणी वापरण्यास उपयुक्त असले तरी पिण्यायोग्य मात्र नाही. असेच पुढे किल्ल्याच्या टोकावर असणाऱ्या बुरुजाकडे जाताना अजून एक विहीर लागते. याही विहिरीत पाण्याची सोय नाही. या बुरुजाच्या खाली आपल्याला एक बुजलेला दरवाजा दिसतो. या बुरुजाकडून उजवी कडे पुढे गेल्यावर आपल्याला आणखी एक अतिशय लहान दरवाजा दिसतो. झेंडेवाडी गावातून आल्यावर याच दरवाज्यातून आपण किल्ल्यात प्रवेश करतो. आता आपण बालेकिल्ल्यात प्रवेश करू. बालेकिल्ल्यातील दोन मंदिरांची शिखरे आपल्याला कधी पासून खुणावत असतात. ही दोन मंदिरे बालेकिल्ल्यात बाजूबाजूलाच असून यातील लहानसे देऊळ खंडोबाचे तर दुसरे थोडे मोठे देऊळ महादेवाचे आहे. खंडोबाच्या देवळामुळेच या गडाला मल्हारगड हे नाव पडले असावे. महादेवाच्या देवळात शंकराची पिंड असून या मंदिरात राहायचे म्हंटल्यावर फारतर ५ - ६ माणसे दाटीवाटीने राहू शकतात. बालेकिल्ल्याचा तट चौकोनी असून काही ठिकाणी त्याची पडझड झाली आहे. बालेकिल्ल्याच्या उत्तरेला प्रवेशद्वार आहे.

गडावर जाण्याच्या वाटा : मल्हारगडावर आपल्याला प्रामुख्याने दोन वाटांनी जाता येते.

१ ं : पुण्याहून सासवडला निघाल्यावर दिवे घाट संपल्यावर काही वेळाने 'झेंडेवाडी' गावाचा फाटा लागतो. येथून २ कि.मी. वर झेंडेवाडी हे गाव आहे. या गावात आपल्याला झेंडूच्या फुलांची शेती केलेली दिसते. गाव पार करून आपल्याला समोरच्या डोंगर रांगांमध्ये दिसणाऱ्या 'ण' आकाराच्या खिंडीत जावे लागते. गावात विचारल्यावर गावकरीही आपल्याला ती खिंड दाखवतात. या खिंडीत पोहोचल्याशिवाय मल्हारगडाचे आपल्याला बिलकुल दर्शन होत नाही. या खिंडीत गेल्यावर समोरच याच डोंगररांगेमध्ये असणारा मल्हारगड आपल्याला दिसतो. तटबंदींनी सजलेल्या मल्हारगडावर जायला आपल्याला पुन्हा डोंगर उतरावा लागत नाही. खिंडीतून किल्ल्यावर जाण्यास अर्धातास तर आपण उतरलेल्या झेंडेवाडीफाट्या पासून खिंडपार करून किल्ल्यावर जाण्यास साधारणपणे दीड तास लागतो.

२ ं : सासवड पासून ६ कि.मी. वर 'सोनोरी' हे गाव आहे. या गावाला एस.टी. सासवडहून निघून दिवसातून तीन वेळा म्हणजे स.- १०, दु.- २ आणि संध्या.- ५ या वेळेत भेट देते. सोनोरी गावातून समोरच दिसणारा मल्हारगड आपले लक्ष वेधून घेतो. गडाकडे कूच करण्याआधी सोनोरी गावात असणारा सहा बुरुजांनी युक्त असा पानसे यांचा वाडा पाहण्यासारखा आहे. एखाद्या गढीप्रमाणे असणाऱ्या या वाड्यात गजाननाचे व लक्ष्मी-नारायणाचे मंदिर आहे. सोनोरी गावात मुळीच चुकवून चालणार नाही असे ठिकाण म्हणजे मुरलीधराचे सुबक मंदिर व मंदिरातील अत्यंत देखणी अशी श्रीकृष्णाची मूर्ती. काळ्या पाषाणात कोरलेली ही अप्रतिम मूर्ती पाहायलाच हवी अशी आहे. सोनोरी गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी अर्धा-पाऊण तास लागतो. डोंगराच्या सोंडेवरूनही गडामध्ये प्रवेश करता येत असला तरी टॉवरच्या बाजूने गेल्यास आपल्याला किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार लागते.

## राहण्याची सोय :
फक्त ५ - ६ माणसे महादेवाच्या मंदिरात दाटीवाटीने राहू शकतात. गडावर अन्यत्र राहाण्याची सोय नाही. मात्र पायथ्याला असणाऱ्या सोनोरी गावात किंवा झेंडेवाडीत शाळेच्या आवारात राहता येते.

## जेवणाची सोय :
नाही

## पाण्याची सोय :
गडावर पिण्याच्या पाण्याची सोय नाही. किल्ल्यात एक तळे व तीन विहिरी आहेत मात्र विहिरींना पाणी अजिबात नाही व तळ्यातील पाणी फक्त वापरण्यासाठी उपयुक्त आहे, पिण्यासाठी नाही.

## बसचे वेळापत्रक :

**Depot**

# भीमाशंकर

किल्ल्याची उंची : ३५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: भीमाशंकर
जिल्हा : रायगड
श्रेणी : कठीण

भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग. सुमारे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेले एक पवित्र देवस्थान. भीमाशंकरचा आजुबाजूचा प्रदेश हा अतिशय घनदाट जंगलांनी व्यापलेला आहे. येथे महाराष्ट्र सरकारचे अभयारण्य आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

मंदिर : भीमाशंकरचे मंदिर १२०० ते १४०० वर्षापूर्वीचे असून त्याची बांधणी हेमाडपंथी पद्धतीचे आहे. मंदिराच्या छतावर आणि खांबावर अतिशय सुंदर नक्षीकाम आढळते. मंदिराच्या बाह्यभागात सिंहासनाधिष्ठीत देवता व त्यांवर छत्रचामर ढाळणारे त्यांचे सेवक यांच्या मूर्ती आढळून येतात. देवळासमोरच १७२९ सालातील धातूची एक प्रचंड घंटा लटकवलेली आहे. मंदिराच्या आवारात ५ ते २० फूट उंचीची दीपमाळ आहे. या दीपमाळेवर एक शिलालेख आढळतो. पंढरपूरला चंद्रभागा म्हणून ओळखल्या जाणा-या नदीचे नाव भीमा आहे. या भीमेचा उगम याच भीमाशंकरच्या डोंगरावर आहे.

नागफणीचे टोक : घाटाच्या रस्त्याने वर आल्यावर एक तळे लागते. या तळ्याच्या उजव्या बाजूने वर जाणारी वाट आपल्याला हनुमान मंदिराकडे घेऊन जाते. मंदिरावरून सरळ वर जाणा-या वाटेने आपण नागफणीच्या टोकापाशी येऊन पोहोचतो. येथून समोरच उभा असणारा पेठचा किल्ला,पदरचा किल्ला,पेब आणि माथेरानचे पठार दिसते. या निसर्गसौंदर्याच्या दालनातून बाहेर पडताना निसर्गावर नितांत प्रेम करणा-या समर्थांच्या ओळी आठवतात
द्रुमलता संमता गुणमालते। सुख मनी सुमनी मन रातले॥ परम सुंदर ते खग बोलती। गमतसे वसती कमलापती ॥

भीमाशंकर : राम मंदिराच्या डाव्या बाजूने एक पाण्याची वाट खाली उतरते. या वाटेने सरळ गेल्यास आपण घनदाट जंगलात प्रवेश करतो. पुढे २५ मिनिटानंतर एक मंदिर लागते. या मंदिरापासून डावी कडे उतरणारी वाट आपणांस पाण्यामुळे तयार झालेल्या पिंडी कडे घेऊन जाते. यालाच गुप्त भीमाशंकर असे म्हणतात. पावसाळ्यात येथे फार मोठा धबधबा तयार होतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :
भीमाशंकरला जाण्यासाठी मुंबईहून कर्जतला यावे.पुणेकरांनी स्वारगेटवरून एस.टी. अथवा ट्रेनने कर्जत गाठावे. कर्जतहून खांडस या गावी यावे.खांडस ते कर्जत सुमारे ३४ कि.मी. चे अंतर आहे. कर्जतहून खांडसला बसने अथवा रिक्षेने येण्याची सोय होते. खांडस गावातून शिडी घाट आणि गणेश घाट या दोन्ही वाटांनी भीमाशंकर गाठता येते

१. गणेश घाट : खांडस गावातून दोन कि.मी अंतरावर एक पूल लागतो. या पुलापासून उजवीकडे जाणारी कच्च्या रस्त्याची वाट गणेश

घाटाची आहे. ही वाट अत्यंत सोपी आहे. या वाटेने तासभराच्या अंतरावर एक गणेशाचे मंदिर लागते. या वाटेने वर जाण्यास ६ ते ७ तास लागतात.

२. शिडी घाट : पुलाच्या डावीकडे जाणारा रस्ता आपणास गावात घेऊन जातो. गावातून विहिरीच्या डाव्या बाजूने जाणारी वाट ही शिडी घाटाची आहे. ही वाट सर्व वाटांमध्ये अवघड आहे. पावसाळ्यात ही वाट फारच निसरडी होत जाते. या वाटेने दीड तासांत ३ शिड्या लागतात. तीस-या शिडी नंतर अर्ध्या तासात एक वाडी लागते. या वाडी मध्ये 'पुंडलिक हंडे' यांचे घर आहे. वाडी पासून वर चढत गेल्यावर एक झाप लागते. या ठिकाणी गणेश आणि शिडी घाटातील वाटा एकत्र येतात. येथे चहा-पाण्याची चांगली सोय होते. इथून पुढे दीड तासांत आपण एका तळ्यापाशी पोहचतो. या तळ्यापासून डावीकडे जाणारी वाट आपल्याला मंदिराकडे घेऊन जाते.

वाहनांची वाट : भीमाशंकरला जाण्यासाठी वर गावापर्यंत डांबरी सडक बांधलेली आहे. या साठी पुणे-तळेगाव-चाकण मार्गेभीमाशंकरला पोहचावे

राहण्याची सोय : भीमाशंकर गावा बाहेर महाराष्ट पर्यटन विकास महामंडळाचे हॉटेल आहेत. गावात घरगुती पण महागडी अशी रहाण्याची सोय होते. पावसाळ्यात मात्र रहाण्याची गैरसोय होते.

जेवणाची सोय : भीमाशंकरला जेवणासाठी हॉटेल्स आहेत.

पाण्याची सोय : विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : गणेश घाट - ६ ते ७ तास. शिडी घाट - ४ तास

सूचना : गणेश घाट सोपा. शिडी घाट कठीण.

बसचे वेळापत्रक

**Depot**

# दुर्ग -ढाकोबा

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: भीमाशंकर रांग

जिल्हा : पुणे

श्रेणी : मध्यम

किल्ल्याची उंची : दुर्ग ३९०० फूट,ढाकोबा ४१०० फुट

नाणेघाट आणि जीवधनच्या दक्षिणेकडे एक उत्तुंग पर्वत रांग दिसून येते.त्याध्येच एक डोंगर म्हणजे 'ढाकोबा'.किल्ल्याची एक बाजू म्हणजे सरळसोट सुटलेला कडा.तो सरळ खाली कोकणातच उतरतो.याच ढाकोबाच्या सरळ रेषेत असणारा दुसरा किल्ला म्हणजे 'दुर्ग'.दुर्गमता आणि विरळवस्ती हे या भागाचे वैशिष्ट्य.येथे ग्रामस्थांची आपल्या प्राथमिक गरजा भागवतांनाच मारामार होते तर वीज -शिक्षण तर दूरच.येथील मुख्य व्यवसाय शेती काही ठिकाणी दुधाचा व्यवसाय पणा केला जातो.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : या दोन्ही गडावर गड किंवा किल्ला असण्याचे कोणतेही अवशेष नाहीत मात्र टेहळणीसाठी यांचा उपयोग केला जात असावा.धाकोबा किल्ल्यावरून नाणेघाट जीवधनची मागची बाजू ,दा-याघाट असे कोकणचे विहंगम दृश्य दिसते.

दुर्ग :-दुर्गादेवीच्या मंदिरासून किल्ल्यावर पोहण्यास २० मिनिटे लागतात.येथून गोरखगड ,सिध्दगड आणि मच्छिंद्रगड असा सर्व परिसर दिसतो.

गडावर जाण्याच्या वाटा : जुन्नर - आपटाळे -आंबोली मार्गेयेणा-या वाटेने प्रथम ढाकोबा आणि नंतर दुर्ग करता येतो.भीमाशंकर-अहुपे मार्गेयेणा-या वाटेने प्रथम दुर्ग आणि नंतर ढाकोबा करता येतो.

१. जुन्नर - आपटाळे -आंबोली मार्गे

जुन्नर वरून आंबोली गावात येण्यासाठी थेट बस आहे.हे अंतर साधारण दीड तासाचे आहे.आंबोली गावातूनच ढाकोबाचे दर्शन होते.गावातून एक वाट सरळ समोरच्या पठारावर जाते.वर जातांना वाटेत तीन गुहा लागतात. गावापसून पठारावर येण्यास दीड तास पुरतो.या वाटेतूनच एक वाट मध्ये उजवीकडे दुभागते ती दा-याघाटा कडे जाते.एकदा पठारावर पोहचल्यावर अनेक ढोरवाटा लागतात.पण त्यामध्ये ठळक मात्र दोनच वाटा आहेत.त्यातील एक वाट डावीकडे जाते तर दुसरीवाट उजवीकडे थेट धाकोबाच्या पायथ्यालगत पुढे जाते आणि पुन्हा ५ मिनिटांनी डावीकडे डोंगरधारेवरून खाली उतरते.हीच वाट पुढे दुर्गकडे जाते.ही वाट ज्या ठिकाणाहून खाली वळते तेथूनच एक वाट सरळ डोंगरावर म्हणजेच धाकोबावर जाते. येथून गडमाथा गाठण्यास अर्धा तास पुरतो.

२. भीमाशंकर-अहुपे मार्गे वर सांगितलेल्या दुर्गकडे जाणा-या वाटेने थोडे पुढे गेल्यावर एक वाट डावीकडे जंगलात वळते.ती धाकोबाच्या मंदिराकडे जाते तर सरळ जाणारी वाट पुढे अर्ध्या तासात एका ओढ्यापाशी येऊन थांबते.या ओढ्याला बारामही पाणी असते.याच वाटेने पुढे हातवीज च्या मार्गेनिघायचे.थोडेफार चढउतार आहेत वाटेला अनेक उपवाटा फुटलेल्या आहेत पण आपण ठळक वाट सोडायची नाही.पुढे एक तासाच्या चालीनंतर दुर्ग किल्ल्याचे दर्शन होते.पुढे एका पठारावर येऊन वाट दुभागते.डावीकडे जाणारी वाट हातवीज आणि दुर्गवाडीकडे कडे जाते तर उजवीकडे जाणारी वाट दुर्गादेवीच्या मंदिरात जाते.येथून दुर्गादेवीच्या मंदिरात जाण्यास अर्धा तास पुरतो.दुर्गादेवीच्या मंदिरापासून किल्ल्यावर जाण्यास ठळक वाट नाही.वाट आपणच आपली शोधून काढायची.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर नाही.

धाकोबाच्या पायथ्याशी असणा-या मंदिरात १५ जणांची राहण्याची सोय होते.

दुर्गच्या पायथ्याशी असणा-या दुर्गादेवीच्या मंदिरात ५ जणांची राहण्याची सोय

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** ढाकोबा आणि दुर्गादेवीच्या मंदिराच्या बाजूलाच पिण्याच्या पाण्याची तळी आहेत.

# रायरेश्वर

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: वाई - सातारा

जिल्हा : पुणे

श्रेणी : सोपी

किल्ल्याची उंची : ४०००फुट

पाचगणीचे टेबललॅन्ड सर्वांनाच माहितच असते मात्र त्याच्यापेक्षाही उंच आणि लांब असे टेबललॅन्ड म्हणजे रायरीचे पठार. भोरपासून ८ कि.मी. अंतरावर असणारे हे रायरीचे पठार पुण्याहून एका दिवसात पाहून येण्यासारखे आहे.दाट
झाडी, खोल दऱ्या, उंचच्या उंच सुळके, अस्ताव्यस्त पसरलेली पठारे, लांबच लांब सोंडा आणि आडवळणी घाट. यामुळे हा परिसर तसा दुर्गमच आहे.

**इतिहास :**

शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली ती याच रायरेश्वराच्या डोंगरावर. मात्र ही घटना काल्पनिक आहे की खरी याबद्दल निश्चित विधान मांडता येणार नाही.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** रायरेश्वरावर पाहण्यासारखे फार काही नाही. रायरेश्वराचे पठार हे ५ ते ६ कि.मी. पसरलेले आहे. त्यामुळे या पठारावरील वर्षाऋतुत पाहण्यासारखे असते. रायरेश्वरावर शंभुमहादेवाचे मंदिर लक्षात येत नाही. पठारावर अलिकडेच गावं वसलेली आहेत. पठारावर भात शेतीचे प्रमाणही मोठे आहे. पांडवगड, वैराटगड, पाचगणी, महाबळेश्वर, कोल्हेश्वर, रायगड, लिंगाणा, राजगड, तोरणा, सिंहगड, विचित्रगड, पुरंदर, रुद्रमाळ, चंद्रगड, मंगळगड हा सर्व परिसर येथून दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** रायरेश्वराला जाण्याचे अनेक मार्ग आहेत. कोणत्याही मार्गाने जायचे झाल्यास भोर गावं गाठावे.

१. टिटेधरण कोर्लेबाजूने

पुण्याहून भोरमार्गेआंबवडे गाठावे. तेथून टिटेधरण कोर्लेबाजूने रायरेश्वरावर जाता येते. वेळ साधारण ३ तास लागतात. वाट काही ठिकाणी अवघड आहे.

२. भोर-रायरी मार्गे

भोर गावातून रायरी गावासाठी सकाळी अकरा व सायंकाळी ६ वाजता (मुक्कामाची) गाडी येते. याच वाटेला सांबरदऱ्याची वाट म्हणून देखील संबोधतात. या वाटेने रायरेश्वर गाठण्यास दोन तास लागतात.

३. केजंळगडावरुन

केजंळगडावरुन सूणदऱ्याने किंवा श्वानदऱ्याने सुध्दा रायरेश्वरला जाता येते.

**राहण्याची सोय :** रायरेश्वरावर मंदिरात किंवा गावात १० ते १२ जणांची राहण्याची सोय होऊ शकते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** बारामही उपलब्ध आहे.

# रायगड जिल्हा

## रायगड

किल्ल्याची उंची : २९०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पुणे
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

महाडच्या उत्तरेस २५ कि. मी. वर हा किल्ला असून याची समुद्रसपाटी पासूनची उंची २८५१ फूट आहे. रायगड हा चहुबाजूंनी डोंगररांगांनी वेढलेला आहे. याच्या उत्तरेला आणि पूर्वेला काळ नदीचे खोरे पसरलेले आहे, तर पश्चिमेला गांधारी नदी वाहते. याच्या पूर्वेला लिंगाणा, आग्नेयाला आकाश स्वच्छ असेल तर राजगड, तोरणा दक्षिणेकडे मकरंदगड, प्रतापगड, वासोटा, उत्तरेला कोकणदिवा असा मुलूख दिसतो. रायगडपासून मुंबई, पुणे, सातारा ही शहरे सारख्याच अंतरावर आहेत. सह्याद्रीतील किल्ल्यांच्या रांगांतील हा एक दुवा आहे. रायगड हा निसर्गतःच डोंगरांनी वेढलेला असल्यामुळे (तसेच) शत्रूच्या हल्ल्यापासून बचाव व्हावा यासाठी पुणे सोडून पश्चिम डोंगरात रायगड ही राजधानी महाराजानी निवडली.

**इतिहास** :रायगडाचे प्राचीन नाव 'रायरी' हे होते. युरोपचे लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच रायगड अजिंक्य, दुर्गम. पाचशे वर्षांपूर्वी जेव्हा त्यास गडाचे स्वरूप नव्हते व तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास 'रासिवटा' व 'तणस' अशी दोन नावे होती. त्याचा आकार उंची व सभोवतालच्या दऱ्या यावरून त्यास 'नंदादीप' असेही नाव पडले. निजामशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापुरता होई. मोऱ्यांचा प्रमुख यशवंतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर प्रतापराव मोरे विजापूरास पळाला. महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायरीस म्हणजेच रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महाराजांच्या ताब्यात आला. कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूर कडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा व पुरेसा आहे. शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळणवळणासही हे ठिकाण जवळ आहे. म्हणून महारांजांनी राजधानीसाठी या गडाची निवड केली. सभासद बखर म्हणते, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोटा. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दिड गांव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोडका. दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखोन बहुत संतुष्ट झाले आणि बोलिले, तक्तास जागा हाच गड करावा'. याच दुर्गदुर्गेश्वराला १५ विविध नावांनी संबोधिले गेले आहे. १. रायगड २. रायरी ३. इस्लामगड ४. नंदादीप ५. जंबुद्विप ६. तणस ७. राशिवटा ८.बदेनूर ९.रायगिरी १०.राजगिरी ११.भिवगड १२.रेड्डी १३.शिवलंका १४.राहीर १५.पूर्वेकडील जिब्राल्टर शिवराज्याभिषेक शिवराज्याभिषेक हा रायगडाने अनुभवलेला सर्वश्रेष्ठ प्रसंग महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे, महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना. ता. १९ मे १६७४ रोजी राज्याभिषेकादि विधीपूर्वी महाराजांनी प्रतापगडाच्या भवानीचे दर्शन घेतले. तीन मण सोन्याचे म्हणजेच ५६ हजार किंमतीचे छत्र देवीला अर्पण केले. गडावरील राजसभेत ता. ६ जून १६७४, ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, शनिवार या दिवशी राज्याभिषेक संपन्न झाला. ता. २४ सप्टेंबर १६७४, ललिता पंचमी अश्विन शु. ५ आनंद संवत्सर शके १५९६ या दिवशी तांत्रिक पद्धतीने राजांनी स्वतःला आणखी एक राज्याभिषेक करून घेतला. या मागचा खरा हेतू हा जास्तीत जास्त लोकांना समाधान वाटावे हा होता. हा राज्याभिषेक निश्चलपुरी गोसावी याच्या हस्ते पार पडला. कवी भूषण रायगडाचे वर्णन करतो की, 'शिवाजीने सर्व किल्ल्यांचा आधार व विलासस्थान अशा रायगड किल्ल्यास आपले वसतीस्थान केले. हा किल्ला एवढा प्रचंड आणि विशाल आहे की, त्यात तीनही लोकींचे वैभव साठवले आहे. गडावर विहिरी, सरोवरे, कूप विराजत आहेत. सर्व यवनांना जिंकून रायगडावर राजा शिवाजीने राजधानी केली आणि लोकांचे इच्छित पुरवून जगतात श्रेष्ठ यश संपादन केले.' इ. स. १६७५ फेब्रुवारी ४, शके १५९६ आनंद संवत्सर माघ व. ५ गुरुवार या दिवशी संभाजी राजांची मुंज रायगडावर झाली. शके १६०१ सिद्धार्थी संवत्सर फाल्गुन व. २, १६८० मार्च ७ या दिवशी राजाराम महाराजांची मुंज रायगडावर झाली. लगेच आठ दिवसांनी राजाराम महाराजांचे लग्न प्रतापराव गुजर यांच्या मुलीशी झाले. रायगडाने अनुभवलेला अत्यंत दुःखद प्रसंग म्हणजे महाराजांचे निधन. शके १६०२ रुद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध पौर्णिमा, हनुमान जयंती, दि. ३ एप्रिल १६८० या दिवशी महाराजांचे निधन झाले. सभासद बखर म्हणते, 'ते दिवशी पृथ्वीकंप जाहला. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवी तळ्याचे उदक रक्तांबर जाले.' पुढे शके १६०२ रौद्र संवत्सर माघ शु. ७, इ. स. १६८१ १६ फेब्रुवारी या दिवशी रायगडावर संभाजी महारांजाचे विधिपूर्वक राज्यारोहण झाले. इ. स. १६८४ च्या सप्टेंबरमध्ये औरंगजेबाने रायगडच्या मोहिमेस सुरुवात केली. ता. २१ रोजी शहाबुद्दीन खान यास चाळीस हजार सैन्यासह बादशाहने रायगडाच्या पायथ्याशी धाडले.१५ जानेवारी १६८५ च्या सुमारास शहाबुद्दीने गडाच्या पायथ्याशी असलेल्या एका गावाला आग लावली व लुटालूट चालू केली. पण प्रत्यक्ष रायगडावर हल्ला न करता तो १६८५ च्या मार्चमध्ये परतला. औरंगजेबाने आपला वजीर आसदखान याचा मुलगा इतिकादखान उर्फ झुल्फिकारखान यास सैन्य देऊन रायगड घेण्यास पाठवले. शके १६१० विभव संवत्सर फाल्गुन शु. ३, १२

फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम महाराजांची कारकीर्द सुरू झाली आणि २५ मार्च १६८९ रोजी खानाने गडास वेढा घातला. दि. ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम महाराज रायगडावरून निसटून प्रतापगडावर गेले. पुढे जवळजवळ आठ महिने वेढा चालू होता. पण दि. ३ नोव्हेंबर १६८९ रोजी सुर्याजी पिसाळ या किल्लेदाराच्या फितुरीमुळे किल्ला मोगलांना मिळाला. वाईची देशमुखी देण्याचे आमिष दाखवून खानाने त्यास फितुर केले. झुल्फिकारखान हा बादशाहने इतिकादखानला दिलेला किताब आहे. पुढे रायगडचे नामांतर 'इस्लामगड' असे झाले. ५ जून १७३३ या दिवशी शाहूमहाराजांच्या कारकिर्दीत रायगड पुन्हा मराठ्यांनी घेतला.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

**1.** पाचाडचा जिजाबाईंचा वाडा : उतारवयात जिजाबाईंना गडावरची थंड हवा, वारा मानवत नसे, म्हणून महाराजांनी त्यांच्यासाठी पाचाडजवळच एक वाडा बांधून दिला. तोच हा मासाहेबांचा राहता वाडा. वाड्याची व्यवस्था ठेवण्यासाठी काही अधिकारी तसेच शिपायांची व्यवस्थाही महाराजांनी केली होती. पायऱ्यांची एक उत्तम विहीर, तसेच जिजाबाईंना बसण्यासाठी केलेले दगडी आसन बघण्यासारखे आहे. यास 'तक्क्याची विहीर' असेही म्हणतात.

२. खुबलढा बुरूज : गड चढू लागले म्हणजे एक बुरुजाचे ठिकाण दिसते, तोच हा सुप्रसिद्ध खुबलढा बुरूज. बुरुजाशेजारी एक दरवाजा होता, त्यास 'चित् दरवाजा' म्हणत पण हा दरवाजा आता पूर्णपणे उध्वस्त झाला आहे.

३. नाना दरवाजा : या दरवाजास 'नाणे दरवाजा' असेही म्हणत. या दरवाजाचा संबंध नाना फडणिसांशी लावला जातो ही पूर्णपणे गैरसमजूत आहे. नाना दरवाजा याचाच अर्थ लहान दरवाजा. इ. स. १६७४ च्या मे महिन्यात राज्याभिषेकाच्या निमित्ताने इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन याच दरवाजाने आला होता. या दरवाज्यास दोन कमानी आहेत. दरवाज्याच्या आतील बाजूस पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या आहेत. त्यांस 'देवड्या' म्हणतात. दरवाजास अडसर घालण्यासाठी खोबणी दिसतात.

४. मदारमोर्चा किंवा मशीदमोर्चा : चित् दरवाज्याने गेल्यावर नागमोडी वळणे घेत गेलेल्या रस्त्याने पुढे गेल्यावर एक सपाटी लागते. या मोकळ्या जागेत टोकाशी दोन पडक्या इमारती दिसतात. त्यापैकी एक पहारेकऱ्यांची जागा असून दुसरे धान्याचे कोठार आहे. येथे मदनशहा नावाच्या साधूचे थडगे आहे. तेथे एक प्रचंड तोफही दिसते. येथून पुढे गेल्यावर खडकात खोदलेल्या तीन गुहा दिसतात.

५. महादरवाजा : महादरवाज्याच्या बाहेरील अंगास वर दोन्ही बाजूस दोन सुंदर कमळाकृती कोरल्या आहेत. दरवाज्यावर असणाऱ्या या दोन कमळांचा अर्थ म्हणजे किल्ल्याच्या आत 'श्री आणि सरस्वती' नांदत आहे. 'श्री आणि सरस्वती' म्हणजेच 'विद्या व लक्ष्मी' होय. महादरवाज्याला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट तर दुसरा ६५ फूट उंच आहे. तटबंदीमध्ये जी उतरती भोके ठेवलेली असतात त्यास 'जंग्या' म्हणतात. शत्रूवर मारा करण्यासाठी ही भोके ठेवलेली असतात. बुरुजांमधील दरवाजा हा वायव्य दिशेस तोंड करून उभा आहे. महादरवाज्यातून आत आल्यावर पहारेकऱ्यांच्या देवड्या दिसतात तसेच संरक्षकांसाठी केलेल्या राहण्याच्या खोल्या दिसतात. महादरवाज्यापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत तर डावीकडे हिरकणी टोकापर्यंत तटबंदी बांधलेली आहे.

६. चोरदिंडी : महादरवाज्यापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत जी तटबंदी जाते, त्यावरून चालत गेल्यास जिथे ही तटबंदी संपते, त्याच्या थोडे अलीकडे बुरुजात ही चोरदिंडी बांधलेली आहे. बुरुजाच्या आतून दरवाजापर्यंत येण्यासाठी पायऱ्या आहेत.

७. हत्ती तलाव : महादरवाज्यातून थोडे पुढे आल्यावर जो तलाव दिसतो तो हत्ती तलाव. गजशाळेतून येणाऱ्या हत्तींच्या स्नानासाठी आणि पिण्यासाठी या तलावाचा उपयोग होत होता.

८. गंगासागर तलाव : हत्तीतलावापासून जवळच रायगड जिल्हा परिषदेच्या धर्मशाळेच्या इमारती दिसतात. धर्मशाळेपासून दक्षिणेकडे अंदाजे ५० - ६० पावले चालत गेल्यास जो तलाव लागतो तो गंगासागर तलाव. महाराज्यांच्या राज्याभिषेकानंतर सप्तसागर व महानद्यांची आणलेली तीर्थेयाच तलावात टाकली गेली. म्हणूनच याचे गंगीसागर असे नाव पडले. शिवकाळात शिबंदीसाठी याचे पाणी वापरण्यात येई.

९. स्तंभ :गंगासागराच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे दिसतात. त्यासच स्तंभ म्हणतात. जगदीश्वराच्या शिलालेखामध्ये ज्या स्तंभांचा उल्लेख केला आहे, ते हेच असावेत. ते पूर्वी पाच मजले होते असे म्हणतात. ते द्वादश कोनी असून बांधकामात नक्षीकाम आढळते.

१०. पालखी दरवाजा : स्तंभांच्या पश्चिमेस भिंत असलेल्या भागातून ३१ पायऱ्या बांधलेल्या दिसतात. त्या चढून गेल्यावर जो दरवाजा लागतो तो पालखी दरवाजा. या दरवाज्यातून आपल्याला बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो.

११. मेणा दरवाजा : पालखी दरवाज्याने वर प्रवेश केला की, चढ - उतार असलेला एक सरळ मार्ग आपल्याला मेणा दरवाजापर्यंत घेऊन जातो. उजव्या हातास जे सात अवशेष दिसतात ते आहेत राण्यांचे महाल. मेणा दरवाज्यातून बालेकिल्ल्यावर प्रवेश करता येतो.

१२. राजभवन : राणीवशाच्या समोर डाव्या हातास दासदासींच्या मकानांचे अवशेष दिसतात. या अवशेषांच्या मागे दुसरी जी समांतर भिंत आहे त्या भिंतीच्या मध्यभागी जो दरवाजा आहे तेथून बालेकिल्ल्याच्या अंतर्भागात प्रवेश केला की जो प्रशस्त चौथरा लागतो तेच हे महाराजांचे राजभवन. राजभवनाचा चौथारा ८६ फूट लांब व ३३ फूट रुंद आहे. १३. रत्नशाळा : राजप्रासादाजवळील स्तंभांच्या पूर्वेकडे असलेल्या मोकळ्या जागेत एक तळघर आहे, तीच ही रत्नशाळा. हा खलबतखाना म्हणजेच गुप्त बोलणी करण्यासाठी केलेली खोली असावी असेही म्हणतात.

१४. राजसभा : महाराजांचा राज्याभिषेक जेथे झाला, तीच ही राजसभा. राजसभा २२० फूट लांब व १२४ फूट रुंद आहे. येथेच पूर्वेकडे तोंड केलेली सिंहासनाची जागा आहे. येथे बत्तीस मणांचे सोन्याचे सिंहासन होते. सभासद बखर म्हणते, 'तख्त सुवर्णाचे बत्तीस मणांचे सिद्ध करवले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती, त्यामध्ये शोध करून मोठी मोलाची रत्ने जडाव केली.'

१५. नगारखाना : सिंहासनाच्या समोर जे भव्य प्रवेशद्वार दिसते तोच हा नगारखाना. हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. नगारखान्यातून पायऱ्या चढून वर गेले की आपण किल्ल्यावरील सर्वाधिक उंचीवर असतो.

१६. बाजारपेठ : नगारखान्याकडून आपण डावीकडे उतरून आलो की, समोर जी मोकळी जागा दिसते तो 'होळीचा माळ'. तेथेच आता शिवछत्रपतींचा भव्य पुतळा बसवलेला आहे. पुतळ्यासमोर जे दोन रांगांमध्ये भव्य अवशेष दिसतात तीच शिवकाळातील बाजारपेठ. पेठेच्या दोन रांगात प्रत्येकी २२ दुकाने आहेत. मधून जवळजवळ चाळीस फूट रुंद रस्ता आहे.

१७. शिर्काई देऊळ : महाराजांच्या पुतळ्याच्या डाव्या बाजूस जे छोटे देऊळ दिसते ते शिर्काईचे देऊळ. शिर्काई ही गडावरील मुख्य देवता. १८. जगदीश्वर मंदिर : बाजारपेठेच्या खालच्या बाजूस पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मणतळे वगैरे अवशेष दिसतात. तेथूनच समोर जे भव्य मंदिर दिसते तेच महादेवाचे म्हणजे जगदीश्वराचे मंदिर. मंदिरासमोर नंदीची भव्य आणि सुबक मूर्ती आहे. पण सध्या ही मूर्ती भग्नावस्थेत आहे. मंदिरात प्रवेश केला की भव्य सभामंडप लागतो. मंडपाच्या मध्यभागी भव्य कासव आहे. गाभाऱ्याच्या भिंतीस हनुमंताची भव्य मूर्ती दिसते. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांच्या खाली एक लहानसा शिलालेख दिसतो. तो पुढीलप्रमाणे, 'सेवेचे ठायी तत्पर हिरोजी इटळकर' या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतीवर एक सुंदर शिलालेख दिसतो तो पुढीलप्रमाणे:- श्री गणपतये नमः। प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंददोनुज्ञया श्रीमच्छत्रपतेः शिवस्यनृपतेः सिंहासने तिष्ठतः। शाके षण्णवबाणभूमिगणनादानन्दसंवत्सरे ज्योतीराजमुहूर्तकिर्तीमहिते शुक्लेशसापै तिथौ ॥१॥ वापीकूपडागराजिरुचिरं रम्यं वनं वीतिकौ स्तभेः कुंभिगृहे नरेन्द्रसदनैरभ्रंलिहे मीहिते । श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुञ्जृंभते ॥२॥ याचा थोडक्यात अर्थ पुढीलप्रमाणे - 'सर्व जगाला आनंददायी असा हा जगदीश्वराचा प्रासाद श्रीमद् छत्रपती शिवाजी राजा यांच्या आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सर चालू असताना सुमुहुर्तावर निर्माण केला. या रायगडावर हिरोजी नावाच्या शिल्पकाराने विहिरी, तळी, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा, राजगृहे आशांची उभारणी केली आहे. ती चंद्रसूर्य असेतोवर खुशाल नांदो.'

१९. महाराजांची समाधी : मंदिराच्या पूर्वदरवाजापासून थोड्या अंतरावर जो अष्टकोनी चौथरा दिसतो तीच महाराजांची समाधी. सभासद बखर म्हणते, 'क्षत्रियकुलावतंस श्रीमन्महाराजाधिराज शिवाजी महाराज छत्रपती यांचा काल शके १६०२ चैत्र शुद्ध १५ या दिवशी रायगड येथे झाला. देहाचे सार्थक त्याणी बांधिलेला जगदीश्वराचा जो प्रासाद त्याच्या महाद्वाराच्या बाहेर दक्षणभागी केले. तेथे काळ्या दगडाच्या चिऱ्याचे जोते अष्टकोनी सुमारे छातीभर उंचीचे बांधिले असून वरून फरसबंदी केलेली आहे. फरसबंदीच्या खाली पोकळी आहे, तीत महाराजांचा अवशिष्टांश रक्षामिश्र मृत्तिकारुपाने सापडतो.' दहनभूमी पलीकडे भग्न इमारतींच्या अवशेषांची एक रांग आहे, ते शिबंदीचे निवासस्थान असावे. त्याच्या पलीकडे सदर वस्तीपासून विलग असा एक घराचा चौथरा दिसतो. हे घर इ. स. १६७४ मध्ये इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडन यास राहावयास दिले होते. महाराजांच्या समाधीच्या पूर्वेकडे भवानी टोक आहे तर उजवीकडे दारूची कोठारे, बारा टाकी दिसतात.

२०. कुशावर्त तलाव : होळीचा माळ डाव्या हातास सोडून उजवीकडील वाट कुशावर्त तलावाकडे जाते. तलावाजवळ महादेवाचे छोटेसे देऊळ दिसते. देवळासमोर फुटलेल्या अवस्थेत नंदी दिसतो.

२१. वाघदरवाजा : कुशावर्त तलावाजवळून घळीने उतरत वाघ दरवाजाकडे जाता येते. आज्ञापत्रात लिहिले आहे की, 'किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे, यांकरीता गड पाहून एक दोन - तीन दरवाजे, तशाच चोरदिंड्या करून ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या.' हे दूरदर्शीपणाचे धोरण ठेऊनच महाराजांनी महादरवाजाशिवाय हा दरवाजा बांधून घेतला. या दरवाज्याने वर येणे जवळजवळ अशक्यच असले तरी दोर लावून खाली उतरू शकतो. पुढे राजाराम महाराज व त्यांची मंडळी झुल्फिरखानाचा वेढा फोडून याच दरवाज्याने निसटली होती.

२२. टकमक टोक : बाजारपेठेच्या समोरील टेपावरून खाली उतरून टकमक टोकाकडे जाता येते. तेथेच एका दारूच्या कोठाराचे अवशेष दिसतात. जसजसे आपण टोकाकडे जातो तसतसा रस्ता निमुळता होत जातो. उजव्या हाताला सरळ तुटलेला २६०० फूट खोल कडा आहे. टोकावर वारा प्रचंड असतो व जागाही कमी असल्यामुळे गोंधळ न करता सावधानता बाळगावी

२३. हिरकणी टोक : गंगासागराच्या उजवीकडे पश्चिमेस जी चिंचोळी वाट जाते ती हिरकणी टोकाकडे जाते. हिरकणी टोकाशी संबंधित हिरकणी गवळणीची एक कथा सांगितली जाते. या बुरुजावर काही तोफाही ठेवलेल्या दिसतात. बुरुजावर उभे राहिले तर डाव्या हाताला गांधारीचे खोरे, उजव्या बाजूला काळ नदीचे खोरे दिसते. तसेच इथून पाचाड, खुबलढा बुरूज, मशीद मोर्चा ही ठिकाणे तोफेच्या माऱ्यात आहेत. त्यामुळे युद्धशास्त्राच्या तसेच लढाऊ दृष्टीने ही खूप महत्त्वाची आणि मोक्याची जागा आहे.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१) मुंबई - गोवा मार्गावरील महाड या बस स्थानकामधून : मुंबई - गोवा मार्गावरील महाड या बस स्थानकामधून रायगडासाठी बसेस सुटतात. तसेच बस स्थानका बाहेरून जीपगाड्याही जातात. बसने आल्यावर चित् दरवाज्यापाशी, (जो आता अस्तित्वात नाही) जिथे पायऱ्या सुरू होतात तेथे उतरून पायऱ्यांनी गडावर जाता येते. जवळजवळ १५०० पायऱ्या चढून गेल्यावर महादरवाजातून आपला गडात प्रवेश होतो.

२) नाना दरवाजाकडूनही : नाना दरवाजाकडूनही आपण गड चढू शकतो. पायऱ्यांकडून जो डांबरी रस्ता पुढे जातो त्या रस्त्याने थोडे पुढे जाऊन उजवीकडे एक पायवाट जाते. त्या वाटेने गेल्यास नानादरवाजाने आपण गड चढू शकतो.

३) रोप-वे : आता गडावर जाण्यासाठी रोप-वेची व्यवस्था झाल्याने पायथ्यापासून १० ते १५ मिनिटांत आपण गडावर पोहचू शकतो.

**राहण्याची सोय** : रायगड जिल्हा परिषदेच्या धर्मशाळेमध्ये राहण्यासाठी खोल्या उपलब्ध आहेत. तसेच एम.टी.डी.सी. च्या बंगल्यांमध्ये किंवा डॉरमिटरी हॉलमध्ये राहण्याची सोय होऊ शकते. रायगड जिल्हा परिषद, तालुका महाड, जिल्हा रायगड अथवा महाराष्ट्र राज्य पर्यटन केंद्र, एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉइंट, मुंबई - २१ यांच्याशी संपर्क केल्यास राहण्याची सोय होऊ शकेल. पायथ्याच्या पाचाड गावी व गडावर श्री देशमुख यांचे उपहारगृह आहे. पाचाडचा फोन - (९५२१४५) ७४८४८, ७४८६६.

**जेवणाची सोय** : गडावर हॉटेल्स आहेत तेथे जेवणाची सोय होते.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २ तास

# लिंगाणा

किल्ल्याची उंची : ३००० फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: रायगड
जिल्हा : रायगड
श्रेणी : अत्यंत कठीण

**इतिहास :** लिंगाच्या आकाराचा हा किल्ला महाडपासून ईशान्येस सोळा मैलांवर असून सह्याद्रीच्या मुख्य रांगेत तोरणा व रायगड यांचे दरम्यान आहे. लिंगाण्याचे खडक २९६९ फूट उंच असून त्याची चढण ४ मैल लांबीची आहे. तटबंदी पूर्ण नष्ट झाली आहे, बाकी आहेत ते फक्त काही हौद व धान्य कोठाराच्या खुणा. मोऱ्यांचा पराभव केल्यावर शिवाजीने रायगडाजवळ हा किल्ला बांधला. इथल्या गुहेत, जे जुने कारागृह होते, एका वेळेस ५० कैदी ठेवत. ( रायगडाची जीवनकथा पृ. ३,४) १६६५ सालच्या पुरंदर तहामध्ये रायगड आणि त्या परिसरातले किल्ले लिंगाणा व बाणकोट महाराजांकडेच राहिले. ( रायगडाची जीवनकथा पृ. २४) लिंगाण्याच्या गिर्दनवाहीचे देव श्रीजननी व सोमजाई हे होत. त्यांच्या नवरात्राच्या उत्सवाच्या रायगडाच्या जमाखर्चातून तरतूद होत असे. ( रायगडाची जीवनकथा पृ. १३०) या देवतांना बकरे बळी देण्याची प्रथा होती.( रायगडाची जीवनकथा पृ. १३१) लिंगाणा किल्ला रायगडचा पूरक होता. त्याच्या डागडुजीचे काम रायगडाबरोबरच चालत असे. १७८६ सालापर्यंत त्यावरील वास्तूंची देखभाल केली जात असे असा उल्लेख आढळतो. त्यामध्ये गडावरील सदर, बुरूज, दरवाजे आणि धान्यकोठार यांचा समावेश असे. ( रायगडाची जीवनकथा पृ. १३५) तेथे पर्जन्यकाळात एक मनुष्य गस्त घाली. ( रायगडाची जीवनकथा पृ. १३९) रायगड नंतर लिंगाणा पडला. रायगडाच्या खोऱ्यात थोडी विश्रांती घेऊन इंग्रजांचे विजयी सैन्य २३ मे रोजी पाली पलीकडील मार्गास लागले. ( रायगडाची जीवनकथा पृ. १८८) **गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : गुहा प्रशस्त असून ३०-४० माणसे सामावून घेते. समोरच दुर्गराज रायगडावरचा स्थितप्रज्ञ जगदीश्वर आपल्याला दर्शन देऊन तृप्त करतो. या गुहेवरून पुढे आपण गेलो की आपण एका कोरड्या हौदाला पार करून थोडेसे पुढे चांगल्या पाण्याच्या हौदापाशी येतो. इथे एक शिवलिंग आहे, पण कुठे मंदिराचा मागमूसही नाही. या हौदाच्या पुढे, म्हणजे गडाच्या उत्तरेस पायऱ्या आहेत ज्यावरती असलेल्या गुहांपर्यंत जातो. इकडे आपल्याला एक बांधकाम नजरेस पडतं, जे अजूनही शाबूत आहे. ग्रामस्थांच्या सांगण्याप्रमाणे इथे दिवा लावत असत, जो कदाचित रायगडावर इशारा देण्यास वापरला जात असे. पण आज ही वाट पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. जाण्याऱ्या वाटेवरूनच ही वास्तू दिसते. लिंगाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे इथला कठीण चढाईचा सुळका. यावर जायचे म्हणजे वाट पूर्णत: घसरडी आहे. दोराच्या सहाय्यानेच इथे चढता येतं. या सुळक्याला सर करायला जवळ जवळ ३-४ तास लागतात. काही ठिकाणी तर सरळ कातळ चढावा लागतो. वाट कठीण आहे. मध्ये फक्त एक पाण्याचे कुंड आहे, बाकी कुठेही पाणी नाही. पण सुळका चढून गेल्यावर जो आनंद मिळतो तो काही वेगळाच असतो. या सुळक्यावरून पूर्वेला राजगड आणि तोरणा, तर पश्चिमेस दुर्गराज रायगड आहे. आता थोडे याच्या इतिहासबद्दल जाणून घेऊ. रायगड जर राजगृह तर लिंगाणा हे कारागृह. इथला बेलाग सुळका आणि निसरडी माती म्हणजे या गोष्टी या साठी अतिशय अनुकूल आहे. जर कोणी पळण्याचा प्रयत्न केला तर त्याला जीव गमावणे हाच एक उपाय. गडावरचे दोर आणि शिड्या काढून घेतल्या की गडावरून पळण्याच्या वाटा बंद. गडाचे क्षेत्रफळ सुद्धा कमी, जवळ-जवळ २५० मी. उत्तरेस ज्या पायऱ्या आहेत त्या टाक्यांकडे नेतात. ती वाटही बिकट झाली आहे. आजमितीस ज्या टाक्यातून पाणी भरले जाते तिथे एक शिवलिंग आहे, ते कुठून आले हा प्रश्न पडतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** या गडावर जाण्यास प्रथम आपणास यावे लागते ते महाडला. इथून पाने गावाला जाण्यास सकाळी ११.०० वाजता आणि सायंकाळी ४.०० वाजता गाड्या आहेत. पाने गावातून साधारण पाऊण तासाच्या चढणीनंतर आपण लिंगाणा माचीवर पोहोचतो. तिथे पाणी भरून पुन्हा पाऊण तास चढल्यावर आपल्याला घसरड्या वाटेवरून आपण अर्ध्या तासात आपण लिंगाणा सुळक्याच्या पायथ्याशी असलेल्या गुहेपाशी येतो.

**राहण्याची सोय :** गुहा प्रशस्त असून ३०-४० माणसे इथे राहू शकतात. हेच एकमेव रहाण्याचे ठिकाण आहे. **जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** पिण्याचे पाणी गुहेच्या पुढे असलेल्या टाक्यांमध्ये आहे. तसेच सुळका चढतांना ज्या टप्प्यावर बांधकाम लागते तिथे मुख्य वाटेपासून डावीकडे घसरड्या वाटेवर थोड्या पुढे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पायथ्यापासून ८ - ९ तास.

**सूचना :** प्रस्तरारोहण आवश्यक.

# सुधागड

किल्ल्याची उंची : ५९० मीटर
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: लोणावळा
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

‘गडकोट म्हणजे राज्याचे मूळ’. गडकोट म्हणजे खजिना . गडकोट म्हणजे सैन्याचे बळ. सुधागड म्हणजे भोर संस्थानाचे वैभव. सुधागड हा फार प्राचीन किल्ला आहे. पूर्वी या गडाला भोरपगड असेही म्हणत असत. पुढे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री शिवछत्रपतींचा पदस्पर्श या गडाला झाला आणि याचे नाव सुधागड ठेवले गेले. या गडाची साधारणत: उंची ५९० मीटर आहे. झाडांमध्ये लपलेला हा गड विस्ताराने फारच मोठा आहे. या गडावर जाण्यासाठी तीन प्रमुख वाटा आहेत.

**इतिहास :** सुधागड हा किल्ला फार प्राचीन आहे. या परिसरात अस्तित्वात असणारी ठाणाळे लेणी, ही २२०० वर्षांपूर्वीची आहेत. यावरून असे अनुमान निघते की सुधागड हा देखील तितकाच जुना किल्ला असावा. एखाद्या मोठ्या सत्तेखाली या गडाची जडणघडण झाली असावी. पुराणात भृगु ऋषींनी येथे वास्तव्य केल्याचे अनेक उल्लेख आढळतात. याच ऋषींनी भोराई देवीची स्थापना या डोंगरावर केली. इ. स. १६४८ साली हा किल्ला स्वराज्यात सामील झाला. याबाबत असा उल्लेख आढळतो की, ‘साखरदऱ्यात मालवजी नाईक कारके यांनी माळ लाविली. सरदार मालोजी भोसले यांच्या हाताखाली जाधव आणि सरनाईक हे प्रथम किल्ल्यावर चढले. या धारकऱ्यांना उभे करून त्यांचे पाठीवर हैबतराव चढले. त्यास संभाजीराव पुढे जाऊन माथा गेले. पंचविसाने पुढे जाऊन गस्त मारिली. बोकडसिलेचा पहारा मारला. पुढे भोराईच्या टप्प्यावरी गेले तो सदरेतून किल्लेदार व लोक धावत आले. हाणहाण झाली त्या समयी किल्लेदार कामास आले. उपरांतिक जाऊन सदर काबीज केली.‘ शिवरायांनी या गडाचे भोरपगडावरून ‘सुधागड’ असे नामकरण केले. गडाच्या पायथ्याशी असलेल्या ’पाच्छापूर’ या गावातच संभाजी व औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर याची भेट झाली होती. महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात असलेल्यांपैकी अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस, त्याचा मुलगा आवजी बल्लाळ, आणि हिरोजी फर्जंद या सर्वांना भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी संभाजीने सुधागड परिसरात असणाऱ्या परली गावात हत्तीच्या पायी दिले.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** या गडाचा घेरा तसा मोठा आहे.गडावर पाण्याचे अनेक तलाव आढळतात.गडावर पंत सचिवांचा वाडा आहे. यात ५० जणांची राहण्याची सोय होते. तसेच भोराई देवीचे मंदिर आहे. यामध्ये २५ जणांची राहण्याची सोय होते. येथे जंगलही ब-यापैकी आहे. आजुबाजूच्या जंगलाच्या परिसरात अनेक प्रकारची औषधी वनस्पती आढळतात. गडावरील पंत सचिवांच्या वाड्याच्या बाजूला भोरेश्वराचे मंदिर आहे. तिथूनच पुढे गेल्यावर एक चोरदरवाजाची विहीर आहे. सचिवांच्या वाड्यापासून पुढे पाय-यांची वाट जाते आणि सरळ भोराई देवीच्या मंदिरात आणून सोडते. जर ही वाट सोडून खालची वाट पकडली तर पुढे पाण्याची टाके आहेत. या टाक्यातील पाणी पिण्यासाठी उपयुक्त आहे. टाक्यांच्या डावीकडील वाट ही आपणांस चोर दरवाज्यांकडे आणून सोडते. ही वाट मात्र आता अस्तित्वात नाही.
पाच्छापूर दरवाजा : या दरवाज्यातून गडावर शिरल्यास थोडे चढल्यावर आपण एका पठारावर पोहोचतो. पठाराच्या डावीकडे सिध्देश्वराचे मंदिर ,तसेच धान्यकोठारं,भाड्यांचे टाके,हवालदार तळे , हत्तीमाळ आहे. उजवीकडे गडाची नैसर्गिक तटबंदी बघावयास मिळते.
गडावरील टकमक टोक : वाड्यापासून आपण पाय-यांच्या साह्याने वर आले की उजवीकडची वाट पकडावी. ही वाट मात्र हत्तीपागां मधून जाते. या वाटेने आपण सरळ एका टोकावर पोहचतो. या टोकाकडे आपण पाहिल्यावर आपल्याला रायगडावरील ‘टकमक’ टोकाची आठवण येते. या टोकावर उभे राहिल्यावर समोरच उभा असणारा घनगड , कोरीगड, तैलबैल्या दिसतो. तसेच अंबानदी व नदीच्या आजुबाजूची गावे हा परिसर दिसतो.
दिंडी दरवाजा : सवाष्णीच्या घाटावरून येणारी वाट आपणांस दिंडी दरवाज्यात आणून सोडते. हा दरवाजा म्हणजे रायगडावरील ‘महादरवाज्याची ’ हुबेहूब प्रतिकृती. हे या किल्ल्याचे महाद्वार आहे. या द्वाराची रचना गोमुखी बांधणीची आहे. दोन भीमकाय बुरुजामध्ये लपल्यामुळे या द्वारास मोठे संरक्षण लाभले आहे. गडावर वाड्याच्या मागील बाजूस चोरवाट विहीर आहे. त्याच्यात एक भुयार असून आता मात्र ते गाळाने पूर्ण भरले आहे. संकटाच्या वेळी गडावरून खाली जाण्यासाठी चोरवाट पण आहे. भोराई देवीच्या मंदिराच्या मागील बाजूस अनेक समाध्या आहेत.त्यावर सुबक नक्षीकाम केले आहे.

## गडावर जाण्याच्या वाटा :

सवाष्णीचा घाट : तैलबैला गावातून सरळ धोंडसे या गावी यावे. अथवा पाली गाव ते धोंडसे गाव हे अंतरही १२ कि.मी. आहे. पालीहून धोंडसे

गावी यावे.तिथून गडावर जाण्यासाठी ३ तास लागतात. वाट फारच दमछाक करणारी आहे.वाट सरळसोट असल्याने चुकण्याचा संभव कमी आहे. या वाटेने आपण दिंडी दरवाजात येतो.

नाणदांड घाट : एकोले गावातून घनगड डावीकडे ठेवून मावळती कडे निघावे.पुढे पाऊण तासाने नाणदांड घाटात पोहोचतो.पुढे एक बावधान गाव आहे. पुढे पाच्छापूरची दिशा धरून ठाकूरवाडीत यावे आणि मग गडमाथा अवघ्या दोन तासात गाठता येतो.

पाच्छापूर मार्गे: डावीकडे सिध्देश्वराचे मंदिर ,तसेच धान्यकोठारं,भाड्यांचे टाके,हवालदार तळे , हत्तीमाळ आहे. उजवीकडे गडाची नैसर्गिक तटबंदी बघावयास मिळते.

गडावरील टकमक टोक : वाड्यापासून आपण पाय-यांच्या साह्याने वर आले की उजवीकडची वाट पकडावी. ही वाट मात्र हत्तीपागां मधून जाते. या वाटेने आपण सरळ एका टोकावर पोहचतो. या टोकाकडे आपण पाहिल्यावर आपल्याला रायगडावरील ‘टकमक’ टोकाची आठवण येते. या टोकावर उभे राहिल्यावर समोरच उभा असणारा घनगड , कोरीगड, तैलबैल्या दिसतो. तसेच अंबानदी व नदीच्या आजुबाजूच गावे हा परिसर दिसतो.

दिंडी दरवाजा : सवाष्णीच्या घाटावरून येणारी वाट आपणांस दिंडी दरवाज्यात आणून सोडते. हा दरवाजा म्हणजे रायगडावरील ‘महादरवाज्याची ’ हुबेहूब प्रतिकृती. हे या किल्ल्याचे महाद्वार आहे. या द्वाराची रचना गोमुखी बांधणीची आहे. दोन भीमकाय बुरुजामध्ये लपल्यामुळे या द्वारास मोठे संरक्षण लाभले आहे. गडावर वाड्याच्या मागील बाजूस चोरवाट विहीर आहे. त्याच्यात एक भुयार असून आता मात्र ते गाळाने पूर्ण भरले आहे. संकटाच्या वेळी गडावरून खाली जाण्यासाठी चोरवाट पण आहे. भोराई देवीच्या मंदिराच्या मागील बाजूस अनेक समाध्या आहेत.त्यावर सुबक नक्षीकाम केले आहे.

**राहण्याची सोय :** पंत सचिवांचे वाडे येथे उपलब्ध असून येथे ५० माणसे राहू शकतात. तसेच भोराई देवीच्या मंदिरात देखील रहाण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय स्वत: केलेली असल्यास उत्तम. पण तसे शक्य नसल्यास गडावरती ‘मोरे’ नावाच्या गृहस्थाचे घर आहे. तेथे ४ ते ५ जणांची जेवणाची सोय होऊ शके

**पाण्याची सोय :** गडावरतीच अनेक हौद आणि तलाव असल्याने बारामही पाण्याची सोय होते

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** दोन तास पाच्छापूर मार्गे, तीन तास दिंडी दरवाजा मार्गे.(धोंडसे मार्ग)

# सरसगड

किल्ल्याची उंची : १६०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पाली
जिल्हा : रायगड
श्रेणी : मध्यम

श्री गणेश म्हणजे विद्येची देवता. पाली हे अष्टविनायकांपैकी एक ठिकाणे. येथील गणपती‘बल्लाळेश्वर’ म्हणून ओळखला जातो. याच पाली गावाच्या सीमेला लागून उभा असणारा गड म्हणजे सरसगड. पाली गावात जाताच या गडाचे दर्शन होते. पाली गावाच्या दक्षिणोत्तर सीमेवर सरसगडाची अजस्त्र भिंत उभी आहे.या गडाचा उपयोग मुख्यतः टेहळणीसाठी करत असत. या गडावरून पाली व जवळच्या संपूर्ण परिसरावर टेहळणी करता येते. शिवाजी महाराजांनी या गडास आपल्या स्वराज्यादाखल करून घेतले आणि किल्ल्याच्या डागडुजीसाठी २००० होन मंजूर केले.स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत या गडाची व्यवस्था ‘भोर’ संस्थानाकडे होती.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** तसे पाहिले तर हा गड दोन ते तीन तासात न्याहाळता येतो. दिंडी दरवाजाला लागूनच तिहेरी तटबंदीची रचना आपणास बघावयास मिळते. दरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे वळावे आणि १५ पाय-या वर चढाव्यात म्हणजे तटबंदी दिसते. दरवाज्यातून आत शिरल्यावर डावीकडे गेल्यावर एक मोठा पाण्याचा हौद लागतो. पुढे एक भुयारी मार्ग लागतो. सध्या हा मार्ग मात्र अस्तित्वात नाही. पुढे गडावर येणारा दुसरा मार्ग आहे. याच्या जवळच ‘मोती हौद’ आहे. जर आपण उजवीकडे गेलो तर १५ पाय-या चढाव्या लागतात आणि मग बालेकिल्ल्याचा पायथा लागतो. बालेकिल्ल्याचा पायथा :- समोरच एक मोठा पाण्याचा हौद आहे.येथे बारामाही पाणी असते. हौदाच्या डाव्या बाजूस एक शहापीराचे थडगे आहे . त्याच्या जवळच पुन्हा पाण्याची तळी आहेत . जवळच कपारीत शंकराची एक पिंड आहे. या कपारीत आपणास रहाता येते. हौदाच्या उजव्या बाजूला काही धान्यकोठारे , शस्त्रागारे आहेत. तसेच निवासस्थाने , आखाडा व

कैदखाना देखील आहे. येथे दहा-बारा जणांची रहाण्याची सोय होते. पुढे बालेकिल्ल्यावर जाण्याचा मार्ग लागतो. बालेकिल्ला माथा :- बालेकिल्ल्याच्या माथ्यावर खास बघण्यासारखे काही नाही. गडावर केदारेश्वराचे मंदिर आहे. येथे एक तलाव आहे. टेहळणीसाठी दोन बुरूज आहेत. मात्र या बालेकिल्ल्यावरून समोरच असणारा तीन कावडीचा डोंगर दिसतो. समोरच उभा असणारा सुधागड, तैलबैला, धनगड आणि कोरीगड दिसतो. तसेच पालीगाव, अंबानदी, उन्हेरीची गरम पाण्याची कुंडे, कोकण, जांभुळपाडा असा सर्व परिसर दिसतो. वैशाख पौर्णिमेला गडावरील शहापीराचा उरूस भरतो. महाशिवरात्रीला केदारेश्वराला भाविकांची गर्दी असते.

गडावर जाण्याच्या वाटा : गडावर जाण्यासाठी मात्र 'दिंडी' दरवाजाची एकच वाट वापरात आहे. पाली गावात उतरून या दरवाज्याने गडावर जाता येते. मंदिराच्या मागील बाजूस असणा-या डांबरी रस्त्यावरून डावीकडे वळावे आणि मळलेली वाट पकडावी. ही वाट सरळसोट असून आपणास थेट गडाच्या बुरुजापर्यंत आणून सोडते. बुरुजाच्या पायथ्याशी एक खोली आहे. या खोलीचा उपयोग पहारेक-यांना रहाण्यासाठी होत असे. पुढे दरवाज्यापर्यंत जाण्यासाठी ९६ पाय-या चढाव्या लागतात. या पाय-या जरा जपूनच चढाव्यात कारण पाय घसरला तर दरीत पडण्याचा धोका उद्भवतो. पाय-यांची वाट फार दमछाक करणारी आहे. या पाय-या आपल्याला सरळ दरवाजापर्यंत आणून सोडतात. दरवाजाच्या समोरच पहारेक-यांच्या देवडया आहेत. गडावर जाण्यासाठीअजून एक वाट असून ती वापरातील नसल्याने या वाटेचा उपयोग कोणी करत नाही.

राहण्याची सोय : गडावर तसे पाहिले तर राहण्याची व्यवस्थित सोय नाही. मात्र ७ ते ८ जणांना दिंडी दरवाज्यासमोर असणा-या देवडयां मध्ये अथवा धान्यकोठारे, कैदखाना येथे रहाता येते. पण गडावर फार कमी ट्रेकर्स रहातात.

जेवणाची सोय : जेवणाची सोय आपण स्वत: करणेच योग्य.

पाण्याची सोय : गडावर पाण्याची भरपूर टाकी आहेत. पण बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी शहापीराच्या उजव्या बाजूस असणारा हौद पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : पाली गावाहून दिंडी दरवाजापर्यंत जायला साधारण १ तास लागतो.

# जंजिरा

किल्ल्याची उंची : ०
किल्ल्याचा प्रकार : जलदुर्ग
डोंगररांग: रायगड
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

महाराष्ट्राला सुमारे ७५० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किना-यावरील किल्ले पाहणे म्हणजे एक आगळी वेगळी आनंदयात्राच ठरते. ही भटकंती चालू होते रेवस बंदरापासून तर संपते तेरेखोल पर्यंत. नारळी फोफळीच्या वनांमधून फिरताना कोकणी समाजाचे दर्शन घडते. रायगड जिल्ह्यात मुरुड तालुक्यात चहुबाजूंनी सागरी पाण्याचा वेढा पडलेला, राजापुरीच्या खाडीच्या तोंडावर मोक्याच्या जागी हा अजेय जलदुर्ग उभा आहे.

इतिहास : जंजिरा किल्ल्यालाच 'किल्ले मेहरुब ऊर्फ किल्ले जंजिरा' अशी नावे होती. इ. स. १५०८ मध्ये मलिक अहमद निजामशाहा मरण पावला. त्याचा ७ वर्षाचा अल्पवयिन मुलगा बु-हाण निजामशाहा गादीवर आला. मिर्झाअल्ली आणि कलबअल्ली हे दोन निजामशाही सरदार उत्तर कोकणातील दंडाराजपुरास आले. त्याचवेळी समुद्रातील चाचे कोळ्यांना फार त्रास देत असत.म्हणून त्यांनी राजपुरीच्या खाडीवर लाकडी मेढेकोट उभारला. रामपाटील या कोळ्याचा अमल त्यावेळी त्यासर्व परिसरावर होता. निजामशाहाने पिरमखान नावाच्या सरदाराला रामपाटीलचा काटा काढण्यासाठी पाठवलं. पिरमखानाने मेढेकोटच्या आजुबाजूला गलबते लावली आणि रामपाटीलाला दारू पाजून बेहोष केले व मेढेकोट आपल्या ताब्यात घेतला. रामपाटीलला निजामशाहा कडे पाठवून त्याचे धर्मांतर केले .इ.स.१५२६ ते १३३२ च्या कारकिर्दीनंतर .इ.स.१५३२ मध्ये पिरामखान मरण पावला बु-हाण निजामशहाची नेमणूक केली. पुढे १५६७ मध्ये हुसेन निजामशहाच्या हुकुमानुसार लाकडी मेढेकोटा ऐवजी दगडी कोट बांधण्यास सुरुवात केली. हे काम इ.स १५७१ पर्यंत पूर्ण झाले आणि हा दगडी कोट 'किल्ले मेहरुब' नावाने ओळखला जाऊ लागला. पुढे १८५७ मध्ये अलर्गखान याची येथे नेमाणुक झाली. १६१२ मध्ये याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा इब्राहीमखान याची नेमणूक झाली ,याच्या मृत्यूनंतर १६१८ - १६२० च्या कालावधीत सिध्दी सुरुदखान हा ठाणेदार झाला. यानंतर सुमारे १९४७ पर्यंत २० सिध्दी नवाबांनी जंजिरा किल्ल्यावर हक्क गाजवला. मुरुड परिसरातून मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांची सांगड बसत नसल्याने मलिक अंबरने हा मुलूख तोडून देऊन याठिकाणी नवीन जहागीरदारी स्थपन केली आणि सिध्दी अंबरसानक या मुलूखाची जबाबदारी पाहू लागला. अर्थात या जंजिरा संस्थानाचा संस्थापक सिध्दी अंबरसानकच ठरला. इ.स १६२५ मध्ये मलिक अंबर मरण पावला. जंजिरेकर स्वतंत्र सत्ताधीश झाले होते. २० सिध्दी सत्ताधिशांनी मिळून ३३० वर्षेराज्य केले आणि १९४८ मध्ये जंजिरा संस्थान भारतीय संघाराज्यात विलीन

झाले. इ.स १६४८ मध्ये शिवरायांनी तळेगड, घोसाळगड आणि रायगड परिसरातील मुलूख जिंकला. १६५७ मध्ये जावळी जिंकली आणि त्यांनी आपली नजर उत्तर कोकणावर वळवली. किल्ले जंजिरा आपल्या ताब्यात आल्याशिवाय उत्तरकोकणावर आपण वर्चस्व गाजवू शकणारा नाही हे सत्य शिवरायांना उमगले होते. १६५९ मध्ये शिवरायांनी शामराजपंत व त्या सोबत बाजी घोलपला जंजिरा घेण्यासाठी पाठवले पण,हा पहिला प्रयत्न फसला. पुन्हा १६५९ मध्ये निळोजीपंत रघुनाथ मुजुमदार ,मायाजी भाटकर यांनी जंजिराच्या सिध्दीची कोंडी केली पण पुन्हा हा प्रयत्न फसला. तिस-या स्वारीचे वर्णन सभासद बखरीत खालीलप्रमाणे दिलेले आहे. '' राजियांनी व्यंकोजी दत्तो फौजेनिशी नामजाद रवाना केले. त्यांनी जाऊन मुलूख मारून तलफ केला. मग शिद्दीने आपले जातीचे हापशी लष्कर घोडेस्वार व हशम नामजाद व्यंकोजी दत्तोवर रवाना केले. त्याशी युद्ध झाले. तीनशे हबशी व्यंकोजीपंत मारिले.घोडे पाडाव केले. व्यंकोजीपंत कस्त फार केली. बारा जखमा व्यंकोजीपंतास लागल्या असा चौका बसून आले. शिद्दीने सल्याचे नाते लावले. पण राजियांनी सला केलाच नाही.'' ही जंजि-यावरील तिसरी स्वारी होती. १६७८ च्या जुलै मध्ये शिवरायांनी जंजि-यावर स्वारी करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न केला. सन १६८२ मध्ये संभाजीराजांनी दादाजी रघुनाथाला जंजिरा घेण्यासाठी पाठवले पण त्याचवेळी औरंगजेब दक्षिणेत उतरल्याने त्याचा जंजिरा घेण्याचा प्रयत्न अपुराच राहीला. या संस्थानाचा शेवटचा अधिपती म्हणजे सिध्दी मुहंमदखान याच्याच कारकिर्दीत अजेय असे जंजिरा संस्थान ३ एप्रिल १९४८ रोजी भारतीय संस्थानात विलीन झाले. **गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : राजापुरी गावापासून येणारी होडी जंजिरा किल्ल्याच्या पायथ्यापाशी थांबते. प्रवेशद्वारावरील पांढ-या दगडातील पारशी लेख स्पष्ट दिसतो. दरवाजाच्या दोन्ही बाजूच्या भिंतींवर विशिष्ट प्रकारचे दगडात कोरलेले शिल्प आढळते. हे गजान्त लक्ष्मीचे शिल्प म्हणून ओळखले जाते. दोन दरवाजांच्या मध्ये पहारेक-यांच्या देवड्या आहेत.जंजिरा किल्ल्याच्या महाद्वारावर नगारखाना आहे. किल्ल्याच्या तटावर जाणा-या पाय-यांनी वर गेल्यावर समोरच तटावर तोफा ठेवल्या आहेत, त्यापैकी सर्वात मोठ्या तोफेचे नाव 'कलाडबांगडी ' असे आहे.

पीरपंचायतन : किल्ल्याच्या मुख्यद्वारातून आत गेल्यावर डाव्याबाजूला आणखी एक द्वार आहे. उजवीकडे खोली सारखे एक बांधकाम आहे. यालाच पीरपंचायतन असे म्हणतात. ह्या वास्तूत ५ पीर आहेत. या पंचायतनाच्या पटांगणातच काही वास्तू आहेत. याच ठिकाणी जहाजाचे तीन नांगर गंजलेल्या अवस्थेत पडलेले आहेत.

घोड्याच्या पागा : पीर पंचायतनाच्या समोरच्या दिशेने तटावरून पुढे गेल्यावर घोड्याच्या पागा लागतात.

सुरुलखानाचा वाडा : येथून बाहेर पडल्यावर समोरच ३ मजली पडकी भक्कम बांधणीची इमारत दिसते यालाच सुरुलखानाचा वाडा असे म्हणतात. अनेक वर्षात या वाड्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आहे.

तलाव : या वाड्याच्या उत्तरेस सुंदर बांधकाम केलेला शोडषट्कोनी गोड्यापाण्याचा तलाव आहे. हा तलाव सुमारे २० मी व्यासाचा आहे. चार कोप-यात चार हौद आहेत.

सदर : बालेकिल्ल्याच्या मागे चुनेगची इमारत आहे. यालाच सदर असे म्हणतात.

बालेकिल्ला : तलावाच्या बाजूने बांधीव पाय-यांनी थोडे वर गेल्यावर बालेकिल्ला लागतो. आज तेथे एक झेंडा वंदनासाठी उभारलेला आहे.

पश्चिम दरवाजा : गडाच्या पश्चिमेला किंचित तटाखाली, तटातून बाहेर पडण्यासाठी छोटा दरवाजा आहे, यालाच दर्या दरवाजा असे म्हणतात. संकटकाळी बाहेर पडण्यास याचा उपयोग होत होता. दरवाजाच्या वरच्या भागातच तटबंदीच्या जवळ कैदखाना होता. किल्ल्याला स्वतंत्र असे २२ बुरुज आहेत. आजही ते सुस्थित आहेत. सर्व किल्ला पाहण्यास तीन तास पुरतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१.अलिबागमार्गे: जंजिरा जलदुर्ग पाहायचा असेल तर पुणे मुंबई मार्गेअलिबाग गाठायचे. पुढे अलिबागवरुन रेवदंडामार्गेमुरुड गाठता येते. मुरुड गावातून किल्ल्यापर्यंत जाण्यासाठी बोटसेवा उपलब्ध आहे. किना-या पासून किल्ला गाठण्यास अर्धा तास पुरतो.

२. पाली- रोहा - नागोठणे - साळाव - नांदगाव मार्गे: अलिबाग मार्गेन जाता पाली- रोहा - नागोठणे - साळाव - नांदगाव मार्गेमुरुडला जाता येते.

३.दिघीमार्गे: कोकणातून यावयाचे झाल्यास महाड - गोरेगाव - म्हसळे - बोर्लिपचंतन दिघी गाठावे. दिघीहून किल्ला पाहण्यासाठी बोटसेवा उपलब्ध आहे.

**राहण्याची सोय** : मुरुड गावात राहाण्याची सोय होऊ शकते.

**जेवणाची सोय** : गावात जेवणाची सोय होते.

**पाण्याची सोय** : किल्ल्यावर नाही

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : मुरुड गावापासून अर्धा तास.

# किल्ले प्रबळगड (मुरंजन)

किल्ल्याची उंची : २३०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान
जिल्हा : रायगड
श्रेणी : मध्यम

मुंबई-पुणे हमरस्त्यावरुन जातांना दिसणारा हा नावाप्रमाणे बलवान असणारा एक दुर्ग चटकन आपले लक्ष वेधून घेतो. पूर्वेला उल्हास नदी, पश्चिमेला गडी नदी, दक्षिणेला पाताळगंगा नदी, माणिकगड आणि नैऋत्येला कर्नाळा किल्ला, तसेच जवळच असलेला इर्शाळगड असा चहूबाजूंनी वेढलेला हा किल्ले मुरंजन उर्फ प्रबळगड.

**इतिहास** : उत्तर कोकणातील हा किल्ला त्याच्या मुलुखात असलेल्या पनवेल, कल्याण या प्राचीन बंदरांवर नजर ठेवण्यास असावा. किल्ल्यावरील गुहांच्या अभ्यासावरुन त्यांचा कालखंड बौद्ध कालाशी जोडता येतो. त्यांच्यावरील मनुष्य निर्मित गुहांमुळेच उत्तरकालातील शिलाहार, यादव या राज्यकर्त्यांनी त्याला लष्करी चौकी बनवून नाव दिले मुरंजन.बहामनीच्या कालात हा किल्ला आकारास आला असावा. नंतर अहमदनगरच्या निजामशाहीच्या ताब्यात तो आला. निजामशाहीच्या अस्तावेळी शहाजीराजांनी निजामशाहीच्या वारसाला छत्र धरून निजामशाही वाचवण्याचा प्रयत्न केला. पण मोगल शहाजहान आणि विजापूरचा अदिलशहा यांनी तह करून आपल्या संयुक्त फौजा शहाजीराजांच्या मागावर पाठवल्या. तेव्हा शहाजीराजे पळ काढून कोंढाणा व मुरंबदेवाच्या डोंगरात निघून गेले. नंतर कोकणात जंजि-याच्या सिद्दिकडे गेले असता त्याने आश्रय नाकारल्यावर चौलला पोर्तुगीजांकडे गेले पण त्यांनीही नकार दिल्यावर शहाजीराजे जिजाऊ, बालशिवाजी आणि लष्करासह मुरंजनावर गेले. सन १६३६ मध्ये बालशिवाजींनी मुरंजनाचा उंबरठा ओलांडला. १६३६ मध्ये माहुलीचा तह झाला. त्यात उत्तर कोकण मोगलांच्या ताब्यात गेले आणि मुरंजनवर मोगली अंमल सुरू झाला. पण प्रत्यक्षात तेथे विजापूरच्या अदिलशहाचीच सत्ता होती. पुढे ही संधी शिवरायांनी साधली. जेव्हा शिवरायांनी जावळीच्या चंद्रराव मोरेला हरवून जावळी ताब्यात घेतली, त्याचवेळी म्हणजे १६५६ मध्ये शिवरायांचा शूर सरदार आबाजी महादेव याने कल्याण भिवंडी पासून चेऊल ते रायरीपर्यंतचा सारा मुलूख स्वराज्यात घेतला. तेव्हा मुरंजन शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. किल्ल्याचे नाव बदलून किल्ले प्रबळगड असे ठेवण्यात आले. पुढे १६६५ मध्ये पुरंदरच्या तहानुसार मोगलांना दिलेल्या २३ किल्ल्यांमध्ये प्रबळगड शिवाजी महाराजांनी दिला. जयसिंगाने किल्ल्यावर राजपूत केशरसिंह हाडा हा किल्लेदार नेमला. पुढे पुरंदरचा तह मोडला. मराठे किल्ले परत घेत असतांना मराठ्यांशी झालेल्या लढाईत केशरसिंह धारातीर्थी पडला तत्पूर्वी राजपूत स्त्रियांनी जोहार केला. केशरसिंहाची आई व दोन मुले किल्ल्याच्या झडतीत सापडले. शिवरायांच्या आदेशानुसार त्याने सन्मानाने देऊळगावी मोगल छावणीत पाठवण्यात आले. नंतर किल्ल्यावर खोदकामात बरीच संपत्ती आढळली.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : प्रबळगडाचा माथा म्हणजे एक मोठे पठार आहे. सर्व पठारी भाग हा जंगलाने व्यापलेला आहे. गडावर एक गणेशमंदिर आहे. तसेच दोन तीन पाण्याच्या टाक्या सुद्धा आहेत. मात्र ही टाकी शोधण्यासाठी व गडावर फिरण्यासाठी वाटाड्या घेणे आवश्यक आहे. प्रथम इंग्रजांनी प्रबळगडाचा माथेरान सारखे थंड हवेचे ठिकाण म्हणून विकसित करण्याचा विचार केला होता. मात्र पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळे तो विचार मागे पडला. गडावर तीन चार इमारतींचे अवशेष आहेत. घनदाट कारवीच्या जंगलामुळे गडावरील वाटा नीट दिसत नाहीत. मात्र गडावरून माथेरानचे विविध पॉईंटस् फार सुंदर दिसतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

शेडुंग मार्गे- : मुंबईहून किंवा पुण्याहून येणा-यांनी पनवेल गाठावे. पनवेल पुणे हमरस्त्यावर शेडुंग गावाकडे जाणारा फाटा आहे. एस्.टी चालकांना सांगून शेडुंग फाट्यावर उतरावे. हमरस्त्यावरून जाणारी वाट पकडावी. अर्ध्या तासाच्या रस्त्यावर शेडुंग गाव लागते. शेडुंग गावापासून ठाकुरवाडीपर्यंत चालत यावे. अंतर ५ कि.मी. ठाकुरवाडी हे गडाच्या पायथ्याचे गाव आहे. येथे ऑश्रि छीीळ चशवळलरश्र ठशीशरीलह उशर्पीीश ची भव्य आणि आकर्षक इमारत आहे. गावातून बैलगाडीची वाट थेट आपल्याला प्रबळमाचीवर घेऊन जाते. प्रबळमाचीवर जाण्यास दीड तास लागतो. प्रबळमाची गावातून समोरच एक घळ दिसते. या घळीतून गडावर जाण्यास एक तास पुरतो.ठाकूरवाडी / ऑश्रि पर्यंत जाण्यास पनवेलहूनही बसेस आहेत.
पोईंज मार्गे:- पनवेल चौक मार्गावर शेडुंगच्या पुढे पोईंज फाटा आहे. तिथे उतरून पोईंज गावात पोहचावे. येथे समोरच असणा-या डोंगर धोंडेवरून प्रबळमाची या गावात जावे. येथून दीड ते दोन तासात प्रबळगड गाठावा.
माथेरान ते प्रबळगड :- माथेरान जवळील शार्लोट जलाशयाजवळील श्री पिसरनाथ मंदिराजवळून डावीकडे वळल्यावर दहा मिनिटात आपण एका घळीत येऊन पोहोचतो. लोखंडी शिड्यांच्या सहाय्याने दोन तासात आकसर वाडी या गावात पोहोचता येते. आकसर वाडीतून प्रबळगडचा डोंगर चढत काल्या बुरूजाखाली असलेल्या पठारावरून घळीतून वर चढत गडमाथा गाठावा.

**राहण्याची सोय** : गडावर रहाण्याची सोय नाही. शेडुंग गावातील शाळेच्या कट्यावर २५ - ३० माणसांची जोपण्याची सोय होऊ

शकते.

**जेवणाची सोय :** आपणच करावी

**पाण्याची सोय :** बारमाही पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ३ ते ४ तास पायथ्यापासून

## इरशाळ गड

किल्ल्याची उंची : ३७०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान
जिल्हा : ठाणे
श्रेणी : अत्यंत कठीण

इरशाळगड हा कर्जत विभागात येणारा किल्ला आहे. कर्जत, मलंगगड, प्रबळगड हे सर्व. कोकणात येणारे किल्ले आहेत. कल्याण पुणे लोहमार्गावरून जातांना मलंगगड, देवणीचा सुळका, माथेरान, पेब, म्हसमाळ, प्रबळगड, इरशाळगड हा परिसर सर्वांचेच लक्ष वेधून घेतो. या परिसरातील जनजीवन तसे सर्वसामान्यच आहे. पावसाचे प्रमाण मुबलक असल्यामुळे सर्वत्र भाताची शेती फार मोठ्या प्रमाणावर होते. महामार्गापासून गड जवळच असल्याने पायथ्याच्या गावापर्यंत वाहनाने जाण्याची सोय होते.

**इतिहास :** तसे म्हटले तर या इरशाळला गड म्हणणेच अयोग्य आहे कारण इरशाळ हा एक सुळकाच आहे. त्यामुळे इतिहासातही त्याचा फार असा कुठे उल्लेख नाही. मे १६६६ मध्ये शिवरायांनी कल्याण, भिवंडी - रायरी पर्यंतचा सारा मुलूख घेतला. तेव्हा त्यात हा गडदेखील मराठ्यांच्या ताब्यात आला असावा. इरशाळ म्हणजे प्रबळगडचा सख्खा शेजारी. २३ जानेवारी १९७२ रोजी याच सुळक्यावर एक दुःखद घटना घडली ती म्हणजे, कुमार प्रकाश दुर्वेयाचा किल्ल्यावरून पडून दुःखद अंत झाला. त्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जानेवारीला मुंबई - ठाण्याचे गिर्यारोहक येथे जमतात.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** इरशाळगड म्हणजे एक सुळकाच आहे. इरशाळ माची पासून गडावर जातांना, वाटेतच पाण्याचे एक टाकं लागत. तेथून पुढे सोपे असे प्रस्तरारोहण करून आपण गडाच्या नेढ्यात पोहोचतो. नेढ्यापासून थोडे वर गेल्यावर, डावीकडे पाण्याचे एक टाकं लागत व बाजूलाच एक कपार आहे. हे पाणी पिण्यास योग्य आहे. नेढ्यातून समोर चढणारी वाट सुळक्यावर जाते. सुळक्यावर जाण्यासाठी प्रस्तारारोहणाचे तंत्र अवगत असणे आवश्यकच आहे. गडमाथ्यावरून समोरच प्रबळगड, माथेरान, चंदेरी, मलंगगड, कर्नाळा, माणिकगड हा परिसर दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

**राहण्याची सोय :** नाही

**जेवणाची सोय :** इरशाळवाडीत ५ ते ६ जणांची होऊ शकते.

**पाण्याची सोय :** मार्च पर्यंत गडावरील टाक्यात पाणी असते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** इरशाळवाडीतून एक तास.

**सूचना :** अतिकठीण (गडमाथा गाठण्यास प्रस्तरारोहणाचे तंत्र येणे आवश्यक आहे). १०० फूटी रोप व इतर गिर्यारोहणाचे सामान सोबत असणे आवश्यक आहे.

## कर्नाळा

किल्ल्याची उंची : २५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

पनवेल विभागात येणारा आणि रायगड जिल्ह्यात मोडणारा हा किल्ला त्याच्या अंगठ्या सारख्या आकारामुळे सर्वांचे लक्ष नेहमीच वेधून घेतो. कर्नाळ्या खालचे अभयारण्य हे संरक्षित प्रदेश म्हणून राखले गेले आहे. एक ते दोन दिवसाच्या भटकंतीत येथील सर्व किल्ले फिरून होतात.

**इतिहास** : किल्ल्यांमध्ये असणा-या टाक्यांवरून हा सातवाहनकालीन असावा असे वाटते मात्र याचा उल्लेख यादवकाळात आढळतो. शिवरायांनी इ.स. १६५७ मध्ये किल्ला घेतला. पुरंदरच्या तहामध्ये मोगलांना देण्यात येणा-या २३ किल्ल्या मध्ये कर्नाळा किल्ल्याचा समावेश होता. यानंतर सन १६७० नंतर महाराजांच्या सैन्याने छापा घालून कर्नाळा किल्ला सर केला आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व कल्याण प्रांत काबीज केला. पुढे संभाजी महाराजांच्या काळात किल्ला पुन्हा मोगलांनी घेतला त्यानंतर तो पेशव्यांकडे गेला. सन १८१८ मध्ये जनरल प्रॉथरने हा किल्ला घेतला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : हा किल्ला प्रसिद्ध आहे तो येथील पक्षी अभयारण्यामुळे. कि ल्ल्याचा माथा फारच लहान आहे. गड फिरण्यास साधारण ३० मिनिटे पुरतात. वाटेने किल्ल्यावर येतांना एक दरवाजा लागतो. दरवाजा ब-याचशा ढासळलेल्या अवस्थेत आहे. दरवाजातून आत शिरल्यावर समोरच, भवानी मातेचे मंदिर आहे. समोरच एक मोठा वाडा आहे. वाडा संपूर्ण ढासळलेल्या अवस्थेत आहे. वाड्याच्या समोरच शंकराची पिंड आहे. समोरच अंगावर येणारा सुळका आहे. सुळक्याच्या पायथ्याशी पाण्याची टाकी आणि धान्य कोठारे आहे.  सुळका चढण्यासाठी प्रस्तरारोहणाचे तंत्र येणे आवश्यक आहे. सोबत प्रस्तरारोहणासाठी आवश्यक असणारे साहित्य सुद्धा हवे. या व्यतिरिक्त किल्ल्यावर पाहण्यासारखे काहीच नाही. कर्नाळा किल्ला आणि पक्षी अभयारण्य हे सर्व एका दिवसात पाहून येण्यासारखे आहे.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

मुंबई - गोवा मार्गाने : मुंबई - गोवा मार्गाने पनवेल सोडल्यानंतर शिरढोण गाव लागते. या गावानंतर लगेसच पुढे कर्नाळ्याचा परिसर लागतो. महामार्गाच्या डावीकडेच शासकीय विश्रामधाम आणि काही हॉटेल्स आहेत. एस.टी बस येथे थांबते. समोरच असणा-या हॉटेल जवळून किल्ल्यावर जाण्यास वाट आहे. वाट चांगली प्रशस्त आहे. साधारण किल्ल्यावर पोहचण्यास अडीच तास पुरतात. वाटेतच बाजूला पक्षी संग्रहालय आहे.

रसायनी - आपटा मार्गाने :  रसायनी - आपटा मार्गाने आकुळवाडी गाव गाठावे. या गावातून येणारी वाट मुख्य वाटेला येऊन मिळते. वेळ साधारण ३ तास.

**राहण्याची सोय** : कल्ल्यावर रहाण्याची सोय नाही. मात्र किल्ल्याच्या पायथ्याच्या असणा-या शासकीय विश्रामधामात रहाण्याची सोय होते.

**जेवणाची सोय** : किल्ल्याखाली हॉटेल्स आहेत.

**पाण्याची सोय** :  गडावर बारामही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : २ १/२ तास.

# माणिकगड

किल्ल्याची उंची : २५०० फूट<br>
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग<br>
डोंगररांग: कर्जत पनवेल<br>
जिल्हा : रायगड<br>
श्रेणी : मध्यम

मुंबई पुणे हमरस्त्यावरुन जातांना अनेक किल्ले आपल्याला दिसतात.प्रबळगड,इरशाळ,चंदेरी,माथेरान,कर्नाळा,लोहगड, विसापूर आणि यांच्या  संगतीतच एक किल्ला आहे त्याचे नावं माणिकगड. कर्नाळा,सांकशी,माणिकगड हे या रांगेतील तीन भाऊ.माणिकगडाच्या आजुबाजुचा सर्व प्रदेश सधन असला तरी येथील  लोकांचे राहणीमान मात्र साधेच आहे.शेती हा येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** किल्ल्यात प्रवेश केल्यावर समोरच तटबंदी दिसते ही तटबंदी अनेक ठिकाणी तुटलेली आहे. तटबंदीमधन आत शिरल्यावर समोरच देऊळ दिसते आणि पुढे दोन कोठ्या दिसतात.कोठ्यांची दारे अजूनही शाबूत आहेत. तटबंदीतून पहिल्या सपाटीवर उतरण्यासाठी पाय-या आहेत.येथून थोडे पुढे गेल्यावर पाण्याची टाकी आढळतात.त्याच्या समोरच जोत्याचे अवशेष दिसतात.येथून डावीकडे फुटणा-या वाटेने पुढे गेल्यावर आणखी ४ टाक्या दिसतात यात मेंपर्यंत पाणी असते.टाक्यांच्या समोरच शंकराची पिंड आहे.पुढे गेल्यावर दोन  चांगले बाधलेले बुरुज आढळतात.येथून पुन्हा गड जिथून पाहयाला सुरवात केल  त्या जागेपाशी येऊन पोहचतो.किल्ल्यावरूनप्रबळगड,इरशाळगड,कर्नाळा आणि सांकशीच किल्ला हा परिसर दिसतो.संपूर्ण गडफेरीस अर्धा तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

पनवेल किंवा खोपोली मार्गेयायचे झाल्यास आपटे फाट्यामार्गेरसायनीकडे वळावे.रसायनीमधून वाशिवली गावात यावे.वाशिवली गावातून वडगाव गावात यावे.वडगाव किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.पनवेलहून वडगाव पर्यंत येण्यास दीड तास पुरतो.वडगाव हे ब-यापैकी मोठे

गाव आहे.माणिकगडाची एक सोंड  गावातच उतरलेली आहे.या सोडेच्या साह्याने समोरच्या डोंगरधारेवर चढत जावे.वडगाव पासून डोंगराच्या माथ्यावर जाण्यास अर्धा तास पुरतो.या डोगराच्या
माथ्याचर कातरवाडी वसलेली आहे.या वाडीतून गड समोरच दिसतो.गडाच्या  दिशेने चालत निघायावर अर्ध्यातासातच आपण एका जंगलात शिरतो.येथून पुढे जाण्यासाठी दोन वाटा फुटतात.

१. माणिकची लिंगी मार्गे     उजवीकडे जाणारी वाट प्रशस्त आणि मळलेली आहे.या वाटेने जातांना गड डावीकडे ठेवून आपण पुढे जातो.वाट जंगलातून पुढे गेलेली आहे.सुमारे अर्ध्या तासाने आपण गडाच्या पश्चिम टोकावर पोहचतो.येथेच गडाला चिटकून एक सूळका आहे.यालाच ‘माणिकची लिंगी’ म्हणतात.येथून एक वाट सरळ पुढे

पठारावर गेलेली आहे तर दुसरी वाट डावीकडे जंगलात वर चढत गेलेली आहे.ही वाट किल्ला आणि सुळका यांच्या बेचक्यातून वर जाते.हीच वाट आपण  पकडायची.या वाटेने थोडे पुढे गेल्यावर एक घळ लागते.या घळीतून वर चढून जायचे पण वाट जरा दमछाक करणारी आहे.या वाटेने किल्ल्यावर पोहचण्यास एक  तास लागतो.

२. खिंडीतुन

उजवीकडच्या वाटेचा नाद सोडून द्यायचा आणि समोर असणा-या झाडीत शिरायचे.या वाटेने आपण समोरची डोंगरसोंड चढत जातो.पुढे दोन उंचवटे  पार केले की आपण एका खिंडीत पोहचतो.येथेच एक छोटासा सुळका आहे. सुळका आणि डोंगर यांच्या खिंडीतून वर चढले की आपण पुन्हा एका घळीत पोहचतो.या घळीतून सोपे प्रस्तरारोहण करून वर चढले की आपण एका पठारावर येऊन पोहचतो आणि या पठारावर क्रं १ ची वाट आपल्या वाटेला येऊन  मिळते.या दोन्ही वाटा एकत्र येऊन पुढे एक वाट तयार होते आणि आपण  किल्ल्यात प्रवेश करतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :**  किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** वडगावमार्गे३ तास.

# चंदेरी

किल्ल्याची उंची : २३०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान
जिल्हा : ठाणे
श्रेणी : कठीण

मुंबई-पुणे लोहमार्गावरून कल्याणहून कर्जतकडे जाताना एक डोंगररांग आहे. त्यातून आपला भलाथोरला माथा उंचावलेला एक प्रचंड सुळका दिसतो, त्याचे नाव चंदेरी. बदलापूर-वांगणी स्थानकादरम्यान बदलापूर-कर्जत रस्त्यावर गोरेगाव नावाचे गाव आहे. येथूनच चंदेरीची वाट आहे. नाखिंड,चंदेरी,म्हसमाळ नवरी बोयी या डोंगररांगेतील एक व पनवेलच्या प्रभामंडळाचे मानकरी असणाऱ्या कर्नाळा, प्रबळगड, इरशाळगड, माणिकगड, पेब, माथेरान आणि अशा कितीतरी गडांपैकी एक म्हणजे चंदेरी होय.  चंदेरीच्या पायथ्याशी असलेली घनदाट वृक्षराजी, गवताळ घसरडी वाट अन् मुरमाड निसरडा कातळमाथा म्हणजे सह्याद्रीतील एक बेजोड आव्हान आहे. तामसाई गावाच्या हद्दीत असणारा असा हा दुर्ग प्रस्तरारोहण कलेची आवड असणाऱ्या गिर्यारोहकांचे खास आकर्षण आहे.

**इतिहास :** खरे तर रायगड जिल्ह्याचे दुर्गभूषण शोभणारा हा किल्ला असूनही तसे नाव घेण्याजोगे इथ काही घडले नाही. किल्ल्यावरील गुहेच्या अलीकडे एक पडक्या अवस्थेतील शेष तटबंदी दिसते. किल्लेपणाची हीच काय ती खूण. मे १६५६ मध्ये शिवरायांनी कल्याण-भिवंडी-रायरी पर्यंतचा सारा मुलूख घेतला, तेव्हा त्यात हा गडही मराठ्यांच्या ताब्यात आला असावा. अल्प विस्तार,पाण्याची कमी साठवणूक, बांधकामाचा अभाव, मर्यादित लोकांची मुक्कामाची सोय, अतिशय अवघड वाट हे सारे पाहून हा किल्ला नसून, एक लष्करी चौकी असावी असेच वाटते. काही जणांच्या मते ७ ऑक्टोबर १९५७ रोजी चंदेरी किल्ल्याच्या सुळक्यावर संघटित प्रस्तरारोहणाचा प्रारंभ झाला

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** गुहेत पूर्वी एक शिवलिंग व नंदी होता. शिवपिंडी भंगलेल्या अवस्थेत आहे. तर नंदीचे अपहरण झाले आहे. गुहेच्या अलीकडेच एक सुमधुर पाण्याचे टाके आहे. ऑक्टोबर शेवट पर्यंतच त्यात पाणी असते ८ ते १० जणांच्या मुक्कामासाठी गुहा उत्तम आहे. गुहेच्या थोडे पुढे सुळक्याच्या पायथ्याशी देखील एक टाके आहे. कातळमाथ्याचा विस्तार फक्त लांबी पुरताच आहे. रुंदी जवळजवळ नाहीच. दरड कोसळल्यामुळे सुळक्याचा माथा गाठणे फारच कठीण झाले आहे. सुळक्यावरून उगवतीला

माथेरान पेब, ऱ्बळची डोंगररांग इ. दिसते. तर मावळतीला भीमाशंकरचे पठार ,सिध्दगड, गोरक्षगड, पेठचा किल्ला इ. दिसतात. गडाच्या पायथ्याचा परिसर पावसाळ्यात फारच रमणीय व विलोभनीय असतो. धबधब्याचा आस्वाद घ्यायला अनेक पर्यटक येथे येतात.

गडावर जाण्याच्या वाटा : मुंबई-कर्जत लोहमार्गावरील 'वांगणी' या रेल्वे स्थानकावर उतरावे. तेथून लोहमार्गाच्या कडेकडेने (बदलापूरच्या दिशेस) जाणाऱ्या वाटेने गोरेगाव गाठावे. मुख्य रस्त्यावरून डावीकडे जाणारी वाट (कच्ची सडक) चिंचोली या पायथ्याच्या गावी घेऊन जाते. बदलापूर स्थानकात उतरून चिंचोलीस साधारण पाऊण तासाची पायपीट करूनही पोहचता येते. (वांगणी स्थानकातून गोरेगाव पर्यंत जाण्यास भाड्याची वहानेही मिळतात.) चिंचोली गावास उजवीकडे ठेऊन वर जाणाऱ्या दोन वाटा आहेत. एका लहानश्या टेकाडाच्या दोन बाजूंनी ह्या वाटा जातात. टेकडीच्या उजवीकडून जाणारी वाट दगडधोंड्यांमधून जाणारी खडकाळ आहे. तर टेकडीच्या डावीकडून जाणारी वाट घसरडया लाल मातीवरील झाडांझुडपांतून जाणारी आहे. ह्या दोन्हीही वाटा मध्यभागी असणाऱ्या एका लहानशा पठारावर घेऊन जातात. तेथून दोन डोंगराना सामाईक असणारी, इंगजी 'त' अक्षराच्या आकाराची खाच दिसते. त्या दिशेने चालत राहावे. ह्या खाचेच्या उजवीकडचा डोंगर म्हसमाळचा तर डावीकडचा उंच सुळका असणारा डोंगर चंदेरी होय. पठारावरून थोडे पुढे गेल्यावर पाण्याचे काही ओहोळ लागतात. त्याच्याचवर धबधब्याचा मार्ग आहे. धबधब्याचे पात्र ओलांडून धबधब्याच्या डावीकडे असणाऱ्या पाय वाटेने गड चढण्यास सुरवात करावी. साधारणत: तासाभराच्या चढणीनंतर आपण एका चिंचोळ्या माथ्यावर पोहोचतो. त्याच्या दोन्ही बाजूस दरी आहे. तेथून डावीकडे जाणारी वाट थेट गुहेपाशी घेऊन जाते. नवीनच गिर्यारोहण करणाऱ्यांनी सोबत वाटाड्या नेणे उत्तम.

राहण्याची सोय : गुहेत ८ ते १० जणांची.

जेवणाची सोय : स्वत:च करावी.

पाण्याची सोय : ऑक्टोबर शेवट पर्यंत (पावसावर अवलंबून आहे.) टाक्यात पाणी असते.

जाण्यासाठी लागणारा वेळ : चिंचोली गावातून दीड तास.

सूचना : गडमाथा गाठण्यास अवघड असे प्रस्तरारोहण करणे आवश्यक आहे.

# अवचितगड

{कल्ल्याची उंची : ३०० मी.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: रोहा
जिल्हा : कर्जत
श्रेणी : सोपी

दक्षिण कोकणात कुंडलिका नदीच्या तीरावर रोहा गावाच्या आजुबाजूला पसरलेल्या डोंगररांगांमध्ये गर्द रानाने वेढलेला अवचितगड पाहणे हा एक सुरम्य अनुभव ठरतो. महाराष्टातील मोजक्या पण श्रीमंत गडांमध्ये या गडाची गणना होते. रोह्यापासून ५ कि.मी. वर असलेल्या पिंगळसई गावापासून गडाची उंची ३०० मी. भरते. घनदाट झाडांमुळे गडावर जाण्याचा मार्ग दुर्गम झाला आहे. सर्व बाजूंनी तटांनी आणि बुरुजांनी वेढलेला असल्याने हा किल्ला संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : गडावर फारसे पाहण्यासारखे काही नाही. गडाच्या दक्षिण बुरुजाकडील दरवाजा ढासळलेल्या अवस्थेत आहे. दुसऱ्या दरवाजात पाण्याने तुडुंब भरलेला तलाव आहे. कुंडातील पाणी एकदम पिण्यायोग्य आहे. जवळच खंडोबाची काळ्या पाषाणातील मूर्ती आहे.पावसाळ्यानंतरचे येथील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे असते. इथल्या रानात रानडुकरे,माकड,बिबळ्या,कोल्हे इ. प्राणी आढळतात. गडावरून समोरच तैलबैलाच्या दोन प्रस्तरभिंती ,सुधागड,सरसगड,धनगड,कोरीगड,रायगड,सवाष्णीचा घाट इत्यादी परिसर न्याहाळता येतो.

गडावर जाण्याच्या वाटा : गडावर जाण्यासाठी तीन वाटा आहेत.

१. पिंगळसई माग : अवचितगडावर जाण्यासाठी मुंबईकरांनी अथवा पुणेकरांनी प्रथम रोह्याला यावे. येथून पायी दीड तासाची पायी रपेट केल्यावर गडाच्या पायथ्याशी असलेल्या पिंगळसई गावात आपण पोहोचतो. हे अंतर साधारणपणे ५ कि.मी. आहे. येथून गडावर जाणारी वाट सरळ आणि मळलेली असल्याने तासाभरात गडावर पोहोचता येते.

२.मेढा माग : मुंबई-रोहा मार्गावर रोह्याच्या अगोदर ७.५ कि.मी. असलेल्या `ढा या गावी उतरावे. गावातून विठोबा मंदिराच्या मागूनच गडावर जाण्यासाठी वाट आहे. या वाटेने आपण एका तासात गडावर पोहोचतो. वाट दाट झाडांमधून जात असल्याने वाट चुकण्याची शक्यता आहे. या वाटेने आपण पडक्या बुरुजावरून गडावर पोहोचतो. बुरुजावरून डाव्या बाजूला कुंडलिका नदीच्या खोऱ्यातील मेढा व पिंगळसई ही गावे दिसतात.

३. पडम माग : गडावर जाण्याचा तिसरा मार्ग पडम गावातून येतो. रोहा मार्गेपिंगळसई गावाला येतांना रोहा नागोठणे मार्गावर एक बंद

पडलेला कागद कारखाना आहे. या कारखान्याच्या मागून जाणारी वाट गडाच्या दक्षिण प्रवेशद्वरापाशी घेवून जाते. या वाटेने गडावर जाण्यास दोन तास पुरतात.

राहण्याची सोय : गडावर राहण्याची सोय नाही.

जेवणाची सोय : जेवण आपण स्वतः घेवून जावे.

पाण्याची सोय : गडावर बारमही पिण्याच्या पाण्याचे तळे आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : पिंगळसई मार्गे१ तास तर पडम मार्गे२ तास.

# बिरवाडी

किल्ल्याची उंची : १२००फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: रोहा
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

रोह्याच्या अवचितगडा पासून सुरू झालेल्या डोंगररांगेत घोसाळगड,तळगड,मानगड कुर्डुगड,बीरवाडी असे अनेक छोटेछाटे किल्ले आहेत.इतिहासात फारसा कुठे उल्लेख नसलेला बीरवाडीचा किल्ला रोह्यापासून १८ कि.मी अंतरावर आहे.स्वतचे वाहन असेलतर १ ते २ तासात किल्ला सहज पाहून होते.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : गावातून किल्ल्यावर जातांना वाटेतच भवानी मातेचे प्रशस्त मंदिरलागते.मंदिरापर्यंत जाण्यास सुमारे १०० बांधलेल्या पाय-या आहेत.सध्या देवळाच्याजीर्णोध्दाराचे काम चालू आहे.देवळाच्या प्रांगणात तोफ ठेवलेली आहे.मंदीराच्यामागील बाजूस शिवरायांचा ६ फुटी पुतळा उभा आहे.येथून थोडे वर चढल्यावरआपण एका सुटावलेला बुरूजापाशी येऊन पोहचतो.बुरुजापासून एक वाटउजवीकडे वळते.ही वाट संपूर्ण किल्ल्याला वळून गडावर पोहचते.वाटेत एकाठिकणी खडकात खोदलेले पाण्याचे टाके आहे त्याला ‘घोड्याचे टाके’म्हणतात.किल्ल्याचे वैशिष्ट्य असे की किल्ल्याच्या चहुबाजूस तटबंदी विरहीत बुरुजआहेत.गडाच्या या मागील बाजूस गडाचे सुबक असे प्रवेशद्वार आहे.आजही हेब-यापैकी शाबूत आहे.येथून थोडेवर गेल्यावर आपण थेट किल्ल्यातच प्रवेश करतो.गडमाथ्यावर पडक्या वाड्याचे अनेक अवशेष आहेत.किल्ल्यावर अनेकपाण्याची टाकी आढळतात.गडमाथा फारच निमुळता असल्याने तो फिरण्यास अर्धातासपुरतो.

गडावर जाण्याच्या वाटा : किल्ल्यावर जाण्याचा एकच मार्ग आहे.तो बिरवाडी गावातून जातो.

रोहा मुरुड मार्गावर चणेरा नावाचे गाव आहे.रोह्यापासून १८ कि.मी वर तर मुरुड पासून ५ कि.मी वर चणेरा गाव आहे.चणेरा गावापासून बिरवाडी गाव ५ किमी वर आहे.बिरवाडी हे पायथ्याचे गाव आहे.गावातून किल्ल्यावर जाण्यास पायवाट आहे.बिरवाडी गावातून किल्ला गाठण्यास अर्धा तास लागतो.

राहण्याची सोय : किल्ल्यावर राहण्याची सोय नाही मात्र बिरवाडी गावात असणा-या मंदिरात २० लोकांची राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : जेवण आपण स्वतः घेवून जावे.

पाण्याची सोय : गडावर बारमही पिण्याच्या पाण्याचे तळे आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : बिरवाडी गावातून अर्धातास .

# तळगड

किल्ल्याची उंची : १००० फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: रोहा
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

रोह्याच्या आजुबाजुला अनेक डोंगररांगा पसरलेल्या आहेत.या डोंगररांगा पसरलेल्या आहेत.या डोंगररांगावर अनेक किल्ले ठाण मांडून

बसलेले आहेत.त्यापैंकी तळगड हा एक किल्ला.

इतिहास :

रोह्यापासून समुद्र अगदी जवळच आहे.कुंडलिका नदी जिथे सागराला मिळते तो सर्व भाग पूर्वी सागरी वाहतुकीसाठी वापरला जात असे.या सर्व परिसरावर नजर ठेवण्यासाठी अनेक किल्ले बांधले गेले त्यापैकी एक म्हणजे तळगडशिवरायांनी या सर्व परिसराचे महत्व जाणले होते म्हणूनच तळगड आणि घोसाळगड हे किल्ले आपल्या ताब्यात घेतले.पुढे राजा जयसिंगाशी झालेल्या पुरंधर किल्ल्याच्या तहामध्ये महाराजांनी १२ किल्ले स्वत:कडे ठेवले.त्यामध्ये तळगड हा एक होता.यावरूनच या किल्ल्याचे महत्व आपणास समजते.पुढे १८१८ मध्ये जनरल प्राथरने हा किल्ला जिंकला.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : किल्ला तसा लहानच त्यामुळे याचा घेरापण मोजकाच.किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे तटबंदी अजूनही शाबूत आहे.अनेक ठिकाणचे बुरुज आजही चांगल्या स्थितित आढळतात.किल्ल्यात शिरतांना पडझड झालेला दरवाजा लागतो तो म्हणजे हनुमान दरवाजा.या हनुमान दरवाजाच्या उजव्या कोप-यात मारुतीची सुंदर मूर्ती कोरलेली आहे. गड हा दक्षिणोत्तर पसरलेला आहे.दरवाजातून आत गेल्यावर थोड्याच अंतरावर पाण्याची खोदलेली सात टाकी आढळतात.पुढे दक्षिणेकडे चालत गेल्यावर बुरुज आहे.अनेक ठिकाणी घरांचे आणि वाड्यांचे अवशेष आढळतात. गडाचा वापर टेहळणी व्यतिरिक्त इतर फारसा होत नसल्याने फारशी शिबंदी गडावर नसावी.किल्ल्यावर घोसाळगड,महाड,रोह्याची खाडी असा सर्व परिसर दिसतो.गडाचा घेर आटोपशीर असल्याने अर्ध्या तासात किल्ला फिरुन होतो.

गडावर जाण्याच्या वाटा : किल्ल्यावर जाण्याची मुख्य वाट ही तळागावातूनच वर जाते.तळागावापर्यत जाण्यासाठी अनेक वाटा आहेत.गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी एकच वाट आहे.या वाटेने गडावर जातांना पहिल्या टप्प्यावर एक छोटीशी सपाटी लागते.दुसरा टप्पा म्हणजे गडाच्या माचीचा भाग आणि तिसरा भाग म्हणजे किल्ल्याच्या अंर्तभागात असणारे प्रशस्त पठारच होय.पायथ्यापासून किल्ल्यावर जाण्यास अर्धा तास पुरतो.

१. इंदापूरमार्गे

मुंबई-गोवा महामागार्वरुन महाडच्या अलिकडे इंदापूर गावाच्या नजीकच तळागावाकडे जाण्यासाठी फाटा फुटतो.येथून तळागावात जाण्यास ४५ मिनिटे लागतात.

२. रोहामार्गे

रोह्याहून मुरुडकडे जातांना तांबडी नावाचे गाव लागते.येथून तळागावा कके जाण्यास एक गाडीरस्ता आहे.

३. मांडादलेणी मार्गे

रोहा-मुरुड मार्गावर रोह्यापासून १५ किमी अंतरावर खाजणी फाटा आहे.या फाट्यापासून ५ किमी अंतरावर कुडा गाव आहे.या कुड्यापासून १२ किमी अंतरावर तळागाव आहे.

राहण्याची सोय : किल्ल्यावर राहण्याची सोय नाही मात्र तळा गावात राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : तळागावात हॉटेल्स आणि भोजनालये आहेत.

पाण्याची सोय : गडावर बारमही पिण्याच्या पाण्याचे तळे आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : तळा गावातून अर्धातास लागतो.

# गडदचा बहिरी

किल्ल्याची उंची : २७००

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

## डोंगररांग: कर्जत

जिल्हा : रायगड

## श्रेणी : कठीण

लोणावळ्याच्या उत्तरेला दहा मैलांवर असलेल्या राजमाची किल्ल्यावर वर्षभर दुर्गप्रेमी येत असतात. मात्र याच राजमाचीजवळ निबीड अरण्यात असलेल्या बुलंद आणि बेलाग अशा ढाकच्या किल्ल्याची फारशी कोणाला ओळख नाही. या किल्ल्याची आपल्या सारख्या रानावनात हिंडणा-या मंडळीना ओळख करून दिली ती म्हणजे ‘गो. नी. दांडेकर’ यांनी. ढाकचा बहिरी म्हणजे ‘ढाकचा किल्ला’ आणि ‘गडदचा बहिरी’. ढाकच्या किल्ल्याच्या बाजूस असणा-या सुळक्याला ‘कळकरायचा सुळका’ असेही म्हणतात. विशेषत: ढाकच्या किल्ल्यावर पोहचायचे असल्यास ‘वदप’ गाव गाठावे. किल्ल्याच्या माथ्यावर पाण्याची दोन, तीन टाकी आणि एक मंदिर आहे. मंदिरात ४ जणांना झोपता येते. या किल्ल्याच्याच नैसर्गिक तटबंदीच्या कातळात ‘गडदचा बहिरी’ लपून बसला आहे. याच्या पश्चिमेला पळसदरी तलाव, पूर्वेला उल्हास नदीचे खोरे आहे.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

बहिरीची गुहा :-या बहिरीच्या गुहेतच पाण्याचे एक मोठे टाके आहे. या टाक्यांमध्येच गावक-यांनी जेवणासाठी काही भांडी ठेवली आहेत. जेवण झाल्यावर ही भांडी धुवून पुन्हा या टाक्यातच ठेवावी. गुहेच्या वरच दीड हजार फूटांची कातळभिंत आहे. गुहेच्या समोरच राजमाचीचे श्रीवर्धन आणि मनरंजन हे दोन बालेकिल्ले दिसतात. येथूनच नागफणीचे टोक , प्रबळगड , कर्नाळा, माथेरान असा विस्तीर्ण परिसर दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडदचा बहिरीवर अर्थात ढाकच्या गुहेपर्यंत जाणा-या सर्व वाटा ‘कळकरायचा सुळका’ आणि बहिरीचा डोंगर यामधूनच जातात.

**राहण्याची सोय :** येथील राहण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे बहिरीची गुहा हेच होय.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** गुहेतच पिण्याच्या पाण्याचे एक मोठे टाके आहे. वाटेत कुठेही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने उन्हाळ्यात पाण्याचा भरपूर साठा असणे आवश्यक.

जाण्यासाठी लागणारा वेळ : ४ तास सांडशी मार्गे.

# पेब

किल्ल्याची उंची : २१०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: कर्जत

जिल्हा : रायगड

श्रेणी : मध्यम

पनवेलच्या ईशान्येला मुंबई पुणे मार्गावरील नेरळपासून पश्चिमेला तीन - चार किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. माथेरानसारख्या सुंदर थंड हवेच्या ठिकाणी असलेल्या माणसांच्या गर्दीपासून मोकळीक हवी असल्यास निसर्गप्रेमींनी पेबचा किल्ला विसरू नये. एरवीदेखील एका दिवसाच्या ट्रेकसाठी ‘पेब’ सारखी जवळची आणि निसर्गरम्य जागा शोधून सापडणार नाही. किल्ला चढण्यासाठी लागणारा वेळ ,चढण्याची वाट ,वरील गुहेची रचना ,गुहेसमोरील निसर्गरम्य दृश्य अशा अनेक बाबतीत हा गड ‘गोरखगडाशी’ साधर्म्य साधतो. मात्र त्यामानाने हा किल्ला चढताना लागणारे जंगल घनदाट आहे. पेबच्या किल्ल्याचे विकटगड असे देखील नाव आहे.

**इतिहास :** या किल्ल्याचे मूळ नाव पेब हे नाव पायथ्याच्या असलेल्या पेबी देवीवरून पडले असावे. किल्ल्यावरील गुहेचा शिवाजी महाराजांनी धान्य कोठारांसाठी उपयोग केला होता, असा स्पष्ट ऐतिहासिक संदर्भ पेबच्या किल्ल्याबाबत आढळतो.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** पेबचा किल्ला चढताना वाटेत लागणारा धबधबा हे एक मोठे आकर्षण. किल्ल्यावरील गुहेसमोरून पावसाळ्यात सुंदर देखावा दिसतो. गुहे समोरून आपल्याला नवरा-नवरी,भटोबा असे सुळके दिसतात. या गडावर कोणत्याही ऋतूत जाता येते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** मध्य रेल्वेने कर्जतमार्गेनेरळ स्टेशनवर उतरल्यावर स्टेशनपासून थोडे बाहेर आल्यावर समोरच माथेरान आणि त्याच्या बाजूस पेबच्या किल्ल्याचे दर्शन होते. पेबला जाण्यासाठी नेरळ स्टेशनला उतरावे आणि उजवीकडची वाट पकडावी.

डावीकडची वाट आपणास माथेरानला घेऊन जाते. डोंगराच्या दिशेने जाताना मैदान,पोल्ट्रीफार्म,अर्धवट घरांची बांधकामे या काही खुणा सांगता येतील. त्यानंतर समोर दिसणा-या इलेक्ट्रिकच्या मोठमोठ्या टॉवरच्या दिशेने मार्गक्रमण करावे. सिमेंटचा एक मोठा पाया असलेला टॉवर आल्यावर तेथून थोडे पुढे गेल्यावर एक मोठा धबधबा लागतो. या धबधब्याजवळ आपल्याला ३ वाटा लागतात. १) धबधब्याला लागून असलेली वाट. २) मधून गेलेली मुख्य वाट. ३) टॉवर्सला लागून असलेली वाट. या तीन वाटांपैकी मधली मुख्य वाट हीच किल्ल्याच्या गुहेपर्यंत नेणारी खरी वाट आहे.पहिल्या वाटेने पुढे गेल्यास जंगल लागते. पण पुढे या वाटेने जाणे अशक्यच आहे. तिसरी वाट म्हणजे मानेला वळसा घालून घास घेण्यासारखा प्रकार होय. तसेच या वाटेला पनवेलकडे जाणारे फाटे फुटत असल्याने वाट चुकण्याची शक्यता जास्त आहे. मधून जाणारी वाट पकडावी. या वाटेने गणपतीचे चित्र काढलेला दगड येतो. या दगडाच्या उजव्या बाजूने वर चढावे. हीच वाट पुढे झ-याची होत असली तरी ही वाट न सोडता याच वाटेने खिंडीच्या दिशेने वाटचाल करावी. खिंडीत पोहोचल्यावर तेथून डाव्या हाताला वळून पुढे जावे.तेथून पुढे पांढरा दगड लागतो. पांढरा दगड चढण्यास अतिशय कठीण असून तो पार केल्यानंतर मात्र पुढे थोड्याच अंतरावर गुहा लागते. प्रथमच जाणा-यांनी वाटाडया घेणे हितकारक आहे. किल्ला चढण्यास लागणारा वेळ दोन ते अडीच तास आहे. पेबवर जाण्यासाठी गिर्यारोहकांना आणखी एक वाट आहे. त्यासाठी माथेरानच्या पॅनोरमा पॉईंटवर यावे. येथून सुमारे ६ तासात पेबच्या गुहेत पोहचता येते. गुहांच्या पायथ्याशी गरुड कोरला आहे.

**राहण्याची सोय** : किल्ल्यावर गुहेमध्ये स्वामी समर्थांचे शिष्यगण रहात असल्याने गुहेच्या बाहेर किंवा जवळच असलेल्या कपारीमध्ये १० जणांच्या रहाण्याची सोय होते. गुहेजवळच असलेली पाण्याची टाके हीच पिण्याच्या पाण्याची सोय.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** पाण्यासाठी टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ३ तास नेरळ पासून

# पेठ

किल्ल्याची उंची :
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: भीमाशंकर
जिल्हा : रायगड
श्रेणी : मध्यम

कोथळीगड हा कर्जतपासून ईशान्येला साधारण २१ कि.मी. अंतरावर आहे. राजमाची आणि ढाक किल्ल्यांच्या आणि सिध्दगड-भीमाशंकरच्या अलीकडे दाट झाडीतून आपला उत्तुंग कातळकडा उभारून हा किल्ला इतिहासाची साक्ष देत उभा आहे. या किल्ल्याला पायथ्याच्या 'पेठ' या गावामुळे 'पेठचा किल्ला' असेही संबोधले जाते. काही ठिकाणी याचा उल्लेख कोथळा असाही आढळतो. लहानशा दिसणाऱ्या या किल्ल्याचा इतिहास मोठा रक्तरंजित आहे. त्याविषयाची माहिती मराठी व इंग्रजी कागदपत्रातून नव्हे तर मुघली कागदपत्रांमधून मिळते. हा किल्ला काही बलाढ्य दुर्ग नाही पण बेलाग सुळक्यावरचा एक संरक्षक ठाणं होता. मराठ्यांचे या किल्ल्यावर शस्त्रागार होते. संभाजीमहाराजांच्या काळात त्याला विशेष महत्त्वही प्राप्त झाले.

**इतिहास** : औरंगजेबाने नोव्हेंबर १६८४ मध्ये अब्दुल कादर व अलिबिरादरकानी यांना संभाजींच्या ताब्यातील किल्ले घेण्यासाठी पाठवले. 'कोथळागड' हा महत्त्वाचा असून जो कोणी तो ताब्यात घेईल, त्याचा ताबा तळकोकणावर राहील हे लक्षात घेऊन अब्दुल कादर याने हा किल्ला घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तो या किल्ल्याच्या जवळपास गेला आणि तेथे राहणाऱ्या लोकांना आपले नोकर म्हणून ठेवून घेतले. मराठे या किल्ल्यातून शस्त्रांची ने-आण करतात, हे कळताच अब्दुल कादर व त्याचे ३०० बंदूकधारी नोव्हेंबर १६८४ मध्येच गडाच्या पायथ्याशी पोहोचले. मराठ्यांनी त्यांना मागे हटवले पण तरीही काही लोक किल्ल्याच्या मगरकोट दरवाज्याजवळ पोहोचले आणि त्यांनी 'दरवाजा उघडा' अशी आरडाओरड सुरू केली. किल्ल्यावरील मराठा सैन्याला वाटले की आपलेच लोक हत्यारे नेण्यासाठी आले आहेत. म्हणून त्यांनी दरवाजा उघडला. दरवाजा उघडताच मोगल सैनिक आत शिरले. मराठे व मोगल यांच्यात लढाई झाली. अब्दुल कादरच्या मदतीसाठी माणकोजी पांढरेही आले. झालेल्या लढाईत मोगलांना यश आले. दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी किल्ल्याला वेढा घातला. फार मोठी लढाई झाली. दरम्यानच्या काळात अब्दुल कादरच्या मदतीला कोणीच न आल्यामुळे त्याची परिस्थिती कठीण झाली. बाणांची व बंदुकींची लढाई झाली. किल्ल्यावरचा दारूगोळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. गडावर जाणारी सामुग्री मराठ्यांनी लुटल्यामुळे मुघल सैन्याला दारूगोळा व धान्य मिळेनासे झाले. वेढा टाकल्यानंतर दहा बारा दिवसांनी जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजिजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला सैन्यासह अब्दुल कादरच्या मदतीला पाठवले. अब्दुलखान तेथे पोहचला तेव्हा त्याची वाट अडवण्यासाठी

मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक यांनी तेथील खोरे रोखून धरले होते. येथेही लढाई झाली. नारोजी त्रिंबक व इतर सरदार धारातीर्थी पडले आणि कोथळागड मुघलांच्या ताब्यात गेला. इहमतखानाने नारोजी त्रिंबकाचे डोके रस्त्यावर टांगले. किल्ला जिंकून सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठवण्यात आली. औरंगजेबाने कोथळागड नावाचा असा कोणता गड अस्तित्वात आहे का? याची खात्री करून मगच अब्दुलखानाला बक्षिसे दिली. मुघलांनी गडाला 'मिफ्ताहुलफतह' (विजयाची किल्ली) असे नाव दिले. फंदफितुरीमुळे मराठ्यांच्या हातून हा मोक्याचा किल्ला निसटला. गड परत मिळवण्यासाठी मराठ्यांनी प्रयत्न सुरू केले. डिसेंबर १६८४ मध्ये गडाकडे जाणाऱ्या मुघल सैन्याला मराठ्यांनी अडवले. नंतर मऱ्हामतखानालाही ७००० मराठ्यांच्या तुकडीने अडवले. पण मराठ्यांना यश लाभले नाही. त्यानंतर एप्रिल १६८५ मध्ये ७०० जणांच्या तुकडीने पुन्हा हल्ला केला. २०० जण दोरीच्या शिडीच्या मदतीने किल्ल्यात उतरले. बरेच रक्त सांडले पण मराठ्यांची फत्ते होऊ शकली नाही. मराठ्यांनी हा महत्त्वाचा किल्ला गमावला होता. पुढे १८१७ च्या नोव्हेंबरमध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या वतीने बापुराव नामक शूर सरदाराने हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यातून सोडवला. सुमारे १८६२ पर्यंत किल्ल्यावर माणसांचा राबता होता.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : पायथ्याजवळच्या पेठ गावातून चहुबाजूंनी तासल्या सारखा पेठचा सुळका दिसतो. पायवाटेने वर पोहोचल्यावर समोरच कातळाच्या पोटात खोदलेल्या गुहा दिसतात. प्रथम आहे ती देवीची गुहा, पाण्याचं टाके आणि मग डावीकडे ऐसपैस अशी भैरोबाची गुहा. या गुहेचे वैशिष्ट्य म्हणजे सपाट, समतल भूमी आणि छताला आधार देणारे कोरीव नक्षीदार खांब. गुहेत ४-५ ठिकाणी गोल खळगे आहेत आणि काही जूने तोफेचे गोळे आहेत.

गुहेजवळच एका ऊर्ध्वमुखी भुयारात किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्यासाठी व्यवस्थित पायऱ्या कोरलेल्या आहेत. गडमाथ्यावरील मंद वारा, तेथील जलाशय आणि आजुबाजूची वनराई सुखावह आहे. गडमाथ्यावरुन भीमाशंकरकडील कलावंतिणीचा महाल, नागफणी, वाघाचा डोळा, सिद्धगड, कल्याणकडील हाजीमलंग, चंदेरी, प्रबळगड, इर्शाळगड, माणिकगड, माथेरानचे पठार हा विस्तृत मुलूख नजरेच्या टप्प्यात येतो.

**गडावर जाण्याच्या वाटा** : कर्जतहून एस्.टी. ने कशेळे मार्गेआंबिवली या गावात जावे. हे अंतर साधारण ३० कि.मी. आहे. नेरळहून येताना कशेळे या गावी यावे आणि जामरुखची एस्.टी. पकडून आंबिवली गावात यावे. आंबिवली गावातून गडाकडे जाण्यास रुळलेली वाट आहे. गडाच्या पायथ्याशी 'पेठ' हे गाव आहे. या गावाहून वर गडावर चढण्याचा मार्ग दमछाक करणारा आहे. पण वाटेवरील करवंदांची आणि चाफ्याची झाडे ही वाटचाल सुखावह करतात. ही वाट सरळ किल्ल्याच्या प्रवेशव्दाराशी घेऊन जाते.

**राहण्याची सोय** : भैरोबाच्या गुहेत २०-२५ जण व्यवस्थित राहू शकतात.

**जेवणाची सोय** : आपणच करावी. पेठ गावात 'कोथळागड' नावाचे हॉटेल आहे.

**पाण्याची सोय** : गडावर बारामाही पिण्याच्या पाण्याची टाकी आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : आंबिवली गावापासून : २ तास , पेठ गावापासून : १ तास

# चांभारगड

किल्ल्याची उंची : १२०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: रायगड

जिल्हा : रायगड

श्रेणी : मध्यम

रायगडाच्या आजूबाजूला असणा-या डोंगररांगावर अनेक किल्ले आहेत. यांत प्रामुख्याने लिंगाणा,काळदुर्ग,सोनगड व चांभारगड यांचा समावेश होतो.यांचा उपयोग केवळ घाटमथ्यावर नजर ठेवण्यासाठी व टेहेळणीसाठी होत असावा. चांभारगड हा महाडपासून हाकेच्या अंतरावर आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : गडमाथा म्हणजे एक छोटेसे पठारच आहे. पठारावर थोडेफार घरांचे अवशेष आहेत तर पठाराच्या खालच्या डोंगराच्या पट्टीवर पाण्याची एक दोन टाकी आहेत.या टाक्यांच्या बांधणीवरुन हा गड फार पुरातन असावा असा अंदाज बांधता येतो. याखेरीज गडावर पाहण्याजोगे काहीच नाही.अर्ध्या तासात संपूर्ण गडफेरी आटपते

**गडावर जाण्याच्या वाटा** : गडावर जाण्यासाठी महाड गाठावे.महाड-पोलादपूर हायवे ओलांडून पायथ्याच्या चांभारखेड गावात पोहोचावे.महाड एस.टी. स्थानकापासून येथे जाण्यास २० मिनिटे लागतात. या खिंडीतून पाऊण तासाच्या चालीनंतर आपण माथ्याच्या

कातळकड्यापाशी पोहोचतो.कातळकडा डावीकडे ठेवून थोडे पुढे  जावे.नंतर वर जाणारी वाट पकडून १५ मिनितांत गडमाथा गाठता येतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर पिण्याचे पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** महाड गावातून एक तास

# कुर्डुगड -विश्रामगड

किल्ल्याची उंची : २०२० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: रायगड
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

पुण्यापासून ९० कि.मी अंतरावर असणारा हा किल्ला पाहण्यासाठी उत्तम कालावधी म्हणजे आक्टोंबर ते फेब्रुवारी. आक्टोंबर मध्ये पावसाळा नुकताच ओसरलेला असतो सर्वीकडे हिरवेगार झालेले असते.अशा वातावरणात कोकणातील  किल्ले पाहण्याची मजा काही औरच असते.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** किल्ल्याच्या पायथ्याशी कुर्डाई देवीचे मंदिर आहे.किल्ल्यावर जातांना  वाटेतच एक भग्नावशेष झोलेला दरवाजा आढळतो.किल्ल्याचा सर्वोच्च माथा म्हणजे एक सुळकाच होय.दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच १ मी उंचीची हनुमान मूर्ती आपल्या  नजरेस पडते.मूर्तीच्या मागच्या बाजूस एक निसर्गनिर्मीत घळ आहे.यात १०० ते १५० माणसे सहज बसू शकतील.किल्ल्यातच दोन भलेमोठे सुळके आहेत आणि हा भलामोठा सुळका म्हणजेच गडमाथा होय.सुळक्याला पूर्ण फेरी मारता येते पण  काही ठिकाणी वाट पूर्णपणे ढासळलेली आहे.किल्ल्यावर पाण्याची एक दोन  टाकी आहेत.किल्ल्यावरुन संपूर्ण कोकण परिसर न्याहळता येतो.कुर्डुगडाचे  स्थान हे फार मोक्याच्या ठिकाणी आहे.पूण्याहून कोकणात येणा-या ताम्हणी  घाटाच्या वेशीवरच हा किल्ला आहे.किल्ल्याच्या मागच्या बाजूस रायगड,कोकणदीवा  हे किल्ले आहेत.संपूर्ण गडमाथा फिरण्यास अर्धा तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** किल्ल्यावर जाण्याचे मुंबईकडून आणि पुण्याकडून दोन्ही बाजूने मार्ग आहेत.

१. पुणे मार्गे

.पुण्याहून मुळशी धरणहून येणारा रस्ता ताम्हणी घाटमार्गेकोकणात उतरतो.ताम्हणी घाटातून एक रस्ता धाम्हणवळ मार्गेकिल्ल्याच्या पठारावर येतो. जिते गावात उतरल्यावर ओढ्याच्याकाठाने थोडे पुढे जावे.थोड्याच अंतरावर  एक प्रतिमा कोरलेला दगड आढळतो येथून डावीकडे वळावे.डावीकडची वाट शेतात जाते ती ५ मिनिटांनी समोरच्या डोंगराला येऊन मिळते.ही डोंगराची वाट सोडायची नाही.ती वाट पुढे वळणावळणाने पठारावर पोहचते. याच पठावर ‘पेठवाडी’ नावाची वाडी आहे.जितेमधून इथपर्यंत येण्यास दीडतास पुरतो.वाट फारच दमछाक करणारी आहे.धाम्हणवळ मधून येणारी वाट सुध्दा पेठवाडी गावात  येऊन मिळते. पेठवाडी गावात एक छान कुर्डाई देवीचे मंदिर आहे.जवळच  पाण्याचे टाके आहे.मंदिराच्या जवळूनच उजव्या बाजूने किल्ल्यावर जाणारी वाट आहे.येथून किल्ला वर जाण्यास अर्धा तास पुरतो.

२. मुंबई मार्गे

मुंबईहून एस टी ने किंवा कोकण रेल्वेने माणगावला यावे.माणगावातून जितेकडे जाणारी बस पकडावी आणि जिते गावात उतरावे.किल्ला हा एका डोंगावर  वसलेला आहे.जिते हे डोंगराच्या पायथ्याचे गाव आहे.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर असणा-या घळीत राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याच्या पाण्याची टाकी आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पेठवाडी गावातून अर्धातास लागतो.

# खांदेरी - उंदेरी

किल्ल्याची उंची : ० फूट
किल्ल्याचा प्रकार : जलदुर्ग
डोंगररांग: पश्चिम कोकण
जिल्हा : रायगड
श्रेणी : सोपी

सह्याद्रीतील भटक्या ट्रेकर्सला ऐकून सुपरिचित असलेली परंतु या सर्व ट्रेकर्सपैंकी अत्यंत कमी जणांनी प्रत्यक्ष पाहिलेली जलदुर्गांची जोडगळ म्हणजेच किल्ले खांदेरी उंदेरी .समुद्राच्या लाटांना समर्थपणे तोंड देत दिमाखाने उभे असणा-या खांदेरी - उदेरीचे वैशिष्टय म्हणजे मजबूत तटबंदी ,उंदेरीवर असणा-या १५-१६ तोफा तर खांदेरीवरच्या अत्यंत दुर्मिळ अशा तोफांना वाहून नेणा-या गाड्यासहीत असणा-या ३ तोफा.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे

खांदेरी किल्ल्याकडे होडीने जात असतांनाच खांदेरीची मजबूत तटबंदी ,बुलंद बुरुज आणि त्यावर असणारे ‘मुंबई पोर्ट ट्रस्ट’ चे दिपगृह आपले लक्ष  वेधून घेते.खांदेरीवर दक्षिणेला ३० मी उंचीची तर उत्तरेला २० मी उंचीची टेकडी आहे.या दोन टेकडयांमध्ये बोटींसाठी धक्का बांधलेला आहे.या धक्क्यावर ज्या ठिकाणी समुदाच्या पाण्याचा स्पर्श होतो तेथे चक्क एक तोफ पुरलेली आहे.तोफेचा मागचा भाग पाण्यातून डोकावतांना दिसतो.बाजूलाच बोटीची एक  शेड बांधली आहे.

१. वेताळाचे मंदिर

धक्क्याच्या बाजूलाच उजवीकडे वेताळाचे लाकडी मंदिर आहे.आत एक मोठी पाढ-या रंगाने रंगविलेली शिळा आहे.ही शिळा म्हणजेच वेताळ होय.ही  शिळा दरवर्षी आकाराने मोठी होत जाते अशी गावक-यांची श्रध्दा आहे.होळीच्या दिवशी येथे जत्रा भरते.

२. भांड्याचा आवाज येणारा खडक

डावीकडे असणा-या धक्क्यावरून उतरून आपण दिपगृहाकडे निघालो की आपण बाजुलाच झाडांध्ये हा मध्यम आकाराच खडक दिसतो.छोट्या दगडांनी यावर ठोकून पाहिले असता अक्षरक्ष: भांड्यावर ठोकल्या सारखा आवाज येतो.

३. गाड्यावरील असणा-या तोफा

धक्क्यावरून दिपगृहाकडे जातांना दिपगृहाला लागुनच असणारे एक तळे  आहे.ते मागे टाकून दिपगृहाच्या बाजूने पुढे जातांना बुरुजावर जाण्यासाठी  पाय-या केलेल्या आहेत.वर पोहचल्यावर आपल्याला दिसते ती गाडयांवर ठेवलेली तोफ.ही तोफ आकाराने मध्यम असून ती आजही सुस्थित आहे.अशाच दोन तोफा लहान टेकडीच्या बाजूला असणा-या बुरुजावर आहेत.

४. दिपगृह

१८६७ मध्ये बांधण्यात आलेले दिपगृह २५ मी उंचीचे असून षट्कोनी  आकाराचे आहे.दिपगृहाच्या अर्ध्या उंचीवर दिपगृहाच्या दोन्ही बाजूला एक गच्ची लागते.दिपगृहाच्या शिखरावरून किल्याचा मनोरम देखावा आपण पाहू शकतो.

५. मजबूत तटबंदी

दिपगृहाच्या बाजूला तटबंदीवर जिथे हेलिपॅड आहे तिथेच खाली एक दरवाजा आहे.हा दरवाजा आपल्याला किल्ल्याच्या बाहेरील समुद्राकडे घेऊन  जातो.येथून बाहेर पडल्यावर कडकडे चालतांना किल्ल्ययच्या मजबूत तटबंदीची  आणि बुरुजांची कल्पना येते.याशिवाय किल्ल्यावर महादेवाचे एक जुने मंदिर असून  गणपति व मारुति चे अलिकडे बांधलेले मंदिरे पण आहे .किल्ल्यावर पाण्याचे  टाकेसुध्दा आहे.वेताळाच्या मंदिराच्या दिशेने चालत गेल्यावर तटबंदीध्ये एक  द्वार आहे.तिथेच एक छेटी खोली आहे.

६. उंदेरी

खांदेरी किल्ल्याप्रमाणे उंदेरीवर पण दोन कमी उंचीच्या टेकड्या आहेत.या ठिकाणी बोटी लागतात तेथून किल्ल्याच्या तटबंदीवर पडझड झालेल्या  दगडांवरून चालत जावे लागते.आपल्या सारख्या गिरिदुर्गांवर भटणा-या ट्रेकर्सला  किल्ल्यावर तोफांचे दर्शन तसे दुर्लभच मात्र उंदेरीवर तोफांचा खजिनाच बघायला मिळतो.संपूर्ण किल्ल्यावर एकंदर १५ ते १६ तोफा आहेत.किल्ल्यावर तीन पाण्याची  टाकी असून त्यातील पाणी पिण्यासाठी मात्र उपयोगी नाही.किल्ल्यावर काही  ठिकाणी खूपच झाडी असून वाटेत एका ठिकाणी तर चक्क झाडाच्या खोडांचे  दार तयार झालेले आहे.किल्ल्याच्या तटबंदीध्ये एक अगदी लहान दार असून येथून   बाहेर गेले असतांना किल्ल्याच्या मजबूत तटबंदीची आणि बुरुजाची कल्पना येऊ  शकते.येथे बोट लावून पण आपण किल्ल्यात शिरू शकतो.

## गडावर जाण्याच्या वाटा : १. थळ मार्गे

खांदेरी - उंदेरी या जलदुर्गांवर जाण्यासाठी आपल्याला जावे लागते ते म्हणजे अलिबागला.अलिबाग ते रेवस या मार्गावर अलिबागपासून ४ कि.मी अंतरावर थळ नावाच्या गावाचा फाटा लागतो.या फाट्यापासून २ ते ३ कि.मी वर थळ गाव आहे.अलिबागहून येथपर्यंत येण्यासाठी एस टी बस उपलब्ध आहेत.थळ बाजारपेठे जवळून आपल्याला किल्ल्यावर जाण्यास बोटी

मिळू शकतात.अलिबागहून थळ आगाराकडे जाणा-या एस टी ने ही आपण बाजारपेठेकडे जाणा-या फाट्यावर उतरून चालत येथ पर्यंत येऊ शकतो.थळ बाजारपेठे जवळच्या समुद्रकिना-याहून दिसणारी दोन बेटे आपले लक्ष सहज वेधून घेतात.यापैकी रा जवळ असणारा किल्ला म्हणजे उंदेरी व डाव्याबाजूच्या थेड्या लांब असणारा किल्ला म्हणजे खांदेरी . खांदेरी किल्ला त्यावर असणा-या दिपगृहामुळे लगेसच लक्षात येतो..थळ बाजारपेठेच्या ठिकाणी सकाळी लवकर येणे सोईस्कर अन्यथा किना-यावरील बोटी मासेमारी करण्यासाठी सकाळी ६ , ६.३० च्या आत समुद्रात जायला निघतात.उशीरा पोहचल्यास मासेमारी करून येणा-या बोटी आपल्याला मिळू शकतात.साधारण मध्यम आकाराच्या ५ ते ६ लोक बसू शकतील अशा होड्या संपूर्ण खांदेरी - उदेरी दाखवून परत आणण्याचे होडीवाले भाव सांगतांना मात्र दुप्पट सांगतात.खांदेरी किल्ल्यावर ज्याप्रमाणे बोटींना धक्क्याची सोय आहे ती सोय उंदेरीपर नाही.त्यामुळे उंदेरीवर ओहटीच्या वेळेसच जाता येते.खांदेरवर कधीही गेलेतरी चालते मात्र उंदरीवर भरती ओहटीची वेळ पाळूनच जावे लागते. भरती ओहटीची वेळ काढण्याची सोपी पध्दत म्हणजे आपण ज्या दिवशी किल्ला पाहण्यास जाऊ यादिवशी मराठी पंचागा प्रमाणे जी तिथी असेल तिला ३/४ ने गुणल्यास पूर्ण भरतीची वेळ सांगणारा आकडा मिळतो.उ.दा जर चतुर्थी असेल तर ४ ला ३/४ ने गुणल्यास ३ आकडा मिळतो.म्हणजेच ३ वा रात्री किंवा दुपारी पूर्ण भरती असेल.याचप्रमाणे पूर्ण भरतीच्या वेळेनंतर ठीक ६ तासांनी पूर्ण ओहटीची वेळ
असते. तर वरील उ.दा मध्ये ९ वाजता रात्री आणि सकाळी ओहटी असते.थळच्या समुद्रकिना-याहून उंदेरी किल्ला समुद्रात साधारण अडीच कि.मी वर आहे तर खांदेरी किल्ला किना-यापासून तीन साडेतीन कि.मी वर आहे.
उंदेरीहून पश्चिमेला पाऊण कि.मी वर खांदेरी आहे.

## राहण्याची सोय : किल्ल्यावर सोय नाही..

## जेवणाची सोय : आपण स्वत: करावी.

## पाण्याची सोय : खांदरीवर पिण्याचे पाण्याचे टाके आहे उंदेरीवर अजिबात नाही.

## जाण्यासाठी लागणारा वेळ : अलिबाग मार्गे२ तास.

# कोर्लई

किल्ल्याची उंची : २७१ फूट
किल्ल्याचा प्रकार : जलदुर्ग
डोंगररांग: अलिबाग
जिल्हा : रायगड
श्रेणी : मध्यम

अलिबाग हे एक प्रसिद्ध ठिकाण. इथला समुद्रकिनारा आणि कुलाबा किल्ला हे सगळेच पाहतात. इथून दक्षिणेस, म्हणजे मुरूड-जंजिऱ्याच्या दिशेने निघालो की १५-२० कि.मी. वर रेवदंड्याचा कोट आणि पुढे ३-४ कि.मी. वर कोर्लईचा किल्ला वसलेला आहे. रेवदंड्यापर्यंत बसने जाता येते. इथून कुंडलिकेच्या खाडीवरचा पूल पार करून आपण कोर्लईच्या पायथ्याशी असलेल्या कोळीवाड्यात पोचतो. हा किल्ला थोडा वेगळाच आहे, कारण हा स्थित आहे कुंडलिका खाडीच्या मुखाशी. म्हणूनच याला पंडित महादेवशास्त्री जोशींनी 'कुंडलिकेने सिंधुसागराला आलिंगन दिले, त्या प्रीतिसंगमावरचा हा तीर्थोपाध्यायच आहे' असे म्हणून जणू गौरविलेच आहे. यास तिन्ही बाजूंनी सागराने वेढा घातला आहे.

## इतिहास :

हा किल्ला १५२१ मध्ये दियोगु लोपिश दि सिकैर या पोर्तुगीज गव्हर्नरने निजामशहाकडे रेवदंड्याजवळच्या चौलच्या खडकावर धक्का आणि क्रुसाची बातेरी बांधण्याची परवानगी मागितली आणि ते बांधले. रेवदंडा हे पोर्तुगीजांच्या मुख्य ठाण्यांपैकी एक. इथे एक मजबूत कोट आहे. १५९४ साली पहिला बुऱ्हाण निजाम गेल्यावर निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फायदा उचलून फिरंग्यांनी चौलच्या खडकावर तटबंदी बांधण्याचा प्रयत्न केला. हुसेन निजामाने यास नकार दर्शवला आणि स्वतःच एक बळकट दुर्ग उभारण्याचे ठरवले. एका संघर्षात दोघांनी पड खाल्ली आणि तह झाला. ठरले असे की निजामाने किल्ला बांधू नये आणि पोर्तुगीझांनी काही सागरी उपद्रव देऊ नये. पण दुसऱ्या बुऱ्हाण निजामाने मात्र पोर्तुगीझांना न जुमानता इथे पक्का किल्ला बांधला.एकदा फत्तेखान या सरदाराने रेवदंड्यावर तोफा झाडल्या आणि पोर्तुगीजांना शह देण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीझांना कुमक अपुरी पडली, म्हणून त्यांनी आणखी मागवली. आणि प्रत्युत्तर म्हणून कोर्लईवरच हल्ला केला. पोर्तुगीझ गडाखालच्या पेठेत घुसले आणि त्यांनी निजामाचा एक हत्ती मारला. शेवटी त्यांनी गड घेतला. मात्र गड घेतल्यावर मात्र त्यांना कडक बंदोबस्त करावा लागला. एका उल्लेखानुसार इथे १६०२ साली ८००० शिबंदी होती. एवढ्या साऱ्या व्यापामुळे त्यांनी बालेकिल्ला ठेवून बरेचसे बांधकाम

पाडले.१६८३ मध्ये संभाजी महाराजांनी कोर्लई घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. १७३९ साली चिमाजीअप्पाने सुभानराव माणकराला कोर्लईवर पाठवले, आणि वर्षभरातच किल्ला हाती लागला. मराठ्यांनी बुरुजांची नावे बदलून सां दियागोचे नाव पुस्ती बुरूज, आणि सां फ्रांसिसकुचे नाव ठेवले गणेश बुरूज.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** इथल्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपण फक्त १० मी. रुंद अशा जागेवर फिरतो. हा बालेकिल्ला. इथून दर्शन होते ते एका विहंगम दृश्याचे. एका बाजूला निळ्याशार सागरावर छोट्या-छोट्या होड्या दिसतात, तर एकीकडे आपण खाडी आणि सागर यांची भेट झालेली पाहतो. इथे एक उत्तराभिमुख चर्चचे अवशेष आहेत.आता आपण उत्तरेकडे वळतो. सर्वप्रथम आपल्याला दोन बुरुजांनी संरक्षित असलेल्या दरवाज्यातून आत जावे लागते. पैकी समुद्राकडे तोंड करून असलेल्या बुरुजाचे नाव आहे सां दियागो आणि खाडीकडे असणाऱ्या बुरुजाचे नाव आहे सां फ्रांसिस्कु. इथे काही अवशेष आपल्याला आढळतात. मुख्य बालेकिल्ल्याच्या खाली पश्चिमेकडे तटबंदी जवळ दारुकोठार आहे. पश्चिम आणि उत्तर तटबंदीला तोफा स्थानापन्न केल्या होत्या. इथे ७० तोफा आणि ८००० शिबंदी असल्याचे उल्लेख आपल्याला आढळतात.आता जरा उत्तरेला वळलो की आपण इथल्या माचीवर पोहोचतो. यास क्रुसाची बातेरी किंवा सांताक्रूज म्हणतात. ही अंदाजे तीन मी. लांब माची आहे. थोडक्यात हा पोर्तुगीज धाटणीचा किल्ला आपल्याला सहजच त्याच्या सौंदर्यात रममाण होण्यास भाग पाडतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

सर्वप्रथम आपल्याला रेवदंड्याला पोहोचावे लागते. इथे राज्य परिवहन मंडळाची सेवा उपलब्ध आहे. इथून कोर्लई गावात आपण रिक्षाने जाऊन २० मिनिटांत गडाच्या पायथ्याशी पोहोचतो. अथवा मुरुड-जंजिऱ्याला जाणारी बस आपल्याला गावाच्या वेशीवर सोडते. गडाच्या पायथ्याशी आहे एक सुंदर समुद्रकिनारा आहे. गडावर आपण दोन वाटांद्वारे पोहोचू शकतो. एक आहे समुद्रकिनाऱ्यावरून. इथून पायऱ्या चढून आपण ४० मिनिटांत कोर्लईच्या गडमाथ्यावर पोहोचतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही. गावात होऊ शकते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** पिण्याचे पाणी उपलब्ध नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** १ तास.

# सातारा जिल्हा

## अजिंक्यतारा

किल्ल्याची उंची : ३०० मीटर
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

अजिंक्यतारा हा किल्ला 'सातारचा' किल्ला म्हणून देखील ओळखला जातो. सातारा शहरामध्ये कुठेही उभे राहिले असता नजरेस पडतो. प्रतापगडापासून फुटणाऱ्या बामणोली रांगेवर अजिंक्यतारा उभारलेला आहे. येथील किल्ल्यांचे भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर डोंगर धारेवरून जाण्यासारखी परिस्थिती या भागात नाही. येथील किल्ल्यांची सरासरी उंची कमीच आहे. अजिंक्यताऱ्याची उंची साधारणतः: ३०० मीटर असून ती दक्षिणोत्तर ६०० मीटर आहे.

**इतिहास :** सातारचा किल्ला (अजिंक्यतारा) म्हणजे मराठ्यांची चौथी राजधानी. पहिली राजगड मग रायगड, जिंजी आणि चौथी अजिंक्यतारा. साताऱ्याचा किल्ला हा शिलाहार वंशीय भोज(दुसरा) याने इ.स. ११९० मध्ये बांधला. पुढे हा किल्ला बहामनी सत्तेकडे आणि मग विजापूरच्या आदिलशहाकडे गेला. इ.स. १५८० मध्ये पहिल्या आदिलशहाची पत्नी चांदबिबी येथे कैदेत होती. बजाजी निंबाळकर सुद्धा या ठिकाणी तुरुंगात होते. शिवराज्याचा विस्तार होत असतांना २७ जुलै १६७३ मध्ये हा किल्ला शिवाजी महाराजांच्या हाती आला. या किल्ल्यावर शिवरायांना अंगी ज्वर आल्याने दोन महिने विश्रांती घ्यावी लागली. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६८२ मध्ये औरंगजेब महाराष्ट्रात शिरला. इ.स. १६९९ रोजी औरंगजेबाने साताऱ्याच्या दुर्गाला वेढा

घातला. त्यावेळी गडावरचा किल्लेदार प्रयागजी प्रभू होते. १३ एप्रिल १७०० च्या पहाटे मोगलांनी सुरंग लावण्यासाठी दोन भुयारे खणली आणि बत्ती देताच क्षणभरातच मंगळाईचा बुरूज आकाशात भिरकावला गेला. तटावरील काही मराठे दगावले. प्रयागजी प्रभू देखील या स्फोटात सापडले. मात्र काहीही इजा न होता ते वाचले. तेवढ्यातच दुसरा स्फोट झाला. मोठा तट पुढे घुसणाऱ्या मोगलांवर ढासळला व दीड हजार मोगल सैन्य मारले गेले. किल्ल्यावरील सर्व दाणागोटा व दारूगोळा संपला आणि २१ एप्रिल रोजी किल्ला सुभानजीने जिंकून घेतला. किल्ल्यावर मोगली निशाण फडकण्यास तब्बल साडेचार महिने लागले. किल्ल्याचे नामकरण झाले आझमतारा.ताराराणीच्या सैन्याने पुन्हा किल्ला जिंकला व त्याचे नामातंर केले अजिंक्यतारा ! पण ताराराणीला काही हा किल्ला लाभला नाही. पुन्हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला. मात्र १७०८ मध्ये शाहुने फितवून किल्ला घेतला आणि स्वतः:स राज्याभिषेक करून घेतला. इ.स. १७१९ मध्ये महाराजांच्या मातोश्री येसूबाई यांना किल्ल्यावर आणण्यात आले. पुढे पेशव्याकडे हा किल्ला गेला. दुसऱ्या शाहुच्या निधनानंतर किल्ला ११ फेब्रुवारी १८१८ मध्ये इग्रजांकडे गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** साताऱ्यातून ज्या मार्गाने आपण गडावर प्रवेश करतो त्यामार्गावर दोन दरवाजे आहेत. आजही या दोन दरवाजांपैकी पहिला दरवाजा सुस्थितीत आहे. दरवाजाचे दोन्ही बुरूज आज अस्तित्वात आहेत. दरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे हनुमानाचे मंदिर आहे. हे मंदिर राहण्यास उत्तम आहे. मात्र गडावर पाण्याची सोय नाही. डावीकडे सरळ रस्त्याने पुढे गेल्यावर वाटेत महादेवाचे मंदिर लागते. समोर प्रसारभारती केंद्राचे कार्यालय व मागे दोन प्रसार भारती केंद्राचे टॉवर्स आहेत. पुढे गेल्यावर एक डावीकडे जाणारी वाट दिसते व 'मंगळादेवी मंदिराकडे' असे तिथे लिहिलेले आढळते.या वाटेत ताराबाई यांचा निवास असलेला पण आता ढासाळलेला राजवाडा तसेच कोठारही आहे. वाटेच्या शेवटी मंगळादेवीचे मदिर लागते. मंदिराच्या समोरच मंगळाईचा बुरूज आहे. मंदिराच्या आवारात अनेक शिल्प आढळतात. या वाटेने थेट तटबंदीच्या साह्याने पुढे जाणे म्हणजे गडाला प्रदक्षिणा घालण्यासारखेच आहे. गडाच्या उत्तरेला देखील दोन दरवाजे आहेत. तटबंदीवरून प्रदक्षिणा मारतांना नजरेस पडतात. या दरवाजात येणारी वाट सातारा-कराड हमरस्त्यावरून येते. दरवाजापाशी पाण्याचे तीन तलाव आहेत. उन्हाळ्यात कशातही पाणी नसते. गडाला प्रदक्षिणा घालून आल्यामार्गाने खाली उतरावे लागते. किल्ल्यावरून समोरच यवतेश्वराचे पठार, चंदनवंदन किल्ले, कल्याणगड, जरंडा आणि सज्जनगड हा परिसर दिसतो. संपूर्ण गड बघण्यासाठी साधारणतः दीड तास लागतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** अजिंक्यतारा किल्ला सातारा शहरातच असल्याने शहरातून अनेक वाटांनी गडावर जाता येते. सातारा एस. टी. स्थानकावरून अदालत वाड्या मार्गेजाणारी कोणतीही गाडी पकडावी आणि अदालत वाड्यापाशी उतरावे. सातारा ते राजवाडा अशी बससेवा दर १० - १५ मिनिटाला उपलब्ध आहे. राजवाडा बस स्थानकापासून अदालत वाड्यापर्यंत येण्यास १० मिनिटे लागतात. अदालत वाड्याच्या बाजूने जाणाऱ्या थेट वाटेने आपण गडावर जाणाऱ्या गाडी रस्त्याला लागतो व येथून गाडी रस्त्याने १ कि.मी. चालत गेल्यावर आपण थेट दरवाज्यापाशी पोहचतो.अजिंक्यतारा किल्ल्यावर जाण्यासाठी थेट गाडी रस्ता सुद्धा आहे. या रस्त्याने आपण किल्ल्याच्या दरवाजापाशी पोहोचतो. कोणत्याही मार्गेगड गाठण्यास साधारण १ तास लागतो.

**राहण्याची सोय :** गडावरील हनुमानाच्या मंदिरात १० ते १५ जणं राहू शकतात.

**जेवणाची सोय :** जेवणाची व्यवस्था आपणच स्वतः करावी.

**पाण्याची सोय :** उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात गडावर पिण्याचे पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** साधारणतः: १ तास(साताऱ्यापासून)

# कल्याणगड

किल्ल्याची उंची : ३५०० फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

कल्याणगड हा सातारा विभागात मोडणारा किल्ला आहे. साता-यापासून अर्ध्या दिवसात हा किल्ला आपण पाहून येऊ शकतो. या परिसरातील किल्ले हे मुख्य डोंगररांगेपासून अलग झालेल्या डोंगरावर विराजमान झालेले आहे. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे चढण्यास

सर्वात सोपा. संपूर्ण प्रदेश ऊसामुळे सधन झालेल्या शेतक-यांचा प्रदेश. त्यामुळे एसटीची सोय देखील उत्तम प्रकारची आहे.

इतिहास : कल्याणगडाचेच दुसरे नाव म्हणजे 'नांदगिरीचा किल्ला'. सातारा येथे सापडलेल्या ताम्रलेखानुसार शिलाहार राजा दुसरा भोज याने या किल्ल्याची निर्मिती केली. हा किल्ला इ.स. ११७८ ते इ.स.१२०९ या कालावधीत बांधला गेला असावा. शिलाहाराच्या सापडलेल्या अनेक ताम्रपटावरून असे दिसते की शिलाहार राजांनी जैन लोकांना अनेक दानधर्मेकेली, आणि कल्याणगडावरील गुहेत असणा-या पार्श्वनाथांच्या मूर्तीवरून हा गड शिलाहारांनी बांधला असावा हे सिद्ध होते. इ.स. १६७३ मध्ये शिवरायांनी सातारा व आजुबाजूचा प्रदेश जिंकून घेतला. त्यातच कल्याणगडाचा देखील समावेश होता. पुढे शिवकालानंतर याचा सर्व कारभार प्रतिनिधींकडे सोपवला गेला. पुढे पेशव्यांमध्ये व प्रतिनिधींमध्ये वितुष्ट निर्माण झाले आणि हा किल्ला पेशव्यांकडे आला. पेशव्याने इ.स. १८१८ मध्ये जनरल प्रिझलरने हा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात घेतला.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : किल्ल्यावर चढताना दोन दरवाजे लागतात. पहिला दरवाजा हा उत्तराभिमुख आहे. यातून आत शिरल्यावर समोरच एक मंदिर दिसते. मंदिराच्या बाजूने तटबंदीच्या अनुरोधाने एक वाट खाली उतरते. या वाटेने खाली उतरल्यावर समोरच एक भुयार लागते. हे कल्याणगडावरील सर्वात प्रेक्षणीय स्थान आहे. हे भुयार जवळजवळ ३० मीटर आत आहे. भुयारात जाणा-या वाटेच्या दोन्ही बाजूला १२ महिने पाणी असते.वाटेच्या आजुबाजूला लोखंडी सळ्या लावलेल्या आहेत. भुयाराच्या शेवटी नवव्या शतकात घडवलेली पार्श्वनाथांची मूर्ती, पद्मावती देवीची मूर्ती आणि श्री दत्तात्रेयाची मूर्ती अशा ३ मूर्त्या आहेत. भुयारात बॅटरी घेऊन जाणे आवश्यकच आहे. पावसाळ्यात भुयारात उतरणे धोक्याचे आहे. हे भुयार पाहून परत पहिल्या दरवाजापाशी यावे. येथून वर जाणारी पाय-यांची वाट आपल्याला दुस-या पूर्वाभिमुख दरवाजापाशी घेऊन जाते. या वाटेने गडावर प्रवेश करून समोरच हनुमान मंदिरातील हनुमानाचे दर्शन घेता येते. डावीकडे गेल्यावर एक बामणघर लागते. या घरात सध्या एक साधू तपश्चर्येसाठी बसतो. बामणघराच्या समोरच कल्याणस्वामींची समाधी आहे. समाधीचे दर्शन घेऊन पुढे निघावे. वाटेतच श्री गणेशाचे पडीक मंदिर व एक मोठे तळे लागते. थोडेसे अंतर चालून गेल्यावर गडावरील वाड्यांचे अवशेष दिसतात. या वाटेने १० मिनिटे पुढे गेल्यावर गडाच्या पूर्व टोकापाशी आपण पोहचतो. या टोकावरून समोरच जरंडा, अजिंक्यतारा, यवतेश्वर, चंदनवंदन, मो-या, वैराटगड ही ठिकाणे दिसतात. गडमाथा फिरण्यास अर्धा तास पुरतो.

गडावर जाण्याच्या वाटा :किल्ल्यावर जाण्यास एकच वाट आहे. ही वाट पायथ्याच्या नांदगिरी (धुमाळवाडी) गावातून वर येते. सातारा एसटी स्थानकावरून सातारा रोडला जाणारी गाडी पकडावी. साताराराेड ते नांदगिरी हे ३ कि.मी.चे अंतर आहे. येथून किन्हईकडे जाणारी बस पकडावी किंवा एकदम सातारा ते किन्हई बसने नांदगिरीला उतरावे. गावातून गडावर जाण्यास ४५ मिनिटे लागतात. वाटेतच एक गुहा लागते.

राहण्याची सोय : गडावरील हनुमान मंदिरात किंवा बामणघरासमोरील आवारात ५ ते ७ जणांची रहाण्याची सोय होते.

जेवणाची सोय : सर्व व्यवस्था आपण स्वतःच करावी.

पाण्याची सोय : पार्श्वनाथांच्या भुयारातील पाणी पिण्यासाठी बारामही उपलब्ध असते.

जाण्यासाठी लागणारा वेळ :४५ मिनिटे(पायथ्यापासून).

# सज्ञनगड

किल्ल्याची उंची : ३३५० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

प्रतापगडाच्या पायथ्यापासून सहयाद्रीची एक उपरांग शंभूमहादेव या नावाने पूर्वेकडे जाते. या रांगेचे तीन फाटे फुटतात. त्यापैकी एका रांगेवर सज्ञनगड उर्फ परळीचा किल्ला वसलेला आहे. समर्थ रामदासांच्या पदस्पर्शाने पावन झालेली इथली माती प्रत्येकाने भाळी लावावी. अनंत कवींनी या पावन भूमीचे अतिशय उत्तम वर्णन केले आहे. ''सहयाद्रीगिरीचा विभाग विलसे,मांदार श्रृंगापरी। नामे सज्ञन जो नृपे वसविला,श्री उर्वशीचे तिरी। साकेताधिपती कपी भगवती,हे देव ज्याचे शिरी। येथे जागृत रामदास विलसे,जो या जना उद्धरी॥'' सातारा शहराच्या नैऋत्येस अवघ्या दहा की.मी. अंतरावर उरमोडी उर्फ उर्वशी नदीच्या खोऱ्यात हा दुर्ग उभा आहे.

**इतिहास** : प्राचीन काळी या डोंगरावर आश्वालायन ऋषींचे वास्तव्य होते,त्यामुळे या किल्ल्याला 'आश्वलायनगड' म्हणू लागले. या शब्दाचा अपभ्रंश म्हणजे अस्वलगड हे देखील नाव मिळाले. या किल्ल्याची उभारणी शिलाहार राजा भोज ह्याने ११व्या शतकात केली. या गडाच्या पायथ्याशी परळी नावाचे गाव होते. म्हणूनच ह्याला परळीचा किल्ला असे देखील संबोधीले जायचे. चवथा बहमनी राजा महंमदशहा (१३५८-१३७५) याच्या कारकिर्दीत या किल्ल्याचा उल्लेख आढळतो. पुढे हा किल्ला बहमनी राज्याचे वारसदार आदिलशहा कडे गेला. इ.स.१६३२ पर्यंत फाजलखान ह्या किल्ल्याचा किल्लेदार असल्याचा उल्लेख आढळतो. २एप्रिल इ.स.१६७३ मध्ये शिवाजी राजांनी हा किल्ला आदिलशहाकडून जिंकून धेतला. शिवरायांच्या विनंती वरून समर्थ रामदास गडावर कायमच्या वास्तव्यासाठी आले. किल्ल्याचे नामकरण करण्यात आले सज्जनगङ. पुढे राज्याभिषेकानंतर शिवाजीराजे सज्जनगडावर समर्थांच्या दर्शनास आले. पुढे ३-११-१६७८ रोजी शिवरायांनी संभाजी महाराजांना समर्थांकडे पाठवले. पण ३-१२-१६७८ रोजी संभाजी महाराज सज्जनगडावरून पळून जाऊन दिलेरखानाला मिळाले. शिवरायांच्या निधनानंतर १८ जानेवारी १६८२ रोजी श्री राममूर्तींचे गडावर स्थापना करण्यात आली. २२ जानेवारी १६८२ मध्ये समर्थांचे निधन झाले. समर्थांनी आपल्या पश्चात सर्व अधिकार दिवाकर गोसाव्याला दिले असले तरी गडाची व्यवस्था भानजी वरामजी गोसावी यांच्याकडे सोपवली होती. पुढे यांत भांडणतंटा सुरू झाला. ही गोष्ट संभाजी महाराजांच्या कानावर जाताच त्यांनी २-६-१६८२ रोजी सज्जनगडाचा मुद्राधारी जिजोती काटकर हयाला पत्र लिहले की ''श्री स्वामी अवतार पूर्ण करण्याअगोदरच आज्ञा केली होती......ऐसे असता उद्धव गोसावी उगीच द्रव्य लोभास्तव भानजी व रामजी गोसावी यांसी कटकट करितात,तुम्ही उद्धव गोसावी यांसी पत्रे व वस्त्रे भानजी व रामजी यांजकडून देवविली म्हणून केलो आले. तरी तुम्हास ऐसे करावयाचे प्रयोजन काये व उद्धव गोसावी यांसी कटकट रावया गरज काये या उपरी जे जे वस्त्रभाव व द्रव्य उधव गोसावी यांचे आधीन करविले असेली ती मागते भानजी व रामजी याचे स्वाधीन करणे.उधव गोसावी यांसी कटकट करू न देणे. श्री स्वामींचे पहिलीच आज्ञा करणे. वेदमूर्ती बिवाकर गोसावी यांचे विद्यमाने आम्हास श्रुत होऊन होणे तो होईल.....या उपरी घालमेलीत पडावया प्रयोजन नाही. श्री स्वामींच्या समुदायांशी काडीइतके अंतर पडो न देणे... या पत्रा प्रमाणे राहाटी करणे.'' या नंतर पुढे २१ एप्रिल १७०० मध्ये फतेउल्लाखानाने सज्जनगडास वेढा घातला. ६ जून १७००ला सज्जनगड मोगलांच्या ताब्यात गेला व त्याचे 'नौरससातारा' म्हणून नामकरण झाले. १७०९ मध्ये मराठ्यांनी पुन्हा किल्ला जिंकला. १८१८ मध्ये किल्ला इंग्रजांच्या हाती पडला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : गडावर शिरतांना लागणाऱ्या पहिल्या दरवाजाला 'छत्रपती शिवाजी महाराजद्वार' असे म्हणतात. हे द्वार आग्नेय दिशेस आहे. दुसरा दरवाजा पूर्वाभिमुख असून त्याला 'समर्थद्वार' असेही म्हणतात. आजही हे दरवाजे रात्री दहा नंतर बंद होतात. दुसऱ्या दारातून शिरतांना समोरच एक शिलालेख आढळतो. त्याचा मराठी अर्थ खालील प्रमाणे - १) ऐश्वर्य तुझ्या दारातून तोंड दाखवत आहे. २) हिंमत त्याच्या कामामुळे सर्व फुलांना प्रफुल्लित करत आहे. ३) तू विंवंचना दूर होण्याचे स्थान आहेस. परंतु पुन्हा विवंचना मुक्त आहे. ४) तुझ्या पासून सर्व विवंचना दूर होतात. ५) परेली किल्ल्यावरील इमारतीच्या दरवाज्याचा पाया ३ जनादिलाखर या तारखेस तयार झाला. आदिलशहा रेहान याने काम केले. ज्या पायऱ्यांनी आपण गडावर प्रवेश करतो त्या पायऱ्या संपायच्या अगोदर एक झाड लागते. या झाडापासून एक वाट उजवीकडे जाते. या वाटेने ५ मिनिटे पुढे गेल्यावर एक रामघळ लागते. ही रामघळ समर्थांची एकांतात बसण्याची जागा होती. गडावर प्रवेश केल्यावर डावी कडे वळावे. समोरच घोड्यांना पाणी पाजण्यासाठीचे घोडाळे तळे दिसते. घोडाळे तळ्याच्या मागच्या बाजूस एक मशिदवजा इमारत आहे तर समोरच आंग्लाई देवीचे मंदिर आहे. ही देवी समर्थांना चाफळच्या राममूर्ती बरोबरच अंगापूरच्या डोहात सापडली. मंदिरा समोरच ध्वजस्तंभ आहे. नंतर आल्यामार्गाने पुन्हा तळयापाशी यावे व सरळ पुढे चालत जावे.वाटेतच उपहारगृह,श्री समर्थ कार्यालय आणि धर्मशाळा लागतात. धर्मशाळेच्या समोरच सोनाळे तळे आहे. याच तळ्यातील पाणी पिण्यासाठी वापरतात.तळ्याच्या मागील बाजूस पुष्पवाटीका आहे. सोनाळे तळ्याच्या समोरून जाणारी वाट पकडावी आणि आपण मंदिराच्या आवारात येऊन पोहचतो. समोरच पेठेतल्या मारुतीचं मंदिर आहे तर बाजूला श्रीधर कुटी नावाचा आश्रम आहे. उजवीकडे श्रीरामाचे मंदिर,समर्थांचा मठ आणि शेजघर आहे. या ठिकाणी समर्थांच्या वापरातील सर्व वस्तू ठेवल्या आहेत. हे सर्व पाहून झाले की मंदिराच्या पुढच्या द्वारातून बाहेर पडायचे आणि डावीकडे वळावे. प्रथम 'ब्रम्हपिसा' मंदिर लागते आणि पुढे गेल्यावर धाब्याच्या मारुतीचे मंदिर आहे. समोरच किल्ल्याचा तट आहे.येथून सभोवतालचा परिसर फारच सुंदर दिसतो.गड फिरण्यास दोन तास पुरतात.

**गडावर जाण्याच्या वाटा** : गडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. त्यांपैकी एक गाडीमार्ग आहे.

परळी पासून : सातारा ते परळी अंतर १० की.मी.चे आहे. परळी हे पायथ्याचे गाव. परळी पासून गडावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. साधारण ७८० पायऱ्यांनंतर गडाचा दरवाजा लागतो. गडावर जाण्यास परळीपासून एक तास पुरतो

गजवाडी पासून : सातारा परळी रस्त्यावर परळीच्या अलीकडे ३ की.मी.वर गजवाडी गाव लागते. तेथून थेट गडाच्या कातळ माथ्यापर्यंत गाडीने जाता येते. येथून पुढे १०० पायऱ्यांनंतर दरवाजा लागतो.रस्त्यापासून गडावर जाण्यास १५ मिनिटे पुरतात

**राहण्याची सोय :** १) गडावर राहण्यासाठी श्री समर्थ सेवा मंडळ कार्यालय तर्फे खोल्या उपलब्ध होतात. २) गडावर धर्मशाळा देखील आहेत. ३) सज्ज्नगड ( सेवा मंडळाच्या ) खोल्याही राहण्यासाठी उपलब्ध होतात.

**जेवणाची सोय :** गडावर जेवण्याची सय होते.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याचे पाणी आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** परळी गावातून पायऱ्यांनी १ तास व गाडीमार्गाने १५ मिनिटे.

# चंदन - वंदन

किल्ल्याची उंची : ३८०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

कथा आणि कादंबरी मध्ये जुळ्या भावा विषयी आपण नेहमीच ऐकत असतो मात्र दुर्गविश्वातही अशी जुळी भावंडे आढळतात त्यांच्यापैकीच एक चंदन-वंदन. साताऱ्याच्या अलीकडे २४ कि.मी. अंतरावर ही दुर्गजोडी उभी आहे. ऊसाच्या पिकामुळे सधन झालेला हा सर्व परिसर त्यामुळे रस्ते, वीज, एस्.टी. या सर्व प्राथमिक सुविधा गावा गावा पर्यंत पोहोचल्या आहेत. सपाट माथा असल्यामुळे पुणे-सातारा मार्गावरून हे किल्ले सहजच ओळखता येतात. यांच्या पूर्वेस जरंडेश्वर कल्याणगड, भवानीचा डोंगर, पश्चिमेस वैराट्गड, पांडवगड. एकीकडे महाबळेश्वर प्रांत तर दुसरीकडे सातारा शहर यांच्या सीमेवर हे किल्ले उभे आहेत.

**इतिहास :** इ.स. ११९१-११९२ सालच्या ताम्रलेखानुसार हे किल्ले शिलाहार राजा दुसरा भोज याने बांधले. १६७३ च्या सुमारास शिवरायांनी सातारा प्रांत जिंकला आणि त्याचवेळी सज्ज्नगड, कल्याणगड, अजिंक्यतारा या किल्ल्यांसोबत यांना देखील स्वराज्यात सामील करून घेतले. पुढे संभाजी राजांच्या कारकिर्दीत सन १६८५ मध्ये फेब्रुवारी महिन्यात अमानुल्ला खानाने चंदन-वंदन येथे असणाऱ्या मराठ्यांच्या तुकडीवर हल्ला केला. या चकमकीत मोघलांच्या हातात २५ घोडी, २० बंदुका, २ निशाणे, १ नगारा सापडला. पुढे १६८९ पर्यंत हा सर्व परिसर मराठ्यांच्या ताब्यात होता. नंतर मात्र तो मोगलांच्या हातात पडला. छत्रपती शाहुमहाराजांनी सन १७०७ मध्ये पावसाळ्यात हा प्रदेश जिंकून घेतला. पुढे सन १७५२ मध्ये ताराबाईवर लक्ष ठेवण्यास पुरेसा फौजफाटा देऊन बाळाजी विश्वनाथांनी या किल्ल्यावर दादोपंत यांची नेमणूक केली. नंतर हा किल्ला इंग्रजांच्या हातात पडला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** चंदनच्या प्रवेशद्वाराजवळील रस्ता पूर्वी बराच कठीण होता. मात्र सध्या तेथे असलेल्या मशिदीमुळे हा रस्ता बराच रुंद झाला आहे. दोन अर्धवट पडलेले बुरूज आपणास प्रवेशद्वाराची जाणीव करून देतात. येथून साधारण १५ पायऱ्या पार गेले असता डाव्या बाजूस एक पडकी वास्तू दिसते. तिच्या वरच्या अंगास एक वडाचे झाड आहे. पाच वडांचा मिळून बनलेला असल्यामुळे त्यास 'पाचवड' म्हणतात. बाजूलाच एक शंकराचे मंदिर आहे. यातील दोन्ही महादेवाच्या पिंडी या पाच लिंगांच्या आहेत. ग्रामस्थांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. श्रावणात येथे यात्रा असते. (येथून दहा एक पायऱ्या चढून गेल्यावर समोरच मोठ्या मोठ्या शिळा रचलेल्या दिसतात. )वंदनप्रमाणेच येथेही एक दर्गा आहे. दर्ग्याच्या बाजूस एखाद्या वाड्याच्या भिंतीसारखे बांधकाम आढळते. एका अर्धवट दरवाजासारखे काहीतरी दिसते. साधारण सदरेसारखे येथील बांधकामाचे अवशेष दिसतात. याच्या मागील भागात सुद्धा अनेक उद्ध्वस्त अवशेष आपणास दिसतात. हीच गडावरील मुख्य वस्ती असावी. गडाच्या उत्तर टोकावर मजबूत बांधणीचा अगदी सुस्थितीत असलेला एक बुरूज आढळतो. याच वाटेवर एक समाधी आढळते. याच्या वरील बाजूस अस्पष्ट असे शिवलिंग आहे आणि एका बाजूस मारुतीची मूर्ती आहे. गडाच्या दक्षिणेकडे तीन कोठ्या असलेली पण वरचे छप्पर उडालेली वास्तू आढळते. गावकऱ्यांच्या मते हे कोठार म्हणजे दारूगोळा साठवण्याची जागा होती. गडाच्या मध्यभागी प्रशस्त चौथरा आहे. यावर काय वास्तू होती याचा मात्र अंदाज लागत नाही.

**गडावर जाण्याच्या वाटा :** चंदन आणि वंदन या दोन्ही किल्ल्यांवर जाणाऱ्या सयुंक्त वाटा आहेत. पुणे-सातारा मार्गावर भुईंज गाव आहे. तेथे उतरून २० कि.मी. अंतरावर किकली गाव आहे. वाई-सातारा या दोन्ही ठिकाणाहून किकलीला

येण्यासाठी बस आहे. किकलीच्या जवळच बेलमाची नावाचे गाव आहे. या बेलमाची गावाचे दोन भाग आहेत. एक आहे ती खालची बेलमाची तर दुसरी वरची बेलमाची. येथूनच एक वाट चंदन आणि वंदन यांच्या खिंडीत पोहोचते. डावीकडे राहतो तो चंदन तर उजवीकडे वंदन. या चंदन किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत :

**राहण्याची सोय :** दर्ग्यात रहायचे असल्यास ३० ते ४० जणांना राहता येते.

**जेवणाची सोय :** नाही

**पाण्याची सोय :**फक्त पावसाळ्यात अन्यथा गडावर पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** अडीच ते ३ तास

# वासोटा

किल्ल्याची उंची : ४२६७फूट
किल्ल्याचा प्रकार : वनदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर कोयना
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

काळ्या मातीच्या या महाराष्ट्रातील, कोयना नदीच्या खोऱ्यात, रानात वसलेला दुर्ग म्हणजे ‘किल्ले वासोटा’. ज्ञानेश्वरीत वासोट्याचा अर्थ ’आश्रयस्थान’ असा दिला आहे. वासोट्यालाच ’व्याघ्रगड’ असेही दुसरे नाव आहे. कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या दुर्गमतेमुळेच हा भाग वन्यजीवनाने समृद्ध बनला आहे.

**इतिहास :** वासोटा किल्ल्याच्या प्राचीनत्वाचा शोध घेता आपल्याला वसिष्ठ ऋषींच्या काळापर्यंत मागे जावे लागेल. असे मानले जाते की, वसिष्ठ ऋषींचा कोणी एक शिष्य, अगस्ती ऋषी यांनी विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडचा मार्ग शोधला, सह्याद्रीच्या कोयना काठच्या त्या शिखरावर राहण्यास आला व त्याने आपल्या निवासी डोंगराला आपल्या गुरूंचे नाव दिले. कालांतराने या देशीच्या क्षत्रियांनी त्या डोंगराला तटाबुरूजाचे साज चढवून लष्करी ठाणे केले. त्या डोंगराचे परंपरागत ’वसिष्ठ’ हे नाव अपभ्रंश होऊन ‘वासोटा’ झाले. प्रत्यक्ष उल्लेखित नसला तरीही, हा किल्ला शिलाहारकालीन असावा. शिलाहारांच्या किल्ल्यांच्या नामावलीत ’वसंतगड’ या नावाने उल्लेखिलेला किल्ला हा वासोटा असावा. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीवरून शिवरायांनी जावळी विजयानंतर वासोटा घेतला असे सांगितले जाते, पण ते खरे नाही. जावळी घेताना, जावळीतील तसेच कोकणातील इतर किल्ले शिवरायांनी घेतले पण वासोटा दूर असल्याने किल्लेदाराच्या हाती राहीला. अफझल वधानंतर काढलेल्या मोहिमेतही वासोटा किल्ला येत नव्हता. पुढे शिवराय पन्हाळगडावर अडकले असताना, आपल्या मुखत्यारीत मावळातील पायदळ पाठवून त्यांनी वासोटा किल्ला दि. ६ जून १६६० रोजी घेतला. सन १६६१ मध्ये पकडलेल्या इंग्रज कैद्यांपैकी फॅरन व सॅम्युअल यांना वासोट्यावर कैदेत ठेवण्यात आले होते. पुढे १६७९ मध्ये वासोटा किल्ल्यावर २६,००० रुपये सापडले. पुढच्या काळात १७०६ मध्ये पंतप्रतिनिधींच्या उपपत्नी ताई तेलिणीने हा किल्ला आपल्या हातात घेतला. पुढीलवर्षी पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांनी ताई तेलिणी बरोबर लढाई केली. ताई तेलिणीने आठ-दहा महिने प्रखर झुंज देऊन किल्ला लढवला. १७३० मध्ये वासोटा किल्ला बापू गोखल्यांच्या हाती पडला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** वासोटा किल्ल्यावर जाण्यासाठी दोन दरवाजे लागतात. यातील पहिला दरवाजा ढासळलेल्या अवस्थेत आहे. दुसऱ्या दरवाजाने गडावर प्रवेश करता येतो. समोरच मारुतीचं बिन छपराचं मंदिर आहे. मंदिरापासून प्रमुख तीन वाटा जातात. सरळ जाणारी वाट किल्ल्यावरील भग्नावशेषांकडे घेऊन जाते. उजव्या बाजूस जाणारी वाट ’काळकाईच्या ठाण्याकडे’ जाते. वाटेतच महादेवाचे सुंदर मंदिर लागते. मंदिरात दोन ते तीन जणांची राहण्याची सोय होऊ शकते. येथून पुढे जाणारी वाट माचीवर घेऊन जाते. या माचीला पाहून लोहगडच्या विंचूकाट्याची आठवण येते. याच माचीलाच काळकाईचे ठाणे म्हणतात. या माचीवरून दिसणारा आजुबाजूचा घनदाट झाडांनी व्यापलेला प्रदेश, चकदेव, रसाळ, सुमार, महिपतगड, कोयनेचा जलाशय हा संपूर्ण देखावा मोठा रमणीय आहे. मारुतीच्या देवळाच्या डावीकडे जाणारी वाट आपल्याला जोड टाक्यांपाशी घेऊन जाते.या टाक्यातील पाणी पिण्यासाठी योग्य आहे. पुढे ही वाट जंगलात शिरते आणि बाबुकड्यापाशी येऊन पोहोचते. या कड्याचा आकार इंग्रजी ’ण’ अक्षरा सारखा आहे. याला पाहून हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्याची आठवण येते. समोरच उभा असणारा आणि आपले लक्ष वेधून घेणारा उंच डोंगर म्हणजेच ‘जुना वासोटा’ होय.

जुना वासोटा नव्या वासोट्याच्या बाबुकड्यावर उभे राहिल्यावर समोरच उभा असणारा डोंगर म्हणजे जुना वासोटा. आता या गडावर जाणारी वाट अस्तित्वात नाही. तसेच पाण्याचाही तुटवडा आहे. घनदाट झाडे व वन्यश्वापदेही असल्याने सहसा येथे कोणी जात

Zmhr.

**गडावर जाण्याच्या वाटा :** वासोटा किल्ल्यावर जाण्यासाठी दोन प्रमुख मार्ग आहेत. एक नागेश्वरमार्गेआणि दुसरा थेट वासोट्याकडे.

सातारामार्गेवासोटा :

१) कुसापूर मार्गे- साताऱ्याहून बामणोली या गावी यावे. सकाळी ९ वाजता साताऱ्याहून बसची सोय आहे. येथून कुसापूरला कोयना धरणाचा जलाशय लाँचने पार करून जाता येते. कुसापूरहून दाट जंगलात दोन वाटा जातात. उजवीकडे जाणारी वाट आठ मैलांवरील नागेश्वराकडे नेते तर डावीकडे जाणारी वाट वासोट्यावर घेऊन जाते. २) खिरकंडी मार्गे- साताऱ्याहून बसने 'वाघाली देवाची' या गावी यावे. येथून लाँचच्या सहाय्याने जलाशय पार करून खिरकंडी या गावी यावे. येथून धनगर वाडी पासून जाणारी वाट 'मेट इंदवली' या गावात घेऊन जाते. साताऱ्याहून इथवरचा प्रवास आठ-नऊ तासांचा आहे. येथून पुढे पाच-सहा तासात वासोट्यावर जाता येते.

३) महाबळेश्वर मार्गे-महाबळेश्वरहून 'तापोळे' गावी येऊन लाँचने कुसापूर गाठता येते, आणि तेथून वासोटा गाठावे.

चिपळूणहून वासोटा : १) चिपळूणहून स. ८.३० वाजताच्या बसने 'चोरवणे' या गावी यावे. येथून ५ ते ६ तासात वासोट्याला पोहोचता येते. या मार्गात वाटेत कुठेच पाणी नसल्यामुळे आपल्याकडे पाण्याचा भरपूर साठा घेऊन जावे. या वाटेने वर गेल्यावर एक पठार लागते. पठारावरून डावीकडे जाणारी वाट नागेश्वर कडे तर उजवीकडची वाट वासोट्याला जाते. येथे नागेश्वराकडे जाणाऱ्या वाटेने थोडे पुढे गेल्यावर खाली एक वाट जंगलात विहिरीकडे जाते. येथून वासोट्याचे अंतर दोन तासात कापता येते.

२) चिपळूणहून 'तिवरे' या गावी यावे. येथून रेडे घाटाने वासोट्याला जाता येते.

नागेश्वरमार्गेवासोटा : नागेश्वरला भेट दिल्याशिवाय वासोट्याची भेट पूर्ण होऊच शकत नाही. वासोट्यावर जाताना समोरच एक सुळका आपले लक्ष वेधून घेतो. त्यालाच नागेश्वर म्हणतात. या सुळक्याच्या पोटात एक गुहा असून, तेथे महादेवाचे मंदिर आहे. हजारो नागरिक दर शिवरात्रीला या पवित्र स्थानी दर्शनास येतात. गुहेच्या छतावरून बाराही महिने पाण्याच्या थेंबांचा अभिषेक शिवलिंगावर होत असतो. बहुतेक ट्रेकर्स प्रथम नागेश्वराचे दर्शन घेऊन मग वासोट्याला जातात. त्यासाठी फक्त लांबचा पल्ला चालण्याची तयारी असावी लागते.

**राहण्याची सोय :** १) पूर्वी उल्लेखिलेल्या नव्या वासोट्यावरील महादेवाच्या मंदिरात २ ते ३ जणांची राहण्याची सोय होते. २) नव्या वासोट्यावर जोड टाक्यांच्या शेजारील पठारावरही राहता येते. ३) नागेश्वराची गुहा ही राहण्यासाठी उत्तम जागा आहे. येथे २० ते २५ जण आरामात राहू शकतात.

**जेवणाची सोय :** आपण स्वतःच करावी.

**पाण्याची सोय :** नागेश्वराच्या गुहेकडे जातांना, पायऱ्यांच्या उजवीकडून जंगलात जाणारी वाट पाण्याच्या विहीरीपाशी घेऊन जाते. नव्या वासोट्यावरही मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. उन्हाळ्यातही या विहिरीला पाणी असते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** कुसापूर मार्गे- ४ तास, चोरवणे मार्गे- ७ तास

**सूचना :** वासोट्याला पावसाळ्यात जाताना जळवांचा मोठ्या प्रमाणावर त्रास होतो. तेव्हा आवश्यक ती काळजी घ्यावी. चिपळूणहून चोरवणे मार्गेवासोट्याला जाताना वाटेत पाण्याची कुठेही सोय नाही. तेव्हा पाण्याचा पुरेसा साठा जवळ बाळगणे आवश्यक आहे.

# भैरवगड

किल्ल्याचा प्रकार : वनदुर्ग

डोंगररांग: ममहाबळेश्वर कोयना

जिल्हा : सातारा

श्रेणी : मध्यम

भैरवगड हा कोयनानगरच्या विभागात मोडणारा किल्ला आहे. येथील किल्ल्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व किल्ले घाटमाथ्याच्या सलग रांगेपासून दुरावलेले आहेत. त्यामुळे दुरून हे किल्ले दिसत नाही. घनदाट जंगल हे येथील मुख्य आकर्षण. हे अरण्य अभयारण्य म्हणून धोषित करण्यात आल्याने येथील सर्व गावांचे स्थलांतर करून ती अरण्याबाहेर बसवण्यात आली आहेत. त्यामुळे माणसांचा वावर तसा कमीच. पायथ्याची गावं गाठण्यासाठी एस. टी. ची चांगली सोय आहे.

**इतिहास :** इतिहासात या गडाचा उल्लेख कोठेही आढळत नाही. मात्र या गडाचा वापर केवळ टेहळणी साठी असावा असे येथील बांधकामावरून दिसते.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** भैरवगडावर पाहण्यासारखे फार काहीच नाही. गडावर एक मंदिर आहे. मंदिर फारच प्रशस्त आहे. मंदिर मजबूत आणि कौलांनी शाकारलेले आहे. मंदिरात भेरी देवी, श्री तुळा देवी, श्री वाघजाई देवी यांच्या २-३ फुटी मूर्ती आहेत. या लाकडी मंदिरावर बरेसचे कोरीव काम आढळते. मंदिरासमोरच्या प्राकारात तुळशीवृंदावन, शंकराच्या पिंडीचा चबुतरा दिसतो. तसेच समोर दोन तीन खांब देखील दिसतात. समोरच शंकराचे मंदिर सुद्धा आहे. मंदिरासमोरच खाली उतरणाऱ्या वाटेने थोडे पुढे गेल्यावर दोन तीन बुरूज लागतात. येथून थोडे पुढे गेल्यावर एक ढासळलेल्या अवस्थेतील दरवाजा आहे. या दरवाजातून पुढे गेल्यावर डावीकडे वळावे. समोर असणाऱ्या टेकाडाला वळसा मारून गडाच्या मागील बाजूस यावे. येथे पाण्याची दोन टाकी आहेत. यातील पाणी पिण्यास उपयुक्त असून ते बारमाही टिकते. याच्यापुढे पाहण्यासारखे काहीच नाही. लांबवर पसरलेलं कोयनेचं दाट जंगल दिसते. गडमाथा तसा अरुंदच आहे. त्यामुळे २ तासात गड फिरून होतो. मंदिराच्या दिशेने तोंड करून उभे राहिल्यास उजवीकडे दरीत उतरणाऱ्या वाटेने ५ मिनिटे खाली उतरावे. येथे सुद्धा पाण्याचं एक टाकं आहे. मात्र हे पाणी मार्चपर्यंतच असते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** भैरवगडावर जाण्यासाठी तीन वाटा आहेत. एक थेट कोकणातून वर चढते तर दुसरी हेळवाकच्या रामघळीत पासून गडावर जाते. तिसरी गव्हारे गावातून आहे.

१. दुर्गवाडी मार्गे: या मार्गेभैरवगडावर येण्यासाठी प्रथम चिपळूण गाठावे. चिपळूण वरून दुर्गवाडी हे पायथ्याचे गाव गाठावे. चिपळूण ते दुर्गवाडी अशी ८:०० वाजताची बस आहे. दुर्गवाडी पर्यंत येण्यास साधारणत: १ तास लागतो. दुर्गवाडी गावाच्या वर असणाऱ्या जंगलातून वाट थेट गडावर जाते. या वाटेने गड गाठण्यास ३ तास लागतात. वाट तशी सरळच असली तरी दमछाक करणारी आहे. गव्हारे गावातून येणारी वाटसुद्धा या वाटेलाच येऊन मिळते. वाटेत कुठेही पाणी नाही.

२. हेळवाकची रामघळ मार्गे: हेळवाकच्या रामघळीत जाण्यासाठी चिपळूण किंवा कराड गाठावे. चिपळूण - कराड रस्त्यावर कुभांर्ली घाट पार केल्यावर हेळवाक नावाचा फाटा लागतो. तेथे उतरून २ तासांत रामघळ गाठावी. रामघळीतूनच वर जाणारा रस्ता पकडावा. पाथरपुंज जुना वाघोना मार्गावरून आपण भैरवगडावर जाऊ शकतो. मात्र हा पल्ला फारच लांबचा असल्याने गड गाठण्यास ६ तास लागतात. वाटेत खूप घनदाट जंगल लागते. वाट तशी मळलेली नसल्याने हरवण्याचा संभव खूपच आहे. या वाटेने जायचे असल्यास वाटाडया घेऊन जाणे आवश्यक आहे.

३. गव्हारे मार्गे: गडावर जाण्यासाठी गव्हारे गावातूनही वाट आहे. दुर्गवाडी गावाच्या अगोदर गव्हारे गावाकडे जाणारा गाडीरस्ता लागतो. या गाडीरस्त्याने गव्हारे गावात पोहचावे. गावातून गडावर जाण्यास तीन तास पुरतात. ही वाट मध्येच दुर्गवाडी गावातून येणाऱ्या वाटेस मिळते.

**राहण्याची सोय :** गडावरील मंदिरात २० जणांना राहता येते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** बारमाही पिण्याच्या पाण्याची सोय आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ३ तास - दुर्गवाडी मार्गे. ७ तास - रामघळी मार्गे.

**सूचना :** पावसाळ्यात जळवांचा त्रास फार मोठ्या प्रमाणात होतो. यापासून बचाव करण्यासाठी मीठ सोबत घेऊन जाणे.

# पांडवगड

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: महाबळेश्वर

जिल्हा : सातारा

श्रेणी : मध्यम

वाई गावाला खेटूनच उभा असलेला पांडवगड त्याच्या विशिष्ट अशा रचनेमुळे नेहमी लक्ष वेधून घेतो. माथ्यावर कातळ भिंतिचा मुकुट परिधान केलेला हा किल्ला वाईहून सहज पायी जाता येण्यासारखा आहे. वाई मांढरदेव मार्गावर हा गड आहे.

**इतिहास :** चालुक्यांच्या राज्यांनतर शिलाहारांनी पन्हाळा - कोल्हापूर दख्खन या भागावर राज्य चालविले. १९९१-९२ मध्ये सापडलेल्या ताम्रलेखानुसार शिलाहार राजा दुसरा भोज याने हा किल्ला बांधला असे पुरावे आढळतात. हा किल्ला प्रथम आदीलशाहीत होता. ७ ऑक्टोंबर १६७३ मध्ये मराठ्यांनी तो जिंकला. पुढे १७०१ औरंगजेबाने हा किल्ला घेतला. त्यानंतर शाहु

महाराजांनी किल्ला पुन्हा स्वराज्यात आणला. इ.स १८१८ मध्ये इगजांनी पांडवगड आपल्या ताब्यात आणला.
गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : मेणवली गावातून आपण पहिल्या माचीवर गेलो असता तेथून जवळच भैरोबाचे मंदिर लागते. त्याच्याबाहेरच काही प्राचीन मूर्तीचे अवशेष आहेत. तेथे कातळात कोरलेल्या काही पाय-या आहेत. येथून साधारण १५ ते २० मिनिटांवर गडाचे प्रवेशद्वार लागते. कातळात कोरलेल्या पाय-यांच्या साह्याने थोडे वर गेल्यावर आपण माची सारख्या भागात प्रवेश करतो. गडाच्या उत्तरबाजुला काही टाकी आढळतात समोरच पारश्याचा एक बंगला आहे. बंगल्या समोरच कुंपण घातलेले एक टाके आहे. येथून आपण बालेकिल्ल्याच्या दिशेने चालत गेल्यावर वाटेत काही अवशेष दिसतात, तर एका ठिकाणी सलग सहा पाण्याची टाकी आढळतात, त्यापैकी एक पाण्याचं टाकं मोठे असून त्याच्या आतील बाजूस खांब देखील आहेत. गावक-यांच्या मते टाक्यातील पाण्याचा रंग वेगवेगळा होता. येथूनच एक पायवाट बालेकिल्ल्याकडे जाते. बालेकिल्ल्याला काहीश्या पाय-या व तटबंदी शिल्लक आहे. डावीकडे गेल्यावर एका उघड्या मंदिरात दगडात कोरलेली मारुतीची मूर्ती दिसते. पुढे काही अंतरावर पांडजाई देवीचे मोडकळीस आलेले मंदीर आहे. येथून पुढे गेल्यावर एक तळे आहे, आता मात्रा सुकलेल्या अवस्थेत आहे. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस इमारतीचे काही अवशेष दिसतात. या इमारतीचा पाया ३० फुट रुंद असा आहे. तसे पाहिले तर बालेकिल्ला फारच छोटा आहे. गडाच्या उत्तरेकडे थोडेसे पठार आहे. लोहगडाच्या विंचुकाट्या सारखा थोडा भाग पुढे आला आहे. गडाच्या पूर्वेकडून एक वाट धावडी गावात उतरते. याच गावा जवळ पांडवलेणी आहेत.आपण जेव्हा मेणवली गावाकडून गडावर येतो, तेव्हा जे पहिले प्रवेशद्वार आहे तेथून गडाचा संपूर्ण घेरा ही खाजगी मालमत्ता आहे. या मागची घटना अशी की पांडवगड कोण्या एका सरदाराची मालमत्ता होती यानंतर मॅपको कंपनीने तो विकत घेतला. सध्या श्री.सर्वोदय वाडीया नावाचे गृहस्थ केअरटेकर म्हणून राहतात. त्यांनी गडावर मोठया प्रमाणात वृक्षारोपण केले आहे. पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांना कुंपण घातले आहे. या गृहस्थाने गडावर एक फलक देखील लावला आहे, त्याद्वारे गडावर मद्यप्राशन ,धुम्रपान मादक पदार्थ सेवनास बंदी घातली आहे. सर्व गड फिरण्यास दोन तास पुरतात.

गडावर जाण्याच्या वाटा : १) : वाई ते मेणवली सतत गाड्यांची ये जा चालू असते. मेणवली गावा जवळून धोम धरणाचा जो कालवा गेला आहे तो पार केल्यावर समोरच पांडवगड दिसू लागतो. समोर असणा-या पठारावर गेल्यावर दोन वाटा फुटतात. येथपर्यंत येण्यासाठी गावातून अर्धातास पुरतो. दोन वाटांपैकी एक वाट लांबची आणि वळसा घालून जाणारी आहे. पहिल्या वाटेने पायथ्यावरुन गडावर जाण्यास १ तास पुरतो. या पठारावर कोळी लोकांची वस्ती आहे.
२) : दुसरी वाट गुंडेवाडी गावातून वर जाते. वाई धावडी मार्गेगुंडेवाडी गावातून वर पोहचावे. गुंडेवाडी गावातून चांगली मळलेली आणि काही ठिकाणी अलिकडेच बांधलेल्या पाय-यांची सोपी वाट आहे. यावाटेने गडमाथा गाठण्यास २ तास पुरतात.

राहण्याची सोय : १ श्री.सर्वादय वाडीया यांच्या घराबाहेरील शेड मध्ये १० जणांना राहता येते. २.पांडजाई देवीच्या मंदीरात १० ते १५ जणांना राहता येते.

जेवणाची सोय : आपण स्वत: करावी.

पाण्याची सोय : बारामही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : मेणवली मार्गे१ तास, धावडी मार्गे२ तास.

# कमळगड

किल्ल्याची उंची : ४२०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

महाबळेश्वरच्या डोंगररांगांनी अनेक ऐतिहासिक गड अलंकारासारखे धारण केले आहेत. धोम धारणाच्या जलाशयात मागील बाजूने एक डोंगररांग पुढे आलेली दिसते. दोन्ही अंगानी पाण्याचा वेढा असलेल्या या पर्वतराजीत हे एक अनोखे पाषाणपुष्प वर आले आहे. दक्षिणेकडे कृष्णानदीचे खोरे आणि उत्तरेकडे वाळकी नदीचे खोरे यांच्या मधोमध हा दिमाखदार किल्ला उभा आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : पंधरा वीस मिनिटांच्या भ्रमंती नंतर गडाच्या निकट आपण पोहचतो. वर जाताच गडमाथ्याच्या सपाटीवर प्रवेश होतो आणि आजुबाजूचा डोंगरद-यांचा सुंदर मुलूख आपल्या दृष्टीपथात येतो. एरवी आढळणारे किल्ल्यांवरील प्रवेशद्वार, बुरूज असे काहीच येथे आढळत नाहीत. गडाला जोडून येणारी एक डोंगर रांग लक्ष वेधून घेते. तिला नवरानवरी चे डोंगर म्हणतात. पुढे जमीन खोल चिरत गेलेले ४०-५० फूट लांबीचे एक रुंद भुयार दिसते. त्याला आत उतरायला

मजबूत पाय-याही आहेत. हीच ती गेरूची किंवा कावेची विहीर, उंच अशा या ५० - ५५ पाय-या उतरत जाताना आपण डोंगराच्या पोटात जात असल्यासारखे भासते. हवेतील थंडावाही वाढत जातो. तळाशी पोहचल्यावर चहुबाजूला खोल कपारी असून सर्वत्र गेरू किंवा काव यांची ओलसर लाल रंगाची माती दिसते.गडावर दक्षिणेकडे कातळाची नैसर्गिक भिंत तयार झाली आहे. तिच्यावर बुरुजाचे थोडेफार बांधकाम झाले आहे. गडावर कोठेही पाण्याचे टाके नाही. दक्षिणेकडेच गवतात लपलेले चौथ-यांचे अवशेष दिसतात. नैऋत्येला केंजळगड, त्याच्या मागे रायरेश्वराचे पठार, कोळेश्वर पठार व पश्चिमेकडे पाचगणी, पूर्वेला धोम धरण अशी रम्य सोयरिक कमळगडाला मिळाली आहे. धोमचे हेमाडपंती शिवमंदिर प्रेक्षणीय आहे. मूळ मंदिर धोम ऋषींच्या वास्तव्याने प्रसिद्ध झाले. थोर संत कवी वामन पंडित यांचीही जवळच भोमगावाला समाधी आहे.

## गडावर जाण्याच्या वाटा :

कमळगडावर जाण्याचे अनेक मार्ग आहेत. ते सर्वच ट्रेकिंगचा मनमुराद आनंद देणारे आहेत.

१) महाबळेश्वरहून :- महाबळेश्वरच्या केट्स पॉईंट वरून खाली येणा-या सोंडेवरून कृष्णा नदीच्या खो-यात उतरले की सुमारे दोन तासांत समोरच्या डोंगर उतारावरील नांदवणे गावी पोहचतो. वस्तीच्या पाठीवरील पहाडावरून तसेच वर गेले की दोन अडीच तासांत कमळगडावर पोहचता येते.

२) वाईहून :- वाईहून नांदवणे गावी येण्यास सकाळी ९.३० वाजता एस.टी. बस आहे.

३) उत्तरेकडून वाळकी नदीच्या खो-यातील असरे, रानोला वासोळे गावीही वाईहून एस.टी. ने येता येते.वासोळ्याहून येताना धोम गावापासून सुरू झालेला धोम धरणाचा जलाशय थेट गावापर्यंत साथ देतो. वासोळे गावातून पाणवठ्याच्या दिशेने चढणीस सुरुवात केली असता आपण साधारण एक ते दीड तासातच माचीजवळ येतो. वासोळे गाव हे डोंगराच्या कुशीत वसलेले निसर्ग सौंदर्याने नटलेले असे सुंदर खेडे आहे. वस्तीच्या पाठीवर उत्तुंग कडा व डोंगरमाथा आहे, दुस-या अंगाला खोलदरी आहे. पुढे गेल्यावर यू टर्न घेऊन पाऊण तासा नंतर आपण किल्ल्याच्या मुख्य पहाडावर येतो. डोंगरमाथ्यावरील घनदाट वृक्षांच्या छायेत गोरखनाथ मंदिर दिसते. येथून थोडे पुढे ५ - १० मिनिटे चालत गेल्यावर रस्त्याच्या डाव्याबाजूला एक पाण्याचे टाके लागते. पाऊल वाटेने तसेच वर गेले की १५ - २० मिनिटांचा घनदाट जंगलाचा छोटा टप्पा लागतो. नंतर मात्र आपण मोकळ्या मैदानावर येतो. येथे धनगरांची वस्ती आहे. याच पठारावरून आपणास कमळगड पूर्णपणे दृष्टीपथात येतो. वस्तीपासून उजवीकडे गडावर जाण्याची वाट आहे

**राहण्याची सोय** : गडावर रहाण्याची सोय नाही. माचीवरील गोरखनाथ मंदिरात पाच - सहा जण राहू शकतात.

**जेवणाची सोय** : नाही

**पाण्याची सोय** : गडावर नाही, गोरखनाथ मंदिराच्या थोडे पुढे छोटे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** : नांदवणे मार्गेअडीच तास

# केंजळगड

किल्ल्याची उंची : ४२६९ फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

तब्बल सव्वाचार हजार फूट उंचीवर असलेला हा रांगडा किल्ला वाई आणि रायरेश्वर दरम्यानच्या महादेव डोंगररांगांच्या एका उत्तुंग नाकाडावर उभारलेला आहे. रोहिड्याची डोंगररांग उतरतांना नैऋत्य दिशेला लांबवर एका भल्या मोठ्या पहाडाच्या डोक्यावर गांधी टोपीच्या आकाराचा केंजळगड अधून मधून दर्शन देत असतो. केळंजा व मोहनगड ही केंजळगडाचीच उपनावे आहेत.

**इतिहास** : बाराव्या शतकात भोजराजाने केंजळगडाची निर्मिती केली. सन १६४८ मध्ये हा किल्ला अदिलशहाच्या आधिपत्याखाली आला. सन १६७४ मध्ये शिवरायांचा मुक्काम चिपळूण शहरात पडला. वाई आणि आजुबाजूच्या परिसरातील सर्व किल्ले शिवरायांच्या ताब्यात आले होते मात्र केंजळगड अजून त्यांच्या ताब्यात आला नव्हता. म्हणून शिवाजी महाराजांनी केंजळगड घेण्यासाठी आपल्या मराठी फौजा पाठवल्या. गंगाजी विश्वसराव किरदत हा किल्ल्याचा किल्लेदार होता, त्याने मराठ्यांना चोख प्रत्युत्तर दिले. पण मराठ्यांकडून तो मारला गेला आणि २४ एप्रिल १६७४ मध्ये किल्ला मराठ्यांनी जिंकला. पुढे १७०१ मध्ये हा गड औरंगजेबाकडे गेला मात्र लगेच एक वर्षाने म्हणजे १७०२ मध्ये परत केंजळगड मराठ्यांच्या ताब्यात आला. २६ मार्च १८१८ साली ब्रिटिश

अधिकारी जनरल प्लिटझर याने दुर्गाचा ताबा घेतला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : कोल्र्याहून सुमारे दोन तासांच्या आल्हाददायी निसर्गभ्रमणानंतर आपण केंजळगडाच्या खांद्यावर जाऊन पोहचतो. माचीवर पूर्वेकडच्या अंगाला सपाटीवर पाच, सात खोपटांची वस्ती आहे. तिला ओव्हरी म्हणतात. मागे केंजळचा भला मोठा खडक उभा असतो. या काळ्या पहाडाच्या माथ्यावर मजबूत झाडी व गवताचे रान माजलेले दिसते. येथे मार्गदर्शक नसेल तर झाडीत उगाच भटकत बसावे लागते. म्हणून मार्गदर्शकाच्या सहाय्याने झाडीतून जाणाऱ्या वाटेने वर चढू लागले‘की आपण गडावर पोहचतो. माथ्यालगतच या गडाचे वैशिष्ट्य आपल्या निदर्शनास येते, ते म्हणजे एवढ्या उंचीवर उभ्या कातळात कोरून काढलेल्या पायऱ्या. ज्या किल्ल्याच्या पायऱ्या फार श्रम करून अवघड जागी खडकात कोरून काढल्या आहेत अश्या मोजक्या किल्ल्यांपैकी केंजळगड अग्रभागी आहे. डोंगर शिखरावरील कातळात पूर्ण लांबीच्या ५५ उंच उंच पायऱ्या आहेत. रायरेश्वरहून येतांना काळ्या कातळभिंतीपाशी येऊन पोहोचलो की, उजव्या हातास वळसा घालून गेले की, पंधरा वीस मिनिटांत आपण त्या कातळ पायऱ्यांपाशी येऊन पोहचतो. पायऱ्यांच्या खाली थोडे पुढे एक गुहा लागते. या गुहेत काळ्या रंगाचे कोळी मोठ्या संख्येने आढळतात. या गुहेच्या जरा पुढे पाण्याचे एक छोटे टाके लागते. यातील पाणी पिण्यासाठी योग्य आहे. पायऱ्यांच्या सुरवातीला दोन्ही बाजूला देवडयांचे अवशेष आहेत. पायऱ्या संपता संपता येथे पूर्वी दरवाजा होता हे सांगणारं जोते फक्त दिसते. माथा गाठल्यावर तटाजवळ एक प्रशस्त खोदलेले तळे आहे. या तळ्याचे पाणी मोठे मधुर आहे. गडाचा घेर हा लंबवर्तुळाकार आणि छोटाच आहे. चारही बाजूंनी उभे ताशीव कातळ कडे आहेत. काही ठिकाणी मजबूत अशी तटबंदी आहे. गडाच्या एका अंगास वाई प्रांताच्या दिशेस थोडी फार तटबंदी आढळते. एक पडझड झालेला बुरूजही आहे. एक सुकलेले टाके तसेच काही इमारतींचे भग्नावशेषही आढळतात. येथेच वरच्या अंगास एक चुन्याचा घाणा आहे. पुढे एक चांगली मजबूत अशी इमारत आढळते. साधारण कोठारासारखी तिची रचना आहे. काही कागदपत्रांच्या उल्लेखानुसार हे दारूचे कोठार असावे. येथून पुढे रायरेश्वराच्या दिशेने ओसाड माळ आहे. कोठारापासून दुसऱ्या दिशेने चालत गेले असता आणखी एक चुन्याचा घाणा आढळतो. दोन चुन्याचे घाणे असणे म्हणजे गडावर मोठ्या प्रमाणावर बांधकाम झालेले असले पाहिजे असे समजते. पण गडमाथ्यावर सर्व बाजूला असलेल्या छातीपर्यंत वाढलेल्या गवतामुळे ही बांधकामे शोधणे कठीण होऊन बसते. या दुसऱ्या चुन्याच्या घाण्यापुढे काही अंतरावर एका जुन्या मंदिराचे अवशेष आहेत.छप्पर नसलेल्या या देवळात केंजाई देवीची मूर्ती आहे. इथल्या रांगड्या निसर्गाला साजेश्या रांगड्या देवतांच्या इतरही काही मुरत्या आसपास आहेत.केंजळगडाची ही डोंगररांग माथ्याकडे हिरवाईने नटलेली दिसते. पावसाळ्या नंतर नजीकच्या काळात आल्यास सारी धरणी हिरव्या गवताने आच्छादलेली असते. अशा अमोघ सौंदर्याने नटलेला केंजळगड हा ट्रेकिंगसाठी आकर्षक ठिकाण ठरतो

## गडावर जाण्याच्या वाटा :

१) .रायरेश्वरमार्गे:- रायरेश्वरच्या देवळाकडे पाठ करून उजवीकडील शेताच्या बांधावरून टेकडीखाली उतरले की समोर केंजळगडाचा घेरा, बालेकिल्ला आणि रायरेश्वरला जोडणारी डोंगररांग स्पष्ट दिसते. आणखी दहा मिनिटे चालल्यावर पठार संपते. तेथून खाली उतरायला एक लोखंडी शिडी आहे. शिडीने खालच्या धारेवर उतरावे. उजवीकडे खाली खावली गाव दिसते. समोर केंजळगडाच्या पाठीमागे असलेल धोम धरणातील पाणी आणि त्याच्याच पलीकडे असलेला कमळगडाचा माथा आपल्याला खुणावत असतो. त्याच वाटेने दीड-एक तास चालत राहिले की केंजळगडाच्या उभ्या कातळभिंतीशी येऊन पोहचतो.

२) कोर्लेमार्गे:- भोरहून सकाळी साडेसात वाजता कोर्लेया गावी एस्.टी. बस येते. तासाभरात बस कोर्ल्याला पोहचते. तेथून पश्चिमेला केंजळचा मार्ग जातो तर उत्तरेला रायरेश्वराचे पठार दिसते. भोरहून आंबवड्याला दिवसातून दहा बसेस येतात. आंबवड्याला उतरूनही कोर्ल्याला पायी ( साधारण ६किमी ) जाता येते. चिखलवडे, टिटेघरकडे येणाऱ्या एस.टी. नेही कोर्लेगाठता येते. कोर्ल्याहून गडावर दोन तासात पोहचता येते.

३) वाईमार्गेगडावर येण्यासाठी आणखी एक मार्ग आहे. वाईहून खावली गावी यावे. खावली गावी जेथे एस.टी. थांबते तेथून थोडे पुढे ५ - १० मिनिटे चालल्यावर उजवीकडे गडावर जाणारा रस्ता दिसतो. अर्धा गड चढून गेल्यावर थोडी वस्ती लागते. येथपर्यंतचा रस्ता ही एक कच्ची सडक आहे. येथून पुढे पायवाटेने अर्धा - एक तासात आपण गडावर येतो. गडाच्या कातळाजवळ आल्यावर आपण डोंगरसोंडेवरुन येणाऱ्या वाटेवर येतो.

**राहण्याची सोय** : गडावर राहण्याची सोय नाही. तंबू ठोकून राहता येऊ शकते. पण वारा प्रचंड असतो. दुसरी सोय म्हणजे ओव्हरीची वस्ती. जेमतेम पाच-सात घरांची ही आदिवासी वस्ती असली तरी तेथील केंजळाई देवळात दहा-बारा जणांची रहाण्याची सोय होऊ शकते.

**जेवणाची सोय** : जेवणाची सोय आपणच करावी.

**पाण्याची सोय** : गडावरील तळ्याचे पाणी पिण्यासाठी वापरता येऊ शकते. कातळ पायऱ्यांच्या खाली थोडे पुढे एक गुहा लागते.

या गुहेच्या जरा पुढे पाण्याचे एक छोटे टाके लागते. यातील पाणी पिण्यासाठी उपयुक्त आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : १) रायरेश्वर रस्ता ते केंजळगड - ३ तास,

# वैराट गड

किल्ल्याची उंची : ३३४० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर
जिल्हा : सातारा
श्रेणी : मध्यम

वैराट गड हा वाई प्रांतात येणारा किल्ला आहे. वाई पासून ८ कि.मी अंतरावर असणारा हा किल्ला एका दिवसात पाहून येऊ शकतो. पायथ्याच्या गावापर्यंत जाणाऱ्या बसेस व इतर गाड्या यामुळे या परिसरातील भटकंती फारच सोपी आहे.

इतिहास : वैराटगड हा शिलाहार राजा भोज ह्याने अकराव्या शतकात बांधला. शिवकाळातही किल्ला केवळ एक लष्करी ठाणे म्हणूनच वापरात होता. शिवरायांनी जेंव्हा वाई प्रांत जिंकला तेव्हा ह्या परिसरातील वैराटगड, पांडवगड हे किल्ले देखील स्वराज्यात सामील करून घेतले. पुढे १८१८ मध्ये किल्ला इंग्रजांनी

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : गडमाथा फारच लहान आहे. गडावर थोड्याफार प्रमाणात काही पडक्या वस्तूंचे अवशेष आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस कड्याच्या खालच्या बाजूस पाच ते सहा टाकी आहेत. उजव्या बाजूस छोटी गुहा आहे. साधारणत: २० ते २५ पायऱ्या चढून आपण गडावर पोहचतो. डाव्या हातालाच मारुतीचे मंदिर आहे. तर मंदिराबाहेर सुद्धा मारुतीची एक मूर्ती आहे. आजुबाजूला काही प्रमाणात चौथरे दिसतात. गडाची तटबंदी अजूनही बऱ्याच प्रमाणात शाबूत आहे. गडावर एक सदर आहे. तिची रुंदी साधारण १० फूट आहे. गडाच्या प्रवेशद्वाराच्या विरुद्ध दिशेला कड्यामध्ये एक खाच आहे ह्यातून म्हसव गावाकडे उतरता येते. त्याच्या जवळच एक उंचवटा आहे. तेथे दगडावर अस्पष्ट असे लिखाण आहे. गडाच्या आजुबाजूला अनेक अवशेष इतस्थत: पसरलेले आढळतात. थोडे शोधकार्य केल्यास आणखी काहीतरी सापडू शकेल. गड फिरण्यास १ तास लागतो.

गडावर जाण्याच्या वाटा : गडावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत. त्यासाठी व्याजवाडीला पोहचावे. वाई सातारा मार्गावर ४ कि.मी वर कडेगाव पूल येथे उतरावे. येथून व्याजवाडी या गावात यावे. गावातून गडावर जाण्यास दोन वाटा आहेत. एक वाट चांगली मळलेली आहे. मात्र ही जरा फिरून जाते. तर दुसरी वाट डाव्या बाजूच्या नाकाडावरून जाते. साधारणत: या वाटेने १/२ तास गड गाठण्यास लागतो. तर पहिल्या वाटेने १ तास लागतो. पुढे दोन्ही वाटा एकत्र मिळतात आणि १० मिनिटे गडमाथा गाठण्यास लागतो. शेवटच्या टप्प्यावरची वाट प्रचंड निसरडी आहे. व्याजवाडीच्या विरुद्ध बाजूस 'म्हसव' नावाचे गाव आहे. या गावातून सुद्धा एक वाट आहे. मात्र ही वाट खूप निसरडी आहे.

राहण्याची सोय : गडावरील मारुती मंदिरात अंदाजे ८ ते १० जणांची राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : गडावर गगनगिरी महाराजांचे शिष्य राहतात. त्यांच्याकडे २ - ४ जणांची जेवणाची सोय होते. जास्त लोक असतील तर जेवणाची सोय आपणच करावी.

पाण्याची सोय : बारमाही पिण्याची सोय आहे. प्रवेशद्वाराच्या डावीकडे ५ ते ६ पिण्याच्या पाण्याच्या टाकी आहेत.

जाण्यासाठी लागणारा वेळ : एक ते दीड तास

# वर्धनगड

{कल्ल्याची उंची : १५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा - फलटण
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

हा किल्ला सातराच्या महादेव डोंगर रांगेवरील भांडलीकुंडल नावाचा जो फाटा आहे त्यावर कोरेगाव व खटाव तालुक्याच्या सीमेवर कोरगावच्या ७ मैलांवर व साताराच्या ईशान्येस १७ मैलांवर बांधलेला आहे.किल्ल्याला लागूनच असलेल्या लालगून व रामेश्वर ह्या दोन डोंगरावरून किल्ल्यावर तोफांचा चांगला _ारा करता येत असे.

**इतिहास** सन ५ में ७०१ मध्ये मोगलांनी पन्हाळा जिंकला त्यानंतर औरंगजेबाने आपले लक्ष्य साता-यातील किल्ल्यांकडे वळवले.मोगल सरदार फतेउल्लाखान याने सल्ला दिला  की '' बादशहांनी खटावला छावणी करावी म्हणजे पावसाळ्यात चंदन-वंदन व नांदगिरी हे किल्ले जिंकून घेता येतील.'' औरंगजेबाने मंजुरी दिली .दि ८ जून  ला फतेउल्लाखान आपल्याबरोबर काही सैन्य घेऊन खटावच्या बंदोबस्तासाठी गेला.त्याने खटावचे ठाणे जिंकले.मराठ्यांचा पराभाव झाला.यानंतर मोगलांची फौज  खटावच्या ठाण्यात जमा हाऊ लागली होती.आज न उद्या हे सैन्य वर्धनगडाला वेढा घालणार हे निश्चित होतं म्हणून वर्धनगडातील मराठ्यांनी किल्ल्याच्या पायथ्याशी  असलेल्या वाड्यांतील लोकांना आक्रमणाची अगाऊ कल्पना दिली होती.ज्या  लोकांना शक्य होते त्यांनी आपल्या बायकामुलाना किल्ल्यात नेले.नंतर  वर्धनगडाच्या किल्लेदाराने आपला एक वकील फतेउल्लाखाना जवळ पाठवला .त्याने याला सांगितले की ''किल्लेदाराला प्राणाचे अभय मिळत असेल तर तो मोगलांना  किल्ला दण्यास तयार आहे.''फतेउल्लाखानाने विनंती ताबडतोब मान्य केले. फतेउल्लाखानाकडे वकील पाठवून किल्ला ताब्यात देण्याची बोलणी करणे हा वेळाकाढूपणा होता. मोगलांचा किल्ल्यावर होणारा हल्ला पुढे ढकलणे हा त्यामागचा हेतू होता.किल्लेदाराने किल्ल्याच्या संरक्षणासाठी सैन्याची जमवाजमव करणे हा त्यामागील  हेतू होता. फतेउल्लाखान किल्लेदार आज येईल उद्या येईल म्हणून वाट पहात राहीला पण एकही मराठा सैनिक त्याच्याकडे फिरकलासुध्दा नाही.फतेउल्लाखानाला मराठयाचा खेळ लक्षात आला आणि त्याने १३ जून रोजी किल्ल्यावर हल्ला चढवला.त्याला मराठ्यांनी चोख प्रत्युत्तर दिले.पण यात अनेक मराठे मारले गेले अनेकजण  जखमी झाले.मोगलानी मराठ्यांच्या चाळीस लोंकाना कैद केले.मग मोगलानी किल्ल्याच्या पायथ्याच्या अनेक वाडया जाळून टाकल्या.या लढाईत मोगलांचे पण अनेक सैनिक प्राणास मुकले.दि.१९जूनला रात्री मराठ्यांनी वर्धनगड सोडला.दि.२२ जन रोजी 'मीर ए सामान ' या खात्याचा व्यवस्थापक अली रजा हा वर्धनगडातील  मालमत्ता जप्त करण्यासाठी गेला.त्याने किल्ल्यातून सहाशे पंचाहत्तर मण धान्य ,  चाळीस मण सोरा व बंदुकीची दारू ,सहा मोठ्या तोफा व जंबुरक असा माल जप्त केला.त्याच दिवशी औरंगजेबाने किल्ल्याचे नाव बदलून 'सादिकगड' असे ठेवले.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** गडाचे प्रवेशद्वार हे पूर्वाभिमुख असून गोमुखी बांधणीचे आहे.आजही ते  सुस्थिति उभे आहे.दरवाज्यापासूनच किल्ल्याची तटबंदी चालू होते तर ती संपूर्ण गडाला वळसा घालून पुन्हा दरवाजाच्या दुस-या टोकाशी येऊन पोहचते. ही तटबंदी आजही चांगल्या स्थितित शाबूत आहे.दरवाजातून आत शिरल्यावर डावीकडेच एक ध्वजस्तंभ आहे.या ध्वजस्तंभाच्या थोडे पुढे गेल्यावर तटातून बाहेर पडण्यासाठी चोरवाट तयार केलेली आहे.

दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच एक माठे टेकाड दिसते.यावर चढून जाण्यासाठी दगडाच्या बांधलेल्या पाय-या आहेत.या टेकाडावर चढून जातांना वाटेतच हनुमानाची भग्न दगडी मूर्ती आहे.पुढे शंकराचे छोटेसे देऊळ लागते.त्याच्याच बाजूला पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.प्रवेशद्वारापासून टेकाडावर असणा-या मंदिरापर्यंत  पोहचण्यासाठी १५ मिनिटे पुरतात.टेकाडावर  असणारे मंदिर हे गडाची अधिष्ठात्री वर्धनीमातेचे आहे.मंदिर जीर्णोध्दारीत असल्यामुळे सध्या रंगरंगोटी केल्यामुळे आकर्षक दिसते. मंदिरासमोर फरसबंदी  चौथरा बांधलेला आहे.मंदिराचा सभामंडप प्रशस्त आहे. वर्धनीमाता नवसाला पावत असल्यामुळे कौल लावण्यासाठी भाविकांची गर्दी चालूच असते.मंदिराच्या गाभा-यात सुंदर कासवाची मूर्ती कोरलेली आहे मंदिराच्या मागच्या बाजूने टेकाडावरून खाली उतरते.यावाटेने खाली उतरतांना उजवीकडे पाण्याची टाकी आढळतात. संपूर्ण गड फिरण्यास एक तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** किल्ल्यावर जाण्यासाठी फलटण किंवा सातारा या दोन्ही बाजूंनी रस्ते आहेत. वर्धनगड गावातूनच किल्ल्याची भक्कम तटबंदी दिसते.आजही किल्ल्याची तटबंदी  चांगल्या स्थितित शाबूत आहे.पायथ्याच्या वर्धनगड गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी  एक प्रशस्त वाट आहे.ही वाट थेट गडाच्या प्रवेशद्वारापाशी पोहचवते.या वाटेने  गडाचा दरवाजा गाठण्यास अर्धा तास लागतो.वर्धनगड गावात शिरतांना दोन तोफा  आपले स्वागत करण्यासाठी मोठ्या डौलाने उभ्या आहेत.

१. फलटणमार्गे

फलटणमार्गेवर्धनगड गावात दोन मार्गांनी पोहचता येते.

१ - फलटण - मोळघाट - पुसेगाव गाठावे.यामार्गेपुसेगाव गाव फलटण पासून ४१ कि.मी वर आहे.

२ - फलटण - दहिवडी मार्गेपुसेगाव गाठावे यामार्गेपुसेगाव गाव फलटण पासून ४५ कि.मी वर आहे.

पुसेगावापासून साता-याकडे जाणा-या रस्त्यावर ५ कि.मी अंतरावर वर्धनगड गाव फाटा आहे. वर्धनगडगाव हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.फलटण ते पुसेगाव अशी एस टी सेवा उपलब्ध आहे.

२. सातारामार्गे

सातारा - पंढरपूर मार्गावर पुसेगावच्या अलिकडे ५ कि.मी वर वर्धनगड गावाचा फाटा आहे.सातारा पुसेगाव अशी एस टी सेवा उपलब्ध आहे.

**राहण्याची सोय :** गडावरील वर्धनीमातेचे मंदिरात अंदाजे ८ ते १० जणांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपणच करावी.

**पाण्याची सोय :** बारमाही पिण्याची सोय आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** अर्धा तास

# संतोषगड

किल्ल्याची उंची : २९०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा - फलटण
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

सह्याद्रीची मुख्य डोंगररांग प्रतापगडापासून तीन भागांमध्ये विभागली गेलेली आहे.शंभूमहादेव रांग ,बामणोली रांग आणि म्हसोबा रांग यापैकी म्हसोबा डोंगररंगेवर संतोषगड,वारुगड,महिमानगड आणि वर्धनगड हे किल्ले आहेत.हा सर्व परिसर तसा कमी पावसाचाच मात्र ऊसाच्या शेतीमुळे सर्व परिसर सधन झालेला आहे.सर्व ठिकाणी वीज ,दूरध्वनी अशा आधुनिक सुविधा सुध्दा उपलब्ध आहेत.फलटण च्या माण तालुक्यात असणा-या या किल्ल्यांना पाहण्यासाठी दोन दिवस पुरतात.संतोषगडाला ताथवड्याचा किल्ला असे ही म्हणतात.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** आज किल्ल्याचा दरवाजा मात्र केवळ नाममात्रच शिल्लक राहिलेला आहे.दरवाज्यामधील पहारेक-यांचा देवड्या आजही सुस्थितित आहेत.दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच हनूमानाचे टाके आहे.त्याच्याच मागे वाड्यांचे व घरांचे अवशेष आहेत.धान्य कोठारांच्या भिंति उभ्या आहेत पण छप्पर उडालेले आहे.याच्याच मागच्या बाजूला एक मोठा खड्डा आहे.लांबवरून पाहिल्यास एखादी विहीरच वाटते मात्र जवळ गेल्यावर समजते की खाली पाण्याचं टाकं आहे आणि टाक्यात उतरण्यासाठी चक्क कातळभिंतिला भोक पाडून पाय-या केलेल्या आहेत.किल्ल्याची पहिल्या टप्प्यावर असणारी संरक्षक तटबंदी , बुरुज आजही चांगल्या परिस्थित उभे आहेत.आजमितिस अनेक किल्ल्यांची तटबंदी ढासळलेल्या आढळतात पण संतोषगडयाला अपवाद आहे.किल्ल्याचा संपूर्ण परिसर भटकण्यास दोन तास पुरतात.किल्ला सा छोटासाच आहे पण तटबंदी ,बुरुज असे पाहण्यासाखे बरेच काही आहे.गडावरून फार दूरच्या प्रदेशावर नजर ठेवता येत असे.पश्चिमेस मोळघाट,दक्षिणपूर्व पसरलेली डोंगररांग याच डोंगररांगेवर सीताबाईचा डोंगर व वारूगड आहे.

**गडावर जाण्याच्या वाटा :** ह्या किल्ल्यावर जाण्यासाठी फलटण आणि सातारा दोन्ही शहरातून जाता येते.ताथवडे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.ताथवडेला अनेक मार्गांनी पोहचता येते.फलटण ते ताथवडे अशी एस टी सेवा दर अर्ध्या तासाला उपलब्ध आहे.फलटण ते ताथवडे हे साधारण १९ कि.मी चे अंतर आहे.साता-याहून पुसेगाव मोळघाटमार्गेफलटणला जाणा-या बसने ताथवडे ला उतरता येते.पुसेगाव ते ताथवडे हे साधारण २३ कि.मी चे अंतर आहे.ताथवडे गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी व्यवस्थित वाट आहे.या वाटेने किल्ल्यावर जाण्यास अर्धा तास लागतो.ताथवडे गावात 'बालसिध्दचे जीर्णोध्दार' केलेले मंदिर आहे.मंदिराच्या पायरीवरून सन १७६२ मध्ये किल्ल्याचा जीर्णोध्दार केल्याचे समजते.गड हा तीन भागात विभागला आहे.पहिल्या टप्प्यावर सरंक्षक तटबंदी तर दुस-या टप्प्यावर माचीचा भाग आणि सर्वात वरचा बालेकिल्लाचा भाग आहे. किल्ल्यावर जाण्याच्या वाटेवर एक मठ आहे.या मठाच्याच बाजूला एक गुहा आहे.या गुहेत थंड पाण्याचा साठा आहे.एक वाल्मिकी ऋषिंची मूर्ती आहे.मठाच्याच वरच्या बाजूला एक दरवाजा आहे मात्र येथपर्यंत पोहचण्यासाठी वळसा घालून यावे लागते.मठाच्या डाव्या बाजूला जाणारी वाट तटबंदीला चिटकूनच पुढे जाते.पुढे वाटेतच एक छोटेसे देऊळ लागते.येथून वर थोडी उजवीकडे सरकत जाणारी वाट आपल्याला थेट किल्ल्याच्या दरवाज्यातच घेऊन जाते.गड हा तीन भागात विभागला आहे.पहिल्या टप्प्यावर सरंक्षक तटबंदी तर दुस-या टप्प्यावर माचीचा भाग आणि सर्वात वरचा बालेकिल्लाचा भाग आहे. किल्ल्यावर जाण्याच्या वाटेवर एक मठ आहे.या मठाच्याच बाजूला एक गुहा आहे.या गुहेत थंड पाण्याचा साठा आहे.एक वाल्मिकी ऋषिंची मूर्ती आहे.मठाच्याच वरच्या बाजूला एक दरवाजा आहे मात्र येथपर्यंत पोहचण्यासाठी वळसा घालून यावे लागते.मठाच्या डाव्या बाजूला जाणारी वाट तटबंदीला चिटकूनच पुढे जाते.पुढे वाटेतच एक छोटेसे देऊळ लागते.येथून वर थोडी उजवीकडे सरकत जाणारी वाट आपल्याला थेट किल्ल्याच्या दरवाज्यातच घेऊन जाते.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही .

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपणच करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर पिण्याचे पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ताथवडे गावातून अर्धा तास.

# वारुगड

किल्ल्याची उंची : ३००० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा - फलटण
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

माणागंगा नदी जिथे उगम पावते त्या सीताबाईच्या डोंगरात डाव्या कुशीवर एक किल्ला आहे त्याचे नाव आहे वारुगड.किल्ला माण तालुक्यात दहिवडीच्या ईशान्येस २० मैलांवर आहे.

इतिहास :

किल्ला शिवरायांनी बांधला असे सांगतात.या किल्ल्याचा किल्लेदार परभूजातीचा होता.२०० पहारेकरी व बरीच शिबंदी किल्ल्यावर होती.१८१८ मध्ये सातारच्या राजाच्या फडणीस विठ्ठलपंत याने २०० लोक पाठवून दुस-या बाजीरावाकडून घेतला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** किल्ला हा दोन भागात मोडतो.एक गडाची माची तर दुसरा बालेकिल्ला.

१. वारुगड माची

किल्ल्याच्या माचीवर गेल्यावर समजते की गडाचा घेरा केवढा मोठा आहे.किल्ल्याची माची ही संपूर्ण तटबंदीवेष्टीत आहे.आजही ती ब-याच मोठ्या प्रमाणावर शाबूत आहे. बालेकिल्ल्यावर जाणारा मार्ग हा या माचीतूनच पुढे जातो.या माचीत शिरण्यासाठी पूर्वी ५ दरवाजे होते.मात्र सद्य स्थितिला दोनच शिल्लक आहे गिरवी जाधववाडी या मार्गेमाचीत प्रवेश करणारी वाट एका दरवाजातून वर येते.तर मोंगळ - घोडेवाडी माचीत प्रवेश करणारी वाट दुस-या दरवाजातून वर येते. माचीवर घरांचे ,वाड्यांचे अनेक अवशेष आहेत.दोन ते तीन पाण्याची टाकी,तळी सुध्दा आहेत.माचीवर भैरोबाचे जीर्णोध्दारीत मंदिर सुध्दा आहे.मंदिर प्रशस्त असल्याने येथे राहण्याची सोय होऊ शकते.संपूर्ण माची फिरण्यास दोन तास लागतात.

२. बालेकिल्ला

गिरवी जाधववाडीतून माचीवर येणारा रस्ता दरवाजातून पुढे गेल्यावर दोन भागात विभागला जातो.उजवीकडे आणि डावीकडे जाणरा रस्ता माचीवरील घोडेवाडीकडे जातो तर सरळ वर जाणारी वाट १५ मिनिटात बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी येऊन धडकते.दरवाजाची तटबंदी आजही शाबूत आहे.बालेकिल्ल्यावर पोहचल्यावर समोरच एक सदरेची इमारत आहे.आज ती पूर्णपणे नव्याने बांधून काढलेली आहे.समोरच पाण्याचे टाके व एक विहीर आहे.विहीर ब-याच प्रमाणात बुजलेली आहे. किल्ल्यावरून समोरचा परिसर पाहीला की आपल्याला जाणवते की किल्ला किती मोक्याच्या ठिकाणी वसलेला आहे.समोरच दिसणारा सीताबाईचा डोंगर , महादेव डोंगररांग हा परिसर दिसतो.संतोषगडवरून सीताबाईच्या डोंगरातून एक वाट वारुगडावर येते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** वारुगडावर जायचे असल्यास फलटण गाठावे.फलटण पासून किल्ल्यावर जाण्यास अनेक मार्ग आहेत. वारुगड मुख्यत: दोन भागात विभागला आहे.एक गडाची माची यावर घोडेवाडी नावाची वस्ती आहे. तर दुसरा वारुगडाचा बालेकिल्ला. बालेकिल्ल्यात जाण्यासाठी माचीतूच जावे लागते.माचीत जाण्यासाठी दोन मार्ग आहेत एक गाडीरस्ता आहे जो थेट माचीत जातो तर दुसरा मार्ग म्हणजे पायवाट जी थेट किल्ल्यावर घेऊन जाते.

१. फलटण ते गिरवी

फलटण ते गिरवी अशी एस टी सेवा उपलब्ध आहे.गिरवीतून ५ किमी अंतरावर असणारा जाधववाडा गाठावा.जाधववाडा हे किल्ल्याच्या पाययाचे गाव आहे.येथून वारुगड माचीवर जाण्यास २ तास लागतात.माचीतून बालेकिल्ल्यावर जाण्यास २० मिनिटे पुरतात.

२. फलटण दहीवडी

फलटण दहीवडी रस्त्यावर फलटण सोडल्यानंर २० किमी अंतरावर मोंगळ नावचा फाटा लागतो.या फाट्यापासून एक कच्चा गाडीरस्ता थेट माचीवरील घोडेवाडी वस्तीत घेऊन जातो.मोंगळ ते घोडेवाडी अंतर १५ कि.मी चे आहे. फलटण दहीवडी रस्त्यावर फलटण सोडल्यानंर २६ किमी अंतरावर बीजवाडी नावचे गाव लागते.या गावातून एक कच्चा गाडीरस्ता थेट माचीवरील घोडेवाडीत जातो.पुढे हा रस्ता वर सांगतिलेल्या रस्त्याला येऊन मिळतो.

**राहण्याची सोय :** वारुगडाच्या माचीवर असणा-या भैरवगडाच्या मंदिरात १०० लोंकांची सोय होते..

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपणच करावी.

**पाण्याची सोय :** माचीवर बारामही पिण्याचे पाण्याची टाकी आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** जाधववाडीतून दोन तास लागतो.

**जाण्यासाठी उत्तम कालावधी :** सर्व ऋतुत जाता येते.

# महिमानगड

किल्ल्याची उंची : ३००० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सातारा - फलटण
जिल्हा : सातारा
श्रेणी : सोपी

किल्ला माण तालुक्यात दहिवाडी नावाच्या खेड्याच्या पश्चिमेला ५.५० मैलांवर शिद्रिबुद्रुक खेड्यात येतो.सातारा जिल्ह्यातील माण तालुका हा कमी पावसाचा त्यामुळे पावसाचे दुर्भिक्ष याच्या पाचवीला पुजलेलं.

इतिहास :

सातराच्या पूर्वेकडील प्रांताचे संरक्षण करण्याकरीता शिवरायांनी जे किल्ले घेतले त्यापैकीच एक महिमानगड. पूर्वी किल्ल्याच्या रक्षणाकरीता महार रामोशी मिळून ७५ इसम ठेवलेले होते.किल्ल्याचा हवालदार आणि सबनीस यांची इनामे अद्यापही वंशज पाटील व कुळकर्णी यांच्याकडे चालू आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** गडाच्या प्रवशद्वाराच्या चौकटीतच हत्तीचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. प्रवशद्वारातून आत शिरल्यावर समोरच हनुमानाचे बिनछप्पराचे देऊळ दिसते.त्याच्या समोरच बुरुजावर जाण्यासाठी केलेल्या पाय-या दिसतात.येथून थोडे पुढे गेल्यावर समोरच पाण्याचे सुंदर तलाव आहे.तलाव ब-यापैकी खोल आहे.या तलावाला बारामही पाणी असते.त्याच्याच बाजूला वाड्यांचे भनावशेष दिसतात.येथून संपूर्ण गडाची तटबंदी नजरेस पडते.गडाच्या ईशान्येस गडाची एक सोंड लांबवर गेलेली दिसते.या सोंडेला पकडून एक डोंगररांग पुढे गेलेली आहे.या सोंडेवर थोडेफार वाड्याचे अवशेष दिसतात.किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या आजुबाजुला असणारी तटबंदी चांगल्या स्थितित शाबूत आहे.गड फिरण्यास साधारण अर्धातास पुरतो किल्ल्यावरून वर्धनगड,ईशान्येकडे असणारा मोळ घाट असा सर्व परिसर दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** १. महिमानगड गाव मार्गे

किल्ल्यावर जाण्याचा मार्ग हा सातारा - पंढरपूर मार्गावर पुसेगावच्या पुढे १२ कि.मी अंतरावर असणा-या महिमानगड फाट्यावरून पुढे जातो.दहिवडी कडून साता-याकडे येणा-या रस्त्यावरुन सुध्दा महिमानगड फाट्यावर उतरता येते. महिमानगड फाट्यावरून महिमानगड गावात जाण्यास वीस मिनिटे लागतात.फलटण - दहिवडी मार्गेसातारा गाडी किंवा सातारा पुसेगावमार्गेपंढरपूर जाणारी गाडी देखील महिमानगड फाट्यापाशी थांबते.महिमानगड गावातूनच किल्ल्यावर एक पायवाट जाते.या वाटेने गड गाठण्यास २५ मिनिटे पुरतात.गडावर चढतांना त्याच्या अभेद्यपणा प्रत्येक क्षणोक्षणी जाणवत असतो.गावाच्या जिल्हापरिषदेच्या कायार्लया समोरूनच एक वाट गडावर जाते.वाट थेट प्रवशद्वारातच घेऊन जाते.प्रवशद्वाराचे बुरुज आजही चांगल्या अवस्थेत आहेत.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर नाही.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपणच करावी.

**पाण्याची सोय :** गडावर नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** महिमानगड गावातून अर्धातास.

**जाण्यासाठी उत्तम कालावधी :** सर्व ऋतुत जाता येते.

# नगर जिल्हा

# हरिश्चंद्रगड

किल्ल्याची उंची : ४००० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माळशेज
जिल्हा : नक्षर
श्रेणी : मध्यम

हरिश्चंद्रगड म्हणजे नगर जिल्ह्याचे महाबळेश्वरच ! ठाणे, पुणे आणि नगर यांच्या सीमेवर माळशेज घाटाच्या डावीकडे उभा असणारा अजस्त्र पर्वत म्हणजे हरिश्चंद्रगड. एखाद्या स्थळाचा अथवा गडाचा किती विविध प्रकारे अभ्यास करता येतो याचा सुरेख नमुना म्हणजे हरिश्चंद्रगड. या गडाचा इतिहास कुतूहलजनक तर भूगोल हा विस्मयकारक आहे. इतर सर्व किल्ल्यांना मोगल अथवा मराठे

यांच्या इतिहासाची पार्श्वभूमी आहे तर हरिश्चंद्रगडाला तर दोन चार हजार वर्षापूर्वीची पौराणिक पार्श्वभूमी लाभली आहे. साडेतीन हजार वर्षांहूनही प्राचीन असलेल्या चहुबाजूंनी तुटलेल्या रौद्रभीषण कडेकपारींनी नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या या हरिश्चंद्रगडाचा उल्लेख प्राचीन अग्नीपुराणात व मत्स्यपुराणात आढळतो. १७४७-४८ मध्ये हा किल्ला मराठ्यांनी मोगलांकडून घेतला आणि किल्लेदार म्हणून कृष्णाजी शिंदे यांची नियुक्ती केली .

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** : टोलारखिंडीच्या वाटेने गडावर आल्यावर आपण रोहीदास शिखरापाशी पोहचतो. येथून तास दीड तासात आपण तारामती शिखरापाशी पोहचतो. पायथ्याशीच हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर आहे.

हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर : तळापासून या मंदिराची उंची साधारणतः सोळा मीटर आहे. मंदिराच्या प्रांगणात प्राकाराची भिंत आहे. या प्राकाराच्या भिंतीसमोरच एक दगडी पूल आहे. या पुलाच्या खालून एक ओढा तारामती शिखरावरून वाहत येतो यालाच 'मंगळगंगेचा उगम' असेही म्हणतात. पुढे ही नदी पायथ्याच्या पाचनई गावातून वाहत जाते. मंदिराच्या आवारात अनेक गुहा आहेत. काही गुहा रहाण्यासाठी योग्य आहेत तर काही गुहांमध्ये पाणी आहे. या गुहांमधील पाणी थंडगार व अमृततुल्य आहे. मंदिराच्या मागे असणा-या गुहेमध्ये एक चौथरा आहे. या चौथ-यात जमिनीत खाली एक खोली आहे. यावर प्रचंड शिळा ठेवली आहे. या खोलीत 'चांगदेव ऋषींनी' चौदाशे वर्ष तप केलं आहे असे स्थानिक गावकरी सांगतात. 'शके चौतिसे बारा । परिधावी संवत्सरा । मार्गशिर तीज (तेरज) रविवार । नाम संख्य ॥ हरिश्चंद्रनाम पर्वतु । तेथ महादेव भक्तु । सुरसिध्द गणी विरुयातु । सेविजे जो ॥ हरिश्चंद्र देवता ॥ मंगळगंगा सरिता । सर्वतीर्थ पुरविता सप्तस्थान । ब्रम्हस्थळ ब्रम्ह न संडीतु । चंचळ वृक्षु अनंतु । लिंगी जगन्नाथु । महादेओ ॥ जोतीर्थासि तीर्थ । केदारांसि तुकिनाति । आणि क्षेत्री निर्मातिबंधु हा॥ ' हे चांगदेवाविषयीचे लेख मंदिराच्या प्राकारात , खांबांवर , भिंतींवर आढळतात. श्री चांगदेवांनी येथे तपश्चर्या करून 'तत्वसार' नावाचा ग्रंथ लिहिला. येथील एका शिलालेखावर, चक्रपाणी वटेश्वरनंदतु । तस्य सुतु वीकट देऊ ॥ अशा ओळी वाचता येतात. मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरच एक छोटे मंदिर आहे. यातही महादेवाची पिंड आहे. या छोट्या मंदिरासमोरच एक भग्न अवस्थेतील मूर्ती आहेत. त्यातील पाषाणावर राजा हरिश्चंद्र डोंबा-यांच्या घरी कावडीने पाणी भरत असलेला प्रसंग चित्रित केला आहे.

केदारेश्वराची गुहा : मंगळगंगेच्या प्रवाहाच्या दिशेने गेल्यावर डाव्या हातास एक गुहा लागते. यालाच केदारेश्वराची गुहा असेही म्हणतात. या गुहेत १ मीटर उंच आणि २ मीटर लांब असे शिवलिंग आहे. यात कमरभर पाणी आहे. ही गुहा खरंतर चार खांबांवर तोलली होती पण सद्यःस्थितीला एकच खांब शाबूत आहे. याच गुहेत एक खोलीही आहे.खोलीच्या डाव्या हाताच्या भिंतीवर शिवपूजनाचा प्रसंग कोरलेला आहे. या शिवलिंगाला प्रदक्षिणा घालावयाची असल्यास बर्फतुल्य पाण्यातून जावे लागते.

तारामती शिखर : तारामती शिखर गडावरील सर्वात उंच शिखर आहे. साधारणतः उंची ४८५० फूट. शिखराच्या पोटात एकूण सात लेणी आहेत. त्यापैकी एका गुंफेत गणेशाची सुमारे साडेआठ फूटाची भव्य आणि सुंदरमूर्ती आहे. याच गणेशगुहेच्या आजुबाजूला अनेक गुहा आहेत. यातही राहण्याची सोय होते. गुहेच्यासमोर उभे राहिल्यावर डावीकडे जाऊन पुढे वर जाणारी वाट आपल्याला अर्ध्या तासाच्या चढाईनंतर तारामती शिखरावर घेऊन जाते. या शिखरावरून समोरच दिसणारे जंगल, घाटावरचा आणि कोकणातील प्रदेश न्याहाळता येतात. शिखरावर जाताना वाटेत अनेक गोमुख आढळतात. माथ्यावर दोन ते तीन शिवलिंग आढळतात.

कोकणकडा : कोकणकडा म्हणजे हरिश्चंद्रगडावरील सर्वात मोठे आकर्षण. कोकणकडा म्हणजे गिर्यारोहकांना आकर्षणाचे स्थान . अर्ध्या किलोमीटर परिघाचा , वाटीसारखा अर्धगोल आकाराचा काळाकभिन्न रौद्रभीषण कोकणकडा हा एकमेवाद्वितीय असावा. कड्याची सरळधार १७०० फूट भरेल. पायथ्यापासून कड्याची उंची साधारणतः ४५०० फूट भरते. संध्याकाळच्या वेळी सूर्यास्ताचा नयनरम्य सोहळा या कड्यावरून पहाण्यात जो आनंद आहे तो अवर्णनीयच आहे. १८३५ मध्ये कर्नल साईक्सला येथे इंद्रव्रज दिसले. येथील निसर्गसौंदर्यावर लुब्ध होऊन एका तरुणाने या कड्यावरून उडी घेतली त्याच्या नावाची संगमरवरी पाटी येथे आहे.

गडावर चहापाण्याची व जेवणाची सोय होते. पावसाळ्यात मात्र या गडाचे सौदर्य काही औरच असते. वनस्पतींची विविधता या गडाएवढी इतरत्र कुठेही आढळणार नाही. करवंद, कारवीच्या जाळी , धायटी , उक्षी, मदवेल, कुडा, पांगळी, हेकळ, पानफुटी, गारवेल इत्यादी वनस्पती येथे आढळतात. या भागातील प्राणीवैभव मात्र शिका-यांमुळे बरेच कमी झाले आहे. तरीही कोल्हे , तरस, रानडुकरे, बिबळ्या, ससे, भेकर, रानमांजरे इत्यादी प्राणी आढळतात. गडाचे सर्वोच्च शिखर तारामतीवरून नाणेघाट, जीवधन, रतनगड, कात्राबाईची खिंड , आजोबाचा डोंगर, कळसूबाई, अलंग, मदन, कुलंग, भैरवगड, हडसर आणि चावंड हा परिसर दिसतो. अशा त-हेने अप्रतिम निसर्गसौंदर्याने नटलेला हरिश्चंद्रगड 'ट्रेकर्सची पंढरी' ठरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा** : हरिश्चंद्रगड पूर्ण पाहवयाचा असल्यास दोन ते तीन दिवसांची सवड हवी. गडाचा घेरा फार मोठा असल्याने गडावर जाण्याच्या वाटाही फार आहेत.

खिरेश्वर गावातून वाट : सर्वात प्रचलित असणारी वाटही खिरेश्वर गावातून गडावर येते. या वाटेने येण्यासाठी पुण्याहून आळेफाटा मार्गेअथवा कल्याणहून मुरबाड-माळशेज घाट मार्गेखुबी फाट्यास उतरावे. खुबी फाट्यावरून धरणावरून चालत गेल्यावर ५ कि.मी. अंतरावर खिरेश्वर गाव लागते.हरिश्चंद्रगडावर जाताना खिरेश्वर गावातून अदमासे एक कि.मी. अंतरावर खिरेश्वराचे प्राचीन शिवमंदिर

आहे. हे मंदिर अकराव्या शतकातील यादवकालीन मंदिर आहे. मंदिराच्या बाहेरील सभामंडप छताला शिल्प पट्टीका बसवलेले आहे. आतील गाभारा असलेल्या दाराच्या माथ्यावर शेषयायी विष्णू व परिवाराचे अप्रतिम कोरीव शिल्प आहे. मूषकवाहन गणेश-गणेशानी ,वृषभवाहक शीव-पार्वती , हंसवाहन ब्रह्म -सरस्वती, मयूरवाहन स्कंद-षष्टी, नरवाहन कुबेर-कुबेरी, मकरवाहन मकर-रति, अशा अनेक कोरीव प्रतिमा येथील पाषाणावर आढळतात. या मंदिराला 'नागेश्वराचे मंदिर' असेही म्हणतात. या गावातून दोन वाटा गडावर जातात. अ. एक वाट ही टोलार खिंडीतून गडावर सुमारे ३ तासात मंदिरापर्यंत पोहचते. ब. दुसरी वाट ही राजदरवाजाची वाट आहे. ही वाट पूर्वी प्रचलित होती. आता मात्र वाटाड्याशिवाय या वाटेने गडावर जाऊ नये. या वाटेने आपण गडाच्या जुन्नर दरवाज्यापाशी पोहचतो. या मार्गाने जाताना गावातील विहिरीतून पाणी भरून घेतले पाहिजे कारण वाटेत कुठेच पाणी नाही.
नगर जिल्ह्यातून : हरिश्चंद्रगडावर जाण्याची एक वाट ही नगर जिल्ह्यातून आहे. यासाठी मुंबई-नाशिक हमरस्त्यावरील घोटी या गावी उतरावे. तिथून संगमनेर मार्गावरील राजूर या गावी यावे. राजूरवरून गडावर दोन मार्गांनी चढाई करता येते. अ. राजुर-पाचनई अशी बससेवा उपलब्ध आहे. हे अंतर सुमारे २९ कि.मी. भरते. पाचनई हे गडाच्या पायथ्याचे गाव असून येथून गड गाठण्यास सुमारे ३ तास लागतात. वाट फारच सोपी आहे. पाचनई ते हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर हे अंतर सुमारे ६ कि.मी. आहे. ब. हल्लीच राजूर ते टोलारखिंड अशी खाजगी वाहनसेवा उपलब्ध झाली आहे. राजूर, अंबीट, पाचनई, मूळा नदीच्या खो-यातून , घनचक्कर या बालेश्वर रांगेतील टेकाडास वळसा घालून ही वाट टोलारखिंडीत पोहचते. ही वाट सरळ एक तासात टोलारखिंडीत घेऊन जाते. समोरच एक व्याघ्रशिल्प आढळते. येथून वर जाणारा रस्ता हा दमछाक करणारा आहे. येथून २ तासांत मंदिरात पोहचता येते.
सावर्णे- बेलपाडा - साधले असा घाटमार्ग : गड सर करण्यासाठी एक सावर्णे- बेलपाडा - साधले असा घाटमार्ग आहे. परंतु हा मार्ग फारच अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असलेल्यांनीच हा मार्ग अवलंबावा. या मार्गेयेण्यासाठी कल्याण - मुरबाडमार्गेमाळशेजघाट चालू होण्यापूर्वी सावर्णेगावात उतरावे. येथून 'बेलपाडा' या कोकणकड्याच्या पायथ्याच्या गावात यावे. येथून कड्यातून काढलेल्या साधले घाटाच्या सहाय्याने कोकणकड्याच्या पठारावर जाता येते. या वाटेने मंदिर गाठण्यास सुमारे दीड दिवस लागतो. या वाटेलाच 'नळीची वाट' असेही म्हणतात.

राहण्याची सोय : गडावर हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या मागच्या गुहेत आणि गणेशगुहा व आजुबाजूच्या गुहेत राहता येते.

जेवणाची सोय : जेवणाची सोय गडावर जेवणाची सोय उपलब्ध आहे.

पाण्याची सोय : पाणी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : खिरेश्वर मार्गे४ तास तर पाचनई मार्गे३ तास लागतात

# नाशिक जिल्हा

## साल्हेर

किल्ल्याची उंची : १५६७मी
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सेलबारी-डोलबारी
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

महाराष्टात जसा सर्वात उंच शिखराचा मान कळसूबाईचा,तसा गडकिल्ल्यांमध्ये सर्वाधिक उंचीचा मान साल्हेरचा.बागलाण हा मोक्षगंगा आणि अक्षगंगा या नद्यांमुळं समृध्द झालेला प्रदेश.येथील भूमी तशी सुपिकच त्यामुळे येथील लोकांचे रहाणीमान तसे थोडे उंचावलेले.तरीही डोंगरी भागात कोकण ,भिल्ल सारख्या काही आदीवासी जमाती रहातात. साल्हेर गडाचा घेरा साधारणपणे ११ कि.मी.असून व्यापलेले क्षेत्र ६०० हेक्टर आहे.

इतिहास :साल्हेर गड हा परशुरामाची तपोभूमीम्हणून प्रसिद्ध आहे.जिंकलेल्या पृथ्वीचे दान करून स्वत:साठी भूमी मिळवण्यासाठी सागराला मागे हटवायला त्यांनी बाण सोडला तो याच भूमीवरून.असे पौराणिक स्थान असलेल्या साल्हेरचे शिवकालीन इतिहासातील स्थान देखील महत्वाचे आहे, ते येथे झालेल्या प्रसिद्ध लढाईमुळे. शिवरायांनी १६७१ मध्ये बागलाण मोहिम काढली आणि साल्हेर जिंकून घेतला.त्या मोहिमेची वार्ता दिल्लीच्या पातशहाला मिळाली .ते एकून पातशहा कष्टी झाला ,नि म्हणाला ,'काय इलाज करावा ,लाख लाख घोड्याचे सुभे रवाना केले ते बुडवले नामोहरम होऊन आले. आता कोण पाठवावे ' तेव्हा पातशहाने 'शिवाजी जोवर जिवंत तोवर दिल्ली आपण सोडीत नाही' असा विचार केला आणि इखलासखान व बहोलोलखान यांस बोलावून वीस हजार स्वारांनिशी सालेरीस रवाना केले.मग इखलासखानाने येऊन साल्हेरला वेढा घातला. हे वर्तमान जेव्हा राजांना कळले तेव्हा मोगलाईत पाठवलेले आपले सरनौबत प्रतापरावांना जासूदाकरवी कळविले 'तुम्ही लष्कर घेऊन सालेरीस

जाऊन बेलोलखानास धारून चालविणे आण कोकणातून मोरोपंत पेशव्यांनाही हशमानिशी रवाना केले. ' हे इकडून येतील तुम्हीही वरघाटी कोकणातून येणे असे दुतर्फा चालून येऊन गनिमास गर्दीस मिळवणे ' अशी पत्रे पाठविली.त्याप्रमाणे एकीकडून प्रतापराव तर दुसरीकडून पेशवे, उभयता सालेरीस आले,आणि मोठे युध्द झाले. सभासद बखरीत याचा उल्लेख खालील प्रमाणे आढळतो ''चार प्रहर दिवस युध्द जाहले मोगल, पठाण, रजपूत, तोफांचे, हत्ती, उंट आराबा घालून युध्द जाहले. युध्द होताच पृथ्वीचा धुराळा असा उडाला की , तीन कोश औरस चौरस ,आपले व परके लोक माणूस दिसत नव्हते . हत्ती रणास आले दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले पूर वहिले.रक्ताचे चिखल जाहले.त्यामध्ये रुतो लाबले ,असा कर्दम जाहला. मराठ्यांनी इखलासखान आणि बेलोलखानाचा पाडाव केला. युध्दात प्रचंड प्रमाणावर हानी झाली. या युध्दात शिवरायांच्या एक लाख २० हजार सैन्याचा समावेश होता,पैकी १० हजार माणसे कामीस आले. सहा हजार घोडे ,सहा हजार उंट, सव्वाशे हत्ती तसेच खजिना ,जडजवाहीर ,कापड अशी अफाट मालमत्ता शिवरायांच्या हाती आली. या युध्दात मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. मोरोपंत पेशवे आणि प्रतापराव सरनौबत यांनी आणीबाणी केली. सूर्यराव काकडे यांना पराक्रम गाजवतांना आपला देह ठेवावा लागला. ते तोफेचा गोळा लागून पडले. 'सूर्यराव काही सामान्य योध्दा नव्हे . भारती जैसा कर्ण योध्दा त्याचा प्रतिमेचा,असा शूर पडला.' विजयाची बातमी शिवरायांकडे गेली राजे खूप खूश झाले.खबर घेऊन आलेल्या जासूदांना सोन्याची कडी आणि प्रतापराव सरनौबत ,मोरोपंत पेशवे, आनंदराव ,व्यंकोजी पंत यांना अपार बक्षीस आणि द्रव्य देण्यात आले.हा पराभाव दिल्लीच्या बादशहाच्या जिव्हारी लागला की सभासद म्हणतो - पातशहा असे कष्टी जाले .'खुदाने मुसलमानांची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असे वाटते. आता शिवाजी अगोदर आपणास मृत्यु येईल तर बरे. आता शिवाजीची चिंता जीवी सोसवत नाही.' असे बोलिले. मोगलांच्या सैन्याशी समोरासमोर लढाई करून तोपर्यंत महाराजांना विजय प्राप्त झाला होता ,त्यात साल्हेरचा विजय प्रथम मानावर होता.असा मोठा विजय यापूर्वी कधाही मिळाला नव्हता.या युध्दात महाराजांच्या लोकांनी दाखवलेल्या युध्दकौशल्याची व शौर्याची किर्ती चहुकडे पसरली आणि त्यांचा दरारा अधिकच वाढला .साल्हेर जिंकल्यावर त्यासमोरील मुल्हेर किल्ला मराठ्यांनी जिंकला आणि संपूर्ण बागलाण प्रांतावर त्यांनी आपला शह बसवला.त्यामुळे सुरत शहरास कायमची दहशत बसली.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : वाघंबे मार्गेगडावर आल्यास उजवीकडे आणि साल्हेरवाडीहून गडावर आल्यास

डावीकडे वळल्यास पाच ते दहा मिनिटाच्या अंतरावर काही भग्न पावलेल्या मंदिराचे अवशेष आढळतात. पुढे थोड्याच अंतरावर पाण्याची दोन टाकी असून समोर गंगासागर तलाव दृष्टीस पडतो. तलावाच्या बाजुलाच रेणुका मातेचे आणि गणेशाचे छप्पर नसलेले मंदिर आहे. या मंदिराच्या जवळून दोन वाटा फुटतात. उजवीकडे जाणारी वाट सरळ एका पाण्याच्या टाक्यापाशी घेऊन जाते. टाक्यांसमोरच एक यज्ञवेदी आहे. जवळच एक मूर्तीदेखील आहे. मंदिरापासून वर चढत जाणारी वाट आपल्याला तीन गुहांपाशी घेऊन जाते. गुहांच्या समोर मारूतीचे मंदिर आहे. या गुहांमध्ये रहाता येऊ शकते. गुहांशेजारची वर जाणारी वाट गडाच्या अत्युच्च शिखरावर घेऊन जाते. या शिखरावर श्री परशुरामाचे मंदिर आहे. या उंच गडमाथ्यावर काहीशा ढासळलेल्या अवस्थेत असलेल्या या मंदिरात परशुरामांची मूर्ती व पादुका आहेत, आणि जोडीला भान हरपून टाकणारा निसर्ग. येथून आजूबाजूच्या प्रदेशाचे विहंगम दृश्य नजरेस पडते. येथून संपूर्ण बागलाण विभाग दिसतो. हा गड डांग - गुजरात आणि बागलाण यांना जोडणा-या व्यापारी वाटेवर असल्याने संरक्षण दृष्ट्या महत्वाचा होता. समोर दक्षिण बाजूला अजंठा - सातमाळा डोंगरातले धोडप, इखारीया हे सुळके दिसतात. पूर्वेकडे मांगी-तुंगी, तांबोळया, न्हावीगड, हनुमान टेकडी, मुल्हेरगड, हरगड, मोरागड आणि सालोटा नजरेस पडतात. समोरच हरणबारीचे धरण लक्ष वेधून घेते.

## गडावर जाण्याच्या वाटा : गडावर जाण्यासाठी प्रमुख दोन मार्ग आहेत.

वाघांबे मार्गे: साल्हरला जाण्यासाठी नाशिक-सटाणामार्गेताहराबाद गाठावे.गुजरातमधून यायचे झाल्यास डांग जिल्हयातून ताहराबादला जाण्यास रस्ता आहे.ताहराबादहून मुल्हेरमार्गेवाघंब अशी एस.टी.अथवा जीप सेवा देखील उपलब्ध आहे.वाघंबे गाठल्यावर गावातूनच साल्हेर-सालोटा यांच्या खिंडीतून साल्हेरला जाणारी वाट आहे.वाटेत कुठेही पाणी नसून खिंडीपर्यंत चालणारी वाटचाल दमछाक करणारी आहे.या वाटेने गडावर जाण्यासाठी साधारण अडीच तास लागतात.या वाटेने गडावर जातांना चार दरवाजे लागतात.तिसऱ्या ते चौथ्या दरवाजाच्या दरम्यान कड्यात खोदलेल्या १८ते २०गुहा आहेत.चौथ्या दरवाजाच्या कमानीवर एक शिलालेख आढळतो. येथून आत आल्यावर समोरच एक पठार दिसते.

साल्हेरवाडी मार्गे: साल्हेरवाडी हे गाव वाघंबे गावाच्या पुढे आहे.साल्हेरवाडीला दोन मार्गांनी जाता येते.एक सटाणा-ताहराबाद-मुल्हर-साल्हेरवाडी असा आहे.साल्हेरवाडीहून गडावर जाणारी वाट दमछाक करणारी आहे.या वाटेने सहा दरवाजे पार करून सुमारे तीन तासांनी आपण गडावर पाहचतो.वाट मळवलेली असल्याने चूकण्याची शक्यता नाही.या वाटे कुठेही पाणी नाही.

माळदर मार्गे: गडावर जाण्यासाठी असलेली ही वाट फारशी वापरात नाही.ही वाट माळदर गावतूनच जाते.सटाण्याहून एस.टी.ने माळदरला जाता येते.ही वाट साल्हेर व सालोटा यांच्या दरम्यानच्या खिंडीमधून जाते. या वाटेने Jडावर जायला साधारण तीन तास पुरतात.

**राहण्याची सोय :** गडावर असलेल्या तीन गुहांमध्ये रहाण्याची व्यवस्थित होऊ शकते.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** गंगासागर तलाव व त्याच्या बाजूस असणारी दोन पाण्याची टाकी यातील पाणी पिण्यास योग्य आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** वाघांबे मार्गेअडीच तास , साल्हेरवाडी मार्गेतीन तास, माळदर मार्गेतीन तास

# मुल्हेर

किल्ल्याची उंची : ४२९०फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: सेलबारी-डोलबारी

जिल्हा : नाशिक

श्रेणी : सोपी

सह्याद्री पर्वताच्या उत्तर-दक्षिण रांगेची सुरुवात नाशिक जिल्ह्यातील बागलाणातून होते. उत्तरेकडून सुरू होणा-या या सह्याद्रिच्या रांगेला सेलबारी किंवा डोलबारी रांग असे म्हणतात. सेलबारी रांगेवर मांगी-तुंगी सुळके, न्हावीगड, तांबोळ्या असे गड आहेत तर दुस-या डोलबारी रांगेवर मुल्हेर, मोरागड, साल्हेर, हरगड, सालोटा हे गडकिल्ले आहेत. पश्चिमेकडील गुजरात मधील घनदाट जंगल असलेला डांगचा प्रदेश आणि महाराष्टातील बागलाण विभाग यांच्या सीमेवर हे किल्ले वसलेले आहेत. बागुलगेड म्हणजेच बागलाण. सुपीक, संपन्न आणि सधन असा प्रदेश. गुजरात आणि महाराष्टाच्या सीमेवरील हा प्रदेश असल्याने येथील जनजीवनावर गुजराती आणि महाराष्टीय अशा संमिश्र आचारविचारांचा प्रभाव पडलेला आहे. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने बागायती शेती मोठ्या प्रमाणावर चालते त्यामुळे लोकांची आर्थिक स्थिती ही फार चांगली आहे. मुल्हेरचा किल्ला हा नाशिक जिल्ह्यात सटाणा तालुक्यात आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी मुल्हेर नावाचे गाव आहे.

**इतिहास :** मुल्हेरचा किल्ला हा प्राचीन किल्ला आहे. पूर्वी किल्ल्यातच गाव वसलेले होते. मात्र कालांतराने गाव खाली उतरले आणि पायथ्यापासून सुमारे २ कि.मी. अंतरावर वसले. हे मुल्हेर गाव महाभारतकालीन आहे. याचे नाव होते रत्नपूर. या भागात मयूरध्वज नावाचा राजा होऊन गेला आणि गावाला मयूरपूर नाव पडले. तर किल्ल्याला मयूरगड हे नाव पडले. औरंगजेबाने किल्ला जिंकला तेव्हा याचे नाव औरंगगड असे ठेवण्यात आले. पुराणात मुल्हेरचा उल्लेख येतो. मात्र खात्रीलायक माहिती चौदाव्या शतकाच्या पहिल्या दशकात मिळते. मुल्हेरचा किल्ला बागुल राजांनी बांधला. इ.स. १३०८ ते १६१९ पर्यंत बागुलांनी येथे राज्य केले. या घराण्याच्या नावावरूनच परिसराला बागुलगेड व त्याचा अपभ्रंश बागलाण हे नाव पडले. बागुल राजे हे मुळचे कनोजचे. या बागुल घराण्याच्या काळातच जगप्रसिद्ध मुल्हेरी मूठ बनवण्यात आली. या घराण्यात एकूण ११ राजे झाले. या राजांना बहिर्जी ही पदवी होती. विजयनगरमध्ये हिंदू सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी कितीतरी अगोदर बागलाण मध्ये हिंदूसत्ता प्रस्थापित होती. अकबराने जेव्हा खानदेशाचे राज्य जिंकले तेव्हा प्रतापशहा बहिर्जी बागलाणचा राजा होता. त्याने मोगलांचे सार्वभौमत्व पत्करले. पुढे शाहजहानशी या राजाने मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले. जुलै १६३६ ला औरंगजेबाची दक्षिणेचा राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. इ.स. १६३८ मध्ये मोगलांनी बागलाणवर हल्ला केला आणि मुल्हेर किल्ला जिंकला व त्याचे नाव औरंगगड असे ठेवले. १५ फेब्रुवारी १६३८ रोजी वैभवशाली हिंदुंचे राज्य संपुष्टात येऊन तेथे मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. मुल्हेर ही बागलाणची परंपरागत राजधानी. किल्ल्यावर महंमद ताहिर याची नेमणूक प्रथम किल्लेदार म्हणून झाली. या ताहिरने मुल्हेरजवळ ताहीर नावाचे गाव वसवले व त्याचे कालांतराने ताहिराबाद असे नामकरण झाले. इ.स. १६६२ मध्ये मुल्हेर किल्ल्यामधील सैनिकांनी अपु-या पगारासाठी बंड केले. दुस-या सुरत लुटीनंतर शिवाजी महाराजांनी बागलाण मोहीम उघडली. यामध्ये त्यांनी साल्हेर, मुल्हेर व इतर किल्ले स्वराज्यात सामील करून घेतले. मराठ्यांनी १६७१ मध्ये प्रथम मुल्हेरवर हल्ला केला पण किल्लेदाराने तो थोपवून धरला. मग मराठ्यांनी त्याचा नाद सोडला. मात्र साल्हेरच्या लढाईनंतर फेब्रुवारी १६७२ मध्ये मराठ्यांनी मुल्हेरगड काबीज केला. त्यानंतर पुन्हा किल्ला मोगलांच्या हातात पडला.पुढे इ.स. १७५२ च्या भालकीच्या तहानुसार मुल्हेरसकट खानदेशमधील सर्व प्रदेश मराठ्यांच्या हाती आला. यानंतर त्रिंबक गोविंद मुल्हेरचा किल्लेदार झाला. पुढे १७६५ मध्ये किल्ल्यावर गुप्तधन मिळाल्याच्या नोंदी पेशवे दफ्तरात आहेत. अशा रीतीने १५ जुलै १८१८ रोजी हा किल्ला ब्रिटिशांच्या तावडीत सापडला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** मुल्हेरगडाचे प्रामुख्याने २ भाग पडतात. एक म्हणजे मुल्हेर माची आणि मुल्हेर बालेकिल्ला. गणेशमंदिरा पासून २ वाटा फुटतात. एक वाट वर चढत जाते व दुस-या वाटेला येऊन मिळते. या वाटेने डावीकडे गेल्यावर १० मिनिटांतच सोमेश्वर मंदिर लागते तर उजवीककडे जाणारी वाट आणि गणेशमंदिरा पासून निघणारी उजवीकडची वाट एकत्र येऊन मिळतात. याच वाटेने थोडे पुढे गेल्यावर एक पठार लागते. पठारापासून दोन वाटा लागतात. वर जाणारी वाट मोती

तलावापाशी जाते. या टाक्यातील पाणी पिण्यास योग्य आहे. पठारापासून समोर जाणारी वाट राजवाड्यांच्या भग्न अवशेषांपाशी घेऊन जाते. येथेच एक गुप्त दरवाजादेखील आहे. राजवाड्यांच्या थोडे खाली आल्यावर रामलक्ष्मण मंदिर लागते. राजवाड्यांच्या वाटेने थोडे अंतर चालून गेल्यावर मुल्हेर व हरगड यांमधील खिंड लागते. सोमेश्वर मंदिराकडे जात असताना वाटेतच डावीकडे ३ मजली चंदनबाव लागते. सध्या येथे प्रचंड झाडी झुडूपे आहेत. सोमेश्वर मंदिर राहण्यासाठी उत्तम जागा आहे. मोती टाक्यांच्या उजवीकडे वर चढत जाणा-या वाटेने अर्धा तास चालल्यावर आपण बालेकिल्ल्याच्या महाद्वारापाशी येऊन पोहोचतो. आत गेल्यावर डावीकडे गुहा आहेत, तर समोरच पाण्याचं टाकं आहे. मुल्हेरगडाचा बालेकिल्ला म्हणजे मोठे पठार. बालेकिल्ल्यावर पोहोचल्यावर समोरच पाण्याची ९-१० टाकी आहेत. राजवाड्याचे भग्नावशेष, भडंगनाथांचे मंदिर या सर्व गोष्टी आहेत. भडंगनाथांच्या मंदिराच्या वर असणा-या टेकडीवरून खाली उतरलो की मोरागडाकडे जाणारी वाट दिसते. समोरच असणारी मांगी-तुंगीची शिखरे, न्हावीगड, तांबोळ्या, हनुमानगड लक्ष वेधून घेतात.

**गडावर जाण्याच्या वाटा :** मुल्हेर किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा अस्तित्वात आहेत. या दोन्ही वाटा मुल्हेर गावातूनच जातात. मुल्हेर गाव ते किल्ल्याचा पायथा यात २ कि.मी. चे अंतर आहे. गावातून २५ मिनिटे चालत पुढे आल्यावर डावीकडे एक घर लागते, आणि समोरच वडाचे एक झाड दिसते. झाडापासून सरळ पुढे जावे. दहा मिनिटांतच धनगरवाडी लागते. धनगरवाडी वरून जाणारी वाट पकडावी. साधारण ४५ मिनिटांनी २ वाटा फुटतात. एक वाट सरळ तर दुसरी उजवीकडे वळते.

सरळ वाट : सरळ जाणा-या वाटेने २० मिनिटांत मुल्हेर माचीवरील गणेश मंदिरापाशी पोहचतो. या वाटेने गडावर प्रवेश करताना ३ दरवाजे लागतात. ते सर्व ढासळलेल्या अवस्थेत आहेत. वाट साधी व सोपी आहे. या वाटेने गडावर पोहोचण्यास दीड तास पुरतो.

उजवीकडची वाट : उजवीकडच्या वाटेने गेल्यावर दोन तासांनी आपण मुल्हेरमाची वरील गणेश मंदिरात पोहचतो. या वाटेनेही गडावर प्रवेश करताना ३ दरवाजे लागतात. ही वाट जरा दूरची आहे. ही वाट हरगड व मुल्हेर किल्ला यांच्या खिंडीतून वर चढते. या खिंडीतून डावीकडे मुल्हेर तर उजवीकडे हरगड लागतो. या वाटेने गडावर पोहचण्यास ३ तास लागतात.

**राहण्याची सोय :** मुल्हेरमाचीवरील सोमेश्वर आणि गणेश मंदिरात आणि बालेकिल्ल्यावर असणा-या गुहेत राहता येते.

**जेवणाची सोय :** आपण स्वतः करावी.

**पाण्याची सोय :** गडावरील मोती टाक्यातील पाणी पिण्यास योग्य आहे. मात्र हे पाणी फेब्रुवारीपर्यंतच उपलब्ध असते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** साधारण २ तास गावापासून. साधारण ३ तास खिंडीतल्या वाटेने

# मोरागड

किल्ल्याची उंची : ४४५०
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सेलबारी-डोलबारी
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

भौगोलिक दृष्ट्या पाहिले तर मोरागड हा मुल्हेर किल्ल्याचाच एक भाग आहे. मोरागड म्हणजे मुल्हेर किल्ल्याचा दुसरा बालेकिल्लाच होय.

**इतिहास :** इतिहासात या गडाचा स्वतंत्र असा उल्लेख करणरे एकही कागदपत्र उपलब्ध नाही.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** गडमाथ्यावर जाताना दुसऱ्या दरवाजाच्याजवळ एक गुहा आहे. गडमाथा म्हणजे एक पठारच होय.माथ्यावर दोन ते तीन पाण्याची टाकी आहेत.एक सुंदर बांधीव तलाव आहे. दोन तीन वाड्यांचे अवशेष आपले अस्तित्व टिकवून आहेत. बाकी गडावर काही नाही. गडावरून मुल्हेरचे पठार व माची,हरगड,मांगी-तुंगी,न्हावीगड,तांबोळ्या,हनुमान टेकडी यांचे विहंगम दृश्य दिसते

**गडावर जाण्याच्या वाटा :** मोरागडावर जाणारी एकच वाट आहे. ती मुल्हेरगडाच्या बालेकिल्ल्यावरून जाते.मुल्हेरमाचीवर असणाऱ्या सोमेश्वर मंदिरापासून वर जाणारी वाटसुद्धा मोरागडावर जाते.पुढे या दोन्ही वाटा एकमेकांना मिळतात. मुल्हेरगडाच्या बालेकिल्ल्यावर भडंगनाथाच्या मंदिराकडे तोंड करून उभे राहिल्यावर उजवीकडे वर जाणारी वाट पकडावी. या वाटेने थोडे वर गेल्यावर समोरच खाली मोरागडाकडे जाणारी वाट दिसते. येथून मोरागडावर जाण्यास अर्धा तास पुरतो. गडावर जातांना तीन दरवाजे लागतात.

**राहण्याची सोय :** मोरागडावर राहण्याची सोय नाही मात्र मुल्हेर किल्ल्यावर आपण राहू शकतो.

**जेवणाची सोय :** आपणं स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** पिण्याच्या पाण्याची टाकी आहेत,मात्र गडावर उन्ह्याळ्यात पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :**४५ मिनिटे मुल्हेर पासून.

# हरगड

किल्ल्याची उंची : ४४५० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: सेलबारी-डोलबारी

जिल्हा : नाशिक

श्रेणी : मध्यम

**इतिहास :** इतिहासात फारसा या गडाचा उल्लेख नाही कारण येथे कोणती मोठी लढाई झाली नाही. मुल्हेर गावात गेल्यावर हरगडचे दर्शन होते. समोर दिसणारा मुल्हेर,डावीकडे मोरागड आणि उजवीकडचा हरगड. या गडाची उंची मुल्हेरपेक्षा थोडी जास्त आहे

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** गडमाथा तसा विस्तीर्ण आहे. गडमाथा म्हणजे एक पठारच होय. या पठारावर काही तटबंदीचे अवशेष आहेत. पाण्याची दोन टाकी आढळतात. एक पडके मंदिर आहे. वाड्यांचे काही अवशेष आढळतात. पाण्याच्या टाक्यांमधील पाणी पिण्यासारखे नसल्याने पाणी जवळ असणे आवश्यक आहे. गडफेरी मारताना पुढे सपाटीवर एक गुहा आढळते यात कपार भवानीचं मंदिर आहे. बाकी गडावर पाहण्यासारखे काही नसल्याने आल्या मार्गाने खिंड गाठून एक तर मुल्हेरगडावर जावे नाहीतर मुल्हेर गावात जावे. गडफेरीस १ तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडावर जाण्यासाठी सध्या एकच वाट अस्तित्वात आहे. गडावर जाणारी वाट मुल्हेर गावातून जाते. मुल्हेर गावातून पुढे आल्यावर एक डांबरी रस्ता लागतो. या रस्त्याने वीस मिनिटे पुढे गेल्यावर दोन फाटे फुटतात. एक डावीकडे जातो तर दुसरा वडाच्या झाडापासून पुढे जातो. ही वाट छोट्याशा टेकडीवर असणाऱ्या धनगर-वाडीपाशी पोहोचते. येथून उजवीकडे वळावे आणि थेट मुल्हेर व हरगड यामधील खिंड गाठावी. येथपर्यंत पोहचण्यास दीड तास पुरतो. खिंडीत डावीकडे जाणारी वाट आपल्याला मुल्हेरगडाकडे तर उजवीकडे जाणारी वाट हरगडाकडे घेऊन जाते. वाट फारशी मळलेली नसल्यामुळे अस्पष्ट झालेली आहे. या खिंडीपासून गडमाथा गाठण्यास एक तास पुरतो.

**राहण्याची सोय :** गडावर राहण्याची सोय नाही.

**जेवणाची सोय :** नाही.

**पाण्याची सोय :** नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** मध्यम

# न्हावीगड

किल्ल्याची उंची : ४१०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: बागलाण

जिल्हा : नाशिक

श्रेणी : मध्यम

सह्याद्री पर्वताच्या उत्तर-दक्षिण रांगेची सुरुवात नाशिक जिल्ह्यातील बागलाणातून होते. उत्तरेकडून सुरू होणा-या या सह्याद्रिच्या रांगेला सेलबारी किंवा डोलबारी रांग असे म्हणतात. सेलबारी रांगेवर मांगी-तुंगी सुळके, न्हावीगड, असे गड आहेत तर दुस-या डोलबारी रांगेवर मुल्हेर, मोरागड, साल्हेर, हरगड, सालोटा हे गडकिल्ले आहेत. पश्चिमेकडील गुजरात मधील घनदाट जंगल असलेला डांगचा प्रदेश आणि महाराष्टातील बागलाण विभाग यांच्या सीमेवर हे किल्ले वसलेले
आहेत.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे** या किल्ल्याला रतनगड असे देखील म्हणतात.गडावर जाण्याच्या वाटेवर पिण्याच्या पाण्याची टाकी आणि देवीचे एक मंदिर लागते.गडावर जातांना आपल्याला पाय-या तर लागतात पण दरवाज्याचा मात्र मागमूसही नाही. किल्ल्याचा माथा तसा निमुळताच आहे.गडावर पाण्याची तीन ते चार टाकी आहेत.घरांचे काही अवशेष सापडतात.गडाचा सर्वोच्च माथा

म्हणजे एक सुळकाच आहे. तो चढून जाण्यासाठी प्रस्तरारोहण आवश्यक आहे.गडमाथा फिरण्यास अर्धा तास पुरतो.गडावरुन मांगीतुंगी, मुल्हेर,मोरागड,साल्हेर आणि हरगड हा परिसर दिसतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. वडाखेल मार्गे

न्हावीगडावर जाण्यासाठी ताहाराबाद मार्गेमांगीतुंगी गाव गाठावे.मांगीतुंगी गावातून १ तासाच्या चालीने वडाखेल गावात यावे.वडाखेलपर्यंत डांबरी रस्ता नाही.त्यामुळे पायीच त्रेधातिरपीट करावी लागते. वडाखेलमधून पाताळवाडीकडे कूच करावे.पाताळवाडी हे पायथ्याचे गाव आहे. वडाखेल ते पाताळवाडी हे अंतर अर्ध्या तासाचे आहे.पाताळवाडीतून एक सरळ वाट किल्ल्याच्या पठारावर गेलेली आहे.या पठारावरुन दोन वाटा :फुटतात.एक वाट समोर नाकाडावरुन वर चढते.ही वाट थोडी कठीण आहे. वाटेने वर चढताना सोपे प्रस्तरारोहण करावे लागते. वाटेने वर चढल्यावर आपण पाय-यापाशी पोहोचतो.दुसरी वाट पठारावरुन डावीकडे वळसा घालून पाय-यापाशी जाते. या

वाटेला पाण्याची दोन-तीन टाकी लागतात.गडावर जाणा-या पाय-या मात्र जपूनच चढाव्या लागतात. पाय-यावर माती साचल्याने घसरण्याची शक्यता फार आहे.पाताळवाडीपासून गडावर दीड तासात पोहोचता येते.

**राहण्याची सोय :** गडावर राहण्याची सोय नाही.

**जेवणाची सोय :** नाही.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** जाण्यासाठी लागणारा वेळ पाताळवाडी गावातून दीड तास.

**जाण्यासाठी उत्तम कालावधी :** आक्टोंबर ते एप्रिल पर्यंत.

# मांगी - तुंगी

किल्ल्याची उंची : ४००० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: सेलबारी-डोलबारी
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

बागलाण सुपीक,सधन आणि संपन्न असा मुलूख. सह्याद्रीच्या उत्तर दक्षिणेची सुरुवात होते ती या बागुलगेड (बागलाण) विभागातूनच होते. येथे असणाऱ्या दुहेरी पूर्व-पश्चिम रांगेला सेलबारी-डोलबारी असे संबोधण्यात येते. ताहराबादला पोहोचले की मांगी-तुंगीचे दोन सुळके आपले लक्ष्य वेधून घेतात. मांगी-तुंगी ही जैन लोकांची तीर्थक्षेत्रे.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

**गडावर जाण्याच्या वाटा :** मांगी-तुंगीला जायचे असल्यास नाशिक वरून सटाणामार्गेताहराबाद गाठावे. गुजरात मधून यायचे झाल्यास नीलमोरा रेल्वेस्थानकावरून अहुआ मार्गेताहराबाद गाठावे. ताहराबाद वरून भिलवाडी पर्यंत येण्यासाठी एस.टी. किंवा बससेवा उपलब्ध आहे. भिलवाडी हे मांगीतुंगीच्या पायथ्याचे गाव.भिलवाडीमध्येच जैनांची आदिनाथ,पार्श्वनाथ यांची मंदिरे आहेत. याला सुद्धा मांगी-तुंगीच म्हणतात. मांगी-तुंगी सुळक्यावर जाण्यासाठी गावातूनच रस्ता आहे. वीस मिनिटे रस्त्यावरून चालत गेल्यावर पुढे पायऱ्या लागतात. सुमारे २००० पायऱ्यांचा चढ चढून गेल्यावर आपण एका कमानीपाशी पोहोचतो. येथून डावीकडे गेलो तर मांगी आणि उजवीकडे गेलो की तुंगी.

**राहण्याची सोय :** गावात धर्मशाळा आहे. येथे १० ते १५जणांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** भिलवाडी गावात जेवणाची सोय होते.

**पाण्याची सोय :** गावातूनच पाणी घेणे आवश्यक कारण गडावर पाणी नाही.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ३ तास पायथ्यापासून

# अचला

किल्ल्याची उंची : ४०४० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: – सातमाळ

जिल्हा : नाशिक
श्रेणी : मध्यम

अचला किल्ला हा अजंठा सातमाळ विभागात येतो.त्यामुळे नाशिकमार्गेअथवा मनमाडमार्गेही या किल्ल्यावर जाता येते.गुजरातहून सापूतारा मार्गेदेखील जाता येते.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

गडमाथा अत्यंत अरुंद आहे त्यामुळे गडावर फारसे पाहण्यासारखेही काही अवशेष नाहीत.गडावर पाण्याची एक दोन पाण्याची टाकी आहेत.याशिवाय भग्नावस्थेत असणारे छोटेसे मंदिर आहे.

गडमाथा फिरण्यास साधारण २० मिनिटे पुरतात.

गडावर जाण्याच्या वाटा :

१. नाशिकमार्गे

नाशिकमार्गेवणी गाठावे.वणीहून एस.टी ने पिंपरी-अचलाकडे जायचं.हे अंतर साधारण १२ कि.मी चे आहे.अचला गावात उतरून पिंपरीपाडा गावाकडे सरळ चालत निघावे.हे अंतर अर्धा तासाचे आहे.पिंपरीपाडा हे अचला किल्ल्याच्या पायथ्याचे गावं आहे.गावातून समोरच्या डोंगरसोंडेवरील खिंडीत एक छोटेसे देऊळ दिसते त्याच्या दिशेने वर चढत जावे.देवळापासून डाव्याबाजूला दिसणारा किल्ला अचला तर उजवीकडे धावत जाणारी सोंड थेट अहिंवतला जाऊन मिळते.डाव्या बाजूने किल्ल्याच्या नाकाडावरून अंगावर येणारी वाट पकडावी.पुढे ही वाट कडा डावीकडे ठेवून त्याला चिटकून वर जाते.पुढे कातळात खोदलेल्या पाय-या लागतात.खिंडीतून माथा गाठण्यास दीड तास पुरतो.

२. बेलवाडी

दुसरी वाट बेलवाडी गावातून किल्ल्यावर येते.बेलवाडी हे अहिवंत किल्ल्याच्या पायथ्याशी असणारे गाव आहे.ही वाट पिंपरीअचला गावामधून येणा-या वाटेला देवळापाशी येऊन मिळते.

राहण्याची सोय :

किल्ल्यावर नाही.

जेवणाची सोय :

आपण स्वत: करावी.

पाण्याची सोय :

फेब्रुवारीपर्यंत

जाण्यासाठी लागणारा वेळ :

पिंपरी अचलामार्गेअडीच तास.

# अहिवंत

किल्ल्याची उंची : ४०००
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: – सातमाळ

जिल्हा : नाशिक

श्रेणी : मध्यम

अहिवंत किल्ला अजंठा सातमाळ विभागात येतो.त्यामुळे नाशिकमार्गेअथवा मनमाडमार्गेया किल्ल्यावर जाता येते.गुजरातहून सापूतारा मार्गेदेखील जाता येते.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

अहिवंत गडाचा माथा फार मोठा आहे.संपूर्ण माथा फिरण्यास १ दिवस लागतो.किल्ल्याच्या सोंडा पूर्व, पश्चिम ,वायव्य आणि ईशान्य कडे मोठ्या प्रमाणात पसरलेल्या आहेत.किल्ल्याच्या इशान्य बाजूस एक गुहा आहे.पण ती राहण्यास अयोग्य आहे.दक्षिण बाजूला असणा-या कड्यामध्ये एक गुहा आहे.ती राहण्यास योग्य आहे.गुहेपासून १० मिनिटावरच पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.दरेगावच्या बाजूने किल्ल्यावर पोहचल्यावर आपल्याला दोन पडक्या दरवाजांचे अवशेष दिसतात.आजुबाजुला अनेक मोठया पडक्या वाड्यांचे अवशेष पडलेले आहेत.यावरून किल्ला एक मोठे लष्करीय ठाणे असावे असे वाटते.अनेक ठिकाणी महादेवाच्या पिंडीपण आढळतात.याबाजूच्या वाटेने किल्ल्यावर येतांना अनेक गुहा कोरलेल्या आढळतात.सद्यस्थितिला यांचा उपयोग मात्र गोठ्यासाठी होतो.किल्ल्यावर फिरतांना दोन ते तीन पाण्याची तळी आढळात.एका मोठ्यातळ्यापाशी देवीची एक मोठी मूर्ती आहे.ही मूर्ती सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीशी साम्य असल्यासारखी दिसते.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. नाशिकमार्गे

नाशिकमार्गेवणी गाठावे.वणीहून नांदुरी रस्त्यावरुनच किल्ल्याचे दर्शन होते.वणी नांदुरी रस्त्याच्या अलिकडे १ कि.मी अंतरावर एक ठळक वाट डावीकडे असणा-या डोंगरसोंडे पर्यंत जाते.डांबरी रस्त्यापासून येथपर्यंत येण्यास १ तास पुरतो.डोंगरसोंडेवर चढून गेल्यावर आपण एका खिंडीत पोहचतो. खिंडीतून पलिकडे जाणारी वाट दरेगावात जाते तर समोर जंगलात शिरणारी वाट थेट गडाच्या पाय-यांपाशीघेऊन जाते.खिंडीपासून गडावर जाण्यास १ तास पुरतो.

२. पिंपरीअचला मार्गे

दुसरी वाट जरा लांबची आहे.वणीहून पिंपरीअचला मार्गेपिंपरीपाड्यात पोहचावे.पिंपरीपाड्यातून समोरच्या डोंगरसोंडेवरील मंदिरापर्यंत जावे.येथून डावीकडे जाणारी वाट अचला किल्ल्याकडे तर उजवीकडे जाणारी वाट बेलवाडीत उतरते.येथून बेलवाडी गाठण्यास अर्धा तास लागतो.बेलवाडीतून गडावर जाण्यास ठळक वाट आहे.या वाटेने किल्ल्यावर पोहचण्यास २ तास लागतात.

## जाण्यासाठी लागणारा वेळ :

दरेगावमार्गेअडीच तास,बेलवाडीमार्गे२ तास.

# इंद्राई

किल्ल्याची उंची : ४४९० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: – सातमाळ

जिल्हा : नाशिक

श्रेणी : सोपी

नाशिक जिल्ह्यात सह्याद्रीची एक रांग सुरगणा पासून चालू होते आणि चांदवडपर्यंत येऊन संपते.पुढे तीच मनमाडच्या जवळ असणा-या अंकाईच्या पर्यंत जाते.याच रांगेला अजंठा - सातमाळ रांग म्हणतात.चांदवड तालुक्यात ४ किल्ले येतात.राजधोर,कोळधेर,इंद्राई आणि चांदवड.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

गडाच्या पाय-या चढून गेल्यावर प्रवेशद्वाराच्या अलिकडेच डाव्या बाजूच्या कातळावर एक फारसीतील शिलालेख कोरलेला आहे.प्रवेशद्वाराचे अवशेष केवळ आजमितिस शिल्लक आहेत.गडमाथा प्रशस्त आहे.

गडमाथ्यावर गेल्यावर डावीकडे वळावे.थोडे पुढे गेल्यावर तीन वाटा  लागतात.प्रथम उजवीकडची वाट पकडावी थोड्याच अंतरावर कातळात खोदलेल्या  गुहांची रांग ची रांग दिसते.या सर्व पाहून परत मागे फिरावे.

नंतर वर जाणारी वाट पकडावी थोडे अंतर चढून गेल्यावर महादेवाचे मंदिर लागते येथून पुढे जाणारी वाट समोरच्या डोंगरावर घेऊन जाते.महादेवाचे दर्शन घेऊन परत मागे फिरावे आणि आता डावीकडची वाट पकडावी.थोडे पुढे  गेल्यावर कातळात खोदलेल्या १८ ते २० गुहा लागतात.यापैंकी काही गुहा राहण्यासाठी योग्य आहेत.शेवटच्या गुहेत पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.इंद्राई किल्ल्यावरून चांदवड,राजधेर,कोळधेर ,धोडप ईखारा हा सर्व परिसर दिसतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. वडबारे मार्गे

चांदवडहून राजधेरवाडी कडे जाणारी बस पकडावी.चांदवड पासून ६ किंमी अंतरावर असणा-या वडबारे गावात उतरावे.वडबारे गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी एक ठळक पायवाट आहे.या वाटेने किल्ल्यावर जातांना एक झाप लागतो.ही वाट किल्ल्याच्या कातळकड्यापाशी राजधेरवाडीतून येणा-या वाटेला येऊन मिळते.गावातून किल्ल्यावर पोहचण्यास ३ तास पुरतात.

२. राजधेरवाडी मार्गे

चांदवडहून राजधेरवाडी कडे जाणारी बस पकडावी आणि राजधेरवाडीत उतरावे. वडबारे गावाच्या पुढे राजधेरवाडी आहे.राजधेरवाडीतू सुध्दा किल्ल्यावर जाण्यास पायवाट आहे. ही वाट किल्ल्याच्या कातळकड्यापाशी वडबारे गावातून येणा-या वाटेला येऊन मिळते.या वाटेने किल्ला गाठण्यास २ तास पुरतात.या कातळकड्यापाशी कातळात खोदलेल्या २ गुहा आहेत.यापैकी एका गुहेत पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.कड्यातूनच गडावर जाण्यासाठी एक पाय-याची वाट खोदलेली आहे.सुमारे १५० पाय-या चढून गेल्यावर आपल्याला गडमाथा गाठता
येतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहेत.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** वडबारे गावातून ३ तास.

# राजधेर

किल्ल्याची उंची : ३५५५  फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग:  – सातमाळ

जिल्हा : नाशिक

श्रेणी : कठीण

नाशिक जिल्ह्यात सह्याद्रीची एक रांग सुरगणा पासून चालू होते आणि चांदवडपर्यंत येऊन संपते.पुढे तीच मनमाडच्या जवळ असणा-या अंकाईच्या पर्यंत जाते.याच  रांगेला अजंठा - सातमाळ रांग म्हणतात.चांदवड तालुक्यात ४ किल्ले येतात.राजधोर,कोळधेर,इंद्राई आणि चांदवड.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** राजधेर किल्ल्यावर प्रवेश करतांना पहिल्या प्रवेशद्वाराच्या डावीकडच्या कमानीवर एक फारसीतील शिलालेख आहे.येथून गडमाथ्यावर जाण्यासाठी कातळात  खोदलेल्या पाय-या लागतात.गडमाथ्यावर पोहचल्यावर समोरच दोन वाटा फुटतात एक डावीकडे जाणारी तर दुसरी उजवीकडे जाणारी .आपण उजवीकडची वाट  पकडायची , थोडे पुढे गेल्यावर एक वाडा लागतो.आजही वाडा चांगल्या स्थितित उभा आहे.या वाड्याशिवाय येथे बघण्सासारखे काही नाही.परत फिरून आता  डावीकडची वाट पकडायची .या वाटेवरून थोडे पुढे गेल्यावर एक कातळात खोदलेली गुहा लागते.या गुहेत उतरण्यासाठी एक शिडी लावलेली आहे.येथे सध्या एका बाबांचे वास्तव्य असते.गुहेच्या वरच्या भागावर एक घुमटाकार कमान असलेली विहीर आहे.येथून परत थोडे पुढे गेल्यावर आणखी एक गुहा लागते.या गुहे  समोरून पुढे जाणारी वाट तलावापाशी घेऊन जाते.तलावाच्या

काठावर एका  गुहेत महादेवाचे मंदिर आहे.तलावाच्या कडेकडेने जाणा-या वाटेने आपण
डोंगरमाथ्यावर पोहचतो.वाटेत अनेक भुयारी टाकी आढळतात.गडाच्या सर्वोच्च माथ्यावर एक तलावआहे.गडमाथ्यावरुन मांगीतुंगी, न्हावीगड ,कोळधेर ,इंद्राई,धोडप असा सर्व परिसर दिसतो.गडमाथा फिरण्यास २ तास  पुरतात.उतरण्यासाठी एक शिडी लावलेली आहे.येथे सध्या एका बाबांचे वास्तव्य असते.गुहेच्या वरच्या भागावर एक घुमटाकार कमान असलेली विहीर आहे.येथून परत थोडे पुढे गेल्यावर आणखी एक गुहा लागते.या गुहे समोरून पुढे जाणारी वाट तलावापाशी घेऊन जाते.तलावाच्या काठावर एका गुहेत महादेवाचे मंदिर
आहे.तलावाच्या कडेकडेने जाणा-या वाटेने आपण डोंगरमाथ्यावर पोहचतो.वाटेत अनेक भुयारी टाकी आढळतात.गडाच्या सर्वोच्च माथ्यावर एक  तलाव आहे.गडमाथ्यावरुन मांगी तुंगी ,न्हावीगड ,कोळधेर ,इंद्राई,धोडप असा सर्व परिसर दिसतो.गडमाथा फिरण्यास २ तास पुरतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. राजधेरवाडी मार्गे

राजधेरवर जाण्यासाठी एकच मार्ग आहे.नाशिक किंवा मनमाड मार्गेचांदवड गाठावे.नाशिक पासून चांदवड ६४ कि.मी वर आहे तर मनमाड पासून चांदवड २४  कि.मी वर आहे.चांदवड मधून एस टी ने राजधेरवाडी गाठावी.राजधेरवाडी हे पाययथ्याचे गाव आहे.राजधेरवाडीतून गडावर जाण्यास ठळक वाट आहे.गावातून किल्ल्यावर जातांना आपण एका कातळकड्यापाशी पोहचतो.येथून वर जाण्याच्या पाय-या तुटलेल्या आहेत.पण सध्या तिथे एक शिडी लावली असल्यामुळे आपण गडाच्या  प्रवेशद्वारात पोहचू शकतो.अन्यथा प्रवेशद्वारा पर्यंत पोहचण्यासाठी प्रस्तरारोहण  करावे लागते.राजधेरवाडीतून इथपर्यंत पोहचण्यास दीड तास लागतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहे. यात १० लोकांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** गावातून दीड तास.

# सप्तश्रुंगी

किल्ल्याची उंची : ४६००  फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग:  – अजंठा सातमाळ

जिल्हा : नाशिक

श्रेणी : मध्यम

नाशिक जिल्ह्यातील सातमाळ डोंगररांगेमध्ये येणारा ‘सप्तश्रुंगी गड’ हा वणीचा डोंगर या नावाने ओळखला जातो.सप्तश्रुंगी हे जगदंबेचे देवस्थान आहे.महाराष्टातील साडेतीन शक्तीपीठांपैकी असलेली ही देवी सात आदिमातांमधील थोरली माता आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** किल्ल्यावर जगदंबा मातेचे अर्थातच वणीच्या देवीचे मंदिर आहे.मंदिरापर्यंत जाण्यासाठी पाय-या आहेत.

## गडावर जाण्याच्या वाटा :

किल्ल्यावर जाण्यासाठी नांदुरी गावातून गाडीरस्ता गेलेला आहे.वणी  नांदुरी दर अर्ध्यातासाला बसेस चालू असतात.नाशिकवरून थेट नांदुरी गाठून जीपने किल्ल्यावर जाता येते.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्यासाठी धर्मशाळा आहेत.

**जेवणाची सोय :** किल्ल्यावर हॉटेल्स आणि भोजनालये आहेत.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** नांदुरी गावातून अर्धातास.

# हातगड

किल्ल्याची उंची : ३५०० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: अजंठा सातमाळ

जिल्हा : नाशिक

श्रेणी : मध्यम

सुरगणा नाशिक मधील एक तालुका.सह्याद्रीच्या पूर्व भागातीलएका रांगेची सुरवात याच तालुक्यापासून होते.यालाच सातमाळ रांग असे म्हणतात.या सातमाळ रांगेतील किल्ले म्हणजे जणु काय एक तटबंदीच.याच रांगेच्या उपशाखेवर एक छोटासा किल्ला आहे त्याचे नाव हातगड या भागातील जनजीवन मात्र सामान्यच.थोड्या फार आधुनिक सुविधा इथपर्यंत देखील पोहचल्या आहेत.

## गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

गडावर प्रवेश करण्यापूर्वी चार दरवाजे लागतात.पहिल्या दरवाज्याच्या अगोदरच उजवीकडे कातळात वरच्या भागात कोरलेले पाण्याचे टाके लागते.येथेच कातळात कोरलेली हनुमानाची मूर्ती आहे.गडाच्या पहिल्या दरवाज्याचे फक्त खांब शिल्लक आहेत.या दरवाज्याजवळच दोन शिलालेख कोरलेले आहेत.या दरवाज्यातून थोडे वर चढल्यावर आपण दुस-या संपूर्ण कातळातून खोदलेल्या बोगद्या सारख्या दरवाज्यातून आत शिरतो.या दरवाज्याला पाहून हरीहर किल्ल्याची आठवण येते.या दरवाज्याच्या बाजूला एक गुहासुध्दा कोरलेली आहे यात पाण्याची तीन टाकी आहेत.या दरवाज्यातून थोडे वर गेल्यावर गडाचा तिसरा आणि चौथा दरवाजा लागतो.गडमाथा खूप विस्तीर्ण आहे.संपूर्ण गडमाथा फिरण्यास १ तास लागतो.दरवाज्यातून वर आल्यावर पाय-यांची एक वाट डावीकडे खाली उतरते.येथे मोठ्या प्रमाणावर तटबंदी आहे.ती आजही ब-यापैकी शाबूत आहे.समोरच एक पीर सुध्दा आहे.उजव्याबाजूच्या तटात एक कमान कोरलेली आहे ,पाण्याचे एक टाके सुध्दा

आहे.हे सर्व पाहून आल्या वाटेने परतावे.आता दरावाज्याच्या उजवीकडची वाट धरावी.येथून थोडे वर गेल्यावर पाण्याचे टाके लागते थोडे अजून वर गेल्यावर पडक्या इमारतींचे अवशेष लागतात.येथे एक बुरुज वजा इमारतही आहे. थोडे खाली उरल्यावर पाण्याचा एक तलाव सुध्दा आहे.यामधील पाणी पिण्यास अयोग्य आहे.तलावाच्या समोरच किल्ल्याचे मोठे पठार देखील आहे.किल्ल्याच्या या भागाची तटबंदी अजूनही शाबूत आहे.तलावाच्या वरच्या बाजूस एक ध्वजस्तंभ आहे.ध्वजस्तंभाच्या पुढे एक वाट गडाच्या दुस-या टोकाला जाते.वाटेत पाण्याची अनेक टाकी लागात. गडाच्या दुस-या टोकाला एक बुरुज आहे.संपूर्ण गडफेरीस एक तास पुरतो.असा हा हातगड नाशिक पासून १०० कि.मी वर आहे .नाशिकवरून एका दिवसात सहज पाहून होतो.किल्ल्याचे मोठे पठार देखील आहे.किल्ल्याच्या या भागाची तटबंदी अजूनही शाबूत आहे.तलावाच्या वरच्या बाजूस एक ध्वजस्तंभ आहे.ध्वजस्तंभाच्या पुढे एक वाट गडाच्या दुस-या टोकाला जाते.वाटेत पाण्याची अनेक टाकी लागात. गडाच्या दुस-या टोकाला एक बुरुज आहे.संपूर्ण गडफेरीस एक तास पुरतो.असा हा हातगड नाशिक पासून १०० कि.मी वर आहे .नाशिकवरून एका दिवसात सहज पाहून होतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. हातगडवाडी मार्गे

हातगडाला जाण्यासाठी नाशिक गाठावे.नाशिक सापुतारा मार्गावर बोरगाव नावाचा फाटा आहे.येथून एक रस्ता सुरगण्याला जातो तर दुसरा सापुता-याला जातो.सापुता-याला जाणा-या रस्त्यावर बोरगावपासून ४ कि.मी अंतरावर हातगडवाडी नावाचे गाव आहे हेच गडाच्या पायथ्याचे गाव आहे.गावातन एक डांबरी सडक कळवणला जाते या सडकेवरून पुढे जायचे ,हातगडवाडी डाव्या हाताला ठेवायची.पुढे डावीकडे एक बुजलेली विहीर लागते.या विहीरी नंतर ५ मिनिटांनी डांबरी सडक सोडायची आणि डावीकडची डोंगरधारेवर चढत जाणारी वाट धरायची.या वाटेन १५ मिनिटात आपण एका आंब्याच्या छाडाखाली पोहचतो.कागदावर जशी आपण तिरकी रेघ मारतो तशी या झाडापासून डोंगराच्या माथ्यापर्यंत तिरघी रेघ मारावी ही तिरकी रेघ म्हणजे गडावर जाणारी वाट.पायथ्यापासून गडमाथा गाठण्यास पाऊण तास लागतो.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.

**जेवणाची सोय :** आपण स्वतः करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** हातगडवाडी मार्गेपाऊण तास.

# अंजनेरी

किल्ल्याची उंची : ४२०० फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: त्र्यंबकेश्वर
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

अंजनेरी किल्ला इतिहासात परिचित आहे तो हनुमान जन्मस्थानामुळे. वायुपुत्र हनुमानाचा जन्म याच डोंगरावर झाला म्हणूनच या किल्ल्याला अंजनेरी म्हणजेच अंजनी पुत्राचे नाव देण्यात आले आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर रांगेतील अंजनेरी हा देखील एक महत्त्वाचा किल्ला आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावर नाशिक पासून २० कि. मी. अंतरावर अंजनेरी नावाचा फाटा आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : अंजनेरी गावातून किल्ल्यावर येताना वाटेतच पायऱ्यांच्या ठिकाणी गुहेत लेणी आढळतात. ही लेणी जैनधर्मीय असल्याचे दिसून येते. पठारावर पोहोचल्यावर १० मिनिटांतच अंजनी मातेचे मंदिर लागते. मंदिर बऱ्यापैकी प्रशस्त आहे. मुक्काम करण्यासाठी योग्य आहे. येथून थोडे पुढे गेल्यावर दोन वाटा लागतात. एक डावीकडे वळते तर दुसरी समोरच्या बालेकिल्ल्यावर चढते. डावीकडच्या वाटेने वळल्यावर १० मिनिटांतच आपण सीता गुहेपाशी येऊन पोहोचतो. गुहा दोन खोल्यांची आहे. यात १० ते १२ जणांना राहता येते. गुहेच्या भिंतींवर अनेक शिल्पे कोरलेली आहे.समोर असणाऱ्या वाटेने बालेकिल्ल्यावर गेल्यावर २० मिनिटांत आपण दुसऱ्या अंजनीमातेच्या मंदिरात पोहोचतो. हे मंदिर सुद्धा प्रशस्त आहे. किल्ल्याचा घेरा फार मोठा आहे. किल्ल्याच्या पठारावर बाकी काही पाहण्यासारखे नाही.

गडावर जाण्याच्या वाटा : किल्ल्यावर जाण्यासाठीची मुख्य वाट अंजनेरी गावातून वर जातेनाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावर नाशिक पासून २० कि. मी. अंतरावरील अंजनेरी फाट्यायावर उतरावे. या फाट्यापासून १० मिनिटे अंतरावरील अंजनेरी गावात पोहोचावे. गावातून नवरा- नवरीचे दोन सुळके नजरेस भरतात. गावातूनच एक प्रशस्त वाट किल्ल्यावर जाते. पुढे पायऱ्या लागतात. पायऱ्यांच्या साह्याने अंजनेरीच्या पठारावर पोहोचता येते. अंजनेरी गावापासून येथपर्यंत येण्यासाठी दीड तास पुरतो.

राहण्याची सोय : १. पठारावरील अंजनीमातेच्या मंदिरात १० ते १२ जणांची राहण्याची सोय होते.

2. सीता गुंफेत सुद्धा १० ते १२ जणांची राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : आपण करावी.

पाण्याची सोय : मंदिराजवळच बारामाही पिण्याच्या पाण्याचा तलाव आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : अंजनेरी गावातून २ तास.

# कण्हेरगड

किल्ल्याची उंची : ३५८२ फूट.
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: अजंठा सातमाळ
जिल्हा : नाशिक
श्रेणी : मध्यम

अजंठा सातमाळ रांग म्हणजे नाशिक आणि गुजराथच्या सीमेवरील तटबंदीच होय.याच रांगेत आडवाटेवर एक किल्ला आहे त्याचे नावं कण्हेरगड.इतिहास प्रसिध्द असा हा कण्हेरगड आजमितिस बराच दुर्लक्षित आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : गडावर पोहचल्यावर खडकात खोदलेला बुरुज दिसतो.येथून थोडे पुढे गेल्यावर एक नेढं दिसते.नेढ्याच्या समोरून जाणारी वाट थेट गडमाथ्यावर घेऊन जाते.गडमाथा बराच प्रशस्त आहे.संपूर्ण गडमाथा फिरण्यास १ तास लागतो. गडमाथ्यावर पाण्याची ६ ते ७ टाकी आहेत महादेवाची पिंड आहे.धोडप किल्ल्याच्या समोर तोंड येईल अशी गुहा एका कड्यात खोदलेली आहे.गडावर वाड्यांचे काही अवशेष आढळतात.गडाचे दुसरे टोक हे धोडपच्या माची सारखेच आहे.गडावरून पश्चिमेला सप्तश्रुंगी,मार्कंड्या ,रवळ्या जवळ्या , धोडप कंचना ,हंड्या अशी संपूर्ण सातमाळ रांग दिसते.

गडावर जाण्याच्या वाटा : कण्हेरगडावर जाण्याचे दोन मार्ग आहेत.हे दोनही मार्ग कण्हेरगड आणि समोरचा डोंगर यांच्या खिंडीत एकत्र येऊन तिथूनच वर जातात.

१. नाशिक - नांदुरी मार्गे

नाशिकवरून नांदुरी गाव गाठावे.नांदुरीतून कळवणला जाणा-या रस्त्यावरच  नांदुरी गाव आहे.नांदुरी पासून ६ कि.मी अंतरावर आठंबा गाव आहे.या  गावातून २ कि.मी अंतरावर असणा-या ‘सादडविहीर’ या गावात यावे. सादडविहीर  गावातून किल्ल्यावर जाण्यास ठळक वाट आहे.या गावातून खिंड गाठण्यास अर्धा तास लागतो.

२. नाशिक कळवण मार्गे

नाशिक कळवण मार्गेओतूर गाठावे.ओतूर मधून अर्ध्या तासाच्या अंतरावर असणारे कण्हेरवाडी गावात यावे.कण्हेरवाडी गावातून वर सांगतिलेली खिंड गाठण्यास १ तास लागतो.या दोन्ही वाटा वर सांगितलेल्या खिंडीत येऊन मिळतात. गडावरून येणारी एक सोंड सुध्दा याच खिंडीत उतरते.ती सोंड पकडून एक तासाच्या खड्या चढणी नंतर आपण गडमाथ्यावर पोहचतो.वाट निसरडी आहे त्यामुळे जरा जपूनच चढावे लागते.

**राहण्याची सोय** : किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहे यात ५ लोकांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय** : आपण करावी.

**पाण्याची सोय** : किल्ल्यावर बारामही पिण्याचे पाण्याचे टाके आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ** :  सादडविहीर गावातून दीड तास.कण्हेरवाडीतून २ तास

**जाण्यासाठी उत्तम कालावधी** : सर्व ऋतुंमध्ये

# अलंग

किल्ल्याची उंची : ४५०० फूट.

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: कळसूबाई

जिल्हा : नाशिक

श्रेणी : अत्यंत अवघड

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी विभागातील सर्वात कठीण अशा किल्ल्यांची ही भटकंती. घोटीवरून भंडारद-याला जातांना कळसूबाई शिख्रराच्या रांगेत अलंग,मदन आणि कुलंग असे तीन किल्ले लक्ष वेधून घेतात. घनदाट जंगल आणि विरळ वस्ती यामुळे हा परिसरातील भटकंती तशी त्रासदायकच आहे. गडावर जाण्याच्या अवघड वाटा ,भरपूर पाऊस यामुळे हे दुर्गत्रिकुट तसे उपेक्षितच आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :  किल्ल्याचा माथा म्हणजे एक प्रशस्त पठारच आहे. किल्ल्यावर राहण्यासाठी दोन गुहा आहेत. पाण्याची ११ टाकी आहेत. किल्ल्यावर इमारतीचे काही अवशेष आहेत. एक छोटेसे मंदिर आहे. किल्ल्यावरून आजुबाजूचा खूप मोठा परिसर दिसतो. पूर्वेला कळसूबाई, औंढचा किल्ला,पट्टा ,बितनगड,उत्तरेला हरिहर ,त्र्यंबकगड,अंजनेरी तर दक्षिणेला हरिश्चंद्रगड,आजोबाचा गड, खुट्टा सुळका ,रतनगड,कात्राबाई चा डोंगर हा परिसर दिसतो. किल्ल्याचा माथा फिरण्यास ४ तास पुरतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

आंबेवाडी माग : अलंग किल्ल्यावर जाण्यासाठी इगतपुरी किंवा कसारा गाठावे. इगतपुरी/कसारा - घोटी -पिंपळनेरमोर या मार्गेआंबेवाडी गाठावी. घोटी ते आंबेवाडी अशी एस टी सेवा देखील उपलब्ध आहे. घोटी ते आंबेवाडी हे साधारण ३२ कि.मी चे अंतर आहे. घोटीवरुन पहाटे आंबेवाडी ला ६.०० वाजताची बस आहे.

आंबेवाडीतून समोरच अलंग,मदन आणि कुलंग हे तीन किल्ले दिसतात. गावातूनच अलंग आणि मदन च्या खिंडी पर्यंत जाण्यासाठी वाट आहे. वाट फारच दमछाक करणारी आहे. खिंड गाठण्यास ३ तास लागतात. खिंडीत पोहचल्यावर डावीकडचा अलंग किल्ला तर उजवीकडचा मदन किल्ला. येथून अलंगवर जाण्यासाठी दोन वाटा आहेत. अ.) एक वाट खिंडीतून समोरच्या दिशेने खाली उतरते. १ तासात आपण खालच्या पठारावर पोहचतो. येथून अलंग चा कडा डावी कडे ठेवत १ तासात आपण किल्ल्यावरून येणा-या तीस-या घळी पाशी पोहचतो. या घळतीच एक लाकडी बेचका ठेवला आहे. या बेचक्यातून वर गेल्यावर थोडे सोपे प्रस्तरारोहण करावे लागते. पुढे थोडीशी सपाटी लागते.येथून डावीकडे कड्यालगत जाणारी वाट पकडावी. १० ते १५ मिनिटात आपण किल्ल्यावरील गुहेत पोहचतो. आंबेवाडीतून येथपर्यंत पोहचण्यास ८ ते ९ तास उलटून गेलेले असतात. ब.) खिंडीतून डावीकडच्या वाटेने थोडे पुढे गेल्यावर सोपे प्रस्तरारोहण केल्यावर काही पाय-या लागतात. या पाय-या चढून गेल्यावर एक ८० ते ९० फूटाचा सरळसोट तुटलेला कडा लागतो. या कड्यावर  प्रस्तरारोहणाचे साहित्य वापरून किल्ल्यावर प्रवेश करता येतो. प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असल्या शिवाय या वाटेने जाण्याचे धाडस करू नये. यावाटेने किल्ला गाठण्यास ६ तास लागतात.

घाटघर मार्गे: किल्ल्यावर जाण्यासाठीची दुसरी वाट घाटघर वरून आहे.घोटी - भंडारदरा मार्गेघाटघर गाठावे. घाटघरहून अडीच तासात

किल्ल्याच्या तीस-या घळीत ठेवलेल्या लाकडी बेचक्यापाशी पोहचतो.
उदडवणे गावातून : किल्ल्यावर जाण्यासाठी आणखी एक वाट आहे. ती भंडारदरा मार्गेउदडवणे गावातून पठारावर येते. पुढे क्रं २ च्या वाटेला येऊन मिळते.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्यासाठी २ गुहा आहेत.यात ३० ते ४० जणांची राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :** आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याच्या पाण्याची टाकी आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** आंबेवाडीतून ७ ते ८ तास लागतात.

**सूचना :** किल्ल्यावर जाण्याच्या वाटा अवघड असल्यामुळे प्रस्तरारोणाचे तंत्र अवगत असणे आवश्यक आहे.

# मदनगड

किल्ल्याची उंची : ४९०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: कळसूबाई
जिल्हा : नाशिक
श्रेणी : अत्यंत कठीण

सह्याद्री मधील कठीण अशा गडकिल्ल्यांमध्ये एक गड म्हणजे मदनगड. किल्ला तसा बराच प्राचीन आहे आणि तेवढाच दुर्गम सुद्धा. या परिसरातील भटकंती करायाची असेल तर सर्वात योग्य असा कालावधी म्हणजे डिसेंबर आणि जानेवारी.
गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : गडमाथा तसा लहानच आहे.गडावर पाण्याची दोन टाकी आहेत मात्र यात फक्त फेब्रुवारी महिन्यापर्यंतच पाणी असते.गडावर २० ते ३० जणांना राहता येईल एवढी गुहा सुद्धा आहे.गडावरून सभोवतालचा परिसर फारच छान दिसतो. अलंग,कुलंग ,छोटा कुलंग रतनगड,आजोबा गड,कात्राबाई ,डांग्या सुळका ,हरिहर,त्रिबंकगड हे कि दिसतात. गडफेरीस अर्धातास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. दोन्ही मार्ग अलंग आणि मदनच्या खिंडीतूनच जातात.
आंबेवाडी मार्गे: मदनगडावर जाण्यासाठी इगतपुरी किंवा कसारा गाठावे. इगतपुरी/कसारा - घोटी - पिंपळनेरमोर या मार्गेआंबेवाडी गाठावी.घोटी ते आंबेवाडी अशी एस टी सेवा देखील उपलब्ध आहे. घोटी ते आंबेवाडी हे साधारण ३२ कि.मी चे अंतर आहे. घोटीवरुन पहाटे आंबेवाडी ला ६.०० वाजताची बस आहे. आंबेवाडीतून समोरच अलंग,मदन आणि कुलंग हे तीन किल्ले दिसतात. गावातूनच अलंग आणि मदन च्या खिडी पर्यंत जाण्यासाठी वाट आहे. वाट फार दमछाक करणारी आहे. खिंड गाठण्यास ३ तास लागतात. खिंडीत पोहचल्यावर डावीकडचा अलंग किल्ला तर उजवीकडचा मदन किल्ला. येथून मदन वर जाण्यासाठी दोन वाटा आहेत. उजवीकडे वळल्यावर थोड्याच वेळात पाय-या लागतात. पाय-या चढून गेल्यावर एक सरळसोट ५०फूट उंचीचा कडा लागतो
घोटी - भंडारदरा मार्गेघाटघर : किल्ल्यावर येण्यासाठी दुसरी वाट घाटघर वरून आहे. घोटी - भंडारदरा मार्गेघाटघर गाठावे.घाटघरहून चार तासात आपण अलंग आणि मदन यांच्या खिंडीपाशी पोहचतो.

**राहण्याची सोय :** गडावर एक गुहा आहे यात साधारण ३० जण राहू शकतात.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर फक्त फेब्रुवारी पर्यंत पिण्यासाठी पाणी उपलब्ध असते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** आंबेवाडीतून ७ ते ८ तास लागतात.

**सूचना :** किल्ल्यावर जाण्याची वाट अतिकठीण असल्यामुळे प्रस्तरारोणाचे तंत्र अवगत असणे आवश्यक आहे.

# औंढ

किल्ल्याची उंची : ४४०० फूट
डोंगररांग: कळसूबाई
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
जिल्हा : नाशिक
श्रेणी : अत्यंत कठीण

सह्याद्रीची उत्तर दक्षिण रांग इगतपूरी परिसरातून थळघाटाच्या पूर्वेकडे जाते याच रांगेला कळसूबाई रांग म्हणतात. या रांगेचे दोन भाग पडतात. एक म्हणजे अलंग,मदन,कुलंग आणि कळसूबाई तर पूर्वेकडील औंढ, पट्टा, बितनगड, आड, म्हसोबाचा डोंगर. वृक्षतोडी मुळे हा सर्व परिसर उजाड झालेला आहे. मात्र एस.टी. ची सोय आणि भरपूर पाऊस यामुळे ग्रामीण जीवन बरेच सुखी झालेले आहे. किल्ल्यावरचा भाग म्हणजे एक सुळकाच आहे. औंढा किल्ला नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्याच्या नैऋत्येस आणि देवळालीच्या दक्षिणेस १० मैलांवर आहे.

**इतिहास :** इ.स.१६८८ पर्यंत हा किल्ला मराठ्याच्या राज्यात होता. यानंतर तो मोगलांनी जिंकून घेतला. येथे मोगलांचा सरदार श्यामसिंग यांची किल्लेदार म्हणून नेमणूक झाली

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** औंढचा किल्ला म्हणजे एक सुळकाच आहे. यामुळे किल्ल्याचा माथा तसा लहानच. याचा उपयोग टेहळणीसाठी होत असे. गडावर पाण्याच्या चार-पाच टाक्या आहे. एका गुहेत पाणी आहे
खड्कात खोदलेला दरवाजा आहे. समोरच पट्टा किल्ला, बितनगड, अलंग,मदन आणि कुलंग, कळसूबाई असा सर्व परिसर दिसतो. गड पाहण्यास अर्धा तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** औंढा किल्ल्याला जाण्यासाठी दोन मार्ग आहेत.

निनावी मार्गे: मुंबई मार्गेइगतपुरी गाठावी. इगतपुरी बस स्थानका वरून सकाळी ७.०० वाजता भगूर कडे जाणारी एस.टी पकडून साधारणतः दीड तासाच्या अंतरावरील कडवा कॉलनी नाक्यावर उतरावे. या कॉलनी पासूनच आपली पायपीट चालू होते. कॉलनीतून पुढे गेल्यावर कडवा धरण लागते. धरणाच्या भिंतीवरून पुढे गेल्यावर साधारण नाक्या पासून ४५ मिनिटांत आपण निनावी गावात पोहचतो. निनावी गावातून औंढा किल्ल्यावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. पहिली वाट गावातून समोरच दिसणा-या उभ्या कड्याच्या घळी मधून जाते. ही वाट मात्र मस्त दमछाक करणारी आहे. दुसरी वाट निनावी गावातील दुस-या हनुमान मंदिराजवळून जाते. ही वाट कमी दमछाक करणारी पण पहिल्या वाटेपेक्षा जास्त वेळ लावणारी आहे. यावाटेने किल्ल्याचे पहिले पठार गाठण्यास पाऊण तास लागतो. या पठारावरच औंढाकिल्ला ठेवल्या सारखा दिसतो. येथून किल्ल्याच्या पाय-या पर्यंत जाण्यास अर्धा तास लागतो. समोरच कातळात कोरलेल्या पाय-या लागतात. पाय-या चढून गेल्यावर कडा उजव ीकडे ठेवून पुढे जावे. वर थोडे प्रस्तरारोहण केल्यावर गडमाथा गाठता येतो.
पट्टा किल्ला मार्गे: अनेक जण औंढ-पट्टा-बितनगड असा ट्रेक सुद्धा करतात. येथून पट्टा किल्ल्याला जाण्यासाठी वरील मार्गाने किल्ल्याच्या पाय-या असणा-या पठारावर परतावे. पठारावरून समोरच एक भगवाझेंडा फडकतांना दिसतो. येथून पुढे जाणारी वाट थे ट पट्टा किल्ल्यावर जाते.

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्याची सोय नाही, औंढावाडीत राहता येते.

**जेवणाची सोय :** नाही.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २ तास निनावी मार्गेआणि २ तास पट्टा किल्ला मार्गे.

**सूचना :** पावसाळ्यात अतिकठिण

# पट्टागड

किल्ल्याची उंची : ४५६२ फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: कळसूबाई
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

सह्याद्रीच्या उत्तर दक्षिण रांगेची सुरुवात इगतपुरी परिसरातून थळघाटाच्या पूर्वेकडे जाते याच रांगेला कळसूबाई रांग म्हणतात. याच रांगेच्या पश्चिमेकडे अलंग, मदन, कळसूबाई तर पूर्वेकडे औंढ, पट्टा, बितनगड, आड हे किल्ले आहेत. अलंग, मदन, कुलंग येथे असणारे घनदाट जंगल, दुर्गमवाटा यामुळे येथील किल्ल्यांची भटकंती फारच अवघड आहे तर औंढ, पट्टा, या परिसरातील भ्रमंती फारच सोपी आहे. पट्ट ाकिल्ल्याचेच दुसरे नाव विश्रामगड असे देखील आहे.

## इतिहास :

पट्टागड शिवाजी महाराजांनी इ.स.१६७१ मध्ये जिकूंन घेतला. पट्टा किल्ल्याचा माथा म्हणजे एक मोठे पठारच आहे. येथून अलंग, मदन, कुलंग, कळसूबाई, त्रिंबकगड हा सर्व परिसर नजरेत भरतो. या सर्व परिसरावर नजर ठेवण्यासाठी या किल्ल्यांचा उपयोग होत असे. शिवरायांनी हा किल्ला जिंकला आणि याचे नामकरण 'विश्रामगड' असे केले. जालानापूरची लूट केल्यानंतर शिवाजी महाराजांनी काही काळ या किल्ल्यावर घालवला. पुढे इ.स.१६८६ पर्यंत हा सर्व परिसर मराठ्यांच्या ताब्यात होता. १६८२ साली औरंगजेबाने महाराष्ट्रात पदार्पण केले आणि मराठी मुलूख ताब्यात घेण्यास सुरवात केली. १६८८ साली मातबरखानाने बागलाणातील अनेक गड घेण्यास सुरवात केली होती. पट्टागडा संबंधी मातबरखान औरंगजेबाकडे अर्ज पाठवतो त्यात तो म्हणतो सेवकाने काही दिवसांपासून १००० कोळी, भिल्ल, व मावळे यांचे पथक सैन्यात घेतले आहे. मराठ्यांच्या ताब्यात असलेले पट्टा व इतर किल्ल्यालगतच्या जमीनदारांना रकमा पुरवण्यात आल्या आहेत. ११ जानेवारी १६८८ ला खानाने काही पथके किल्ला घेण्याच्या मार्गावर धाडली. मध्यरात्रीच्या सुमारास किल्ल्याच्या तटाला दोर लावून किल्ला जिंकून घेतला. भगूरचा ठाणेदार गोविंदसिंग याची किल्ल्यावर नेमणूक करण्यात आली. मोगलांनी १६८८ ते ८९ या कालावधीत मराठ्यांचे औंढा, त्रिंबकगड, कवनी, त्रिंगलवाडी, मदनगड, मोरदंत किल्ले फितुरीने घेतले मात्र पट्टागड त्यांना जिंकून घ्यावा
गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : पट्टा किल्ल्याचा माथा म्हणजे एक प्रशस्त पठारच आहे. औंढा किल्ल्याकडून येणा-या वाटेने किल्लावर पोहोचल्यावर (वाट२) समोरच पाण्याचे एक टाके लागते. पाण्याच्या टाक्यापासून दोन वाटा निघतात. एक डावीकडे तर दुसरी उजवीकडे. उजवीकडच्या वाटेने पुढे गेल्यावर थोड्याच अंतरावर पाण्याचे टाके आहे. उजवीकडच्या माथ्यावर आता काहीच शिल्लक नाही म्हणून आता डावीकडच्या माथ्यावर वळावे. पाऊण तास पुढे गेल्यावर दोन पाण्याची टाकी आढळतात. समोरच एक मोठी इमारत आहे. इमारतीच्या भिंती आणि छप्पर अजूनही शिल्लक आहे. समोरच किल्ल्याची आडवी तटबंदी आहे. तटबंदीच्या वरच्या भागावर दोन मोठ्या गुहा आहेत. समोरच सात पाण्याची टाकी आहेत. गुहा रहाण्यासाठी उत्तम आहेत. तटबंदीच्या खालच्या बाजूला गेल्यावर अष्टभुजा देवीचे मंदिर लागते. या मंदिराचा अलीकडेच जीर्णोद्वार केला आहे. मंदिराच्या समोरच उत्तरमुखी दरवाजा दिसतो. त्याची कमान आजही शाबूत आहे. दरवाजाच्या उजव्या बाजूला बुरूज आहे. मंदिर आणि बुरुजाच्या खालच्या बाजूस उतरलं की दोन गुहा लागतात. एका गुहेमध्ये साधूचे वास्तव्य आहे तर दुस-या गुहेत अलीकडेच गावाचा दवाखाना आहे. येथून खाली जाणारी वाट पट्टावाडीत जाते. संपूर्ण गडमाथा फिरण्यास ४ तास पुरतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

इगतपुरी - घोटी मार्गेटाकेद : इगतपुरी - घोटी मार्गेटाकेद गाव गाठावे. टाकेद पर्यंत पोहचण्यास १ तास लागतो. टाकेद वरून कोकणवाडी या वाडी पर्यंत जीपसेवा उपलब्ध आहे. टाकेद ते कोकणवाडी हे अंतर पाऊण तासाचे आहे. कोकणवाडीला येण्यासाठी दुसरी वाट एकदरा गावातून सुद्धा जाते. टाकेदच्या पुढेच हे एकदरा गाव आहे. कोकणवाडी ते पट्टावाडी अंतर अर्ध्या तासाचे आहे. पट्टावाडी हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव. पट्टावाडी हे गाव मुळातच डोंगराच्या पठारावर बसलेले आहे. गावातूनच किल्ल्यावर जाण्यास वाट आहे. गावातून किल्ल्याचा माथा गाठण्यास अर्धा तास पुरतो.

इगतपुरी-भगूर बसने कडवा कॉलनी : दुसरी वाट औंढ किल्ल्याकडून येते. इगतपुरी-भगूर बसने कडवा कॉलनी गाठावी. कडवा कॉलनी पासून निनावी गावात यावे. निनावी गावात औंढ किल्ल्याची डोंगसोंड खाली उतरलेली आहे. यावरून वर चढून गेल्यावर आपण एका पठारावर पोहोचतो. पठारावरून उजवीकडची वाट पकडावी. या वाटेने थोडे पुढे गेल्यावर आपण औंढ्याच्या पायथ्याशी पोहोचतो. या किल्ल्याच्या पायथ्याशी वाट दुभागते. उजवीकडची वाट औंढ किल्ल्यावर जाते तर, सरळवाट पट्टा किल्ल्याकडे जाते. या वाटेने पुढे गेल्यावर एक खिंड लागते. या खिंडीतून पुढे गेल्यावर समोरच पठार लागते. पठारावर देवीचे एक मंदिर आहे. मंदिराच्या मागून जाणारी वाट पुढे दुभागते.डावीकडची वाट पट्टावाडीत जाते तर सरळ डोंगरसोंडेवर चढणारी वाट वीस मिनिटात एका कातळकड्या पर्यंत पोहचते. कातळकड्याच्या डावीकडची वाट कड्याला चिकटूनच पुढे जाते. सुमारे २० मिनिटांत आपण दोन डोंगराच्या मध्ये जाते. समोरच पट्ट्याची तटबंदी आहे. वाटेतच एक पाण्याचे टाके लागते.

## राहण्याची सोय :

१) किल्ल्यावर दोन मोठ्या गुहा आहेत. गुहेमध्ये ५० जणांची राहण्याची सोय होते. २) पट्टावाडीत सुद्धा राहण्याची सोय होते.

## जेवणाची सोय :

जेवणाची सोय आपण स्वतः करावी.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याच्या पाण्याची टाकी आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पट्टावाडीतून अर्धा तास लागतो.

# त्रिंगलवाडी

किल्ल्याची उंची : ३२३८ फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: कळसूबाई
जिल्हा : नाशिक
श्रेणी : सोपी

इगतपुरी परिसरातून सह्याद्रीची एक रांग पश्चिमेकडे पसरली आहे. याच रांगेत त्रिंगलवाडी बळवंतगड आणि कावनई हे किल्ले आहेत. या मार्गात लागणारी गावं, डोंगरमाथ्यापर्यंत आलेले रस्ते, माणसांची वर्दळ यामुळे येथील भटकंती ही कमी कष्टाची आहे

**इतिहास :** किल्ल्याच्या पायथ्याशी असणा-या जैन लेण्यांवरून या किल्ल्याची निर्मिती साधारण १०व्या शतकात झाली असावी. हा किल्ला मराठ्यांनी कधी घेतला हे ज्ञात नाही. मात्र १६८८ च्याशेवटी मुघलांनी फितुरीने हा किल्ला मराठ्यांकडून जिंकून घेतला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** त्रिंगलवाडी गावातून गडावर जाताना पायथ्याशी पांडवलेणी नावाची गुहा आहे. या लेणी ३ भागात आहेत. ओसरी, आत विहार आणि विहारात कोरलेले कोनाडे. प्रवेशद्वारावर सुंदर कोरीव काम आढळते. विहाराच्या आत असलेल्या कोनाड्यात गौतमबुद्धाची ध्यानस्थ मूर्ती आहे. त्या मूर्तीच्या खाली एक शिलालेख आहे. विहाराच्या ४ खांबांपैकी ३ खांबांची पडझड झाली आहे. येथून वर किल्ल्यावर जात असताना वाटेतच पाय-यांच्या अगोदर गुहा लागते. पाय-यांनी गडावर पोहचल्यावर समोरच पडक्या वाड्याचे अवशेष लागतात. वाड्यांचे अवशेष पाहून परत पाय-यांकडे वळायचे. पाय-यांपासून उजवीकडे वळल्यावर अनेक सुकलेली पाण्याची टाकी आढळतात. ५-१० मिनिटे पुढे गेल्यावर डावीकडे असणा-या डोंगराच्या पायथ्याशी एक मोठी गुहा आहे. या गुहेत २०-२५ जणांना राहता येते. येथून पुढे चालत गेल्यावर पिण्याच्या पाण्याचे भुयारी टाके लागते.टाक्याच्या खांबांवर सुंदर नक्षीकाम आढळते.या टाक्यांपासून पुढे गेल्यावर शंकराचे मंदिर लागते. या मंदिरासमोरच्या कड्यावरून दक्षिणेस तळेगड, इगतपुरी पूर्वेला कळसुबाई, उत्तरेला त्र्यंबकरांग, हरिहर, बसगड असा परिसर दिसतो. आल्या मार्गाने परत पाय-यांपाशी यावे. पाय-यांच्या समोरच वाड्याचे अवशेष आहे. ते मागे टाकून सरळ पुढे वाटेने खाली उतरावे आणि उजवीकडे वळावे. ही वाट गडाच्या गुप्त दरवाजापाशी घेऊन जाते. पाय-यांनी खाली उतरल्यावर आपण अखंड कातळात कोरलेल्या दरवाजापाशी पोहचतो. दरवाजाच्या उजवीकडे ६-७ फूट उंच हनुमानाची मूर्ती कोरली आहे. समोरच कातळात कोरलेल्या पाय-या किल्ल्याच्या मधल्या पठारावर घेऊ फिरण्यास साधारण १ तास पुरतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडावर जाण्यासाठी ३ मार्ग आहेत.

चिंचोली मार्गे: या मार्गाने गडावर जाण्यासाठी कसारा गाठावे. कसा-यावरून जव्हार, मोखाडा किंवा खोडाळा यापैकी जाणारी कुठलीही बस पकडावी आणि ‘विहीगाव’ फाट्यावर उतरावे.या फाट्याच्या समोरच एक देऊळ आहे. या देवळाच्या मागे म्हणजेच रस्त्याच्या उजवीकडे जाणारी वाट पकडावी. पाऊण तासानंतर चिंचोली नावाचे गाव लागते. या गावाच्यामागून जंगलातून जाणा-या रस्त्याने किल्ल्याच्या मध्यभागी असणा-या पठारावर पोहचावे.येथून क्र. २ मध्ये सांगितल्याप्रमाणे २ वाटा जंगलावर जातात. कोणत्याही वाटेने दगडावर पोहचावे ही वाट फारच लांबची असल्याने याने गड गाठण्यास ४ तास लागतात. वाट चुकण्याचा देखील संभव आहे.

त्रिंगलवाडी मार्गे: गाडीने किंवा रेल्वेने इगतपुरी गाठावे. इगतपुरीच्या पूर्वेकडे म्हणजेच एस.टी स्टँडच्या बाजूला बाहेर पडायचे. एसटी स्थानकाच्या अलीकडे आंबेडकर चौक लागतो. या चौकातून एक वाट वर जाते. या वाटेने पुढे पंधरा मिनिटे चालत गेल्यावर उजवीकडे वळावे. अर्ध्या तासात आपण वाघोली नावाच्या खिंडीत पोहचतो. खिंडीतून खाली उतरल्यावर आपण त्रिंगलवाडी नाक्यावर पोहचतो. येथून डावीकडे (त्रिंगलवाडी गावाकडे ) वळावे.अर्ध्या तासात आपण त्रिंगलवाडी गावात पोहचतो. त्रिंगलवाडी Jावापर्यंत इगतपुरी-घोटी-त्रिंगलवाडी अशी जीपसेवा देखील उपलब्ध आहे.गावाच्या मागे त्रिंगलवाडी धरण आहे. धरणाच्या भिंतीवर चढून डावीकडे वळावे.भिंत संपल्यानंतर उजवीकडची वाट पकडावी. या वाटेने अर्ध्या तासात आपण किल्ल्याच्या पायथ्याशी पोहचतो. पायथ्याशीच पांडवलेणी नावाची गुहा आहे. या गुहेच्यावरून गडा वर जाण्यास

विपश्यना विद्यापीठामार्गे: इगतपुरी स्थानकावरून उत्तर दिशेला म्हणजेच ‘विपश्यना विद्यापीठा’कडे उतरावे. विद्यापिठाचे प्रवेशद्वार आल्यावर तेथून समोर असणारी डोंगराची सोंड चढावी. ती वाट आपल्याला प्रचंड कड्याखाली आणून सोडते. तो प्रचंडकडा उजवीकडे ठेवत दोन तासात किल्ल्याच्या पायथ्याशी पोहचतो. येथून वर चढण्यास आपल्याला अर्धा तास पुरतो.हा मार्ग पुढे दोन मार्गांमध्ये

विभागलेला आहे. पूर्वेकडून वर चढणारा मार्ग हा वर सांगितलेल्या क्र. १ च्या वाटेला जाऊन मिळतो, तर पश्चिमेकडे जाणारी वाट किल्ल्याला उजवीकडे ठेवत एका घळीपाशी पोहचते. या घळीतून वर चढल्यावर पुढे कातळात कोरलेल्या पाय-या लागतात. या पाय-यांनी वर चढल्यावर किल्ल्याचा दरवाजा लागतो.

राहण्याची सोय : किल्ल्यावर १५ जणांना राहता येईल एवढी मोठी गुहा आहे.

जेवणाची सोय : आपण स्वतः करावी.

पाण्याची सोय : गडावर बारामाही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : १ तास त्रिंगलवाडी गावापासून, ३ तास चिंचोली गावापासून, २ तास विपश्यना मार्गे

सूचना :चिंचोली गावातून जाणारी वाट - मध्यम,निसरडी.

## कावनई

किल्ल्याची उंची : २५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: इगतपुरी-पश्चिम
जिल्हा : नाशिक
श्रेणी : मध्यम

इगतपुरी परिसरात असणारी सह्याद्रीची रांग दोन दिशांना विभागली जाते एक पूर्वेकडे तर दुसरी पश्चिमेकडे पूर्वेकडे असणा-या सह्याद्रीच्या रांगेला कळसूबाई रांग म्हणतात.यात कळसूबाई ,अलंग,कुलंग ,अवंढ - पट्टा हे किल्ले
येतात तर पश्चिमेकडे असणा-या रांगेत त्रिंगलवाडी,कावनई ,हरीहर,ब्रम्हगिरी,अंजनेरी हे किल्ले येतात.या परिसरात भ्रमंती करायची असल्यास इगतपुरी किंवा घोटीला यावे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : किल्ल्याचा दरवाजा आजही ब-यापैकी शाबूत आहे.दरवाज्यातून आत शिरल्यावर उजव्या हातालाच गुहा आहे.गुहेत ४ ते ५ जणांना राहता येईल एवढी वाट आहे.येथूनच माथ्यावर जाण्यास जागा आहे.गडमाथ्यावर पोहचल्यावर दक्षिणभागात एक तलाव आहे आजुबाजुला पडक्या वाड्यांचे अनेक अवशेष आहेत.गडाच्या पश्चिम भागात एक बुरुज आहे.बुरुजाच्या जवळच पाण्याचे टाके आहे.गडमाथा तसा लहानच त्यामुळे फिरण्यास अर्धा तास पुरतो.किल्ल्यावरून कळसूबाई रांग,त्र्यंबक रांग,त्रिंगलवाडी असा सर्व परिसर दिसतो.

गडावर जाण्याच्या वाटा : १. कावनई मार्गे

कावनई ला जायचे असल्यास इगतपुरीला किंवा घोटीला यावे.येथून कावनई गावाकडे जाणारी बस पकडावी.कावनई गाव हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे.इगतपुरीहून अप्पर वैतरणा ला जाणारी बस पकडून वाकी फाट्यावर उतरावे. वैतरणा कडे जाणारा रस्ता सोडून उजवकडची वाट पकडावी.या फाटयापासून १ तासाच्या चाली नंतर आपण कावनई गावात पोहचतो.गावात कपिलाधारातीर्थचा नावाचा आश्रम आहे.गावात शिरल्यावर उजव्या हातालाच किल्ला दिसतो.किल्ल्याची एक सोंड गावात उतरलेली आहे.या सोंडेवरून चढत जायचे अर्ध्या तासाच्या चालीनंतर वाट उजवीकडे वळते आणि चिमणीपाशी येऊन थांबते.पुढचा चढाई चिमणीतूनच आहे.येथे सोपे प्रस्तरारोहण करून आपण किल्ल्याच्या दरवाजापाशी येऊन पोहचतो.गावापासून इथपर्यंत पोहचण्यास १ तास पुरतो.

राहण्याची सोय : किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहे यात ४ ते ५ लोकांची राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : आपण स्वतः करावी.

पाण्याची सोय : किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.यात एप्रिल पर्यंत पाणी असते.

जाण्यासाठी लागणारा वेळ : कावनई गावातून अर्धा तास.

# रत्नागिरी जिल्हा

## रत्नदुर्ग ( भगवतीचा किल्ला )

किल्ल्याची उंची : ०
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: कोकण
जिल्हा : रत्नागिरी
श्रेणी : अत्यंत सोपी

रत्नांगिरी शहरापासून अवघ्या २ - ३ कि.मी. वर असणारा रत्नदुर्ग हा पर्यटकांसाठी मुख्य आकर्षणाचा विषय ठरला आहे तो त्यावरील अत्यंत सुंदर भगवती मंदिरामुळे, येथून दिसणाऱ्या समुद्राच्या विहंगम दृश्यामुळे आणि समुद्रापर्यंत जाणाऱ्या किल्ल्यातील भुयारी मार्गामुळे. रत्नदुर्ग रत्नांगिरी शहराच्या अत्यंत जवळ असून अरबी समुद्राच्या काठावरील डोंगरावर बांधण्यात आला आहे. किल्ल्याचा आकार घोड्याच्या नालासारखा असून क्षेत्रफळ १२० एकर आहे. रत्नदुर्ग तीनही बाजूंनी समुद्राने वेढलेला असून याच्या आग्नेय दिशेला जमीन आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीच मिरकरवाडा हे बंदर आहे.

**इतिहास :** रत्नदुर्गाची बांधणी फार पूर्वी बहमनी काळात झाली. १६७० साली शिवाजी महाराजांनी हा किल्ला अदिलशहाकडुन जिंकून घेतला. धोंडू भास्कर प्रतिनिधी यांनी १७९०  साली किल्ल्याची डागडुजी करून याला अधिक मजबुती आणली.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोरच सुबक बांधणीचे श्री भगवतीचे शिवकालीन मंदिर आहे. भगवती देवीचे दर्शन घेऊन पुढे गेल्यावर एका ठिकाणी चारही बाजूंनी भिंतींनी संरक्षित केलेली एक जागा आपल्याला दिसते. हाच तो तीन तोंडाचा भुयारी मार्ग. आज हा भुयारी मार्ग वापरात नसला तरी दीपगृहाकडून किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे येतांना लागणाऱ्या तटबंदीवरून या भुयाराचा शेवट खाली समुद्रकिनाऱ्यावर ज्याठिकाणी होतो तेथे असलेली एक प्रचंड गुहा स्पष्ट दिसते. या भिंतींनी संरक्षित केलेल्या तीन तोंडाच्या भुयारी मार्गापासून थोडे पुढे चालत गेले असता समुद्राचे मनोरम दर्शन घडवणारा एक बुरूज लागतो. या बुरुजाचे नाव रेडे बुरूज असून यावर एक स्तंभही उभारला आहे.  किल्ल्याच्या एका बाजूला दीपगृह असून या दीपगृहावरुन संपूर्ण रत्नांगिरी शहराचे तसेच समुद्राचे अत्यंत सुंदर दृश्य दिसते. किल्ल्यात एक लहान तळे व एक खोल विहीर आहे. रत्नांगिरी शहरातून किल्ल्याकडे जाण्यासाठी रिक्षा सोईची असून रत्नांगिरी शहराचा नजारा दीपगृहावरुन बघण्यासाठी संध्याकाळी ५.०० च्या सुमारास गेल्यास तशी परवानगी मिळू शकते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** किल्ल्यावर जाण्यासाठी वरपर्यंत डांबरी रस्ता असून किल्ल्याच्या पायथ्याशीच शंकराचे श्री भागेश्वर मंदिर आहे. या मंदिराच्या खांबांवर पशुपक्ष्यांची सुंदर सुंदर चित्रे केरलेली असून मंदिराच्या सभोवती नारळी, पोफळी व फुलझाडांनी बहरलेली बाग आहे.

**राहण्याची सोय :** नाही.

**जेवणाची सोय :** नाही.

**पाण्याची सोय :** मंदिराजवळ पिण्याचे पाणी मिळू शकते.

# महिपतगड

किल्ल्याची उंची : ३०९० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: महाबळेश्वर कोयना
जिल्हा : रत्नागिरी
श्रेणी : मध्यम

खेड तालुक्याच्या पूर्वेस १२ मैलांवर रसाळगड-सुमारगड आणि महिपतगड ही डोंगररांग उभी आहे. या मध्ये उत्तरेकडचा महिपतगड हा सर्वात उंच आणि विस्ताराने सुद्धा प्रचंड आहे. किल्ल्याचे क्षेत्रफळ १२० एकर आहे.हे तीन किल्ले एकमेकांच्या जवळजवळ असल्यामुळे अनेक ट्रेकर्स महिपतगड-सुमारगड-रसाळगड असा ट्रेक देखील करतात.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** महिपतगड हा नावाप्रमाणेच महिपत आहे. किल्ला तसा आकाराने फार मोठा आहे. चहुबाजूंचे कडे तुटलेले असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी तटबंदीची गरज भासत नाही. काही ठिकाणी जिथे कडा चढण्यास सोपा आहे तिथे तटबंदी उभारली आहे. सध्या मात्र ही तटबंदी पडून गेलेली आहे. किल्ल्याला एकूण सहा दरवाजे आहेत. ईशान्येकडे लालदेवडी दरवाजा, पूर्वेस पुसाटी दरवाजा, दक्षिणेकडे खेड दरवाजा, पश्चिमेस शिवगंगा दरवाजा, उत्तरेकडे कोतवाल दरवाजा, आग्नेयेस यशवंत दरवाजा. सद्यःस्थितीला हे दरवाजे नाममात्र उरलेले आहेत. हे सर्व दरवाजे होते याच्या खुणा फक्त उरलेल्या आहेत. शिवगंगा दरवाजा जवळ एक शिवाची पिंड आहे. पुसाटी दरवाजा जवळ एक शिडी आहे. कोतवाल दरवाजा जवळ मारुतीचे एक छोटेसे मंदिर आहे.

पारेश्वराचे एक मोठे मंदिर किल्ल्यावर आहे. या मंदिरात राहण्याची सोय होते. मंदिराच्या समोरच पिण्याच्या पाण्याची विहीर आहे. या व्यतिरिक्त किल्ल्याचे पठार म्हणजे एक जंगलच आहे. अनेक प्रकारचे अवशेष या झाडीत लपलेले आहेत. या सर्वांचा अभ्यास होणे फार आवश्यक आहे. या किल्ल्यावर एक आगळावेगळा प्रकार दिसतो. तो म्हणजे न वापरलेल्या चुन्याचे अवशेष येथे पडलेले दिसतात. गड फिरण्यास दोन ते तीन तास पुरतात.

गडावर जाण्याच्या वाटा : खेड वरून पहाटेच दहिवली गावाला जाणारी बस पकडावी. खेड ते दहिवली १ तासाचे अंतर आहे. दहिवली गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी मळलेली वाट आहे. ही वाट लांबची असल्याने गडमाथा गाठण्यास ४ तास लागतात. या वाटेने जातांना आपल्याला दोन खिंडी पार कराव्या लागतात.

२) : खेडवरून वाडीजैतापूरला जाणारी गाडी पकडावी. वाडीजैतापूरास उतरल्यावर मळलेल्या वाटेने वाडी बेलदार गावात यावे. वाडीजैतापूर ते वाडीबेलदार हे अंत दोन ते अडीच तासांचे आहे. वाडीबेलदारहून गडमाथा गाठण्यास १ तास पुरतो. वाट चांगली मळलेली असल्याने चुकण्याचा संभव नाही.

३) : रसाळगडवरून सुमारगड मार्गेसुद्धा महिपतगड गाठता येतो. हे अंतर साधारणतः: ७ तासांचे आहे. जंगल दाट असल्याने वाट चुकण्याचा फार संभव आहे.

राहण्याची सोय : पारेश्वर मंदिरात २० ते ३० जणांची राहण्याची सोय होते.

जेवणाची सोय : आपण स्वतः: करावी.

पाण्याची सोय : बारामही उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : १) दहिवली गावातून - ४ तास

# सुमारगड

किल्ल्याची उंची : २००० फूट

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: महाबळेश्वर कोयना

जिल्हा : रत्नागिरी

श्रेणी : कठीण

सुमारगड हा नावाप्रमाणेच सुमार आहे. 'उगवतीच्या कड्यावर एका झाडाला धरून वर येंगाव लागतं' असा गोनीदांनी या किल्ल्याबद्दलच्या वर्णनात म्हटलेले आहे. रसाळगड आणि महिपतगड यांच्या बरोबर मध्ये हा किल्ला येतो. आजुबाजूला असणारे जंगल आणि किल्ल्यावर जाण्यासाठी असणारी अवघड वाट यामुळे किल्ला फारच दुर्लक्षित झालेला आहे

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : किल्ल्यावर वर पोहचल्यावर समोरच पाण्याची दोन टाकी आहेत. टाक्यांच्या पोटातच एक गुहा आहे. यात शिवाची पिंड आणि देवीची मूर्ती आहे. पाण्याच्या टाक्यांच्या उजव्या अंगास थोडे वर गेल्यावर एकखांबी पाण्याचे टाके लागते. एक वाट समोरच्या टेकाडावर जाते तर एक टेकाडाला वळसा घालून पुन्हा टाक्यांपाशी येते. समोरच्या टेकडीला वळसा मारताना एका ठिकाणी दगडमातीने बुजलेली गुहा दिसते. या गुहेत दोन खोल्या आहेत. मात्र यात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर माती जमा झालेली आहे. गडमाथा फारच लहान असल्यामुळे गडफेरीस अर्धा तास पुरतो.

गडावर जाण्याच्या वाटा : सुमारगडावर जाण्यासाठी एकच वाट आहे. ही वाट एका खिंडीमधूनच वर जाते. या दोन्ही वाटा एका खिंडीतच येऊन मिळतात. महिपत गडावरून वाडीबेलदार या गावात न उतरता उलट्या दिशेने खाली उतरावे. वाटेत धनगराची दोन तीन घर लागतात. येथून थोडे खाली उतरल्यावर एक ओढा लागतो तो पार करून समोरचा डोंगर चढावा. पुढे अर्ध्या तासातच आपण एका खिंडीपाशी पोहचतो. खिंडीतून डावीकडे वर चढणारी वाट थेट सुमारगडावर घेऊन जाते. या वाटेने पुढे गेल्यावर थोड्याच वेळात आपण एका कड्यापाशी पोहचतो. कड्याला लागूनच वाट पुढे जाते. पुढची वाट अवघड आहे. जवळ रोप असल्यास फारच उत्तम. खिंडीपासून किल्ल्यावर जाण्यास पाऊण तास पुरतो. रसाळगडावरून सुमारगडाकडे यायचे झाल्यास वाटेत एक राया धनगराचा झाप लागतो. मात्र रसाळगड ते सुमारगड हे अंतर साडेचार तासा चे आहे.

राहण्याची सोय : नाही

जेवणाची सोय : आपण स्वतः: करावी.

पाण्याची सोय : बारामही उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ : महिपतगडामार्गेअडीच तास

# रसाळगड

किल्ल्याची उंची : १७७० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: खेड
जिल्हा : रत्नागिरी
श्रेणी : सोपी

सह्याद्रीची रांग उत्तरदक्षिण पसरलेली आहे. मुख्य रांगेपासून सुटावलेल्या अनेक रांगा पाच पंचवीस मैल लांबवर पसरलेल्या आहेत. पोलादपूर सोडून खेडवरून चिपळूणकडे जाताना रसाळगड, सुमारगड, महिपतगड हे तीन दुर्ग आपले लक्ष वेधून घेतात. हे सर्व किल्ले जावळीच्या खोऱ्यातच येतात. प्रतापगड, मधुमकरंदगड, रसाळगड, सुमारगड आणि महिपतगड हा ट्रेकही खूप प्रसिद्ध आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

रसाळगडाचा घेरा लहानच असल्याने संपूर्ण गडफेरीस एक ते दीड तास पुरतो. रसाळवाडीतून किल्ल्यावर शिरतानाच वाटेत दोन दरवाजे लागतात. पहिले प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच तटातील मारुतीचे दर्शन होते. वळसा मारून आपण किल्ल्याच्या दुसऱ्या दरवाजात पोहचतो. या दरवाजातून किल्ल्यात प्रवेश केल्यावर समोरच तटावर एक भली मोठी तोफ दिसते. तोफा हे या किल्ल्यांचे मोठे वैशिष्ट्यच आहे. किल्ल्यावर लहानमोठ्या मिळून सुमारे १६ तोफा आहेत.संपूर्ण किल्ल्याचा माथा म्हणजे एक पठारच होय. समोरच झोलाई देवीचे मंदिर आहे. मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे. कोनाड्यात अनेक सापडलेल्या मूर्त्या ठेवल्या आहेत. मंदिराच्या समोर दीपमाळ आणि तुळशी वृंदावन आहे. समोरच एक तोफ सुद्धा ठेवलेली आहे. मंदिराच्या बाजूला पाण्याचा मोठा तलाव आहे. हे पाणी पिण्यासाठी योग्य आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला शिवाचे छोटेसे मंदिर आहे. पाण्याच्या टाक्याच्या वरच्या भागाला थोडासा उंचवटा आहे , यालाच
बालेकिल्ला म्हणतात. यात वाड्यांचे मोठ्या प्रमाणावर अवशेष आहेत. बुरूजाव तोफा आढळतात. येथून समोरच एक दगडी बांधकाम असलेली खोली आढळते. हे धान्य कोठार असावे असे वाटते. बालेकिल्ल्याच्या जवळच आणखी एक पाण्याचा तलाव आहे. या दोन्ही तलावात बारामही पाणी असते. किल्ल्याच्या नैऋत्य भागात एक नंदी आहे. मात्र येथे शिवाची पिंड आढळत नाही. किल्ल्यावर पाण्याची टाकी मोठ्या प्रमाणावर आहेत. म्हणजे हा किल्ला पूर्वी मोठ्या प्रमाणावर नांदता असावा.

गडावर जाण्याच्या वाटा :

१. खेड वरून वडगाव बिरमणी कडे जाणारी बस पकडायची आणि वाटेत असणाऱ्या हुंबरी फाट्यावर उतरायचे. हुंबरी फाट्यापासून थेट बीड गावात जाणारी वाट पकडायची. साधारणत: बीड गावात पोहचण्यास एक तास लागतो. वाडीबीड गावातून गडावर जाण्यास मळलेली वाट आहे. या मार्गाने किल्ल्यावर पोहचण्यास दीड तास लागतो.

२. खेड वरून निमनी गावात जाण्यासाठी बसेस सुटतात. निमनी गावात उतरून एका तासात रसाळवाडी मार्गेकिल्ला गाठता येतो. वाट अत्यंत सोपी आहे.

३. खेड वरून मौजे जैतापूर गावात जाणारी एस. टी. पकडावी. मौजे जैतापूरहून – रसाळवाडी मार्गेदोन तासात रसाळगड गाठावा. वाट अत्यंत सोपी आहे.

राहण्याची सोय :

झोलाई देवीचे मंदिर (३० ते ४० माणसे राहू शकतात.)

जेवणाची सोय :

आपण स्वतः करावी.

पाण्याची सोय :

बारामही उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ :

रसाळवाडीतून (१५ मिनिटे)

# ठाणे जिल्हा

## माहुली

किल्ल्याची उंची : फूट.

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग: शहापूर

जिल्हा : ठाणे

श्रेणी : सोपी

ठाणे जिल्ह्यात शहापूर-आसनगावाजवळ एक दुर्गत्रिकुट आहे. माहुली-भंडारगड आणि पळसगड मिळून हे बळकट ठाणे तयार झाले आहे. मुद्दाम जाऊन पहावे असे हे ठिकाण कोणाही निसर्गप्रेमी माणसाला आपल्या निसर्गसौंदर्याने वेड लावते. अनेक सुळके असलेला लांबलचक असा हा डोंगर माहुली नावाने ओळखला जातो. माहुलीचे दोन खोगिरामुळे तीन भाग पडले आहेत. उत्तरेचा पळसगड, मधला माहुलीगड आणि दक्षिणेचा भंडारगड.

इतिहास : इतर अनेक किल्ल्यांप्रमाणे याही किल्ल्याची मूळ उभारणी कोणी केली, हे ज्ञात नाही. पण १४८५ च्या सुमारास हे ठिकाण नगरच्या निजाम शाहीच्या संस्थापक असलेल्या मलिक अहमद याच्याकडे आले. पुढे शहाजीराजे निजामशाहीचे संचालक बनल्यावर दिल्लीच्या मोगल फौजा व आदिलशाही सेना संयुक्तपणे निजामशाही बुडवण्यासाठी प्रयत्न करू लागल्या. १६३५-३६ च्या सुमारास शहाजींनी कठीण परिस्थितीत बळकट आश्रयस्थान म्हणून जुन्नर - शिवनेरीहून जिजाबाई व बाळ शिवाजीसह माहुलीला मुक्काम हलवला. खानजमान म्हणजे महाबतखानाच्या मुलाने माहुलीला वेढा दिला. शहाजीराजांनी पोर्तुगीजांकडे मदत मागितली. पण त्यांनी नकार दिला असता शहाजींनी शरणागती पत्करली. पुढे १६५८ मध्ये ८ जानेवारी रोजी शिवरायांनी हा किल्ला मोगलांकडून परत मिळवला. पण १६६१ मध्ये तो मोगलांना परत द्यावा लागला. लगेसच तो परत जिंकून घेतला गेला. १६६५ च्या पुरंदरच्या तहात हे दुर्गत्रिकुट परत गमवावे लागले. त्यानंतर मोगलांचा मनोहरदास गौड हा धोरणी कर्तबदार सरदार माहुलीवर कारभार पाहू लागला. त्याने गडावर बरेच बांधकाम करून घेतले. फेब्रुवारी १६७० मध्ये खुद्द शिवाजीराजांच्या नेतृत्त्वाखाली माहुलीवर केलेला हल्ला अयशस्वी ठरला. दीड हजार मराठी मावळ्यांपैकी तब्बल हजार मावळे मोगलांनी कापून काढले. मराठ्यांचा दणदणीत पराभव झाला. या यशानंतरही मनोहरदास गौडने किल्लेदारी सोडली. त्याच्या जागी अलाविर्दी बेग हा नवा किल्लेदार रुजू झाला. नंतर १६ जून १६७० रोजी दोन महिन्यांच्या वेढ्या नंतर दोनशे मोगल सैनिकांचे रक्त सांडले. मोरोपंत पिंगळ्यांनी माहुली, पळसगड व भंडारगड हे त्रिकूट स्वराज्यात सामील करून घेतले.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे : आसनगावमार्गेमाहुली गावातून शिडीच्या वाटेने किल्ल्यावर आल्यावर समोरच पाण्याची दोन टाकी आहेत. पाच मिनिटांवर आणखी एक पाण्याचे टाके आहे. उजवीकडे गेल्यावर खाली पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. समोरच ढासळलेल्या अवस्थेतला महादरवाजा आहे. इथून भातसा राशी, अलंग, मदन, कुलंग व कळसूबाई पर्वतरांग दिसते. तर पूर्वेला हरिश्चंद्रगड, आजोबा, दक्षिणपूर्वेला माथेरान रांग, दक्षिणपश्चिमेला तानसा खोरे, तुंगारेश्वर रांग असलेला प्रचंड मुलूख दिसतो.शिडीच्या वाटेने दोन मिनिटे पुढे गेल्यावर डावीकडे जंगलात एक वाट जाते. वाटेतच छप्परवजा असणारे महादेवाचे मंदिर आहे. पुढे वाड्याचे काही अवशेष आढळतात. समोरच पाण्याचा फार मोठा तलाव आहे. पुढे गेल्यावर जांभळाचे रान लागते. ही वाट खिंडीत जाऊन पोहोचते. ही खिंड म्हणजे माहुली आणि भंडारगड दरम्यानची खिंड आहे. खिंडीच्या थोडे वर गेल्यावर उजव्या बाजूस ५०० ते ६०० फूट खाली उतरल्यावर कड्यालगतच कल्याण दरवाजा आहे. या दरवाज्यातून गडावर यायचे झाल्यास प्रस्तरारोहणाची गरज पडते. खिंडीतून वाटेने वर चढत गेल्यावर झाडीमध्ये बारमही पाण्याचं भुयारी टाके आहे. येथून पुढे जाणारी वाट गडाच्या दक्षिण टोकापाशी म्हणजेच भंडारगडावर घेऊन जाते. भंडारगडावरुन समोरच उभे असणारे भटोबा, नवरा व नवरीचे सुळके दिसतात. समोरच उजवीकडे असणाऱ्या डोंगररांगेवर वजीरचा सुळका दिसतो. सभोवतालच्या परिसराचे दृश्य अतिशय रमणीय असते.

गडावर जाण्याच्या वाटा :

१)आसनगावमाग : मुंबई-नाशिक लोहमार्गावरील आसनगाव गाठावे. इथून ५ कि.मी. अंतरावरील गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या माहुली या गावी पायी अथवा रिक्षाने जाता येते. गडाच्या पायथ्याशी महादेवाचे सुंदर मंदिर आहे. रात्री तेथे राहण्याची सोय होते. इथून उजवीकडे एक ओढा पार करून ३ कि.मी. चा खडा चढ चढून जावे. वाटेत एक लोखंडी शिडी आहे. ती पार करून वर गेल्यावर समोरच पाण्याची दोन टाकी दिसतात.या वाटेने गडावर जाण्यास २ तास पुरतात.

२)वाशिंदमार्गे: लोकलने किंवा एस्.टी. ने वाशिंदला उतरावे. उत्तरेला दहागाव आणि पुढे चाप्याचा पाडा गाठावा. चंदेरीचा डोंगर उजवीकडे ठेवून माहुलीच्या दक्षिण टोकापासून निघालेल्या व पश्चिमेला पसरलेल्या सोंडेवर चढावे. सोंडेवरून नवरा-नवरी सुळके उजवीकडे ठेवत अवघड श्रेणीचा कातळटप्पा चढून कल्याण दरवाजाने भंडारगडावर प्रवेश करावा. कल्याण दरवाजावर एक शिलालेख आढळतो. ही वाट खूप अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे साहित्य जवळ असणे आवश्यक आहे.

राहण्याची सोय : भंडारगडावर रहाण्याची कोणतीही सोय नाही. किल्ले माहुलीवर रहाण्यासाठी पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत, पण शक्यतो हा ट्रेक एक दिवसाचाच करावा.

जेवणाची सोय : किल्ल्यावर जेवणाची सोय आपणच करावी.

पाण्याची सोय : किल्ले माहुलीवर पहारेकऱ्यांच्यादेवड्यांसमोर पाण्याचे टाके आहे. येथील पाणी पिण्यासाठी उपयुक्त आहे. भंडारगडावर पिण्याच्या पाण्याची सोय नाही. त्यामुळे तेथे असताना पाण्याचा साठा जवळ ठेवावा.

जाण्यासाठी लागणारा वेळ : आसनगाव मार्गेदोन तास.कल्याण दरवाजा मार्गे६ ते ८ तास.

सूचना : वाट - आसनगाव मार्गेसोपी.कल्याण दरवाजा मार्गेअवघड .

# मलंगगड

किल्ल्याची उंची : ३२०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान
जिल्हा : ठाणे
श्रेणी : मध्यम

मलंगगड कल्याणपासून दक्षिणेस १६ कि.मी. अंतरावर एका उंच डोंगरावर बांधलेला आहे. बदलापूरच्या नैऋत्येस व मुंबई आणि साष्टीच्या पूर्वेस हा किल्ला आहे. करंजा व उरण नैऋत्येस आणि बोरघाट,भीमाशंकर व माळशेज घाट पूर्वेस असा हा भाग लढाईच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे.

इतिहास : ॲबिंग्डन ह्या इंग्रजी अधिकाऱ्याने १७८० मध्ये मंलगगडाला वेढा घातला. पावसाळ्यात मराठे युद्ध टाळतात. हे लक्षात घेऊन बेसावध मराठ्यांवर भर पावसातच हल्ला करण्याचे त्याने ठरवले. लढाई सुरू होताच नैऋत्य व उत्तरेकडच्या वाटा बंद करून टाकल्या. त्याने प्रथम पीरमाची घेण्याचे ठरवले. तेथे पांडुरंग केतकर यास ३०० माणसांनिशी नेमलेले हाते. अचानक हल्ला झाल्यामुळे मराठ्यांनी प्रतिकार केला नाही. १२५ जण सोने माचीकडे धावले. तर बाकी गडावर जागा नव्हती म्हणून कल्याणच्या मामलेदाराकडे धावले. ॲबिंग्डनने गडावर पोहचण्यासाठी गडाच्या पायथ्यापासून पीर माचीपर्यंत वाट शोधून काढली. नाना फडणविसाने वेढा उठवण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. ॲबिंग्डनने पीर माचीच्या पठारावर तीन तोफा चढवल्या व सोने माचीवर गोळीबार चालू केला. पण प्रवेशद्वार मोठ्या खुबीने बांधले असल्यामुळे तेथवर गोळे पोहचेनात. मराठ्यांना जंगलातल्या अनेक चोरवाटा माहीत असल्यामुळे त्यांचा बाहेरच्या जगाशी संपर्क तुटण्याचा संभव नव्हता. किल्लेदाराने आनंदराव धुळप व काशीपंत यांच्याकडे मदत मागितली पण त्यांनी प्रत्यक्ष न येता ७०० शिपाई पाठवले जे तेथवर पोहचू शकले नाहीत. कॅप्टन ॲबिंग्डनने शिड्या लावून २५० माणसे सोने माचीवर चढवली. पण मराठ्यानी गडावरून दगडधोंड्यांचा वर्षाव करून त्यांना परत पाठवले. ॲबिग्डनने पीर माचीवरून तोफा काढून घेतल्या. गंगाधररावानने संधी साधून दाणापाणी व दारूगोळा भरून धेतला. नाना फडणीसांनी बाळाजी विश्वनाथ पाठक व

राधोविश्वनाथ गोडबोले यांना सैन्य देऊन वेढा उठवण्यास पाठवले. त्यांच्या फौजा शिरवळ या मलंगच्या उत्तरेला असलेल्या गावी पोहचल्या. मराठ्यांची फौज तीन हजारावर होती. त्यांनी शत्रूला हुसकावून लावण्याचे प्रयत्न केले. पण ते अयशस्वी झाले. १६ सप्टेंबरला गारद्यांची एक पलटण पीर माचीवर चाल करून गेली. त्यांनी तोफांवर हल्ले केल्यामुळे ब्रिटिशांनी घाईघाईने तोफा काढून घेतल्या. मेजर वेस्टफॉलने ॲबिंग्डनच्या मदतीसाठी जादा कुमक धाडली. या सेनेने रसद घेऊन येणाऱ्या मराठ्यांच्या तुकडीला उध्वस्त केले. त्यामुळे मलंगगडावर अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला. काही धान्य पावसाने नासले, खजिना संपत आला. मराठ्यानी इंग्रजांचेही दळणवळण तोडून टाकले होते. तेंव्हा कर्नल हार्टलेने बेलापूर,पनवेल,तळोजे मार्ग सुरक्षित केला. शिरवळच्या मराठ्यांच्या तळावर हल्ला करून त्यांना हुसकावून लावले. आता ब्रिटिशांनी कॅप्टन कारपेंटरच्या हुकमतीत मलंगगडावर दुसरा हल्ला चढवला. तोफांचा गोळीबार सुरू केला. तटाला भगदाड पडले की आत घुसायला ३५० सैनिक तयार ठेवले होते पण केतकरांनी किल्ला शौर्याने लढवेला.इंग्रजांचे बरेच सैनिक कामी आले. तेंव्हा इंग्रजांनी हल्ले थांबवले. पण वेढा मात्र उठवला नाही.पीर माचीवरून तोफा काढून घेतल्या. मराठ्यांची नाकेबंदी करून त्यांची उपासमार केली. त्यांना शरण यायला लावावे असे इंग्रजांनी ठरवले. ऑक्टोबर नंतर किल्ल्यावर उपासमार होऊ लागली. बाहेरून गंगाधर कार्लेकर काही मदत पाठवू शकले नाहीत. शेवटी नाना फडणविसाने काही सरदारांना हाताशी घेऊन मोठी फौज जमा केली आणि मलंगगड व वसई वर धाडली. स्वत: नाना व हरीपंत फडके दहा हजार फौजेसह खांडाळ्याला आले व त्यांनी राजमाची घाट उतरून कल्याणकडे जायचे ठरवले. त्यामुळे हार्टलेला प्रतिशह दिला जाणार होता. ताबडतोब हार्टलेने मलंगगडावरून सैन्य काढून घेतले व लगेसच मराठ्यांनी मलंगगडाकडे जादा कुमक व रसद धाडली अशाप्रकारे मराठ्यांनी अखेरपर्यंत मलंगगड शर्थीने लढवला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** माचीवरून सरळ पुढे जात पलीकडचे टोक गाठायच. तेथून एका चोर वाटेने खाली उतरले की गडाच्या निम्म्या उंचीवर एक आश्रम लागतो. तिथून गडाच्या दक्षिण व उत्तर टोकाच्या दिशेने वळसा घेत जाणा-या वाटा निघतात. पहिली वाट खाली वावंजे गावात जाते. तेथून पनवेलला जायला एस टी मिळते. उत्तर दिशेच्या वाटेने गेले की दोन वाटा फुटतात. सरळ जाणारी वाट गडाला वळसा घालून पालखीसारख्या आकाराच्या खडकाखालून किल्ल्यावर जाते. उजवीकडे खाली उतरणारी वाट मलंगगड व गणेश कार्तिक सुळक्यांचा डोंगर यांच्यामधील खिंडीत पोहचते. माचीवरून बालेकिल्याकडे जाण्यासाठी कड्याला उजवीकडे ठेवत वळसा घालून गेले की खोदीव पाय-या दिसतात. पाय-यापुढे एक गुहा व पाण्याचे टाके आहे. येथून पुढे जाणे कठीण आहे. पन्नास साठ पाय-यां नंतरच्या पाय-या तुटलेल्या आहेत. तो भाग चढण्यासाठी दहा बारा फूटांचा एक पाइप आडवा टाकलेला आहे आणि हातांच्या आधारासाठी दोर लावला आहे. हा अवघड टप्पा पार करून दहा मिनिटांत गड माथ्यावर पोहचता येते. शिरोभाग तसा लहान आहे. छप्पर उडालेले पण भिंती शाबूत असलेला एक वाडा दिसतो. त्याच्या मागे खोदलेली सात टाकी आहेत. बालेकिल्याच्या मध्यभागी औदुंबराच झाड आहे. आणि काही ठिकाणी तटबंदीही आहे. बालेकिल्याच्या समोरच देवणीचा सुळका आहे. येथे येणारे भाविक या समोरच्या देवणीवर एक दगड फेकून मारण्याचा सोपस्कार करतात. दगड जर देवणीवर पोहोचला तर मनातली गोष्ट साध्य होते असे म्हणतात. पूर्वेकडून नैऋत्येकडे गोरखगड,राजमाची,माथेरान,पेब,इर्शाळ,प्रबळ वगैरे हा परिसर दिसतात.

**गडावर जाण्याच्या वाटा :** कल्याणहून सकाळी अर्ध्या तासात बसने गडाच्या पायथ्याशी पोहचता येते. गडाच्या निम्म्या उंचीवर तेथील सुप्रसिध्द हाजीमलंग दर्गा आहे. तिथपर्यंत पाय-या आहेत.वाटेत दुकाने आहेत. एक देवीचं मोठे मंदिर आणि शंकराच लहान देऊळ आहे. वरच्या या दर्ग्यापर्यंत भविकांची भरपूर वर्दळ असते.दर्ग्याच्या अलीकडे दुकानांच्या रांगेतून एक बोळ उजवीकडे जातो. तेथे घरे आहेत आणि विहीरही आहे. वाट समोरच्या डोंगराला लागून उजवीकडून वर चढायला लागते. पधंरा वीस मिनिटांत पहिला चढ पार करून वरच्या उभ्या कडयापाशी पोहचता येते.

**राहण्याची सोय :** नाही

**जेवणाची सोय :** नाही

**पाण्याची सोय :** गडावर अनेक टिकाणी पाण्याची टाकी आहेत. यातील पाणी पिण्यासाठी वापरता येऊ शकते.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** पायथ्यापासून २ तास.

# ताहुली

किल्ल्याची उंची : ३४८७ फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: माथेरान

जिल्हा : ठाणे

श्रेणी : मध्यम

कल्याण, कर्जत व पनवेल या विभागात हा किल्ला आहे. ताहुलीला किल्ला किंवा गड म्हणणे तसे अयोग्यच. हा त्याच्या तीन सुळक्यांमुळे प्रसिद्ध आहे. उंच बेलाग कडे, जाण्याच्या अनगड वाटा यामुळे ताहुली वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि कदाचित यामुळेच दुर्लक्षितही आहे.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे ताहुलीच्या पठारावर संत गाडगेबाबा महाराजांचा मठ आहे. या वाटेत आणखी दोन आश्रम लागतात. पठाराच्या सर्वात वरच्या भागाला 'दादीमा ताहुली' म्हणतात. येथे ५ पीर आहेत. समोरच एक छोटेसे घर देखील आहे. याच वाटेने थोडे पुढे गेल्यावर दोन तासात आपण ताहुलीच्या सुळक्यापाशी पोहोचतो. एका
सुळक्याचे नाव 'दाऊद' तर दुसऱ्याचे नाव 'बामण' आहे.

गडावर जाण्याच्या वाटा : ताहुलीवर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत.

१. अंबरनाथ वरून

दुसरी वाट अंबरनाथ वरून जाते. अंबरनाथवरुन बाहेर पडून बदलापुरचा रस्ता ओलांडावा. थोड्याच वेळात काकुली नावाचा तलाव लागतो. या काकुली तलावापासून थोड्याच अंतरावर एक डोंगराची सोंड वर ताहुलीच्या तीन सुळक्यांपाशी पोहोचते. या वाटेने ताहुली पठार गाठण्यास ४ तास लागतात.

२. कुशीवली वरून

कल्याण मलंगगड रोडवर कुशीवली गावाच्या स्टॉपवर उतरणे. गावाच्या बाहेरूनच थेट बैलगाडी जाईल एवढी मोठी वाट ताहुलीला गेली आहे. ही वाट दोन डोंगराच्या बेचक्यामधून वर चढते. कुशीवली गावापासून वर पठारावर जाण्यास अडीच तास लागतात.

राहण्याची सोय : नाही

जेवणाची सोय : नाही

पाण्याची सोय : नाही

जाण्यासाठी लागणारा वेळ : अडीच तास कुशीवली मार्गे, चार तास काकुली लेक मार्गे

# वसई

किल्ल्याची उंची : ० फूट.

किल्ल्याचा प्रकार : सागर किनाऱ्यावरील किल्लेडोंगररांग: उत्तर कोकण

जिल्हा : ठाणे

श्रेणी : अत्यंत सोपी

सिंधुसागर किनाऱ्याचे प्रादेशिक विभागणी नुसार दोन भाग पडतात. उत्तर कोकण व कोकण. उत्तर कोकणातील प्रमुख बेट मुंबई, याच्या संरक्षणासाठी अनेक किल्ले बांधले. त्यापैकी प्रमुख म्हणजे वसईचा किल्ला. वसई बंदर हातात असले म्हणजे मुंबई बेट, ठाणे, साष्टी हा सर्व परिसर समुद्रकिनारा ताब्यात ठेवता येत असे. भौगोलिक दृष्ट्या वसईचा किल्ला फार महत्वाचा ठरतो. पोर्तुगिजांची सत्ता नष्ट करण्यासाठी चिमांजी आप्पा यांच्या नेतृत्वाखाली मराठी सैन्याने १७३७ ते १७३९ मध्ये केलेल्या पराक्रमाची आठवण हा परिसर फिरतांना आजही येते. हे सागरी किल्ले पावसाळ्या शिवाय इतर सर्व ऋतुत फिरता येतात.

इतिहास :

स.न. १४१४ मध्ये भडारी-भेंगाळे नावाच्या सरदाराने हा उभारला. १५३० मध्ये गुजराताच्या सुलतानाने त्याच्याकडून घेतला. पुढे १५३४ मध्ये पोर्तुगिजांनी याचे महत्त्व जाणून पुर्नबांधणीसाठी घेतला. वसईचा किल्ला जेव्हा पोर्तुगिजांनी बांधायला सुरुवात केली, तेव्हा या कामाला दहा वर्ष लागली. किल्ला दशकोनी आहे व प्रत्येक कोपऱ्यावर एक बुरुज आहे. त्याची लांबी रुंदी एक एक कि.मी. आहे. तटबंदी फार मजबूत असून तीस पस्तीस फूट उंच व पाच फूट रुंद आहे. या बुरुजांची बाहरी बुर्ज, कल्याण बुर्ज, फत्ते बुर्ज, कैलास बुर्ज आणि दर्या बुर्ज अशी नावे आहेत. तटबंदीच्या मधोमध बाहरी गढी आहे. किल्ल्याला एक समुद्राकडून व एक भूभागाकडून प्रवेशद्वार आहे. शिवाय चोर दरवाजेही आहेत. किल्ल्यावर पाणी मुबलक प्रमाणात आहे. हा किल्ला जलदुर्ग व भुदुर्ग या दोन्ही प्रकारात मोडतो. एका बाजूस अथांग सागर व बाकी तिन्ही बाजु दलदलीने व्याप्त आहेत. सोपर व गोखरावा येथे

पूल आहेत, असे या किल्ल्याचे वर्णन केलेले आहे.

मुंबई जवळील साष्टी म्हणजे सहासष्टी नावाचा प्रदेश होता. त्यावर लक्ष ठेवण्यासाठी वसईचा किल्ला महत्त्वाचा होता. इ.स. १७३७ साली मराठ्यांनी वसईचा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ते व्यर्थ गेले. त्यानंतर बाजीरावाने वसईची मोहिम चिमाजी आप्पाच्या हातात सोपवली आणि इ.स. १७३८ मध्ये चिमाजी आप्पाने मोहिम आखली. चिमाजी आप्पाने किल्ल्यावर दलदलीच्या बाजुने हल्ला करायचे ठरवले. मराठ्यांनी लढून तटाच्या उत्तर भागाला खिंडार पाडले व सारे सैन्य 'हर हर महादेवाच्या' गर्जना करत आत घुसले. दुर्देवाने सुरुंग उशिरा उडाले. त्यामुळे भरपूर मनुष्य हानी झाली. तुंबळ हातघाईची लढाई झाली. २ मे १७३९ रोजी सुरु झालेली लढाई दोन दिवस चालली. लढाईत पोर्तुगिजांची ८०० माणसे मारली गेली. दारुगोळा संपला आणि पोर्तुगिज शरण आले. मराठ्यांनी किल्ला सर केला. किल्ल्यातील बायकामुलांना सुखरुप जाऊ दिले.

पुढे १७८० मध्ये ब्रिटिशांनी किल्ल्याचा ताबा मिळवण्यासाठी बेत आखण्यास सुरुवात केली. त्यावेळी विसाजी कृष्ण लेले किल्ल्याचा किल्लेदार होता. सुरतेचा कर्नल गोडार्डला वसईच्या मोहिमेचा सेनाप्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. समुद्रमार्ग आणि भुमार्ग या दोन्ही बाजुंनी किल्ल्यावर हल्ला करायचे सिध्द झाले. कर्नल हार्टले कल्याणवरुन हल्ला करणार होता तर गोडार्ड समुद्रमार्गाने हल्ला करणार होता. वसईला वेढा देण्याचे काम गोडार्ड करणार होता. पुण्याहून शत्रुला कुमक पोहचू नये याची काळजी सुध्दा घेण्यात आली होती. नाना फडणिसांनी आनंदराव रास्ते यास वसईच्या ८ कि.मी. गोखरावा या गावी धाडले. २३ ऑक्टोबर रोजी चिमाजी पानसे, भवानी शिवराम यांची फौज तोफखाना घेऊन तळेगाव मार्गेवसईला निघाले. वसईच्या किल्ल्यावर आता अन्नधान्याची टंचाई भासू लागली. खजिना पण रिता झाला होता. लोक गावे सोडून गेले होते. गोडार्डने तोफांचा मारा सज्ञ केला होता. २८ तारखेला तोफांची गोळीबारी सुरु झाली. मराठ्यांनी सुध्दा बुरुजावरुन गोळीबारी सुरु केली. इंग्रजांनी गोखरावा व सोपार पूल उडवले. ७ डिसेंबरला किल्ल्यात दारुगोळा पडला आणि भयंकर स्फोट झाला. त्यामुळे सगळे जण घाबरुन गेले. ९-१० डिसेंबरला तोफखान्याचा मारा चालू ठेवला. १० डिसेंबरला २०० मराठ्यांच्या एका तुकडीने गोखरावा खाडी पार करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो फसला. १२ डिसेंबरला किल्ला इग्रजांच्या ताब्यात गेला.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :

गावापासून किल्ल्याच्या तटापर्यंत पोहचण्यास १५ मिनीटे लागतात. उजवीकडे प्रवेशद्वार आहे. त्यातून आत शिरल्यावर समोरच तटावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. त्यावरुन सर्व किल्ल्याची रचना लक्षात येते. तटाची उंची ३० ते ३५ फूट आहे. किल्ल्याला दहा बुरुज आहेत. त्यांची नावे नोस्सा सिन्होरा दोरेमेदिया, रैस मागो, सेंट गोंसोले चौथा माद्रद दीय. चौथ्या बुरुजाच्या अलीकडे तटात चोर वाटा आहेत. पाचवा सेंट जॉन, या बुरुजानंतर दर्या दरवाजा आहे. येथून बंदरावर जाणारा रस्ता आहे. सहावा एलिफांत, सातवा सेंट पेद्रु, आठवा सेंट पॉल्स, नववा सेंट सेबस्तियन आणि दहावा सेंट सेबस्तियन कावलिरो

बुरुज.येथून नंतर आपण बालेकिल्ल्याकडे जातो. बालेकिल्ल्याकडे जातांना वाटेत तीन चर्च लागतात. बालेकिल्ल्याच्या जवळ गेल्यावर डावीकडे वळावे. समोरच न्यायालयाची इमारत दिसते आणि पलिकडे एक हॉस्पिटल आहे. तिथून दोन कमानी असलेला टाऊन हॉल आहे. त्याच्या पुढे कारागृह आणि वज्रेश्वरी मंदिर आहे. पुढे चिमाजी आप्पांची विजय मिळवल्याबद्दलचे प्रतीक उभारलेले आहे. हे सर्व पाहून मागे फिरायचे आणि बालेकिल्ल्यात प्रवेश करायचा बालेकिल्ल्यात दारु कोठार, सैनिकांची वसतिस्थाने आणि वाड्यांचे अवशेष आहेत. एका दगडावर कोरलेला शिलालेख सुध्दा आहे. बालेकिल्ल्याच्या बाहेरील पटांगणावर एक विहिर आहे.प्रवेशद्वाराच्या अलीकडे रस्त्याच्या कडेला महादेवाचे व वज्रेश्वरीचे मंदिर आहे.दोन तासात सर्व गड पाहून होतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

किल्ल्यावर जाण्यासाठी जुने वसई गाठावे. नवी वसई ते जुना वसई अशी एस्. टी. सेवा आहे किंवा नवी वसई ते किल्ल्यापर्यंत जाणाऱ्या बसेस ही उपलब्ध आहेत. वसई स्टेशनहून किल्ल्यात टमटम रिक्षा अथवा साध्या रिक्षेनेही जाता येते.स्टेशनपासुन किल्ला ६ कि.मि.वर आहे.

## राहण्याची सोय :

किल्ल्यात नाही.

## जेवणाची सोय :

वसई गावात अनेक चांगली हॉटेल्स आहेत.

## पाण्याची सोय :

काही विहीरी किल्ल्यात आहेत.

जाण्यासाठी लागणारा वेळ :

१५ मिनिटे गावापासून.

# अर्नाळा

किल्ल्याची उंची : ० फूट.

किल्ल्याचा प्रकार : सागर किना-यावरील किल्ले

डोंगररांग: उत्तर कोकण

जिल्हा : ठाणे

श्रेणी : जास्त सोपी

अर्नाळा नावाच्या लहानशा बेटाच्या वायव्य दिशेस हा जलदुर्ग किल्ला बांधला आहे.उत्तर कोकणातील वैतरणा नदी या किल्ल्याजवळ समुद्राला मिळत असल्यामुळे खाडीच्या स र्वच प्रदेशावर या पाणकोटावरून नजर ठेवता येत असे.

**इतिहास :** चारही बाजूंनी पाण्याने वेढलेला अर्नाळा हा जलदुर्ग १५१६ मध्ये गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याने बांधला. पोर्तुगीजांनी १५३० साली हा किल्ला जिंकला व नंतर यावर अनेक नवीन बांधकामे केली. सुमारे २०० वर्षांच्या पोर्तुगीज सत्तेनंतर हा किल्ला १७३७ मध्ये मराठ्यांच्या ताब्यात आला. पोर्तुगीजांप्रमाणेच पहिल्या बाजीरावानेही या किल्ल्याची पुनर्बांधणी केली. शेवटी १८१७ मध्ये इतर किल्ल्यांप्रमाणेच हा किल्ला देखील इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** अर्नाळा किल्ला चौकोनी असून दहा मीटर उंचीची अखंड व मजबूत तटबंदी याचे संरक्षण करते. तटबंदीमध्ये असलेले बुरुज आजही ताठपणे उभे आहेत. किल्ल्याला एकूण तीन दरवाजे असले तरी मुख्य प्रवेशद्वार उत्तरेकडे आहे. या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन बुलंद बुरुज उभे आहेत. या दरवाजाच्या कमानीवर अत्यंत सुंदर नक्षीकाम असून दोन्ही बाजूला हत्ती व वाघाची प्रतिमा कोरलेली आहे. दरवाजावरच एक शिलालेख कोरलेला आहे. या शिलालेखामधील बाजीराव अमात्य मुख्य सुमती आज्ञापिले शंकर! पाश्चात्यासि वधूनि सिंधु उदरी बांधा त्वरे जंजिरा!! या ओळींवरुन या किल्ल्याची पुनर्बांधणी बाजीराव पेशव्याने केली हे लक्षात येते.किल्ल्याच्या आत त्र्यंबकेश्वराचे व भवानी मातेचे मंदिर आहे. त्र्यंबकेश्वर महादेवाच्या मंदिरासमोरच सुबक बांधणीचे एक अष्टकोनी तळ आहे. या शिवाय किल्ल्यात गोड्यापाण्याच्या विहिरीही आहेत. किल्ल्याच्या सभोवार लोकांची वस्ती असून त्यांची शेतीही आहे. किल्ल्याच्या मुख्य दरवाजाकडे जातांना बाहेरच्या बाजूला कालिकामातेचे मंदिर आहे. समुद्रकिनाऱ्यावरुन किल्ल्याकडे पाहिले असता डाव्या बाजूला असणारा किल्ल्यापासून संपूर्ण सुटा असा एक गोल बुरुज आपले लक्ष वेधून घेतो. याच्या आत जाण्यास एक लहानसा दरवाजा आहे. संपूर्ण किल्ला बघण्यास अर्धा ते पाऊण तास लागतो. किल्ल्याच्या मजबूत तटबंदीवरुन किल्ल्याचे समोवार दर्शन घेत गोल फेरी मारता येते. मुख्य प्रवेशद्वाराच्या वर असणाऱ्या उंचवट्यावर बसले असता पूर्ण किल्ल्याचा आवाका नजरेस पडतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** पश्चिम रेल्वेवरच्या विरार पासून अर्नाळा अंदाजे १० कि.मी. वर असून तेथे जायला एस्. टी. बस व रिक्षा यांची सुविधा आहे. अर्नाळा गावातून समुद्रकिनाऱ्यापर्यंत गेल्यावर बोटीनेच किल्ल्यावर जाता येते. ही बोट सकाळी ६.०० ते दुपारी १२.३० व संध्याकाळी ४.०० ते ७.०० या वेळेतच आपल्याला किल्ल्यावर घेऊन जाते. समुद्रकिनाऱ्यावरुन समोरच दिसणाऱ्या अर्नाळा किल्ल्यावर बोटी जायला ५-१० मिनीटे लागतात.

**राहण्याची सोय :** गडावर राहण्याची सोय नसली तरी संपूर्ण गड अर्धा-पाऊण तासात बघून बोटीने किनाऱ्यावर परतता येत असल्याने राहण्याची गरज नाही.

**जेवणाची सोय :** गडावर जेवणाची सोय नाही.

**पाण्याची सोय :** गडावर गोड्यापाण्याच्या विहिरी आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** १ तास विरार पासून.

# शिरगावचा किल्ला

किल्ल्याची उंची : ०

किल्ल्याचा प्रकार : सागर किना-यावरील किल्ले
डोंगररांग: कोकण
जिल्हा : ठाणे
श्रेणी : अत्यंत सोपी

एिरगावचा किल्ला पालघर तालुक्यात माहीमच्या उत्तरेला ५ कि.मी. अंतरावर आहे. शिरगावचा किल्ल्यापाठचा समुद्रकिनारा अत्यंत सुंदर असून किल्ला तसा दुर्लक्षित असल्याने समुद्रकिनाराही निर्मनुष्य असतो.

**इतिहास :** १७३९ साली मराठ्यांनी हा किल्ला डहाणू, केळवे, तारापूर या किल्ल्यांबरोबर जिंकून घेतला. मराठ्यांच्या आधी या किल्ल्याचा ताबा पोर्तुगिजांकडे होता. नंतर १८१८ मध्ये इतर किल्ल्यांप्रमाणेच हा किल्लाही इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** शिरगावचा किल्ला साधारण २०० फूट लांब व १५० फूट रुंद इतक्याच आकाराचा आहे. मात्र किल्ल्याची तटबंदी ३५ फूट उंच व १० फूट रुंद आहे. किल्ल्याला चार कोपऱ्यांत चार बुरूज असून प्रवेशद्वाराजवळही एक बुरूज आहे. प्रवेशद्वाराच्या वर एक अत्यंत सुबक बांधणीचा चबुतरा आहे. हा चबुतरा आपल्याला रायगडावरील महाराजांच्या समाधीची आठवण करून देतो. येथील तटबंदीवर, बुरुजांवर जाण्यासाठी किल्ल्याच्या आत असणाऱ्या तटबंदीच्या बाहेरून पायऱ्या असल्या तरी बुरुजांवर जायला तटबंदीच्या अंतर्भागातूनही पायऱ्या केलेल्या आहेत. अर्थात आतून जाणाऱ्या पायऱ्या सध्या वापरात नसल्या तरी बुरुजाला असलेल्या खिडक्यांमधून आपल्याला या पायऱ्या दिसतात. किल्ल्याच्या पश्चिमेकडील तटबंदीत आणखी एक दरवाजा आहे. मात्र आता तो पूर्णपणे बंद केलेला आहे. किल्ल्याच्या तटबंदीवरून पश्चिमेकडे असणाऱ्या समुद्रकिनाऱ्याचे सुंदर दृश्य दिसते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** पश्चिम रेल्वेवरील शेवटचे स्टेशन म्हणजे विरार. विरारच्या पुढे जाण्यासाठी मेल अथवा शटल पकडावी व पालघरला उतरावे. पालघरला पोहोचल्यावर तेथून सातपाटी मार्गावर धावणाऱ्या बस अर्धा-अर्धा तासाने आहेत. या बस पकडून आपल्याला 'मशीद स्टॉपवर' उतरावे लागते. हे अंतर बसने १५ मिनिटाचे आहे. याशिवाय पालघरहून या स्टॉपवर यायला रिक्षासुद्धा आहेत.मशीद स्टॉपवरून १० मिनिटे चालल्यावर आपण किल्ल्यापाशी येतो. किल्ल्याला लागूनच एक शाळा आहे.

**राहण्याची सोय :** संपूर्ण किल्ला अर्धा-पाऊण तासातच बघून होतो. त्यामुळे राहण्याची गरज नाही. मात्र तशी गरज भासल्यास किल्ल्याला लागूनच असलेल्या शाळेमध्ये राहण्याची सोय होऊ शकते.

**जेवणाची सोय :** पालघरला अनेक चांगली हॉटेल्स आहेत.

**पाण्याची सोय :** गडावर पिण्याच्या पाण्याची काहीच सोय नाही.

# गोरखगड

किल्ल्याची उंची : २१३७ फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: कर्जत
जिल्हा : ठाणे
श्रेणी : मध्यम

गोरखगड हा मुंबईकरांसाठी आणि पुणेकरांसाठी एका दिवसात करता येण्याजोगा किल्ला आहे. गोरखगड आणि मच्छिंद्रगडाला तसा ऐतिहासिक वारसा नसला तरी त्यांच्या सुळक्यांमुळे प्रस्तरारोहकांसाठी ते नेहमीच एक आकर्षण ठरले आहे. गोरखगड आणि मच्छिंद्रगड याच्या आजुबाजूचा परिसर प्रसिद्ध आहे तो म्हणजे येथील घनदाट अभयारण्यामुळे. गोरखगडाचा विस्तारही तसा मर्यादितच आहे. शहाजी राजांच्या काळात या गडाला महत्त्व होते. मात्र येथे कोणत्याही प्रकारच्या लढाईचा उल्लेख नाही. शिवकालात गडाचा उपयोग केवळ आसपासच्या प्रदेशवर नजर ठेवण्यासाठी होत असे.पूर्वी नाणेघाट मार्गेजुन्नरला जातांना या गडाचा निवासस्थान म्हणून वापर करत असत. मर्यादित विस्तार असूनही मुबलक पाणी, निवा-याची योग्य जागा मात्र या गडावर उपलब्ध आहे. गोरक्षनाथांच्या साधनेचे हे ठिकाण म्हणूनच याचे नाव 'गोरखगड'.

गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे **:** दरवाज्यातून वर चढून गेल्यावर वर दोन तीन पाण्याची टाके लागतात. समोरची वाट पुन्हा थोडयाश्या चढणीवर घेऊन जाते. पुढे पाय-यांच्या मदतीने थोडे खाली उतरल्यावर आपण गोरखगडाच्या सुळक्यात खोदलेल्या अतिविशाल गुहेसमोर येऊन पोहचतो. समोरच प्रांगणाखाली भयाण दरीत झुकलेले दोन चाफ्याचे डेरेदार वृक्ष आणि समोरच असणारा 'मच्छिंद्रगड' निसर्गाच्या भव्य अदाकारिचे असीम दर्शन घडवतो. गुहेच्या आजुबाजूला पाण्याची तीन टाकी आहेत. गोरखगडाच्या पठारावर एकूण चौदा पाण्याची टाके आहेत पण त्यापैकी गुहे जवळील पाण्याच्या टाक्यातील पाणी पिण्यायोग्य आहे. गोरखगडाचा टेक

हा त्याच्या माथ्यावर गेल्याशिवाय पूर्ण होतच नाही. गुहेसमोर तोंड करून उभे राहिल्यावर उजव्या बाजूने जाणा-या वाटेने पुढे यावे. थोडे अंतर चालून गेल्यावर सुळक्यावर चढण्यासाठी डाव्या बाजूला कातळात ५० पाय-या खोदलेल्या आहेत. ५० पाय-यांच्या या मार्गावरून जरा जपूनच चालावे लागते. गडाचा माथा फारच लहान आहे.वर एक महादेवाचे मंदिर आहे आणि समोरच एक नंदी आहे. माथ्यावरून समोर मच्छिंद्रगड, सिध्दगड, नाणेघाटाजवळील जीवधन, आहुपेघाट असा सर्व रमणीय परिसर न्याहाळता येतो.

### गडावर जाण्याच्या वाटा :

१ : गोरखगडावर येण्यासाठी मुंबईकरांनी कल्याणमार्गेमुरबाडला तर पुणेकरांनी कर्जत मार्गेमुरबाडला यावे. मुरबाडहून 'म्हसा' फाटया मार्गे'धसई' गावात यावे. येथून 'दहेरी' पर्यंत खाजगी जीप अथवा एस.टी. ची सेवा उपलब्ध आहे. दहेरी गावातून समोरच दोन सुळके दृष्टिक्षेपात येतात. लहान सुळका मच्छिंद्रगडाचा तर मोठा सुळका गोरखगडाचा आहे. गावातील विठ्ठलाच्या मंदिरात मुक्काम करता येतो. मंदिराच्या मागच्या बाजूने जंगलात जाणारी पायवाट एक ते दीड तासात गोरखगडाच्या कातळात खोदलेल्या दरवाज्यापाशी घेऊन जाते. या वाटेने गड गाठण्यास दोन तास पुरतात.

२ : मुरबाड - मिल्हे मार्गाने दहेरी गावी यावे. या गावातून अतिशय सोप्या वाटेने गडावर जाता येते.

३ : गोरखगडावर येण्यासाठी सिध्दगडावरूनही एक वाट आहे. अनेक ट्रेकर्स सिध्दगड ते गोरखगड असा ट्रेक करतांना या वाटेचा उपयोग करतात. या वाटेवर एक घनदाट जंगल लागते. सिध्दगडावर जाण्यासाठी मुरबाड - नारिवली मार्गाने यावे. नारिवली हे पायथ्याचे गाव आहे. सिध्दगडावर एक रात्र मुक्काम करून पहाटेच सिध्दगड उतरावा. वाटेत असलेल्या ओढ्याबरोबर एक वाट जंगलात शिरते. या वाटेने थोडे उजवीकडे गेल्यावर आपण धबधब्याच्या वाटेला जाऊन मिळतो. या वाटेने वर आल्यावर आपण एका छोटयाश्या पठारावर येऊन पोहचतो. पठारावर महादेवाचं छोटे मंदिर आहे आणि दोन समाध्या देखील आहेत. येथून पुढे गेल्यावर लागणारी वाट ही उभ्या कातळातील असल्याने प्रत्येक पाऊल जपून टाकावे लागते. आपण कातळात खोदलेल्या दरवाज्यापाशी येऊन पोहचतो. या मार्गाने गड गाठण्यास तीन तास पुरतात.

**राहण्याची सोय :** गडावर असलेल्या एका गुहेत २०-२५ जणांना आरामात राहता येते.

**जेवणाची सोय :** जेवणाची सोय आपण स्वत:च करावी.

**पाण्याची सोय :** गडावर बारमाही पाण्याची टाके आहेत.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** दोन तास दहेरी मार्गे.

# अशेरीगड

किल्ल्याची उंची : १६८० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पालघर
जिल्हा : ठाणे
श्रेणी : मध्यम

पालघर विभागात जे अनेक लहानमोठे किल्ले आहेत, त्यांच्यात 'दादा' वाटावा असा हा अशेरीगड. आकार प्रचंड असल्याने हा गड बुलंद वाटतो.

**इतिहास :** अशेरीगड शिलाहारवंशीय भोजराजाने बांधला असा उल्लेख आहे.त्यामुळे या गडाचे आयुर्मान साधारणत: ८०० वर्षेआहे असे अनुमान निघते. पुढे पोर्तुगीजांनी हा गड ताब्यात घेऊन त्याची पुनर्बांधणी केली. पेशव्यांनी १७३७ च्या कोकणमोहिमेत हा गड जिंकून घेतला व १८१८ नंतर तो इंग्रजांच्या हाती गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** पठारावर व उजवीकडे पडक्या वाड्यांचे अवशेष आढळतात. तसेच चर असलेले अनेक चौथरे येथे आढळतात. बहुदा पावसाळ्यात पावसाचे पाणी किंवा सांडपाणी वाहून नेण्यासाठी त्यांची योजना केलेली असावी. गडावरची गुहा मध्यम आकाराची व रूंद तोंडाची आहे. परंतु ती खडकात अशा खुबीने खोदलेली आहे की भणाणणाऱ्या वाऱ्याला व थंडीला अजिबात प्रवेश मिळू नये. गुहेचा पृष्ठभाग अतिशय खडबडीत आहे. मात्र इथे आत व बाहेर पहारेकऱ्यांना झोपण्यासाठी 'बर्थ' केलेले आहेत. गावकऱ्यांकडून येथे कधीतरी पूजा होत असावी असे वाटणारी व एरवी सहसा न आढळणारी दोन जास्वंदीची झाडे गुहेच्या तोंडाशी आहेत. गुहेच्या वरच्या अंगाला एक चौकोनी बांधीव तळे आहे. या तळ्यात एक अर्धवट बुडालेली तोफही दिसते. याशिवाय आणखी दोन पण अर्धवट बांधलेली तळी आहेत. वरच्या पठारावरून आग्नेय दिशेकडे पाहिल्यास कोहोजगड स्पष्ट दिसतो.

दुर्बिणीने त्यावरील निसर्गनिर्मित मानवी पुतळाही सहज निरखता येतो. याच दिशेने पुढे गेल्यास कडयाला गेलेली मोठी भेग व पुढे एक बांधीव बुरूज दिसतो.

**गडावर जाण्याच्या वाटा :** गडावर जाण्यासाठी एकच वाट आहे. पालघरहून कासा या शहराकडे जाणाऱ्या एस. टी. बसने किंवा या महामार्गावरून धावणाऱ्या खाजगी वाहनाने निघून 'मस्तान नाका' या ठिकाणापासून सुमारे १० - ११ किमी वर असणाऱ्या 'खोडकोना' गावाच्या स्टॉपला उतरायचे. प्रत्यक्ष गाव महामार्गापासून थोडे आत आहे. गावात जाण्यासाठी रस्त्याच्या डावीकडे बैलगाडीची वाट आहे. महामार्गावरूनच पालघरकडे पाठ करून उभे राहिल्यास उजवीकडे अडसूळ व डावीकडे प्रचंड असा अशेरीगड दिसतो. बैलगाडीची वाट एका सिमेंटच्या पुलावरून गावात शिरते. इथे वेशीवरच वाघदेवाचे छोटेसे परंतु टुमदार मंदिर आहे. आत गेल्यावर विस्तीर्ण पसरलेले आम्रवृक्ष, शेते व त्यातून डोकावणारी घरे प्रवासाचा शीण घालवतात. विहिरीच्या थंड पाण्याने आपल्या बाटल्या भरून गावकऱ्यांनी दाखवलेल्या वाटेने खिंडीकडे निघायचं. वाट जंगलातून जात असल्याने उन्हाळ्यातही त्रास होत नाही. साधारणत: खिंडीत पोहोचण्यास एक ते दीड तास लागतात. वाट इथपर्यंत सोपी पण चढणीची आहे. खिंडीत थोड्या वरच्या बाजूला वाघदेवाचे छोटे उघडे देऊळ आहे. खिंडीतून उजवीकडे वळून गडमाथ्याकडे निघायचं. इथे एका मोठ्या खडकाला वळसा घातला की आपण दरवाजाच्या खाली येतो. इथे दगडावर कोरलेली एक छोटी गणेशमूर्ती आहे. दरवाजा सुरुंगाने फोडलेला आहे. इथे मात्र वर चढताना काळजी घेणे आवश्यक आहे. प्रस्तर वेडेवाकडे असल्याने अनुभवी व्यक्तींच्या सहाय्याने चढाई करणे योग्य. शक्यतो पाठीवरचे सामान उतरवूनच चढावे. इथून प्रस्तरारोहणाची हौस भागवून वर चढले की उजवीकडे वर जाण्यासाठी कातळात पायऱ्या खोदलेल्या आहेत. वाटेत खराब पाण्याचे टाके लागते. या टाक्यावरूनच दुतर्फा खांद्यापर्यंत उंच झुडूपांतून गडाच्या मध्यापर्यंत जाणारी वाट आहे. या वाटेने जाताना डाव्या हाताला थोडे खाली खडकात पाच पाण्याची टाकी खोदलेली आहेत. यापैकी एका टाक्याचे पाणी पिण्यायोग्य आहे. पुन्हा सरळ वाटेने पुढे चालल्यावर ५ मिनिटांच्या अंतराने डावीकडे अजून एक वाट फुटते. तिने खाली गेल्यावर पाण्याची तीन आणखी टाकी आहेत. या टाक्यांतील अतिशय सुंदर आहे. जवळच खडकात एक गुहा देखील आहे.

**राहण्याची सोय :** १० ते १२ माणसे गुहेत व बाहेरच्या बांधीव कट्ट्यांवर राहू शकतात. परंतु उंदरांपासून सामानाची काळजी घ्यावी.

**जेवणाची सोय :** आपण स्वत: करावी.

**पाण्याची सोय :** बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** ३ तास

**सूचना :** पावसाळ्यात प्रस्तरारोहण धोक्याचे ठरू शकते.

# कोहोजगड

किल्ल्याची उंची : ३२०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पालघर
जिल्हा : ठाणे
श्रेणी : मध्यम

मुंबईच्या उत्तरेस गुजरातकडे जातांना ठाणे जिल्ह्याचा पालघर हा विभाग लागतो. या परिसरात अनेक लहान मोठे गडकिल्ले अजूनही आपले अस्तित्व टिकवून आहेत. यापैकी वाडा पालघर रस्त्यावरचा 'कोहोज ' हा प्रमुख किल्ला. वाड्यापासून अवघ्या १० - ११ किमी वर वसलेला

**इतिहास :** या किल्ल्याचा फारसा इतिहास उपलब्ध नाही. गडावरच्या खोदीव टाक्यांवरून हा गड बऱ्यापैकी जुना, भोजकालीन असावा असे वाटते. पण यास पुरावा नाही. १६ व्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीजांनी गुजरातच्या राजाकडून हा प्रदेश जिंकून घेतला व या गडावर तट - बुरूज चढवले. पुढे पेशव्यांनी १८ व्या शतकात (१७३७) काढलेल्या मोहिमेत हा प्रदेश जिंकला. शेवटी तो इंग्रजांकडे गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :**माचीवरचे विस्तीर्ण पठार वाटेने येताना अजिबात न जोखता आल्याने आश्चर्यचकित व्हायला होते. माचीवर समोरच शंकराचे जिर्णोद्धारीत मंदिर आहे. त्याच्या समोरच दोन टाकी आहेत, पण ती खराब झालेली आहेत. मंदिराकडे तोंड करून उभे राहिल्यास डाव्या हाताला थोडे खाली उतरून गेल्यावर एकमेकांना लागून खोदलेली सात टाकी आहेत. यापैकी एका टाक्याचे पाणी अतिशय सुंदर आहे. दोन टाकी खराब झाली असून बाकी बुजलेली आहेत.मंदिराच्या उजवीकडे काही

उद्ध्वस्त अवशेष आढळतात. काही ठिकाणी जुजबी तटबंदी शिल्लक आहे. मंदिर डाव्या हाताला ठेवून पुढे गेले की उजवीकडे वर जाणारी वाट दिसते. इथून वर चढताना उजव्या बाजूला पाण्याची ३ प्रशस्त टाकी लागतात. यापैकी १ बुजलेले असून बाकी पाणी शेवाळयुक्त असले तरी पिण्यायोग्य आहे. इथेच कोपऱ्यात मारुतीची एक उघडी मूर्ती आहे. इथून तीच वाट घेऊन पुढे निघालं की आपण पडक्या बुरुजाजवळ येतो. डावीकडे छोटे मारुती मंदिर आहे. पायऱ्यांनी वर गडमाथ्यावर जायचं. इतकी चाल सुमारे १५ मिनिटांत आटोपते. माथ्यावर वाऱ्याने तयार झालेले सुळके आहेत. यातील निसर्गनिर्मित माणसाच्या आकाराचा दिसणारा पुतळा ही निसर्गाची केवळ अवर्णनीय कलाकृती. ही कोहोजवरची सर्वात प्रेक्षणीय गोष्ट. विविध दिशांतून विविध आकार व भास दाखवणारी ही कृती पाहून आपण अचंबित होतो. इथून थोडे पुढे डोळ्यांना सुखावणारे कृष्णाचे छोटे देऊळ आहे. वरून खालचा (वाडा - मनोर) रस्ता छान दिसतो. या सगळयात एक गोष्ट मात्र मनाला खंतावून जाते, मिळेल त्या ठिकाणी मंदिरांवर, प्रस्तरांवर, इतकेच काय पण पुतळ्यावरही लोकांनी आपली नावे बदनाम करून ठेवलेली आहेत.

**गडावर जाण्याच्या वाटा :**

**राहण्याची सोय :** गडावर निवारा असा नाही. शंकराच्या मंदिरात केवळ २ माणसे राहू शकतात.

**जेवणाची सोय :** खाण्याची सोय आपणच करावी, पिण्याचे पाणी गडावर आहे.

**पाण्याची सोय :** बारमाही पाण्याची सोय आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** २ तास.

# काळदुर्ग

किल्ल्याची उंची : १५०० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: पालघर
जिल्हा : ठाणे
श्रेणी : मध्यम

ठाणे जिल्ह्यातील पालघर विभागात अनेक डोंगरी किल्ले आहेत. शहरी भागापासून फारसे लांब नसल्यामुळे मुंबईकरांना एका दिवसात आरामात पाहता येतात.हे सर्व किल्ले ठाणे आणि जव्हारच्या सीमेवर आहेत.जंगल खूप असल्याने येथे आदिवासी लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सर्व परिसर आजही मागासलेल्या अवस्थेत आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** खरे पाहिले तर काळदुर्गला गड म्हणणे योग्य नाही.गड असल्याची कोणतीही खूण यावर नाही. हे एक टेहेळणीचे स्थान असावे असे वाटते.गडमाथा म्हणजे चौकोनी आकाराचा कातळकडाच होय.या कातळामुळे हा गड लांबूनही नजरेत येतो.गडाचे क्षेत्रफळ साधारण अर्धा एकर असावे.गडमाथ्याच्या खालच्या पठारावर पाण्याचे मोठे टाके आहे.एक कुंडदेखील आढळते.(किल्ला दोन स्तरांत विभागला आहे.) (एक गडमाथा आणि खालचे पठार )पठारावरुन गडमाथ्यावर जाण्यास २ ते ३ पाय-या आहेत.पठारावर पाण्याचे एक टाके आहे.किल्ल्यावरुन संपूर्ण घाटमाथ्यावर नजर ठेवता येते.

**गडावर जाण्याच्या वाटा :** १. वाघोबा खिंड मार्गे

मुंबईहून विरारमार्गेपालघर गाठावे.अथवा कल्याणहून एस.टी.ने पालघरला जावे.पालघरहून मनोरे ला जाणारी बस पकडावी.'वाघोबा'नावाच्या देवळाच्या थांब्यावर उतरावे. येथूनच गडावर जाण्याची वाट फुटते.या देवळाच्या उजवीकडे जाणा-या वाटेने आपण गडावर पोहोचू शकतो. 'हातपंप' ही खूण लक्षात ठेवणे.हातपंपच्या समोरुन वर जाणारी वाट पकडावी.ही वाट पुढे तीन भागांत विभागली जाते. डाव्या व उजव्या बाजूची वाट सोडून द्यावी. सरळ वर जाणा-या
वाटेने काळदुर्ग गाठता येतो.

**राहण्याची सोय :** गडावर निवारा असा नाही.

**जेवणाची सोय :** खाण्याची सोय आपणच करावी, पिण्याचे पाणी गडावर आहे.

**पाण्याची सोय :** बारमाही पाण्याची सोय आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** वाघोबा खिंडीतून दोन तास लागतात.

**जाण्यासाठी उत्तम कालावधी :** सर्व ऋतुत जाता येते.

# आजोबागड

किल्ल्याची उंची :

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग:

जिल्हा : ठाणे

श्रेणी : मध्यम

बालाघाटाच्या रांगेत रतनगड आणि हरिश्चंद्रगड यांच्या मधोमध अगदी कडेला असलेला ‘अजापर्वत’ उर्फ ‘आजोबाचा डोंगर’ एखाद्या पुराण पुरुषाप्रमाणे भासतो. घनदाट झाडाझुडुपांनी नटलेला हा आजोबाचा गड गिर्यारोहकांसाठी एक आगळे वेगळे लक्ष्यच ठरला आहे. या गडाची ३००० फूटांची उभी भिंत ही प्रस्तरारोहकांसाठी एक मोठे आव्हानच आहे.

**इतिहास :** गडाचे नाव आजोबा कसे पडले यावर एक पुराणकथा प्रसिद्ध आहे. याच गडावर बसून वाल्मिकी ऋषींनी ‘रामायण’ हा धर्मग्रंथ लिहिला. याच गडावर सीतामाईने लव आणि कुश यांना जन्म दिला. लव आणि कुश वाल्मिकी ऋषींना ‘आजोबा’ म्हणत असत. म्हणूनच या गडाचे नाव आजोबाचा गड असे पडले अशी कथा सांगितली जाते. येथे गडावर वाल्मिकी ऋषींचा आश्रम व त्यांची समाधीसुद्धा आहे.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** पहिली वाट पकडून वाल्मिकी ऋषींच्या आश्रमापाशी साधारणत: अर्ध्या तासात पोहचावे. वाल्मिकी ऋषींच्या आश्रमाजवळून गडाच्या माथ्यावर जाण्यासाठी वाट नसल्याने आपल्याला मुक्काम आश्रमातच करावा लागतो. येथे गडावर रहाण्यासाठी एक कुटी आहे.जवळच पाण्याचा झरा आहे. जर मुक्कामाचा कार्यक्रम असेल तर जेवणाची सोय आपल्याला घरूनच करून आणावी लागते. आश्रमाजवळून पुढे धबधब्याच्या वाटेने चढत गेल्यास सुमारे एक ते दीड तासानंतर वर एक गुहा लागते. येथे लवकुशाच्या पादुका खडकात कोरलेल्या आहेत. येथे डावीकडे एक पाण्याचे टाके सुद्धा आहे. या गुहेपर्यंत जाण्यासाठी लोखंडी शिड्या देखील लावल्या आहेत. याच मार्गाने आश्रमात परतावे. अशा प्रकारे मुंबईहून येणा-यांसाठी आजोबाचा गड एक निसर्गरम्य अशी दुर्गयात्राच ठरते. गडाच्या माथ्यावर दोन ते तीन पाण्याची टाकी सोडल्यास पहाण्याजोगे विशेष असे काहीच नाही. अनेक दुर्गवीर रतनगड - आजोबाचा गड - हरिश्चंद्रगड असा ४ ते ५ दिवसांचा ट्रेक करतात.

## गडावर जाण्याच्या वाटा :

मुंबईहून आसनगाव रेल्वे स्थानकावर : गडावर जाण्याचा सरळ आणि सोपा मार्ग म्हणजे मुंबईहून आसनगाव रेल्वे स्थानकावर यावे. येथून शहापूर या गावी रिक्षेने अथवा एस.टी. ने यावे.येथून पहाटेच एस.टी ने अथवा जीपने डोळखांब-साकुर्ली मार्गे‘डेणे’ या गावी यावे. ‘डेणे’ गावातून जाताना मध्ये एक पठार लागते. पठारावर तीन वाटा एकत्र येतात. यातील एक बैलगाडीची वाट सरळ वाल्मिकी ऋषींच्या आश्रमापाशी घेऊन जाते. दुसरी वाट कात्राबाईच्या डोंगरात जाते आणि पुढे ‘कुमशेत’ या गावास जाऊन मिळते. तिसरी वाट मात्र जंगलात जाते. या वाटेने न जाणेच श्रेयस्कर.

कल्याण - मुरबाड - माळशेज - डोळखांब या मार्गाने : कल्याण - मुरबाड - माळशेज - डोळखांब या मार्गाने सुद्धा डेणे गावी पोहचता येते.

कसारा - घोटी - राजूर - कुमशेत माग : गडावरचा माथा पहाण्यासाठी कसारा - घोटी - राजूर - कुमशेत मार्गेजाता येते.

**राहण्याची सोय :** गडावरती रहाण्यासाठी आश्रम आहे. यात २० जणांना रहाता येते.

**जेवणाची सोय :** येथे जेवणाची सोय नसल्याने जेवणाचे साहित्य आपण स्वत:च घेऊन यावे.

**पाण्याची सोय :** येथे बारामाही पाण्याचा झरा सतत वाहत असतो.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** एक तास

**सूचना :** गडावर सापांचे फार वास्तव्य असल्याने योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे.

# कोल्हापूर जिल्हा

## पन्हाळगड.

किल्ल्याची उंची : ४०४० फूट
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
डोंगररांग: कोल्हापूर
जिल्हा : कोल्हापूर
श्रेणी : सोपी

महाराष्ट्राच्या इतिहासात शिवरायांना अनन्या साधारण महत्व आहे.त्यांच्या कारकिर्दीतील खरे सोबती म्हणजे अजिंक्य आणि बेलाग किल्ले.शिवरायांच्या जीवातील नाट्यपूर्ण घटनांचा साक्षीदार म्हणजे किल्ले पन्हाळगड.

**इतिहास :** हा किल्ला प्रथम शिलाहार भोज राजा नृसिंह याच्या कारकिर्दीत बांधण्यात आला.हा किल्ला पूर्वी नाग जमातीतील लोकांकडे होता.याचे पहिले नाव 'पन्नग्रालय' .अफजलवधानंर १८ दिवसातच शिवरायांनी हा किल्ला २८-११-१६५९ ला घेतला.किल्ला विजापुरांच्या ताब्यात पडला पण राजांनी तो पुन्हा घेतला.२ मार्च १६६० मध्ये किल्यास सिध्दी जौहरचा वेढा पडला. १६७३ मध्ये कोंडाजी फर्जंद या बरोबर सैन्य पाठवून भेदनितिचा उपयोग करून किल्ला ताब्यात घेतला.पुढे १७१० मध्ये पन्हाळा कोल्हापूरची राजधानी झाली नंतर १८४४ ध्ये किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**गडावरील पहाण्यासारखी ठिकाणे :** १. राजवाडा

हा ताराबाईचा वाडा होय.वाडा प्रेक्षणीय असून यातील देवघर बघण्यासारखे आहे.आज यात नगरपालिका कार्यालय ,पन्हाळा हायस्कूल व मिलटरी बाईज होस्टेल आहे.

२. सज्जाकोठी

राजवाड्यावरून पुढे गेल्यावर ही कोठीवजा इमारत दिसते.याच इमारतीस संभाजी राजांना शिवरायांनी या प्रांताचा कारभार पाहाण्यास ठेवले होते.शिवरायांची गुप्त खलबते येथेच चालत.

३. राजदिंडी

ही दुर्गम वाट गडाखाली उतरते.याच वाटेचा उपयोग करून शिवराय सिध्दी जौहरचा वेढ्यातून निसटले.हीच विशाळगडावर जाणारी एकमेव वाट आहे.याच दरवाजातून ४५ मैलांचे अंतर कापून महाराज विशाळगडावर पोहचले.

४. अंबारखाना

अंबारखाना हा पूर्वीचा बालेकिल्ला.याच्या सभोवती खंदक आहे येथेच गंगा ,यमुना आणि सरस्वती अशी तीन धान्यकोठारे आहेत.यात वरी,नागली आण भात असे सुमारे २५ हजार खंडी धान्य मावत असे.याशिवाय सरकारी कचे-या ,दारुगोळा अणि टाकंसळ वैगरे होती.

५. चार दरवाजा

हा पूर्वेकडील अत्यंत मोक्याचा व महत्वाचा दरवाजा होय.इ.स १८४४ मध्ये हा इंग्रांनी पाडून टाकला.थोडे भग्नावशेष आज शिल्लक आहेत.येथेच 'शिवा काशीद' यांचा पुतळा आहे.

६. सोमाळे तलाव

गडाच्या पेठेलगत हे एक मोठे तळे आहे.तळ्याच्या काठावर सोमेश्वर मंदिर आहे.ह्या मंदिराला महाराजांनी व त्याच्या सहस्त्र मावळ्यांनी लक्ष्य चाफ्यांची फुले वाहिली होती.

७. रामचंद्रपंत अमात्य यांची समाधी

सोमेश्वर तलावापासून थोडे पुढे गेल्यावर दोन समाध्या दिसतात.त्यातील उजवीकडची रामचंद्रपंत अमात्य व बाजूची त्यांच्या पत्नीची.

८. रेडे महाल

याच्याच बाजूला एक आडवी इमारत दिसते त्यास रेडे महाल म्हणतात.वस्तुत: ही पागा आहे मात्र त्यात नंतर जनावरे बांधत म्हणून त्याला रेडे महाल म्हणत.

९. संभाजी मंदिर

त्याच्यापुढे ही एक छोटी गढी व दरवाजा आहे हे संभाजी मंदिर आहे.

१०. धर्मकोठी

संभाजी मंदिरापुढे गेल्यावर ही एक झोकदार इमारत दिसते ती धर्मकोठी .सरकारातून धान्य आणून येथे यथायोग्य दानधर्म करत.

११. अंदरबाव

तीन दरवाज्याच्या वरच्या बाजूला माळावर एक तीन कमानीची ,काळ्या  दगडांची वास्तू दिसते.ही वास्तू तीन मजली आहे.सर्वात तळाला खोल पाण्याची विहीर  आहे ,तर मधला मजला रा पेस आहे त्यातून तटाबाहेर जाण्यासाठी खिडकीवजा चोर दरवाजा दिसतो.

१२. महालक्ष्मी मंदिर

राजवाड्यातून बाहेर पडल्यावर नेहरू उद्यानाच्या खालच्या बाजूस महालक्ष्मी मंदिर आहे.हे गडावरील सर्वात प्राचीन मंदिर आहे.ह्याच्या बांधणीवरून ते साधारण १००० वर्षापूर्वीचे असावे .राजा गंडारित्य भोज याचे हे कुलदैवत होय.

१३. तीन दरवाजा

हा पश्चिमेकडील सर्वात महत्वाचा दरवाजा .दरवाज्या वरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे.इ.स १६७६ मध्ये कोंडाजी फर्जंदने येथूनच अवघ्या ६० मावळ्यानिशी किल्ला जिंकला.

१४. बाजीप्रभुंचा पुतळा

एस टी थांब्यावरून थोडे खाली आल्यावर एका ऐसपैस चौकात वीररत्न  बाजीप्रभुं देशपांडे ह्यांचा आवेशपूर्ण पुतळा आहे.

## गडावर जाण्याच्या वाटा :

१. चार दरवाजा मार्गे

कोल्हापूर शहरातून ‘एस टी’ बसने किंवा खाजगी वाहनाने थेट किल्यावर जाता येते.ही वाट चार दरवाजा मार्गेगडात प्रवेश करते.

२. तीन दरवाजा मार्गे

गडावर जाण्यासाठीचा दुसरा मार्ग तीन दरवाजातून जातो.हा दरवाजा तीन  मजली असून याचे बांधकाम शिसे ओतून केलेले आहे

**राहण्याची सोय :** किल्ल्यावर राहण्यासाठी निवसस्थाने ,हॉटेल्स आहेत.

**जेवणाची सोय :** निवासस्थानांमध्ये होते.

**पाण्याची सोय :** किल्ल्यावर बारामही पिण्याच्या पाण्याची सोय आहे.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :** कोल्हापूर मार्गेगाडी रस्त्याने १ तास.

**जाण्यासाठी उत्तम कालावधी :** सर्व ऋतुत.